म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८१६

# प्रिय आणि अप्रिय

लेखक

अनंत काकबा प्रियोळकर

REFBK-0014403
REFBK-0014403

मराठवाडा बुक कंपनी : पुणें

७१५७९ संदर्भ
२६।३।७०। निबंध
~~निबंध~~
१८१६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७१५७९ वि: निबंध.
क्रमांक १८१६ नोंद दि २६/३/७०

# प्रिय आणि अप्रिय

# प्रिय आणि अप्रिय

मराठी ग्रंथ
दा. क्र. १४४०३

लेखक
अनंत काकबा प्रियोळकर

REFBK-0014403

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणें

पहिली आवृत्ति : १९६५

सर्व हक्क सुरक्षित

किंमत सात रुपये

मुद्रक :
**हरि महादेव गद्रे**
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार, पुणें २

प्रकाशक :
**अ. ज. प्रभु**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६९५१९ दि: ११८८५
क्रमांक ९८९६ नों: दि: २६/३/६०

परमपूज्य मातु:श्री

कै. सौ. पार्वतीबाई प्रियोळकर

यांस

समर्पण

# प्रस्तावना

## प्रवाहपतिताचें निवेदन

माझ्या निवडक लेखांचा संग्रह प्रसिद्ध करावा, अशा प्रकारची सूचना, भारतीय महिलाविद्यापीठाच्या परीक्षकांच्या सभेला एकदा गेलों असतां, कै. वामन मल्हार जोशी यांनीं कांहीं वर्षांपूर्वीं मला प्रथम केली. त्यावेळीं 'सावरकर-काव्य-समालोचन' हें पुस्तक नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें (१९४३). त्यांतील सावरकरांच्या 'गोमंतक' काव्यावरील माझा लेख वाचून त्यांना ही सूचना करावीशी वाटली असावी, असा माझा तर्क आहे. म. म. दत्तोपंत पोतदार यांनींही 'विविधवृत्ता'च्या दिवाळी अंकांतील सेंट झेवियरवरील माझा लेख वाचून, अशासारखे आपले लेख कोणी एकत्र छापील तर 'तें एक उपयुक्त कार्य होईल' असा मजकूर लिहिलेलें १९५२ मधलें पत्र, जुने कागदपत्र चाळतांना परवांच पुनः माझ्या नजरेस पडलें. माझे एक स्नेही डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं तर माझे संशोधनात्मक लेख एकत्र स्वतंत्र रूपानें छापून प्रसिद्ध व्हावे असा अनेकवार आग्रह केला.

'तुमचा लेखसंग्रह प्रसिद्ध करा', अशी सद्भावना व्यक्त करणारे मित्र पुष्कळ भेटले; परंतु 'तुमचा लेखसंग्रह मी प्रसिद्ध करतों,' असें म्हणून पुढें आलेला प्रकाशक मात्र परवांपर्यंत मला कोणी भेटला नव्हता. अलीकडेच पुण्यांतील 'विदर्भ मराठवाडा बुक कंपनी' या प्रकाशनसंस्थेचे उत्साही चालक, श्रीयुत अ. ज. प्रभु यांचा परिचय झाला. त्यांनीं माझे लेख प्रसिद्ध करण्याची इच्छा दर्शविली. त्यांच्या हौसेमुळें आणि मजवरील त्यांच्या लोभामुळें माझ्या कांहीं हितचिंतकांची व चाहात्यांची इच्छा आज मूर्त स्वरूपांत येत आहे.

मी लेखक बनलों हा केवळ अपघात होय. पुढेंमागें मी एक चांगला चित्रकार होईन, अशा प्रकारच्या अपेक्षा कांहीं मंडळींच्या मनांत निर्माण झाल्या होत्या. मराठी प्राथमिक शाळेंत असतांना पाटीवर चित्रें काढतांना पुष्कळ वेळां पकडलों गेल्यामुळें, तात्यापंतोजींच्या हातचा मार मला खावा लागला होता. १९१० सालीं गोमंतकामध्यें प्रजासत्ताक राज्य स्थापन झाल्यावर कै. दत्तात्रय विष्णु आपटे व पुण्याचे कॉंग्रेससेवक हरि गणेश फाटक यांनीं फोंडें येथें एक इंग्रजी शाळा उघडली. तिच्यामध्यें मी एक विद्यार्थी होतों. एकदा वर्ग चालू असतांना आमचे वर्गशिक्षक गु. हरिभाऊ फाटक यांचें मीं चित्र काढलें. शेजारच्या मुलानें त्यावर एकदम झडप घालून फाटकांकडे नेऊन तें सादर केलें. मास्तर मला शिक्षा करतील, अशी त्याची अपेक्षा; पण झालें उलटेंच. चित्रकलेंतील माझी गति पाहून त्यांनीं माझी

स्तुति केली, आणि पुढें वेळोवेळीं ते मला चित्रकलेचें सामान पुरवूं लागले. माझ्यामुळेंच संस्थेतर्फे चित्रकला आणि इतर हस्तोद्योग यांचीं प्रदर्शनें दरवर्षी भरविण्याची कल्पना निघाली असावी. म्हापसें येथें भरलेल्या एका प्रदर्शनांत मला बक्षीसही मिळालें होतें. धारवाडला कॉलेजांत असतांना चित्रकलेच्या परीक्षेला बसावें, असें मला वाटलें. तेथील कर्नाटक हायस्कुलांत नेर्लेकर नांवाचे एक ड्रॉइंगमास्तर होते. त्यांच्याकडे जाऊन 'मला ड्रॉइंगच्या परीक्षेला बसावयाचें आहे; मला तुम्हीं ड्रॉइंग शिकवाल काय,' असा मीं त्यांना प्रश्न केला. माझी या कलेंत पूर्वतयारी कितपत आहे हें पाहाण्याकरितां, त्यांनीं मला साधें पेन्सिलीचें आणि वॉटरकलरचें अशीं दोन चित्रें काढावयास लाविलीं. तीं पाहिल्यावर ते म्हणाले, " तुम्हांला शिकण्याचें कारण नाहीं. लवकरच थर्डग्रेडची परीक्षा होणार आहे. उमेदवार म्हणून मीं तुमचें नांव नोंदवितों. तुम्हीं एकदम परीक्षेच्या दिवशीं या. "

परीक्षेच्या पहिल्या दिवशीं, चित्र काय काढावयाचें हें मला रा. नेर्लेकर सांगूं लागले. तें पाहून हायस्कूलचे हेडमास्तर त्यांच्यावर संतापले. नेर्लेकर म्हणाले, " ही इतर परीक्षांसारखी परीक्षा नाहीं. प्रश्नांचीं उत्तरें त्यांना मी सांगत नाहीं. त्यांनीं चित्रकलेच्या शाळेंत कधींच पाय न ठेवल्यामुळें आजच्या कार्यक्रमाची त्यांना माहिती देतों. त्यांना चित्र मी काढून देत नाहीं. तसें करण्याचें कारणही नाहीं, हें तुम्हांला लवकरच दिसून येईल. "

मी चित्र काढतांना हेडमास्तरसाहेब मधून मधून येत व माझें चित्र पाहून गालांत हंसत. दिलेल्या वेळेच्या आंतच मी चित्र पुरें करून मोकळा झालों. चित्र पाहून हेडमास्तर खूष झालेले दिसले. दुसऱ्या दिवशीं परीक्षेचा कार्यक्रम सांगतांना नेर्लेकरांना त्यांनीं विरोध केला नाहीं. या परीक्षेंत मी पास होऊन मला बक्षीसही मिळालें होतें.

मीं जर चित्रकलेची उपासना चालू ठेविली असती, तर आमच्या कांहीं प्रांतबंधूंनीं ज्याप्रमाणें या व्यवसायांत भरघोंस यश संपादलें आहे, तसें कदाचित् मलाही लाभलें असतें; परंतु चित्रकला हा एक छंद आहे, उपजीविकेचें तें साधन होऊं शकत नाहीं, अशी त्या काळीं माझी समजूत होती. चित्रकलेला व्यवसाय या दृष्टीनें विशेष महत्त्व अलीकडेच प्राप्त झालें आहे.

कुंचली जाऊन माझ्या हातांत लेखणी येण्याचें दुसरें एक कारण असें कीं, चित्रकलेची उपासना ही महाग पडते. कागद, शाई व लेखणी एवढ्यावर लेखनाचें भागतें. चित्रकलेची साधनें महाग असतात. तीं कुठेंही मिळूं शकतात असें नाहीं. आमचे बंधु, 'स्वयंसेवक' नांवाचें एक मासिक

प्रसिद्ध करीत असत. त्याच्यामध्यें मी अधूनमधून लिहूं लागलों. मासिक घरचेंच असल्यामुळें लेख ‘ साभार परत ’ येण्याची भीति नव्हती. गोमंतकांत ‘ भारत ’ नांवाचें एक साप्ताहिक पत्र प्रसिद्ध होत असे. त्याकडे खरें नांव न कळवितां मी लेख पाठवूं लागलों. ते प्रसिद्ध होऊं लागले, आणि पुढें पुढें तर अग्रलेख म्हणूनही त्यांना स्थळ मिळूं लागलें ! या लेखांचा कर्ता कोण, हें बऱ्याच दिवसांनंतर संपादकाला आमच्या बंधूकडून कळलें. अशाप्रकारें लेखनासंबंधीं हळुहळू आत्मविश्वास निर्माण होऊं लागला आणि त्याबरोबरच चित्रकलेचा विसर पडत चालला. एकादें चित्र तयार केलें तर त्याचें पुढें काय, हा प्रश्न असे. तें कोणी विकत घ्यावयास तयार नव्हता, आणि प्रसिद्ध होण्याची आशा तर नव्हतीच.

पुढें शिक्षणाकरितां कर्नाटक कॉलेजांत धारवाडास गेल्यावर कॉलेजच्या ‘ मॅगेझिन ’ मध्यें मी लेख लिहूं लागलों. प्रा. अ. बा. गजेंद्रगडकर त्यावेळीं त्याचे संपादक होते. त्यांनीं माझ्या लेखांचें कौतुक केलें आणि वेळोवेळीं उत्तेजन दिलें. कॉलेजचे सायन्सचे प्रोफेसर श्रीयुत देवलाळकर हे ‘ विविध-ज्ञानविस्तारा ’ चे वर्गणीदार होते. त्यांच्याकडून तें मासिक आणून मी वाचीत असें. इंटरच्या वर्गांत असतांना ‘ विस्तारा ’कडे मीं एक लेख प्रसिद्धीकरितां पाठविला. तो तेव्हांचे संपादक रावसाहेब मोरमकर यांनीं स्वीकारला. इतकेंच नव्हे, तर ‘ विस्तारा ’ करितां असेच आणखी लेख पाठवावे, अशी आग्रहाची इच्छा पत्रद्वारें प्रदर्शित केली. धारवाडहून मी बी. ए. च्या सीनियर वर्गांत सांगलीला विलिंग्डन कॉलेजांत गेलों. तेथें माझा व कै. डॉ. पां. दा. गुणे यांचा निकट संबंध आला. कोंकणी-मराठी प्रश्नामुळें माझें भाषाशास्त्राकडे आधीं लक्ष होतेंच. डॉ. गुण्यांच्या सहवासामुळें या विषयाकडे मी जास्त आकर्षिला गेलों. पाठचिकित्साशास्त्राकडेही त्यांनींच प्रथम माझें लक्ष वेधलें. या वेळीं गद्य लेखांबरोबर माझ्या कविताही प्रसिद्ध होत. त्या वेळच्या ‘ नवयुग ’ मासिकांतही माझ्या दोन लेखांस प्रसिद्धि मिळाली होती. बी. ए. झाल्यावर ‘ विविधज्ञानविस्तार ’ व ‘ विविध-वृत्त ’ यांच्याशीं माझा कसा संबंध आला, याचा अल्प इतिहास प्रस्तुत लेखसंग्रहांतील क्रमांक ८ व ९ या निबंधांत सांपडेल.

मुंबईतील माझ्या वास्तव्यांत ‘ मनोरंजना ’चे संपादक श्री. विठ्ठल जिवाजी नाडकर्णी व प्रो. वसंतराव नाईक यांच्या इच्छेवरून मीं त्या मासिकांत लेख, कविता व गोष्टी लिहिल्या. ‘ महाराष्ट्र साहित्य ’ वगैरे मासिकांतही माझें गद्य-पद्य लिखाण त्या काळीं प्रसिद्ध झालें आहे.

मीं जें आजपर्यंत कांहीं लिहिलें त्याच्या प्रती संग्रहीं जपून ठेवण्याची मीं

कधीं काळजी घेतली नाहीं. त्यामुळें मीं आतांपर्यंत काय लिहिलें, त्याचें मलाच संशोधन करावें लागेल ! माझे एक चाहाते व हिंतचिंतक, पुण्याच्या भांडारकर रिसर्च इंस्टिटयूटचे क्युरेटर श्री. पी. के. गोडे, माझ्या मुद्रित ग्रंथांची आणि लेख, कविता, वगैरेची कालानुक्रमें सूची तयार करावी असें मला नेहमीं सांगत. त्यांनीं स्वत: आपल्या निबंधांच्या सूचीच्या अशा तीन आवृत्त्या प्रसिद्ध केल्या होत्या. या कामीं वेळेच्या अभावाची सबब जेव्हां एकदा मीं पुढें केली, तेव्हां ते म्हणाले, "तुम्ही आपल्या पीएच्. डी. च्या एकाद्या विद्यार्थ्याला 'प्रियोळकर व त्यांचें वाङ्मय' असा प्रबंधाकरितां विषय द्या; म्हणजे अशी सूचि आपोआपच तयार होईल !" ही सूचना विनोद म्हणून त्यांनीं केली असावी, म्हणून मीं त्यांना तसेंच उत्तर दिलें. "आम्हीं जर आमच्या वाङ्मयाच्यां अशा सूच्या तयार करून ठेविल्या तर भावी पिढीला संशोधनाला कामच राहाणार नाहीं !" अलीकडे विद्यमान व्यक्तींवर प्रबंध लिहिले जातात व ते पदवीकरितां मान्यही होतात. त्यामुळें महामहोपाध्याय पां. वा. काण्यांसारखे विद्वान, पीएच्. डी. पदवी अजिबात काढून टाकावी, अशी सूचना करूं लागले आहेत.

प्रस्तुत निबंधसंग्रहांत समाविष्ट केलेल्या बहुतेक लेखांच्या प्रती माझ्या कांहीं चाहात्या स्नेह्यांकडून मिळाल्या. अशा प्रकारच्या (१) संकीर्ण निबंधांचे आणखी एक-दोन भाग तयार होतील. याशिवाय (२) गोमंतकासंबंधींचे लेख, (३) मुंबईविषयींचे लेख, (४) महाराष्ट्राच्या एकीकरणासंबंधींचे लेख, (५) गोष्टी, (६) नाटिका, (७) विनोदी लेख, (८) कविता, (९) संशोधनात्मक निबंध, (१०) कादंबरी, (११) पुस्तक-परीक्षणें व नाट्यप्रयोग-परीक्षणें, (१२) इतरांच्या ग्रंथांस लिहिलेल्या प्रस्तावना, (१३) रेडियोवरील भाषणें, (१४) वाङ्मयात्मक वादंगें, (१५) विविधवृत्तांतील संपादकीय लेख, (१६) जेजुईट वाङ्मयासंबंधींचे लेख, (१७) नवीन पुढें आणलेले प्राचीन मराठी कवि, (१८) ढोंगी लोकांचा दंभस्फोट करणारे लेख, (१९) ग्रंथ, ग्रंथशास्त्र व ग्रंथालयें यासंबंधींचे लेख, (२०) इंग्रजी लेख, असे प्रत्येक विषयावरचे लहान मोठे स्वतंत्र खंड होतील. यांपैकीं संशोधनात्मक लेख सोडून इतर बहुतेक वाङ्मय निनांवीं किंवा टोपण नांवानें असल्यामुळें तें शोधून काढणें बरेंचसें कष्टाचें व कठीण काम आहे.

गुजराती भाषा व अर्वाचीन इतिहास यांच्या संशोधनाकडेही माझें लक्ष्य एकेकाळीं बरेंच वेधलें होतें. दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्राचें संपादन व त्यांच्या उत्तरचरित्राचें लेखन करतांना गुजराती वाङ्मयाचें

पुष्कळसें वाचन मला करावें लागलें. त्यावेळीं मुंबई येथील फोर्बस गुजराती सभेचे अध्यक्ष दि. ब. कृष्णलाल जव्हेरी यांचा माझा परिचय झाला. त्यांच्या आग्रहावरून या सभेपुढें "गुजराती मुद्रणाचें आदि पर्व" आणि "मानवधर्मसभा व दुर्गाराम मंछाराम" या विषयांवर मीं दोन निबंध वाचले. ते त्यांना इतके आवडले कीं, चालकांपैकीं एका गृहस्थानें दुसऱ्या व्याख्यानाच्या शेवटीं उठून "आमचें तुम्हांला कायमचें निमंत्रण आहे. आधीं कळवून वाटेल त्या दिवशीं तुम्हीं येथें येऊन निबंध वाचीत जा," असें सांगितलें.

एकाद्याला व्याख्यान द्यावयाला बोलावणें किंवा त्याचा लेख स्वीकारणें म्हणजे त्यावर उपकार करणें किंवा त्याला पुढें आणणें, अशी त्याकाळीं महाराष्ट्रीयांमध्यें समजूत होती. माझें पहिलें निबंधवाचन झालें, त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं, फोर्बस सभेचे कार्यवाह श्री. शंकर प्रसाद रावळ माझ्या घरीं आले आणि माझ्या हातावर त्यांनीं पन्नास रुपयांचा चेक ठेवला. "हा कसला चेक," असें विचारतां "कालच्या निबंधवाचनाबद्दल मानधन," असें त्यांनीं सांगितलें. यापूर्वीं अशा निबंधवाचनाबद्दल किंवा लेखाबद्दल कोणी कधीं मला मोबदला दिला नव्हता. त्यामुळें हे पैसे घ्यावयाला मी प्रथम खुषी नव्हतों. पुढें त्यांच्या आग्रहावरून मीं त्याचा स्वीकार केला. दुसऱ्या निबंधवाचनाच्या दिवशीं लगेच त्यांनीं मला पुनः पन्नास रुपयांचा चेक दिला.

गुजराती प्रेसचे मालक व 'गुजराती' वृत्तपत्राचे संपादक रा. नटवरलाल देसाई, माझ्या मराठी लेखांचीं भाषांतरें करून आपल्या पत्रांत प्रसिद्ध करूं लागले.

'वक्तृत्वा अवधानाचा होय चारा,' असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. गुजराती बांधवांच्या या सहानभूतीचा चारा असाच चालू राहाता, तर कांहीं काळानें माझा काका कालेलकर बनला असता! परंतु मध्येंच एक अपघात झाला, त्याच्यामुळें माझा गुजरातीचा नाद सुटला.

'विविधवृत्ता'च्या दिवाळीच्या खास अंकांत 'मुंबईतील गुजराती व मराठी' या विषयावर मी एक लेख लिहिला होता. त्यांत गुजराती लोकांचा-संबंध मुंबईशीं केव्हां व कसा आला, याचें साधार वर्णन केलें होतें. संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न त्यावेळीं जोरांत होता. माझा लेख वाचून एका गुजराती संशोधक 'साक्षरा'चें पित्त भडकलें. 'तुम्हीं प्रियोळकरांचें एवढें कौतुक करतां; परंतु ते Anti-Gujarati आहेत' असें जाऊन त्यांनीं दि. ब. जव्हेरींना म्हटल्याचें स्वतः फोर्बस सभेच सेक्रेटरीच एकदा सहज

माझ्याशीं बोलले. त्याच वेळीं मीं निश्चय केला कीं, इतउत्तर फोर्बस सभेपुढें कधीं निबंध वाचावयाचा नाहीं आणि वाचला तर मानधन स्वीकारावयाचें नाहीं. पूर्वीं स्वीकारलेल्या पैशांमध्यें त्याच्या कितीतरी पटींनीं आणखी भर घालून मीं दुर्मिळ गुजराती ग्रंथ विकत घेतले होते. १८६७ पूर्वींचीं पुस्तकें त्यांत सुमारें दोनशें होतीं. तीं इतर कांहीं दुर्मिळ आद्यमुद्रितांसह मीं अलीकडे मुंबई विद्यापीठाला देणगीदाखल दिलीं आहेत.

फोर्बस गुजराती सभेपुढें वाचलेले उपर्युक्त दोन निबंध मराठीमध्यें प्रथम मीं लिहिले. सभेचे चालक त्यांचें गुजराती भाषांतर करून देत व पुढें ते मी वाचीं. गुजराती फोर्बस सभेच्या त्रैमासिकांत ते प्रसिद्धही झाले आहेत.

स्वतः गुजरातींत लिहिण्याचा सराव मी त्यावेळीं नुकताच करीत होतों. दीडदोन वर्षांनीं मला संशोधनाच्या कामापुरतें गुजराती चांगलें लिहितां आलें असतें. अर्वाचीन गुजराती वाङ्मयाची निर्मिती मराठीप्रमाणेंच प्रथम मुंबईत झाली आहे. त्याच्या इतिहासाला उपयोगीं पडण्यासारखे कितीतरी कागदपत्र मुंबईच्या सरकारी दप्तरांत व पुण्याच्या डायरेक्टर ऑफ एज्यु-केशनच्या दप्तरांत आहेत. अर्वाचीन मराठीच्या इतिहासाचा शोध करतांना हे गुजरातीचे कागदपत्रही माझ्या दृष्टीखालून गेले आहेत. त्यांचा उपयोग करून अर्वाचीन गुजराती वाङ्मयाच्या इतिहासावर मी नवा प्रकाश पाडूं शकलों असतों. याच हेतूनें मी गुजराती आद्यमुद्रितें विकत घेत असें. दिवाणबहादूर मुंबई युनिव्हर्सिटीच्या सभांच्या वेळीं गांठ पडली म्हणजे निबंधवाचनाची मला नेहमी आठवण करून देत. त्यांच्या मृत्यूच्या आधीं कांहीं दिवस, लायब्ररीकमिटीच्या एका सभेच्या वेळीं, “ निबंध केव्हां वाचतां ? ” असा त्यांनीं मला प्रश्न केला. “ मराठींत वाचला तरी चालेल, ” असेंही ते म्हणाले. त्यावेळीं ‘ तुमच्या गुजराती प्राध्यापकांना कां सांगत नाहीं ? ’ असा त्यांना मीं प्रश्न केला. ते मला म्हणाले, “ They are *cachchas* ” महाराष्ट्रसरकारच्या दप्तरांतील हे गुजरातीसंबंधींचे कागदपत्र स्वतंत्र पुस्तक-रूपानें प्रसिद्ध केल्यास तें एक मोठें कार्य होईल. विद्यमान गुजराती प्राध्या-पकांचें इकडे लक्ष्य जाईल काय ?

गुजरातींत व हिंदींत भाषांतरित झालेल्या माझ्या लेखांचा एक स्वतंत्र खंड होण्यासारखा आहे.

प्रस्तुत पुस्तकांत प्रसिद्ध झालेला, “ भारतांतील दोन महात्मे : चक्रधर व गांधी ” हा पहिलाच लेख ‘ गुजराती ’ पत्राच्या १९४६ सालच्या दिवाळी अंकांत गुजराती भाषांतररूपानें प्रथम प्रसिद्ध झाला होता. पुढें १९४७ सालीं दिवाळी अंकाकरितां ‘ यशवंत ’ मासिकाच्या संपादकांनीं लेखाची

मागणी केली, त्यावेळीं मूळ मराठी हस्तलिखित माझ्या संग्रहीं होतें, तें मीं त्यांच्या हवालीं केलें. या लेखाच्या शेवटीं महात्मा गांधींसंबंधीं लिहितांना "त्यांचा स्वाभाविक अंत न होतां ते असेच (म्हणजे चक्रधराप्रमाणें) लोकविलक्षण पद्धतीनें काळाच्या पडद्याआड होतील," अशी शंका मीं प्रदर्शित केल्याचें दिसून येईल. ती पुढें दुर्दैवानें १९४८ च्या जानेवारींत खरी ठरली !

'गुजराती' पत्राच्या १९४६ च्या दिवाळी अंकामध्यें जरी हा लेख प्रथम प्रसिद्ध झाला, तरी त्याच्याही पूर्वीं कधींतरी प्रार्थनासमाजाच्या एका वार्षिकोत्सवाच्या प्रसंगीं 'वानर, नर, नारायण' या विषयावर मीं जें भाषण केलें त्याचा तो उत्तरार्ध किंवा उत्तररंग होता.

प्रस्तुत लेखसंग्रहांत प्रसिद्ध झालेले बहुतेक लेख, दिवाळीच्या किंवा दुसऱ्या कसल्या तरी खास अंकांत प्रसिद्ध झालेले वाचकांना आढळून येतील. गंभीर प्रकृतीचे वाचक अशा खास अंकांतील लेख वाचीत नसतात, अशी माझी कल्पना आहे. त्यांचा वाचक ललितवाङ्मयाचा भोक्ता असतो. त्यामुळें मतप्रचाराच्या दृष्टीनें खास अंकांतील गंभीर लेख वायां जातात. पुष्कळसे संशोधनात्मक गंभीर विचार शर्करावगुंठित क्विनाइनच्या गोळ्यांप्रमाणें विनोदाच्या किंवा लालित्याच्या वेष्टनाखालीं मीं वाचकांच्या गळीं उतरविण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु 'संशोधक' म्हणून माझें नांव कुप्रसिद्ध झालेलें असल्यामुळें, त्यांमध्यें कांहीं लालित्य आढळलें तरी साधारण वाचक तें वेदशास्त्रजडच मानणार ! कांहीं विनोदी लेखक म्हणून प्रख्यात असलेले वक्ते चुकून कधींतरी गंभीरपणानें बोलूं लागले म्हणजे कांहीं आचरट श्रोते त्यांत विनोद आहे असें समजून निष्कारण हंसूं लागतात. (त्यांच्या या हंसण्यानें मात्र विनोद निर्माण होतो !) त्याच्या अगदीं उलट प्रकार माझ्या बाबतींत होण्याचा संभव आहे. साहित्यसंमेलनाचा नियोजित अध्यक्ष म्हणून झालेल्या एका सत्कारप्रसंगीं, माझ्या लेखनाच्या विविधत्वाविषयीं निर्देश ऐकून एक श्रोते म्हणाले कीं, 'वामन एक कीं अनेक,' असा जसा सध्यां वाद चालू आहे, तसा भावी काळांत 'प्रियोळकर एक कीं अनेक' असा वाद निर्माण होईल ! या 'विविध' पणांत माझ्या लेखनकौशल्यापेक्षां अगतिकत्वाचाच जास्त भाग आहे. ज्या परिस्थितींत मी सांपडलों त्या परिस्थितीप्रमाणें माझ्या हातून लेखन झालें. म्हणून या प्रस्तावनेला 'प्रवाहपतिताचें निवेदन,' असें नांव द्यावेंसें मला वाटलें.

कै. श्री. गोडे यांनीं सुचविल्याप्रमाणें माझ्या समग्र वाङ्मयाची कालानुक्रमानें सूचि तयार करण्याची माझी मनीषा आहे. प्रकृति चांगली राहिली

आणि सवड मिळाली तर हें काम माझ्या हातून होईल; मग पुढें तें वाङ्मय प्रसिद्ध होवो अगर न होवो. गांधी, नेहरू यांच्यासारख्या थोर माणसांचा कोणताही लेखच काय, पण अर्धवट वाक्यही रक्षणीय आणि जशाचें तसें मुद्रित होण्यासारखें असतें. माझ्यासारख्या सामान्य माणसाच्या बाबतींत तसा प्रकार नाहीं. प्रस्तुत संग्रहांत हाताशीं मिळालेले कांहीं लेख समाविष्ट केले. त्यांच्यांतील प्रत्येक लेख संग्राह्य आहे किंवा वाचकाला आवडेलच असें नाहीं. वाचकांच्या मनोवृत्तीप्रमाणें कांहीं लोकांना सर्वच लेख प्रिय होतील, कांहींना सर्वच अप्रिय होतील. कांहीं लोकांना कांहीं प्रिय तर कांहीं अप्रिय वाटतील. म्हणून या संग्रहाला नांव काय द्यावें, या विचारांत असतांना " **प्रिय आणि अप्रिय** " असें एका स्नेह्यांनीं नांव सुचविलें तें मीं तावडतोब मान्य केलें. त्यांच्या या सूचनेच्या मुळाशीं कदाचित् निराळीच गोम असेलही !

—अ. का. प्रियोळकर

ता. ५–९–६५
सरस्वती बिल्डिंग, केनेडी ब्रिज, मुंबई ४

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | प्रस्तावना | ७ |
| १ | भारतांतील दोन महात्मे – चक्रधर व गांधी | १७ |
| २ | यजुर्वेदी ब्राह्मण | ३० |
| ३ | आपलीं नांवें आणि आडनांवें | ४६ |
| ४ | ग्रंथ, ग्रंथप्रेम व ग्रंथवेड | ६४ |
| ५ | बापांवर बेट्यांचा बहिष्कार | ७९ |
| ६ | चमत्कारांचा चमत्कार | ८९ |
| ७ | जुन्या काळच्या शाळांतील शिक्षेचे प्रकार | ९६ |
| ८ | " श्रेष्ठ धर्म कुठला बोला ? " | १०६ |
| ९ | कादंबरीलेखनाच्या फंदांत मी कसा अडकलों ? | ११७ |
| १० | माझे कांहीं टीकाकार | १२६ |
| ११ | " गाईला घांस घाला ! " | १३८ |
| १२ | " माझें मोठें पहा ! " | १४६ |
| १३ | संशोधनाचें संशोधन | १५२ |
| १४ | कानडा विठ्ठल | १६२ |
| १५ | विलक्षण आत्मयज्ञ : सती | १६८ |
| १६ | महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र | १८९ |


### चित्रें

पृष्ठ ६४ व ६५ यांच्यामध्यें स्वतंत्र सहा पृष्ठें आद्यमुद्रितांच्या चित्रांचीं आहेत.

दा. क्र. 98803

## भारतांतील दोन महात्मे-चक्रधर व गांधी

निरनिराळ्या देशांचे वेगवेगळ्या काळचे इतिहास वाचतांना त्यांमध्यें आपणांस कांहीं ठिकाणीं मौजेचीं व विलक्षण साम्यस्थळें आढळतात. त्यावरून एक दुसऱ्याची केवळ नक्कल आहे अशी समजूत करून घेण्यास, विशेषतः कांहीं उतावीळ व पूर्व-ग्रहदूषित वृत्तीच्या लोकांस चांगलीच संधि मिळते. वाल्मीकीनें आपलें रामायण होमरच्या इलियडवरून लिहिलें हा डॉ. वेबरचा शोध, किंवा गीता ही केवळ बायबलची नक्कल आहे हें डॉ. लॉरिन्सर याचें संशोधन, या गोष्टी भ्रांत बुद्धीचे दोन उत्कृष्ट नमुने म्हणून पुढें करतां येतील. इसापाच्या करडानें ज्याप्रमाणें लांडग्यास गढूळ पाणी खालून वर जाणें शक्य नाहीं असें सांगितलें, त्याप्रमाणें न्या. मू. काशिनाथपंत तेलंगांनीं या दोघांही पाश्चात्य पंडितांना समर्पक उत्तरें देऊन, उसनवारी झालीच असेल तर हे पंडित म्हणतात त्याच्या उलट दिशेनें झाली असली पाहिजे, हें उत्कृष्ट रीतीनें दाखवून दिलें. बौद्ध धर्म व ख्रिस्ती धर्म यांच्यामध्येंही अशींच विलक्षण साम्यें आहेत, ही गोष्ट पंडित मॅक्समुल्लर यांनीं मान्य केली असून त्यांच्या परस्पर संबंधाचा आपणांस उलगडा मात्र करतां येत नाहीं, असें ‘ India what can it teach us ? ’ या ग्रंथांत म्हटलें आहे. **यशोदा-कृष्ण** व **येशु-क्रिस्त** यांच्या-विशेषतः पूर्वचरित्रामध्यें तर कमालीचा सारखेपणा आहे. कृष्णाचा जन्म बंदिशाळेंत तर ख्रिस्ताचा जन्म गोशाळेंत असहाय स्थितींत होतो. कंसरायाच्या भयानें बाळकृष्णाला वसुदेव गोकुळामध्यें नेऊन ठेवतो, तर हेरोदरायाच्या भयानें बाळ ख्रिस्ताला घेऊन मेरी व जोसेफ मिसर देशामध्यें पळून जातात. कंस ज्याप्रमाणें कृष्ण म्हणून मथुरेंतील लहान मुलांस ठार करतो त्याप्रमाणें हेरोदही बेथलहेम व त्याच्या आसपासच्या प्रांतांतील दोन वर्षांचीं व त्याच्या खालील वयाचीं मुलें मारून टाकतो ! हें जें साम्य ती एक दुसऱ्याची नक्कल कीं केवळ इतिहासाची पुनरावृत्ति, हें कोणी सांगावें ? परंतु तेराव्या शतकांतील व विसाव्या शतकांतील अशा दोघां महात्माजींचें जें आपणांस मी साम्य दाखविणार आहें, ती मात्र एक दुसऱ्याची नक्कल नसून इतिहासाची केवळ पुनरावृत्तिच आहे.

## माजी महात्म्याचें दर्शन

तेराव्या शतकामध्यें, म्हणजे ज्ञानेश्वरी लिहिली जाण्याच्या कांहीं वर्षें अगोदर, गुजरात देशामध्यें भरवच ( सध्यांचा भडोच ) या भागावर त्रिमल्लदेव नांवाचा एक राजा राज्य करीत असे. त्याचा विशालदेव नांवाचा एक प्रधान होता. त्याला प्रथम संतान नव्हतें. पुढें नवसासायासांनीं त्याला मुलगा झाला. त्याचें नांव हरिपाल असें ठेवण्यांत आलें. तेराव्या शतकांतील महात्माजी म्हणून ज्याची माहिती सांगावयाची तो पुरुष हाच होय. यानें पुढें जो पंथ स्थापिला, त्याचें नांव '**महात्मा**–पंथ' असेंच होतें. सोयीकरितां या महात्म्याचा निर्देश 'माजी महात्मा' व विसाव्या शतकांतील महात्माजीशीं त्याचें साम्य दाखवितांना गांधीजींचा उल्लेख 'आजी महात्मा' असा करूं. महात्मा गांधी हे माजी महात्म्याप्रमाणेंच गुजरातच्या एका संस्थानांतील दिवाणाचे पुत्र आहेत. त्यांनींच आपल्या आत्मचरित्रामध्यें कथन केल्याप्रमाणें ते लहानपणीं विलक्षण नादी होते. माजी महात्म्यानें आत्मचरित्र लिहिलें नसल्यामुळें त्याची तपशीलवार माहिती मिळत नाहीं. या दोघांचींही लग्नें लहान वयांत झालीं. आजी महात्म्याच्या कुटुंबाचें नांव कस्तुरबा तर माजी महात्म्याच्या पत्नीचें नांव कमळाइसा. माजी महात्म्याचें आत्मचरित्र उपलब्ध नसलें तरी त्याच्या शिष्यांनीं लिहून ठेवलेल्या आठवणी-वजा 'लीळा' प्रसिद्ध आहेत. या 'लीळां'ची भाषा ज्ञानेश्वरकालीन आहे. त्यांतील कांहीं भाग येथें उद्धृत करतों; म्हणजे माजी महात्माही कसा नादी होता हें आपणांस कळेल व त्या काळच्या गद्य मराठीचें स्वरूपही आपणांस समजून येईल:—

'गोसावी ( माजी महात्मा ) गुजराथेचेंया प्रधानाचे कुमरु : गोसावी सारीचें जूं ( द्युत ) खेळती : जींकती : म्हणौनि : हारी स्वीकरली : बहुत द्रव्य हारविलें : जुआरीं म्हणीतलें : 'जि जि हारविलें असे तें वीचिजो : दीजो : मग खिळिजो : ' मग गौसावीं तेथौनी बीजें ( गमन ) केलें : दारवठां जुवारीं म्हणीतलें : 'जि : जि : गोसावी : आमुचें आधीं देयावें : मग भीतरी बीजें करावें : ' सर्वज्ञें ( माजी महात्मा ) म्हणीतलें : 'तुमचें दीधलेयावीण हें ( मी, गोमंतकी–'हांव' ) आरोगण ( भोजन ) करी तरी गोपाळण्ही 'आन' ( शपथ ) : गोसावीं भीतरी बीजें केलें : कमळाइसातें म्हणीतलें : 'आपुला अळंकारू आणा ' : तेहीं म्हणीतलें : 'कां ?' : 'एथौनि जूं हारविलें : तयांतें म्हणीतलें : तुमचे दिधलेयावीण हें ( मी ) आरोगण करी तरी गोपाळण्ही आन ' : कमळाइसीं म्हणीतलें : 'आह्मीं देवों तरि आम्हांइ तेचि आन : ' मग गोसावीं उपरियेवरी ( माडीवर ) पहुड स्वीकरीला : माता उठवावेया आली : गोसावी

नुठती : मग माता कमळाइसातें पुसों लागली : तेहीं मागील वृत्तांतु सांघीतलें : प्रधान राउळौनि (राजवाड्यांतून) आला : आणि पुसीलें : 'गोसावीयां आरोगणा ? : ' राणियां म्हणीतलें : 'नाहीं' : 'आजि आजूइं कां नाहीं ?' मग तेहीं मागील वृत्तांतु सांघीतलें : मग प्रधानु गोसावियापासीं आला : गोसावी पहुडले असती : उपगळिये घेउनी उठविलें : मग पुसीलें : 'आजि आजूइं आरोगण कां नाहीं ?' सर्वज्ञें म्हणीतलें : 'एथौनि जूं हारविलें : तयांतें म्हणीतलें : 'तुमचें दीधलियावीण हें (मी) आरोगण करी तरि गोपाळण्ही आन : ' प्रधानें म्हणीतलें : 'जोडीलें असे तें तुझें नव्हे' : प्रधानें वाखारीं आणवीलि : जुआरियांचें द्रव्य पाठविलें : मग गोसाविया आरोगणा जाली : ॥ ६ ॥'

### कस्तुरबा आणि कमळाइसा

कांहीं बायका आपला जीव देतील, पण दागिना देणार नाहींत ! त्यांपैकींच ही कमळाइसा असावी; किंवा आपल्या पतीला जुगाराच्या नादापासून परावृत्त करण्याकरितां तिनें हा सत्याग्रह पुकारला असणें अशक्य नाहीं.

गांधीजींचा कस्तुरबाशीं असाच एक खटका दागिन्याकरितां उडाला, असें त्यांच्या आत्मचरित्रांत नमूद आहे; पण तो प्रसंग मात्र वेगळा. दक्षिण आफ्रिकेंतून परत हिंदुस्थानांत येतांना त्यांना ज्या त्यांच्या मित्रांनीं व अशिलांनीं बहुमोल भेटी दिल्या ते सगळे दागिने त्यांचे ट्रस्टी नेमून गांधींनीं तिकडील लोकांच्या हिताकरितां परत करण्याचें ठरविलें. कस्तुरबांना तें पसंत नव्हतें. या वेळचें वर्णन गांधी देतात तें असें :—

"**कस्तुरबा**—'तुम्हांला एक नसेल (दागिन्याची) जरूर, तुमच्या मुलांनाहि नसेल. मुलांचें काय ? जशीं चढवावीं तशीं चढतात. मला नाहीं घालूं दिलेत तरी हरकत नाही, पण माझ्या सुनांचें काय ? त्यांच्या तर उपयोगी पडतील ? आणि उद्यांचा दिवस कसा येईल हें तरी कोणीं पाहिलें आहे ? इतक्या प्रेमानें दिलेल्या वस्तु परत करणें बरें नाहीं—' अशा तऱ्हेनें वाग्धारा सुरू झाली आणि त्यांतच अश्रुधारा येऊन मिसळली.

मीं हळूच म्हटलें, 'मुलगे लग्न करतील तेव्हांची गोष्ट. आपल्याला कुठें बालवयांत लग्नें करून द्यायचीं आहेत ! मोठे झाल्यावर स्वतःला वाटेल त्याप्रमाणें करीत ना ? आणि आपल्याला तरी दागिन्यांची हौस वाटणाऱ्या सुना थोड्याच शोधावयाच्या आहेत ? इतक्या उपर कांहीं दागिने हवेच असले तर मी कुठें गेलों नाहीं ना ?'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम.......................... दि: ..................
क्रमांक .......................... नोंद दि: ..................

' तुमचे पराक्रम कळले ! माझे दागिनेहि काढून घेतले तेच तुम्हीं कीं नाहीं ? मला धड घालूं दिले नाहींत ते तुम्हीं सुनांसाठीं काय देणार ? मुलांना तर आजपासून बैरागी बनवतां आहां ! मला हें तें माहीत नाहीं, हे दागिने परत नाहीं करायचे. त्यांतून माझ्या हारावर तुमचा काय हक्क ? '

' पण तो हार तरी तुझ्या कामगिरीबद्दल मिळाला आहे कीं माझ्या कामगिरीबद्दल ? ' मीं विचारलें.

' त्याचें काय मोठें ? तुमची कामगिरी ती माझी पण खरीच. मला रात्रं-दिवस राबविलीत ही काय कामगिरी नव्हे ? मला रडवूनहि वाटेल त्याला घरांत ठेवलेंत, आणि माझ्याकडून त्याची चाकरी करविलीत तें कुठें गेलें ? '

हे सर्व वाग्बाण तीक्ष्ण होते. त्यांतील कित्येक मला भेदूनहि जात होते. पण दागिने तर मला परत करावयाचे होते. पुष्कळशा गोष्टींबद्दल मीं जेमतेम कबुली मिळविली. "

## दोघांचे गुरु महाराष्ट्रीयच

आतां सांगितलेली गोष्ट हरिपालाच्या मनाला फार झोंबली. तो अत्यंत उदास झाला व आपण रामटेकच्या यात्रेला जावें, असें त्यानें ठरविलें. आईनें मोठ्या कष्टानेंच त्याला परवानगी दिली. अशाप्रकारें कांहीं नोकरांसमवेत हरिपाल निघाला; पण वाटेंत त्याची व त्याच्या लोकांची चुकामूक झाली व रामटेकची वाट सोडून तो ऋद्धिपुराकडे वळला. या पुण्यभूमीमध्यें गोविंदप्रभु नांवाच्या सर्वसंगपरित्यागी विद्वानाशीं त्याची गांठ पडली व त्यास त्यानें आपला गुरु केला. माजी महात्म्याचा **गो**विंदप्रभु तर आजी महात्म्याचा **गो**पाळप्रभु ( म्हणजे भारत-सेवक गोपाळ कृष्ण गोखले ). हे दोघेही महाराष्ट्रीय गुरु, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. गोविंदप्रभूनें हरिपाळाला मंत्रोपदेश दिला व चक्रधर या नव्या नांवानें तो प्रसिद्ध झाला. माजी महात्म्याला **चक्रधर** असें नांव कां ठेवण्यांत आलें हें माहीत नाहीं; पण आजी महात्म्याला चक्रधर असें नांव शोभून दिसेल; कारण चरका हें आजी महात्म्याचें प्रखर शस्त्र आहे; आणि ' चरखा ' म्हणजे चक्रच नव्हे का ?

## महात्म्यांची विषयासक्ति

आपण पूर्वीं विषयासक्त होतों, असें गांधीजींनीं आपल्या आत्मचरित्रा-मध्यें दाखविलें आहे. एकदोन प्रसंग तर त्यांनीं असे वर्णिले आहेत कीं, त्यांच्या हातून प्रत्यक्ष दुराचरण जरी घडलें नाहीं तरी मानसिक अधःपतन झालेंच. चक्रधर हाही कांहींसा विषयासक्त होता, असें वाटतें; कारण त्यानें प्रवासांत असतांच दोन विवाह केले. औरंगल नांवाच्या शहरीं कमळ नाईक

नांवाचा एक गृहस्थ होता. त्याला हंसांवा नांवाची एक रूपवती विदुषी कन्या होती. या मुलीच्या बापानें अनेक वर पाहिले; पण त्यांपैकीं एकही या विदुषीच्या पसंतीस उतरेना ! अखेर हरिपालाच्या गळ्यांत माळ घालण्यास ती तयार झाली. महाराष्ट्रांतील कांहीं सुशिक्षित कुमारी प्रौढ होईपर्यंत अविवाहित राहून शेवटीं विशेषतः 'सेकंडहँड' नवरे पसंत करतात, ही प्रथा यावरून फार पुरातन दिसते !

इकडून हरिपाल निघाला आणि पुढें अचलपूर येथील रामदेवराव दरणा नामक संस्थानिकाच्या आग्रहावरून त्याच्या उमा नांवाच्या कन्येशीं त्यानें विवाह करून तिचें गौरी असें नांव ठेविलें. अर्थात् हे सगळे संबंध लग्नाचे म्हणजे जुन्या दृष्टीनें तरी नैतिक होते. 'लीळाचरित्र' या ग्रंथामध्यें अकराव्या 'लीळें'त जी कथा दिली आहे ती मात्र चमत्कारिक आहे. ती अशीः—

"अंध्रदेशीं एकाकी असतां एकी गांवीं तेलीया एकाचेया घरा पाहानपटीं बीजें केलें : तवं तो तेली नदी हातपाए धों गेला होता. तयाची तेलिणी आंगणीं बाजसूपवतीएवरि नीजैली होती. तिएसवें गोसावीं पहुड स्वीकरीला : तयाची पासवडी पांगुरौनि : तवं ते गजन्नजौनि उठिली : 'मेलिये वो : मेलिये वो : मजसरिसा कोणु नेणो एकु नीजैला' : ऐसी बोबात बाहीरि नीगाली : तेथ मांदी (गर्दी) मीनली : एक तयां पुढां साघों गेले : 'आगा : तुझीए स्त्रीये सरिसा कोन नेणों एकु निजैला' : तेणें आपुला नीएमु सारीला : मग आला खांडें (तरवार) घेउनि : गोसावी श्रीमूख पांगुरौनी पहुडले होते : तेणें पासवडी आसूडिली : आणि श्रीमुख देखिलें आणि रोखबुधी (रोषबुद्धि) नीवर्तली : हातींचें खर्ग गळौनि गेलें : "

ती बिचारी तेलीण एकटीच आहे म्हणून तिच्या सोबतीकरितां म्हणून हा पुरुष बाजूला निष्पाप बुद्धीनें झोंपला असेंच म्हणूं; पण जुगार खेळणें व एकामागून एक सारखे तीन विवाह करणें हें विषयासक्ततेचें चिन्ह म्हणावयास हरकत नाहीं. आपण ज्यांस महात्मा म्हणतो तेदेखील या पाशवी अवस्थेमधून गेले होते व आत्मशुद्धि करून पुढें थोर पदास चढले, हें पाहून कोणत्याही पतित नराला नारायण होण्याची उमेद बाळगतां येईल, हें कळून येतें.

## माजी महात्म्याची संन्यासदीक्षा

चक्रधराचा रामदेवराव दरणा या संस्थानिकाच्या कन्येशीं विवाह झाल्याचें सांगितलें. येथें सासरीं असतांना एके दिवशीं तो चंद्रभागा नदीमध्यें पोहावयास गेला. नदीला पूर येऊन ती तुडुंब भरून वाहात होती. चक्रधर खोल पाण्यांत गेला व एकाएकी अदृश्य झाला ! 'जांवईबुवा बुडाले,' अशी नदीकांठच्या

लोकांनीं एकच ओरड केली. राणीवशांत चक्रधराची पत्नी जी गौरी तिच्या कानीं ती पडतांच तिनें एकदम जमिनीवर अंग टाकलें व प्राण सोडला. इतक्यांत चक्रधर पाण्यांतून वर आला. ही आनंदाची बातमी सांगण्यास लोक राजवाड्याकडे धांवले; पण तिकडे भलताच देखावा दृष्टीस पडला! गौरीच्या या आत्मत्यागामुळें चक्रधराचें संसारावरून जें लक्ष उडालें तें मात्र कायमचेंच उडालें. तो एकदम विरक्त झाला, आणि आपल्या अंगावरचे कपडे फाडून तो विदेही स्थितींत भटकूं लागला. असा भ्रमत असतां शके ११८५ कार्तिक महिन्यांत त्याला श्रीदत्तात्रयाचें दर्शन झालें असें म्हणतात. त्यानें संन्यासदीक्षा घेतली. चक्रधर महात्मा झाला.

अशाप्रकारें श्रीचक्रधर हा गांधीजींप्रमाणें गुजरातेंतील एका प्रधानाच्या पत्नीच्या पोटीं जन्मास आला. त्यानें गोविंदप्रभु या महाराष्ट्रीय पंडितास आपला गुरु केला व त्यानें आपलें वास्तव्यस्थानही महाराष्ट्रच केलें. महाराष्ट्र त्याला फार पसंत होता. चक्रधरोक्त सूत्रपाठ या ग्रंथामध्यें त्यानें आपल्या शिष्यांना उपदेश केलेला दिला आहे, त्यांत अशीं वाक्यें आढळतात:–' आपणेयातें कव्हणी नेगे आपण कव्हणातें नेगिजे ऐसां स्थानीं असावें; कानडेदेशां तेलंगदेशां न वचावें (जावें): ते विषयबहळ देश: तेथ अवधूत मान्य: **महाराष्ट्रीं असावें** : मातापुरा कोल्हापुरा न वचावें: (कोल्हापुराचा त्या काळीं म्हणजे सहासातशें वर्षांमागें लौकिक फारसा चांगला असलेला दिसत नाहीं! कारण चक्रधर पुढें म्हणतात:) तियें साभिमानियें स्थानें साधकांसि विघ्न करिती:' लीळाचरित्र या ग्रंथामध्यें '**विद्या आणि पुरुषु महाराष्ट्रिं असे,**' असे या माजी महात्म्याचे उद्गार आहेत. गांधींजींचा सेक्रेटरी जसा महादेव तसा चक्रधराचा पट्टशिष्य नागदेव. यानेंच चक्रधराच्या 'महात्मा' पंथाला व्यवस्थित स्वरूप देऊन त्याचा सर्वत्र प्रसार केला. गांधींजींच्या परिवारांत मिराबेन, सुशीला नायर, प्रेमा कंटक अशासारख्या जशा शिष्या आहेत, त्याप्रमाणें चक्रधराच्या परिवारांतही नागांबिका, महदंबा, कमाईसा वगैरे अनेक सुशिक्षित शिष्यिणी होत्या.

## महात्म्यांची स्वातंत्र्यभावना

चक्रधर व गांधी यांचें जें बाह्य साम्य दाखविलें, त्याप्रमाणें अंतर्गत म्हणजे वैचारिक साम्य दाखवितों.

चक्रधराच्या काळीं परकीय राजकर्त्यांचा प्रवेश महाराष्ट्रांत झाला नव्हता. युरोपियन लोक तर अज्ञातच होते; पण मुसलमानांचे पायही महाराष्ट्राला जेते म्हणून लागले नसावे. यावेळीं देवगिरीच्या यादवांची सत्ता महाराष्ट्रावर होती.

अर्थात् राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचें जें आजचें गांधीजींचें कार्य तें चक्रधराला करावें लागलें नाहीं. तरीपण तो विलक्षण स्वातंत्र्यवादी होता, असें सिद्ध करणारे त्याचे उद्गार आहेत : गांधीवादाचें सार एका वाक्यांत सांगावयाचें झालें तर ‘ श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ ’ या ग्रंथांतील ‘ आचारमालिका ’ या प्रकरणांत असलेलें पहिलेंच वाक्य पुढें करतां येईल :–

‘ **स्वातंत्र्य हा मोक्ष पारतंत्र्य हा बंध** ’ हें तें वाक्य होय. ‘ आपण कव्हणा अधीन होआवें नाहीं : आपणया अधीन कव्हणातें करावें नाहीं. ’ असें चक्रधराचें सांगणें असे. स्वातंत्र्यप्रेमाप्रमाणेंच सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य हीं चरकाधर गांधींप्रमाणें माजी महात्मा चक्रधर याचीं आवडतीं तत्त्वें होतीं. या तत्त्वांचा त्यानें ठिकठिकाणीं पुरस्कार केलेला आढळतो. आजच्या महात्मा पंथामध्यें त्या पंथाच्या जनकालाच तेवढी ‘ महात्मा ’ ही पदवी आहे; पण तेराव्या शतकांतील त्या पंथांतील प्रत्येक माणसाला महात्मा अशी संज्ञा असे ! शंकरराव देवही महात्मा आणि नगिनदास मास्तरही महात्मा. महात्मा हा मुमुक्षु किंवा साधु याचा वाचक शब्द असे. चक्रधर आपल्या शिष्यशिष्यिणींना सत्यार्जनासंबंधीं सांगतात :

‘ महात्मेनि प्रियवक्तेया होवावें : महात्मेनि सत्यार्जवा होआवें: हांसतांहि लटिकें न बोलिजे : आपणें आपसिं ज्ञातांविरक्तांचा संगू कीजे: तुम्हीं महात्मे कीं: तुम्हीं चतुर्विध भूतग्रामां अभयो देआवे कीं : राग, क्रोध, मद, मत्सरु याचा त्यागु याचिं नांवें संन्यासु कीं: अहंतेचें मूळ सकंदी उपडावें नाई का ? : येरव्ही अंकुरू निगेती : मग शांतीचीं रोपें लावावीं. ’

गांधी म्हणतात, ‘ I have no God to serve but truth.. I want to see God face to face. God I know is truth.’ ( सत्याशिवाय दुसऱ्या ईश्वराची सेवा मला माहीत नाहीं. ईश्वराला मी समोरासमोर पाहूं इच्छितों. सत्य हा एकच ईश्वर मी जाणतों. )

## महात्माजींची अहिंसा—

सत्याप्रमाणें अहिंसेवर चक्रधराचा फार जोर होता. ‘ चंहुयुगीं हिंसा अधर्मु : तुमचेनि मुंगी रांड न होवावी : ’ असें तो म्हणतो. ‘ अक्रोधानें क्रोधाला जिंकावें ’ असें जसें बुद्धानें म्हटलें आहे; किंवा ‘ तुमच्या एका गालावर मारल्यास दुसरा गाल पुढें करा, ’ असें जसें ख्रिस्ताचें सांगणें असे, त्याप्रमाणें चक्रधर म्हणतो : ‘ एथौनी तुम्ही ऐसेया होआवें कीं हा जनु तुमतें डोइये डोइये मारील परि तुम्ही डोईचि ओडवावी ( पुढें करावी ) कीं : तुम्हां मारीता पूजिता समानुचि होआवा. ’ चरकाधर गांधी अहिंसेसंबंधीं मद्रासला ‘ यंग मेन्स ख्रिश्चन

असोसिएशन ' पुढें केलेल्या आपल्या भाषणांत म्हणतात, ' Literary speaking ahinsa means 'non-killing' but to me it has a world of meaning and takes me into the realms much higher, infinitely higher. It really means that you may not offend anybody : You may not harbour an uncharitable thought even in connection with one who may consider himself your enemy.'

( भावार्थ : अहिंसा याचा शब्दशः अर्थ हत्या न करणें; परंतु माझ्या अर्थाप्रमाणें यांत विश्व सांठलें आहे व हा शब्द मला फार उच्च वातावरणांत नेत आहे. त्याचा खरा अर्थ म्हणजे कुणाचाही जरादेखील अपमान न करणें व त्याला न दुखविणें हा आहे. एकादा माणूस तुमचा शत्रु म्हणवीत असला तरीही त्याच्यासंबंधीं रोषबुद्धि मनांत न बाळगणें याचेंच नांव अहिंसा. )

**आणि चक्रधरांची अहिंसा**

माजी महात्मा चक्रधर याचेही असेच विचार होते. याविषयीं एक गोष्ट प्रसिद्ध आहे. चक्रधराचा पद्मनाभी नांवाचा एक शिष्य होता. आज जसे आपल्याकडे अनेक राजकीय पक्ष आहेत, तसे त्या काळीं विविध धर्मपंथ असत. अशा दुसऱ्या एका पंथापैकीं ' परमाणु भवदेव ' नांवाचा एक साधु होता. त्याच्या बिढारीं पद्मनाभी गेला. नांव सोनुबाई पण हातांत कथलाचा वाळा म्हणतात त्याप्रमाणें त्या साधूचें नांव ' परमाणु ' भवदेव असलें तरी त्याचें शरीर ' उपाधिस्थूळ ' म्हणजे भलतेंच लठ्ठ होतें ! ' एकी आसूचें ( एक चांदीचें नाणें ) तांबुळें एका विडेयासि लागे,' असें त्याचें वर्णन लीळाचरित्रांत दिलें आहे ! पद्मनाभीला हा ' लठ्ठ परमाणु ' पाहून अनावर हसूं लोटलें व त्या साधूची त्यानें चेष्टा केली. त्याबरोबर त्या साधूनें त्याला हांकून लाविलें. ही गोष्ट चक्रधराला समजली. त्याची शीस्त महात्मा गांधींप्रमाणेंच अत्यंत कडक होती. तो नागांबिकेला म्हणाला, ' बाई यासि भितरी रिगों नेदाः ' कुसुमाहूनही मृदु अंतःकरण असलेल्या चक्रधराची ही कठोर आज्ञा ऐकून नागांबिका म्हणाली, ' कां बाबा ?' चक्रधरानें उत्तर केलें, ' बाई, हा प्राणियांचें चैतन्य पोळवूनि आला असे : आतां एथौनि याचें मुख न पाहिजे : आतां बाहिरी घाला : ' आश्रमांत आपणांस घेत नाहींत, हें पाहून पद्मनाभी मोठ्यानें रडूं लागला, त्याबरोबर नागांबिकेला त्याची दया आली व ती चक्रधराला म्हणाली, ' बाबा, बापुडा रडतुसे : बापुडा बटकिरुं एकला कैं जाईल ? तरीं एॐ देयावा पां : ' अशा रीतीनें नागांबिकेनें रदबदली केल्यावर चक्रधर म्हणाला, ' बाई तेयाचिया ठायां जाऊनि : सेणामातियां आंग माखौनि : तेया आड पडौनि प्रायश्चित्त घेयावें : मग तेंहीं होऊनि येथें नीरोविति : ' आपुलीं

सन्निधीं असों देया :' तर एथ असों दिजैलु :' अशाप्रकारें पद्मनाभीनें अंगाला माती माखून त्या साधूची क्षमा मागितल्यावर त्याला ठेवून घेतला. 'हिंसा न करावी. हिंसा पाप. पापातंव नरक,' असें चक्रधराचें सांगणें असे. मातीचे व पाण्याचे उपचार चरकाधर गांधी शारीरिक व्याधींवर करीत हें प्रसिद्ध आहे; पण पद्मनाभीच्या मानसिक व्याधीवरही चक्रधरानें केलेला हा मातीचा प्रयोग प्रभावी ठरला, हें आजी महात्म्याला माहीत नसावें ! पण शिष्यांच्या अपराधाबद्दल स्वतः उपवास करून त्यांचे मानसिक रोग दूर करणें हें गांधींजींचें अभिनव तंत्र चक्रधराला परिचित असलेलें दिसत नाहीं.

जिभेचे चोंचले फाजील वाढवूं नये हें या दोघांही महात्म्यांचें सांगणें आहे. गांधीजी म्हणतात, 'One should eat not in order to please the palate but just to keep the body going'. हें वाक्य म्हणजे 'प्राणासि आहारु देआवा : इंद्रियासी नेदावा,' किंवा 'जेवितां आवडी नावडी न होवावी,' या चक्रधराच्या उक्तीचें इंग्रजी भाषांतरच नव्हे काय ?

## अस्पृश्यता : मौन

अस्पृश्यता ही जशी गांधीजींना तशीच चक्रधरालाही अमान्य होती. गांधीजींची अस्पृश्यतेविरुद्ध मोहीम प्रसिद्धच आहे. चक्रधरही हा भेद मानीत नसे. एकदा चक्रधर कोणा एके गांवीं गेला असतां एक चांभाराचें जोडपें बाजाराला गेलेलें परत येत असतांना पाणपोईवर त्यांची व चक्रधराची गांठ पडली, आणि तें जोडपें चक्रधराच्या भजनीं लागलें; परत घरीं जाईना ! चक्रधराची त्यांनीं दीक्षा घेतली. लीळाचरित्रकार या अस्पृश्य जोडप्यासंबंधीं लिहितो, 'मी कवण काइ ऐसे विसरले : ते लोकीं गोसावी होउनि वर्तती : ते विचरत खोल नाएकाचिया आंबेया आले : तेथ ईश्वरपुरुषु म्हणौनि घरोघरीं जेवायला नेती : एक आपुलेया घरीं घेऊन गेले : पूजा केली : जेऊं सूदलें : तया पुरुषाचिए गांवींचे चाम्हार तेथ हाटासि आले : तेहीं म्हणितलें : 'हारे हा आमचिया गांवींचा चाम्हारु नव्हे ? : एथ देवो जाला : एणें गांवों विटाळला :'

पुढें काय ग्रामण्यें झालीं असतील हें काय सांगावयाला पाहिजे ? 'महारवाड्याहौनि धर्मु काढावा,' अशी चक्रधराची उक्ति आहे. त्याचा अर्थ महारवाड्यांतून धर्माची निर्मिति करावी, असा दिसतो.

मौनावर गांधीजींचा किती विश्वास आहे हें प्रसिद्धच आहे. सोमवार हा मौनदिन म्हणून ते पाळतात. गांधी म्हणतात, 'Silence of sewn-up lips is not silence. He is silent who having capacity to speak utters

no idle word.' चक्रधर म्हणतो : 'ओठांतरा निघालें तें देशांतरा जाए : दोहीं ओठां टाळें घालावें : जाणौनि नेणे तो सुदैवु :'

## संसार आणि ब्रह्मचर्य

ब्रह्मचर्य व संयम यांचें माहात्म्य गांधींनीं पुनः पुनः वर्णिलें आहे. अविवाहितांनीं ब्रह्मचर्य पाळावें, इतकेंच नव्हे तर विवाहितांनींही ब्रह्मचर्य पाळावें असें त्यांचें सांगणें. चक्रधर म्हणतात, 'विषयो न सेवी तरी जीवु काइ गा मरतु असे ? : निरोधु साहिलेया अधिका योग्यता होए : दक्षता होए : विषय अनुतापासी आश्रयो नरकासि हेतु : पुरुष जेतुल जेतुली विषयसेवा करी तेतुल तेतुली धर्मीं निबळ जाए :' स्त्रियांनीं व शूद्रांनीं संन्यास घेणें हें वैदिक धर्माच्या विरुद्ध आहे; पण चक्रधराच्या काळीं दामोदर पंडिताची पत्नी हिरांबा हिनें नवऱ्याच्या आधींच संन्यासाची दीक्षा घेऊन ती गुरुच्या सेवेंत राहूं लागली होती, असें नागदेवाच्या चरित्रांत नमूद आहे. महदाइसा, नागांबा वगैरे अनेक स्त्रियांनीं संन्यासग्रहण केलें होतें. सनातनी लोकांचा यामुळें चक्रधराच्या पंथाविरुद्ध क्षोभ झाला असला पाहिजे, हें उघड आहे. महात्मा गांधींच्या खासगी वर्तनासंबंधीं एके काळीं कुजबूज होऊन राहिली होती व त्याच्या निरसनार्थ त्यांना 'हरिजन' मध्यें १९३९ च्या ऑक्टोबरांत एक लेखही लिहावा लागला होता. चक्रधराभोंवतीं या बाया गोळा झाल्यामुळें लोकनिंदेला वाव मिळाला होता कीं नाहीं, याविषयीं पुष्कळांना जिज्ञासा उत्पन्न होईल म्हणून यासंबंधीं दोन शब्द लिहितों.

## दोन्ही महात्म्यांच्या शिष्यिणी

नागांबा नांवाची चक्रधराची शिष्या होती. ती जेव्हां चक्रधराची प्रथम सेवा करूं लागली, त्यावेळीं हंसांबा नांवाची एक बाई व पांडे नांवाचा एक बुवा तिची चेष्टा करूं लागलीं. लीळाचरित्रकार लिहितात,' "हें काइ जालें या नागुवइनिसी ? : चळली काई ? नेणो कोण आणिला असे : तेयाचें उसीटें खाती असे : पायवणी पीति असे,' ऐसीं दोघें भकती : मग नागुबाई म्हणीतलें : 'बाबा हे हांसुबाई भकती असे : इयेसी काय करूं बाबा ?' गोसावी उगेची होते : एकु दिनीं वोटेयावरी आसन : तंव हांसुबाईसें आलीं : सर्वज्ञें म्हणीतलें : 'हंसुराजा या :' या शब्दासरिसीं स्तीति ( वृत्तिपालट ) जाली : श्रीचरणापाशीं गडबडा लोळती : 'जी : जी : मी पापीण जी : गोसावीयांसी भकें जी । निंदा करीं जी:' मग तेही सेवा करूं लागली."

आतां मघाशीं सांगितलेला पांडे हा एकच निंदक राहिला. वामदेव नांवाचा एक योगी होता. त्याच्या गुंफेला जाऊन पांडे म्हणे–' एतुके दीस एकीचि भुलली होती : आतां दोघी भुललीया : या काई जालें दोघींसी ? : चळल्या काई ? '

पांड्याची ही निंदा नागांबेच्या कानावर येई व तिला फारच दुःख होत असे. ती चक्रधराला म्हणे–' बाबा, पांड्या भकतु असे : काई करूं ?' चक्रधर कांहींच उत्तर न देतां उगाच राही ! पुढें काय झालें तें लीळाचरित्रांतील भाषेंतच पहा:—' एकु दी ( दिवशीं ) पांडे रात्री निजैले असती : ते रात्रीं स्वप्न जाला : गुंजावर्ण डोळे : बाबर झांटी ( अक्राळविक्राळ केस ) : हातीं मुदलगु ( गदा ) : ऐसे जमजूत ( यमदूत ) आले : पांड्यासि मुदगलवेऱ्ही घेती : तेविन्चि म्हणती : ' आरे हे कवण पुरुखु ऐसें नेणसी ? : हे द्वारावतीकार चांगदेव राऊळ : नित्य गोसावियासीं तूं भकसी ? : यांची तूं निंदा करिसी ? ' ऐसें म्हणौनि मुद्गलें तोंडावरी हाणिती : गोसावी आड श्रीकर वोडवीति ( पुढें करीती ) : ' नको नको बापुडा मारूं : नेणचि ' : पांडे काकुळती येती : चेवो आला । उठिले : मग ' नागुबाई, नागुबाई ' म्हणौनि बोबावूं लागले : नागुबाई म्हणीतलें : ' हांसुबाई पाही पां : पांडा कां बोबातु असे :' हंसराजु गेली : ' आवो, तूं काय आलिसी ? : नागुबाई बोलावीं : ' नागुबाईस गेलीं : रात्रीचें वृत्तांतु सांघीतलें : ' तरी गोसावियासी विनवी कां : एथ विजें करावें' : नागुबाईसां सुख जालें : नागुबाई बोलाऊं गेली : नागुबाई विनविलें :–' बाबा, पांडा बोलावीत असे : तेथ बीजें कीजो जी ' : सर्वज्ञें म्हणीतलें–' बाई, हें ( मी ) काय तेयाचिये नाथेचा ( वेसण ) बैलु : तेयाच्चिया बोलविलेल्या येईल ' : असें बोलून चक्रधर त्याच्याकडे गेला व पांड्यानें त्याच्या पायावर दंडवत घातलें. अपकाराची फेड उपकारानें कशी करावी, ही चक्रधराची वृत्ति आपणांस या उदाहरणावरून दिसून येते.

चक्रधराचें आचरण व वर्तन शुद्ध व निर्मळ होतें. अशा पुरुषाला गुरु करण्याचा बायाबापड्यांना कंटाळा येत नसे.

देमाईसा नांवाची एक बाई. ती एकदां पुराणाला गेली. तेथें तिनें असें ऐकिलें कीं गुरूशिवाय तरणोपाय नाही. आतां गुरु कुणाला करावा, असा तिला विचार पडला. वामदेव म्हणून एक प्रसिद्ध बुवा असल्याचें तिनें ऐकिलें होतें. ह्यांनाच गुरु करावें आणखी काय, असें म्हणून ' केळें नारिएळें : पानें फोपळें ' घेऊन ती त्यांच्या गुंफेमध्यें गेली. पुढचा वृत्तांत लीळाचरित्राच्या भाषेंतच वाचा–

' तंव ते नागवे : काळे : ढेप ऐसे बैसले असती : ( तेराव्या शतकांतील हा उपासनीच दिसतो ! ) ऐसे देखौनि आपुलें ठायीं विचारिलें : ' याजवळीं

उठों बैसों न ये : बोलों चालों न ये : दाऊं मिरवूं न ये : नागवे कैसेन गुरु करूं गे आई ? ' म्हणौनि मागुती निघाली : तंव मार्गी लखुमाइसें भेटलीं : तेंही पुसिलें-' देमाइसे कैं गेलीं होतींति ?' ' वामदेवाचियें गुंफेसी. ' ' काय करूं ? ' मग देमाइसीं मागील आवघें सांघीतलें : मग लखुबाईसीं म्हणीतलें : ' गुरु कराल तरि मी तुम्हांसि दाखवीन : जयाजवळीं बैसों उठों ये : दावुं मीरवूं ये : ऐसे गुरु मी दाखवीन.'

अशाप्रकारें लखुबाई तिला चक्रधराकडे घेऊन गेली व तिनें त्याला आपला गुरु केलें. चक्रधराजवळ जरी एवढा शिष्यिणींचा परिवार होता, तरीपण स्त्रियांच्या बाबतींत सावध राहण्याबद्दल आपल्या शिष्यांना त्यानें पुनः पुनः बजाविलें आहे. तो म्हणतो—' स्त्री भणिचे मत्त द्रव्याचा रावो गा : आणिकें द्रव्यें सेवेलिया माजवी : स्त्री दर्शनमात्रेंचि माजवी : चित्रींची स्त्री न पाहावी : ' ( सिनेमा नव्हते त्यावेळीं ! ). दुसरी एकीकडे तो म्हणतो—' स्त्री सहसा प्रवर्तेना : प्रवर्तली तरि निवर्तेना ! पुरुषु प्रवर्तों जाणे : निवर्तों जाणे : '

स्त्रीजातीसंबंधीं असे उद्गार काढण्यास महात्मा चक्रधराला कुठली नीला नागिणी भेटली होती समजत नाहीं ! महात्मा गांधींनीं मात्र स्त्रियांसंबंधीं ठिकठिकाणीं अत्यंत आदराचे व सोज्ज्वल उद्गार काढले आहेत.

## माजी महात्म्याचें मराठी-प्रेम

महात्मा गांधींनीं ज्याप्रमाणें वर्धा हें आपलें वास्तव्यस्थान केलें आहे, त्याप्रमाणें चक्रधरानेंही विदर्भ हेंच आपलें कार्यक्षेत्र केलें होतें. त्यांचे गुरु ज्याप्रमाणें महाराष्ट्रीय त्याप्रमाणें त्यांचे शिष्यप्रशिष्यही महाराष्ट्रीय असत. हा माजी महात्मा अगदींच महाराष्ट्राळलेला होता. आपल्या पंथाचें लिखाण मराठीमध्येंच लिहा, असें त्याचें सांगणें असे. एकदां केशवराजसूरि नांवाचा एक शिष्य चक्रधराचा सेक्रेटरी जो नागदेव त्याच्याकडे येऊन म्हणाला, ' मी उद्धरण संसरण हीं प्रकरणें संस्कृतांत पद्यरूपानें लिहूं का ? ' नागदेवभाईनें उत्तर केलें, ' नको गा केशवदेया : येणें माझिये स्वामीचा सामान्यु परिवारु नागवेल की : म्हणौनिचि चक्रधरें महाराष्ट्रीयें निरोपिलें गा : ' चक्रधर आपल्या गुजराती जन्मभाषेमध्यें बोलल्याची एक लीळा उपलब्ध आहे. चक्रधर गुजरातीमध्यें बोलले तें जसें वेडेवांकडें ऐकलें तसें त्याच्या शिष्यानें टिपून ठेविलें.

एके दिवशीं देवगिरीचा महादेवराव यादव ठाण्याला आला होता. त्या वेळीं तो सिन्नरला गेला. ( सिन्नर किंवा श्रीनगर हें देवळालीपासून सात मैलांवर आहे. ) या वेळीं चक्रधराचा मुक्काम तेथें होता. त्याला भेटावें अशी इच्छा होऊन आपले दूत राजानें त्याच्या चौकशीकरितां पाठविले. चक्रधर ज्या मठामध्यें

उतरला होता तेथें येऊन, 'येथें महात्म्ये आहेत काय ?' अशी राजदूतांनीं पृच्छा केली. चक्रधराला राजाला भेटावयाचें नव्हतें. त्यानें उत्तर दिलें. 'मा इहां कोई नथी : बाइ एकी थी : भिक्षा हउ इहां छौं : म्हातारी एकी छे : ते गांवमां हें भिक्षा मागन गैइ छे : हउं इहां अछौं : माहातुमे बाहातुमे कांहीं नथी : हउ इहां छौं :'

**चक्रधराचा अंत आणि—**

श्री चक्रधराचा महात्मा पंथ सध्यां महानुभाव पंथ म्हणून आज प्रसिद्ध आहे. हा माजी महात्मा एकशें एकोणीस वर्षें जगला. (आजी महात्म्याची एकशें पंचवीस वर्षें जगण्याची प्रतिज्ञा आहे.) शके ११९४ त म्हणजे इ. स. १२७२ मध्यें चक्रधरानें गंगातीराहून बदरिकाश्रमीं गमन केलें व पुढें त्याचें काय झालें कळत नाहीं. गांधीजींच्या उपवासाच्या वगैरे मधूनमधून घोषणा ऐकिल्या म्हणजे त्यांचा स्वाभाविक अंत न होतां ते असेच लोकविलक्षणपद्धतीनें काळाच्या पडद्या-आड होतील असें वाटूं लागतें. महात्मा चक्रधराच्या अनुयायांनीं पुष्कळ रसभरित व तेजस्वी मराठी वाङ्मय निर्माण केलें आहे; परंतु इतर महाराष्ट्रीयांनीं त्या पंथियांना वेळोवेळीं इतका जोराचा विरोध केला कीं, त्यांना आपलें वाङ्मय कित्येक शतकें झांकून ठेवावें लागलें. अलिकडे तें पुनः उजेडांत येऊं लागलें आहे. महात्मा चक्रधराचे एक शिष्य श्रीयुत सानेगुरुजी यांच्या व इतर गांधीजनांच्या मराठी वाङ्मयावर जे मधूनमधून सध्यां हल्ले होत आहेत तीही या जुन्या इतिहासाची पुनरावृत्तिच आहे कीं काय ?

यशवंत—दिवाळी अंक १९४७

२

## जजुर्वेदी ब्राह्मण

ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, व अथर्ववेद हें हिंदु लोकांचें प्राचीनतम ज्ञानभांडार होय; परंतु हिंदूंचा वेद म्हणून युरोपांत जो ग्रंथ प्रथम प्रसिद्धि पावला तो यांपैकीं एकही नसून निराळाच ' जजुर्वेद ' ( Jozour Bed ) होय ! या तोतया पांचव्या वेदाचा इतिहास मोठा गमतीचा आहे. सुप्रसिद्ध फ्रेंच पंडित व्हॉल्टेर याला पाँडिचरीहून कोणीतरी एक हस्तलिखित ग्रंथ पाठविला. हा ग्रंथ म्हणजे हिंदु लोकांच्या वेदाचें कोणीतरी केलेलें फ्रेंच भाषांतर असावें असें त्याला वाटलें व हा पौर्वात्य विद्येचा ठेवाच अचानक आपल्या हातीं लागल्याबद्दल त्याला मोठा हर्ष झाला. आपल्या निरनिराळ्या लेखांत व विशेषतः Essai sur les moeurs et l,esprit des nations मध्यें त्यांतील पौर्वात्य ज्ञानाचा त्यानें मोठ्या आदरानें व उत्साहानें निर्देश केलेला आहे. व्हॉल्टेरला हा ग्रंथ मिळाला ती बहुतेक एप्रिल महिन्याची पहिली तारीख असावी, असें पुढील हकीकतीवरून स्पष्ट होतें ! १७६१ सालीं हा ग्रंथ व्हॉल्टेरनें पॅरिस येथील रॉयल लायब्ररीला नजर केला. हा ग्रंथ अस्सल असून श्रीरंगपट्टणच्या देवळांतील प्रमुख ब्राह्मणानें लिहिलेली वेदावरील टीका होय अशीच त्याची प्रामाणिक समजूत होती. व्हॉल्टेरच्या ग्रंथांतील निर्देशामुळें युरोपांतील विद्वान् लोकांचें या हस्तलिखिताकडे लक्ष वेधलें, व १७७८ सालीं हा ग्रंथ छापण्यांत येऊन लगेच त्याचें जर्मन भाषेंत भाषांतरही झालें. याच सालीं व्हॉल्टेर वारला. त्याच्या निधनानंतर लवकरच Mr. J. G. Herder यानें आपल्या Ideen zur Geschichteder Menschheit च्या दहाव्या पुस्तकांत आपलें स्पष्ट मत नमूद केलें आहे कीं, हिंदु लोकांच्या अध्यात्मविद्या म्हणून युरोपियन लोक समजतात त्या गोष्टी आधुनिक असून त्यांचा खरा वेद व खरी संस्कृत भाषा यांच्या माहितीकरितां आपणांस आणखी कांहीं काल थांबावें लागेल. हेर्डरचें हें भाकीत अखेर खरेंच ठरलें. कोलब्रुक ( Asiatick Researohes, Vol. 8, Calcutta 1805, pp. 639–476 ) फ्रेड्रिक रोसेन ( Rigvedae Specimen, 1830 ) वगैरे विद्वानांनीं वेदांचा अभ्यास करून या ग्रंथासंबंधीं माहिती व वेंचे प्रसिद्ध केलें. ऋग्वेदसंहितेचा पहिला भाग रोसेनच्या निधनानंतर १८३० सालीं प्रसिद्ध झाला.

वेदविद्येसंबंधीं रॉथ, वेबर, मॅक्समुल्लर वगैरे इतर युरोपियन पंडितांचे पुढील प्रयत्न प्रसिद्ध असल्यामुळें त्यांची माहिती येथें देण्याचें कारण नाहीं. उपरिनिर्दिष्ट 'जजुर्वेद' मुद्रित करण्याच्या वेळीं सुप्रसिद्ध फ्रेंच प्रवासी Anquetil du Perron ह्याची मदत झाली होती. पेरोन १७५४ मध्यें हिंदुस्थानांत आला होता व संस्कृत भाषेचा त्यानें अभ्यासही केला होता. पुढें युरोपांत परत गेल्यावर त्याची राजग्रंथालयांत प्राच्य दुभाषा ( Oriental Interpreter ) म्हणून नेमणूक झाली. त्यानेंच उपरिनिर्दिष्ट ग्रंथ छापतांना Jozour Bed च्या जागीं L 'Ezour Vedam ( यजुर्वेद ) अशी नांवांत दुरुस्ती केली असावी असें वाटतें; परंतु वेदवाङ्मयाशीं त्याचाही परिचय नसल्यामुळें तोही व्हॉल्टेरप्रमाणें फसला गेला ! शेवटीं मद्रासचे कलेक्टर Francis White Ellis, I. C. S., यांनीं एक निबंध लिहून हा हिंदूंचा वेद नसून जेजुइट मिशनऱ्यांनीं केलेला बनावट ग्रंथ आहे, असें पहिल्याप्रथम पद्धतशीर रीतीनें जगापुढें मांडलें. मि. एलिस याला संस्कृत, तामीळ, तेलगू व मलयालम भाषा अवगत होत्या. १८१९ सालीं रामनाद येथें तो कॉलेरानें वारला व त्याच्या निधनोत्तर १८२२ सालीं हा त्याचा निबंध प्रसिद्ध झाला. ( Asiatick Researches, Vol. XIV, Calcutta, " A Modern imitation of the Vedas," pp. I—59 ).

या पांचव्या जजुर्वेदापेक्षां त्याचा जनक-किंवा वेदांच्या परिभाषेंत बोलावयाचें म्हणजे द्रष्टा-म्हणून समजला जाणारा ऋषि, इटालियन जेजुइट, रॉबर्ट डि नोबिली ( Robertus de Nobilibus ) ऊर्फ 'तत्त्वबोधक स्वामी' या जजुर्वेदी ब्राह्मणाची हकीकत मोठी विस्मयजनक आहे. तो १६०६ सालीं सध्यांच्या मद्रास इलाख्यांत असलेल्या जुन्या मदुरा संस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां येऊन ठाकला. डि नोबिली हिंदुस्थानांत येण्यापूर्वी या क्षेत्रांत काय परिस्थिति होती त्याची थोडक्यांत प्रथम माहिती देतों, म्हणजे डि नोबिलीच्या कार्यपद्धतीचें व करामतीचें वैशिष्ट्य वाचकांना कळून येईल.

## थोडा पूर्वेतिहास

व्हास्को द गामा १४९८ सालीं ज्या वेळीं कालिकत येथें उतरला, त्या वेळीं त्याच्याबरोबर पेद्रु नांवाचा एक फ्रांसिस्कन पाद्री होता. त्यानें लगेच आपलें धर्मप्रसाराचें कार्य सुरू केलें; पण बहुतेक मुसलमानांबरोबर झालेल्या झटापटींत तो ठार झाला व गामाबरोबर परत स्वदेशीं जाऊं शकलाच नाहीं. अशा प्रकारें वेळोवेळीं तिकडून प्रत्येक जहाजांतून फ्रांसिस्कन व त्यांच्या मागून डोमिनिकन पाद्री येऊं लागले. १५४२ सालीं प्रसिद्ध सेंट फ्रांसिस झेवियर गोव्यांत उतरला. त्यानें हिंदुस्थानांत पाय ठेवण्यापूर्वींच गोव्यामध्यें बिशप

आल्बुकेर्क व त्याचे साथी मायकेल वाझ व जेम्स बॉर्व या फ्रांसिस्कन पाद्रींनीं गोव्यामध्यें धर्माच्या नांवाखालीं जुलूम चालवून हिंदु लोकांना बळजबरीनें ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याला व त्यांच्या धर्ममंदिरांवर हल्ला चढवावयाला आरंभ केला होता. धर्मसत्तेच्या मागें राजसत्तेचा जोर असल्यामुळें ख्रिस्ती धर्मप्रसाराचें हें कार्य त्यांना कठीण गेलें नाहीं. १५६० सालीं गोव्यांत इंक्विझिशन हें भयंकर न्यायमंदिर ( ? ) स्थापण्यांत आलें. बळजबरीनें ख्रिस्ताच्या कळपांत ओढलेल्या हिंदु लोकांनीं जुन्या धर्माकडे किंवा चालीरीतींकडे ओढा दाखविल्यास किंवा तसा त्यांच्यावर कुणी नुसता आरोप केल्यास, त्यांच्यावर खटले भरून कमाल शिक्षा म्हणून Auto de Fe नांवाच्या धर्मोत्सवांत दरवर्षी जाळून टाकण्यांत येत असे ! ख्रिस्तीकरणाच्या मार्गांत अडथळे निर्माण केल्याबद्दल हिंदु लोकांवरही इंक्विझिशनची धाड येई. अशा प्रकारें निरनिराळीं आमिषें किंवा धाक यांच्या जोरावर पोर्तुगीज सत्तेखालील प्रदेशांत ब्राह्मणापासून अंत्यजापर्यंत निरनिराळ्या जातींचें ख्रिस्तीकरण कसें झालें तें आपल्याला समजतें; परंतु जेथें क्रुसाच्या मागें तरवारीचा जोर नव्हता अशा हिंदुस्थानच्या इतर भागांत या पाद्री लोकांना हिंदु लोक ख्रिस्ताच्या कळपांत कसे ओढतां आले, हा पुष्कळांना प्रश्न आहे.

झेवियर ज्या वेळीं हिंदुस्थानांत आला त्या वेळीं गोव्यांतील पोर्तुगीज लोक ऐषआरामांत दंग होऊन, नाना व्यसनांत व अनीतिपंकांत पिचत पडले होते. ख्रिस्ताच्या कळपांत राहून सैतानाच्या भजनीं लागलेल्या या लोकांना सन्मार्गावर आणणें, हें झेवियरचें हिंदुस्थानांत येण्याचें खरें उद्दिष्ट नव्हतें. अशा प्रकारच्या कार्याला त्याला युरोपांतदेखील वाव होताच; परंतु ख्रिस्ताचा संदेश ज्यांच्या पर्यंत अद्याप पोंचलेला नाहीं, अशा इतर धर्मांमधील लोकांना त्याला ख्रिस्ताच्या भजनीं लावावयाचें होतें. म्हणून आपल्या बदफैली वर्तनानें ख्रिस्ताचें नांव बद्दु करणाऱ्या या ख्रिस्ती लोकांचा नाद सोडून त्यानें केप कामोरींकडे पार[illegible] नांवाच्या जातीच्या लोकांमध्यें जाऊन वास्तव्य केलें. हे लोक खालच्या [illegible] निकृष्ट जातीचे होते. समुद्रांतून मोत्यांचे शिंपले गोळा करण्याचा त्य[illegible]चा धंदा होता. हे लोक अत्यंत गरीब व अज्ञ असल्यामुळें यांच्या कष्टां[illegible]वर मुसलमान व्यापारी गबर होऊन बसले होते. एकदां एका मुसलमानानें [illegible] एका पारावाच्या कानांतील दागिना तोडून काढल्यामुळें त्या माणसानें [illegible] रागाच्या भरांत त्या मुसलमानाला जागच्या जागीं ठार केला. या वैयक्तिक [illegible] भांडणाचें पर्यवसान या दोन्ही जमातींमध्यें मारामारींत होऊन एकमेकांची[illegible] त्यांनीं कत्तल सुरू केली. या वेळीं पारावांचा निःपात करण्याकरितां म[illegible]ुसलमान आरमार घेऊन आले; त्या वेळीं त्यांनीं कोचीनच्या पोर्तुगीजांक[illegible] धांव घेतली. हे सगळे लोक ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास तयार असतील त[illegible] आपण त्यांस मदत करूं, असें पोर्तुगीजांनीं

त्यांना उत्तर दिलें. ही अट मान्य करण्यापलीकडे पारावांना दुसरें गत्यंतरच नव्हतें. त्याप्रमाणें मुसलमानांचें पारिपत्य करून पोर्तुगीजांनीं पारावांचें रक्षण केलें. अशा प्रकारें १५३२ मध्यें वीस हजार पारावांनीं एकदम ख्रिस्ती धर्म स्वीकारला. हे जे ख्रिस्ती झाले, ते केवळ नामधारीच ख्रिस्ती होते. त्यांना ख्रिस्ती धर्माची शिकवण देण्याच्या कार्याला झेवियरनें दहा वर्षानंतर स्वतःला वाहून घेतलें व असें करतांना आजूबाजूच्या भागांतील कांहीं वरिष्ठ जातींतील व्यक्ति त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक वजनामुळें ख्रिस्ती धर्मांत त्याला ओढतां आल्या. उदाहरणार्थ एक गरोदर बाई प्रसूतीसाठीं तीन दिवस अडून त्रासांत पडली होती व तिची सर्वांनीं आशा सोडली होती. इतक्यांत तिकडे झेवियर प्राप्त झाला. त्यानें ईश्वराची प्रार्थना केली व इतक्यांत ती प्रसूत झाली. हा चमत्कार वाटून तें कुटुंब झेवियरच्या भजनीं लागलें व त्यांनीं त्याचा धर्म स्वीकारला. अशा प्रकारचीं तुरळक उदाहरणें सोडिलीं, तर झेवियरचें किंवा त्याच्यानंतर जे निरनिराळे फ्रान्सिस्कन किंवा जेजुइट लोक मद्रासेकडे आले, त्यांचें कार्य मुख्यतः खालच्या जातींमध्येंच होतें. या जाती हिंदु समाजांतर्गत मानल्या जात, तरी त्यांना हिंदु धर्माचें ज्ञान नव्हतें व त्यांनीं परधर्म स्वीकारला म्हणून वरिष्ठ मानलेल्या वर्गांना त्याची पर्वा किंवा सुखदुःख नव्हतें. यामुळें या पाद्री लोकांना त्या लोकांमध्यें निर्विघ्नपणें कार्य करतां आलें. याचा परिणाम असा झाला कीं, ख्रिस्ती धर्म हा अस्पृश्य लोकांचा धर्म अशी सार्वत्रिक समजूत होऊन बसली व अस्पृश्य जातींतील लोक ख्रिस्ती धर्माकडे तिरस्कृत दृष्टीनें पाहूं लागले. ज्या वेळीं संबंध महाराष्ट्र, इंग्रजांच्या हुकमतीखालीं आला, त्या वेळीं रे. विल्सनप्रभृति मिशनरींनीं शाळा वगैरे उघडून, विशेषतः खालच्या जातींमध्यें इंग्रजी शिक्षण सुरू केलें. माउन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यानें, अशा प्रकारें खालच्या वर्गांपासून इंग्रजी शिक्षणाचा आरंभ झाल्यास वरिष्ठ वर्गामध्यें इंग्रजी शिक्षणासंबंधीं अढी उत्पन्न होईल अशा प्रकारची जी भीति व्यक्त केली आहे, त्याची येथें आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं.

रॉबर्ट डि नोबिली याचा जन्म इटलीमध्यें १५७७ सालीं एका उच्च सरदार घराण्यांत झाला. पोपचा तो जवळचा नातलग व कार्डिनल बलार्मिनचा भाचा होता. ख्रिस्तावरील निष्ठेमुळें त्यानें ऐहिक सुखोपभोगांचा त्याग करून तो जेजुइट सोसायटीला जाऊन मिळाला. ख्रिस्ताचा संदेश जगांतील दूरदूरच्या प्रदेशांत पोंचविण्याच्या उद्देशानें तो ज्यावेळीं हिंदुस्थानांत १६०६ सालीं आला, त्या वेळीं त्याचें वय तिशीच्या आसपास होतें. या वेळीं मदुरा संस्थानांत मुट्टु कृष्णाप्पा हा नायक राज्य करीत होता. डि नोबिलीच्या पूर्वींच या संस्थानांत फ्रान्सिस्कन लोक व गोन्सालव्ह फर्नांडिस नांवाचा एक जेजुइट ख्रिस्ती धर्माचा

प्रचार करीत होता; पण वर सांगितल्याप्रमाणें त्यांचें कार्य केवळ खालच्या निकृष्ट वर्गापुरतें मर्यादित होतें. डि नोबिली याचा युरोपांतील प्राचीन व अर्वाचीन भाषांचा चांगला अभ्यास होता. मदुरेमध्यें आल्याबरोबर त्याला स्थानिक व तेलगु भाषांचा परिचय करून घेण्यास वेळ लागला नाहीं. थोडक्याच दिवसांत त्यानें येथील परिस्थितीचें बारकाईनें निरीक्षण केलें. ख्रिस्ती धर्म म्हणजे गोमांस खाणाऱ्यांचा, दारू पिणाऱ्यांचा व पारावांसारख्या अस्पृश्यांमध्यें राबणाऱ्यांचा धर्म आहे, अशा प्रकारची सार्वत्रिक समजूत झाल्याचें त्याच्या नजरेस आलें. जुन्या ख्रिस्ती कार्यकर्त्यांनीं हिंदु लोकांच्या धर्माबरोबर त्यांच्या चालीरीती, आचारविचार, खाद्यपेय, पेहराव वगैरे दरएक गोष्टीविरुद्ध, मग ती वाईट असो किंवा बरी असो, बंड उभारलें होतें. हें धोरण अत्यंत चुकीचें, अनिष्ट व आत्मघातकी आहे, ही गोष्ट जाणणारा हिंदुस्थानांतील पहिला मिशनरी रॉबर्ट डि नोबिली हाच होय. तेव्हां हिंदी लोकांना अन्तर्बाह्य युरोपियन बनविण्याचें ध्येय सोडून ख्रिस्ताच्या मूळ शिकवणीशीं फारशा विसंगत नाहींत, अशा त्यांच्या समाजिक चालीरीती, आहारविहार व पोषाख कायम ठेवूनच त्यांना ख्रिस्ताच्या नादीं लावण्याचें नवें धोरण डि नोबिलीनें आंखलें. हिंदु समाजामध्यें ब्राह्मणांचें केवढें प्रस्थ आहे, हें त्याला माहीत होतें. ब्रह्मदेवाच्या मुखापासून त्यांची उत्पत्ति झाली असा लोकांचा सार्वत्रिक समज. हिंदु लोकांचें ज्ञानभांडारही त्यांच्या स्वाधीन. तेव्हां या ब्राह्मणांची जागा आपण घेतल्याखेरीज ख्रिस्तदेवाला हिंदुस्थानांत ब्रह्मदेवाचें स्थान कधींही मिळणार नाहीं, हें त्यानें जाणलें व स्वतः ब्राह्मण बनण्याचा निर्धार केला. याकरितां पहिली गोष्ट त्यानें केली ती ही कीं, संस्कृत भाषेचा त्यानें जोरानें अभ्यास चालविला. मांसाहार अजिबात सोडून त्यानें एक ब्राह्मण स्वैंपाकी ठेवला व त्याच्या हातच्या भातभाजी अशा शाकाहारावर तो राहूं लागला. खालच्या जातींमध्यें कार्य करणाऱ्या फर्नांडिससारख्या जेजुइटाकडे संबंध त्यानें अजिबात वर्ज्य केला. इतकेंच नव्हे, तर डोक्यावर शेंडी राखली, गळ्यांत जानवें घातलें, भगवें वस्त्र परिधान केलें, कपाळाला भस्म चर्चिलें, बूट सोडून तो लांकडी पादुका वापरूं लागला व ब्राह्मण लोकांच्या आळींत एक मातीची झोपडी बांधून तेथें तो राहूं लागला. ब्राह्मणांखेरीज इतर खालच्या जातीशीं तो बिलकूल संपर्क ठेवीत नसे, इतकें त्याचें कडक सोवळें होतें ! इतर ब्राह्मणांच्या यज्ञोपवितालो केवळ तीनच सूत्रें असतात, तर या जजुर्वेदी ब्राह्मणाच्या जानव्याला पांच असत ! तीन सोनेरी व दोन रुपेरी. पिता, पुत्र व पवित्र आत्मा या त्रैक्याबद्दल ( Trinity ) सोनेरी आणि मनुष्याचें शरीर व आत्मा यांचें निदर्शक रुपेरी ! नेहमी त्याच्याजवळ कमंडलु असे. तामील, तेलगू व संस्कृत भाषा व वाङ्मय यामध्यें त्यानें चांगलें प्रावीण्य मिळविलें होतें व धार्मिक वादविवादाला आपणासमोर कोणी उभा राहिल्यास त्याला



**तत्त्वबोधक स्वामी**

( फादर डी नोबिली संन्याशाच्या वेशांत )

हें मूळ चित्र गोव्याच्या सरकारी ग्रंथालयांतील नोबिलीच्या एका हस्त-लिखित तामील ग्रंथांत आहे.

आपण कुंठित करूं असा त्याला आत्मविश्वास होता; पण हिंदुधर्मावर पुढून हल्ला केल्यास आपलें सोंग उघडकीला येईल, हें जाणण्याइतका तो धूर्त व चाणाक्ष होता. हिंदुधर्मग्रंथांचा तो अशा रीतीनें अर्थ लावी कीं, हळूहळू ख्रिस्ती धर्माची भूमि लोकांच्या अन्तःकरणांत तयार व्हावी. युरोपियन वेषाबरोबर त्यानें आपलें जुनें इटालियन नांव बदलून 'तत्त्वबोधकस्वामी' हें नवें नांव धारण केलें. हा फिरंगी माणूस आहे, असें म्हणणारे लोक त्या काळीं नव्हते असें नाहीं; पण आपण फिरंगी किंवा पोर्तुगीज नसून उत्तरेकडील रोमक ब्राह्मण आहें व इतर ब्राह्मणां-पेक्षां आपण श्रेष्ठ दर्जाचा ब्राह्मण आहें, असें तो सांगे. आपल्या आक्षेपकांचें तोंड बंद करण्याकरितां जुन्या कागदावर संस्कृत भाषेंत एक बनावट लेख तयार करून त्यांत ह्या जजुर्वेदी (जेजुइट) ब्राह्मणांची उत्पत्ति ब्रह्मदेवापासून झाली आहे व इतर ब्राह्मणांपेक्षां हे 'रोमक ब्राह्मण' श्रेष्ठ दर्जाचे आहेत, असा पुरावा त्यानें पुढें केला. हा पुरावाही खोटा आहे, अशी ज्या वेळीं मदुरेच्या ब्राह्मणांनीं ओरड केली, त्या वेळीं आपली उत्पत्ति ब्रह्मदेवापासून झाली आहे हें त्यानें शपथेवर सांगितलें, असें जेजुइट इतिहासकार Jouvencis यानें लिहून ठेविलें आहे, (The History of Christianity in India by Rev. James Hough, Vol. II.) उत्तरेकडील ब्राह्मण हे मद्रासेकडील ब्राह्मणांपेक्षां वर्णानें गोरे असतात व त्यांपैकीं कित्येकांच्या कातडीचा रंग समशीतोष्ण प्रदेशांतील इटालियन किंवा पोर्तुगीज लोकांसारखाच साधारणतः शुभ्र असतो. त्यामुळें तिकडील भोळ्या लोकांना फसविणें त्याला सोपें गेलें.

डि नोबिलीला हिंदु बुवाबाजीचें तंत्र चांगलें साधलें होतें. आपलें बस्तान हळूहळू बसत चाललें आहे, असें दिसतांच या तत्त्वबोधकस्वामीची भेटच त्याच्या भक्तांना दुर्लभ होऊं लागली! भोळ्या भाविकांनीं स्वामीच्या दर्शनाला जावें व बाहेर तासचे तास तिष्ठत बसावें. आज कुठें स्वामी प्रार्थनेंत गर्क आहेत किंवा आज गुरुजी ध्यानमग्न आहेत, अशासारखीं ठराविक उत्तरें शिष्यांकडून त्यांना मिळत. पुढें जेव्हां एकदां महत्प्रयासानें स्वामीच्या दर्शनाचा लाभ होई, तेव्हां स्वामींची गंभीर मूर्ति व मोहक वाणी ऐकून त्यांचा शिणभाग जाई व त्याची विद्वत्ता पाहून हे लोक चकीत होत. हिंदुधर्मग्रंथाचा, नेहमीच्या पद्धतीला सोडून, एका अभिनव पद्धतीनें (म्हणजे ख्रिस्तीधर्मशास्त्रास अनुसरून!) अर्थ लावण्याची स्वामीची हातोटी पाहून 'हें प्रकरण कांहीं न्यारें आहे,' असा विचार करीत व स्वामीजींचे गुण गात भक्तजन परत फिरत! असें करतांना स्वामीजी कधींही ख्रिस्ताच्या नांवाचा चूकूनदेखील उच्चार करीत नसत, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तसें केल्यास आपले बेंड बाहेर फुटून ब्राह्मणआळींतून तावडतोब आपली हकाल-पट्टी होईल, याची त्याला चांगली जाणीव होती. ब्राह्मणांचे जे चार वेद, त्यांपैकीं

तीनच वेदांचा सध्यां अभ्यास होतो; परंतु चौथा वेद जो अनेक शतकें लुप्त झाला होता त्याचा आपण नुकताच शोध लावला असून तो नष्ट होण्यापासून आपण त्याचा बचाव केला आहे, असें तो सांगे. इतर तीनही वेदांपेक्षां आत्म्याच्या तारणाकरितां या चौथ्या वेदाचा अभ्यास अवश्य आहे, असें त्यांचें सांगणें असे. ऋग्वेद, सामवेद व यजुर्वेद हेच मुख्य वेद असून त्यांना 'त्रयीविद्या' अशी संज्ञा आहे. अथर्व किंवा ब्रह्मवेद या वेदाला चौथा वेद म्हणून मान्यता मागाहून मिळाली. वेद तीनच असून चौथा वेद लुप्त झाला आहे, अशी सतराव्या शतकांत कल्पना होती, असें मानण्याला अन्यत्रही आधार आहे. A Rogerius नांवाचा हॉलंडमधील एक रहिवासी डच ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरींत धर्मोपदेशक म्हणून होता. त्याचें पुलिकत येथें १६३१ ते ते १६४२ पर्यंत वास्तव्य होतें. त्यानें पोर्तुगीज भाषा जाणणाऱ्या पद्मनाभ नांवाच्या एका ब्राह्मणाच्या साहाय्यानें भर्तृहरीच्या शतकत्रयाचें भाषांतर केलें होतें. त्यानें लिहिलेला De open Deure नांवाचा ग्रंथ १६५१ मध्यें Leyden येथें प्रसिद्ध झाला. त्यांत सध्यां तीनच वेद उपलब्ध आहेत व चौथा नष्ट झालेला अथर्वणवेद (adderawana wedam) जर ब्राह्मणांच्या हातीं लागता, तर त्यांचें महत्त्व, दर्जा व शक्ति राजापेक्षांही मोठी झाली असती, असें पद्मनाभ म्हणतो, असें या रोजेरियसनें नमूद केलें आहे. वेदग्रंथाचा उल्लेख युरोपियन लोकांच्या लिखाणांत पहिल्यांदा सुप्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकार Diogo do Couto याच्या Decadas ( Vol. 63 ) मध्यें "Vedaos" असा सांपडतो. हा ग्रंथ आधीं लिहिलेला, पण १६०२ सालीं प्रसिद्ध झाला. संस्कृत भाषेचा अभ्यास करणारा पहिला युरोपियन गृहस्थ Sassetti हा इटालियन प्रवासी होता, असें त्याच्या प्रसिद्ध झालेल्या पत्रव्यवहारावरून दिसून येतें. १५८६ मध्यें त्याचें गोवें येथें वास्तव्य होतें व तेथेंच त्यानें संस्कृत भाषा व वाङ्मय यांचा परिचय करून घेतला.

वेदासंबंधीं डि नोबिलीच्या व त्याच्या भोंवतालच्या ब्राह्मण भक्तगणांच्या कल्पना किती हास्यास्पद होत्या, हें त्याच्या स्वतःच्या ता. २४ डिसेंबर १६०८ च्या पत्रावरून कळून येतें. फादर हेरास यांनीं केलेल्या त्या पत्राच्या इंग्रजी भाषांतराचा खालीं उतारा देतों:—

"What helps me very much in the conversion of these people is the fact I discovered, that they had originally four Vedas: Three which the Brahmans still teach, viz. of Vesmu (Vishnu), Brama (Brahma) and Rutru (Siva) and a fourth, wholly spiritual, by which salvation was to be attained. They say, however, that this fourth Veda is lost, and there is no

man wise and good enough to recover it...So I profit by this disposition to tell them that if they wish to be saved, they aught to listen to me ; that I have come from a far-off country simply to save them by teaching them that spiritual law which ( as their Brahmans avow ) has been lost. I tell them that if they wish to apprehend this fourth law, they aught to declare themselves my disciples. Their conversion becomes then very easy. For when they resolve to become my disciples, they easily receive from me the doctrine I preach to them." ( The Aravidu Dynasty of Vijayanagara. 1927, p. 388)

'विश्वावशूची भगिनी शुभद्रा नेली जशी मारुतीनें शमुद्रा,' अशा प्रकारचें हें हिंदु वेदविद्येचें शकारी मासल्याचें अगाध ज्ञान त्याच्या बुवाबाजीच्या कारकीर्दीच्या आरंभींचें होतें. पुढें त्यानें या विषयांत जास्त गति करून घेतली असली पाहिजे.

अशा प्रकारें डि नोबिलीच्या शिष्यपरिवारांत दिवसेंदिवस भर पडूं लागली. त्याला तामील व संस्कृत भाषा शिकविणाऱ्या त्याच्या शिक्षकानें बाप्तिस्मा घेतला व त्याला आल्बर्ट ( Albert ) असें नांव देण्यांत आलें. १६०९ सालापर्यंत राजाचा एक जवळचा नातलग आपल्या घरच्या वीस कुटुंबीयांसह त्याच्या पंथांत शिरला. अशा प्रकारें ब्राह्मण, सरदार, नायक वगैरे वरिष्ठ वर्गांतील लोक या मोक्षदायक लुप्त 'जजुर्वेदा'चा फायदा घेण्याकरितां त्याच्या आश्रमांत गोळा होऊं लागले. डि नोबिलीचा धूर्तपणा इतका विलक्षण होता कीं, त्याच्या या दुटप्पी धोरणानें आपल्या शिष्यांच्या मूळ धार्मिक भावनेला धक्का बसण्याचा प्रसंग त्यानें कधींही येऊं दिला नाहीं. त्याची विद्वत्ता, साधेपणा, शुद्ध आचरण यांच्या-मुळें शिष्यांच्या अन्तःकरणावर शेवटपर्यंत त्याची जबरदस्त पकड बसून राहिली होती. डि नोबिलीच्या साधुपणाची कीर्ति स्वतः मदुरेचा नायक राजा मुट्टु कृष्णप्पा याच्या कानापर्यंत जाऊन पोंचली, आणि त्यानें डि नोबिलीला भेटण्याची इच्छा दर्शविली; परंतु आपल्या बुवाबाजीची फाजील जाहिरात झाल्यास सगळेंच कारस्थान उघडकीला येईल असा विचार करून आपण आश्रमाबाहेर एकदा पाऊल टाकल्यास स्त्रीचें आपणांस मुखदर्शन होईल व तें तर आपल्या पंथाच्या विरुद्ध आहे, असें सांगून त्यानें राजाचें निमंत्रण नाकारलें. यामुळें त्याच्या निःस्पृहतेचें जास्तच कौतुक झालें असल्यास नवल नाहीं.

जसजसें डि नोबिलीचें प्रस्थ वाढूं लागलें तसतसा तो जास्त धीट होत गेला व हिंदुधर्माविरुद्ध हळूहळू प्रचार करूं लागला. इतर तीन वेदांपेक्षां आपण

मिळविलेल्या चौथ्या वेदाचा अभ्यास मोक्षप्राप्तीकरितां जास्त आवश्यक आहे, आणि या वेदाच्या आदेशानुसार हिंदु देवदेवतांची पूजा निषिद्ध आहे असें तो सांगूं लागला. ब्रह्मा, विष्णु, महेश हे देव म्हणजे केवळ थोतांड असून मदुरेचा ग्रामदेव जो चोक्कनाथ तो केवळ दगडाचा तुकडा व माणसाच्या हातचें साधें बाहुलें आहे, असें तो म्हणूं लागला. हिंदु त्रैमूर्तीच्या ठिकाणीं ख्रिस्ती त्रैक्य (Trinity), ख्रिस्त व इतर सेंट यांची त्यानें स्थापना केली. मात्र त्यांना त्यानें अशाप्रकारें हिंदु नांवें दिलीं होतीं कीं, हे देव ख्रिस्ती असल्याची कोणाला सहसा शंकाच येऊं नये.

डि नोबिलीनें अशा प्रकारें कितीही सावधगिरी बाळगिली, तरी सगळे लोक त्याच्या कपटनाटकाला बळी पडणें शक्य नव्हतें. त्याचें कारस्थान पुष्कळांच्या लक्षांत आलें. हा संन्याशाच्या वेषांत असलेला मनुष्य हिंदुधर्माचा प्रचंड शत्रु आहे, अशी त्यांची खात्री झाली. देशांतील दुष्काळ, अनावृष्टि वगैरे आपत्तीला कारण या मांत्रिकाचे पांढरे पाय आहेत, असें त्यांपैकीं कांहीं लोक म्हणूं लागले. राज्यांतील भटभिक्षुक, पंडित व इतर पुढारी राजाकडे व धर्मगुरूकडे जाऊन डि नोबिलीला देशांतून घालवून दिल्याखेरीज देशांत पर्जन्यवृष्टि होणार नाहीं, असें सांगूं लागले. डि नोबिली हा नास्तिक असून चोक्कनाथादि हिंदु देवदेवतांची व हिंदु धर्माची निंदा करतो आणि स्वतः तुर्क असतां स्वतःला राजा म्हणवून भगवीं वस्त्रें परिधान करतो, ब्राह्मण नोकर ठेवतो, वेदग्रंथांचा अभ्यास करतो, अशी त्यांनीं ओरड चालविली. लोकक्षोभाचा जोर इतका तुफान होता कीं, कांहीं लोकांनीं त्याच्या आश्रमांत शिरून त्याच्या शिष्यांचीं जानवीं व शेंड्या कापून टाकल्या आणि त्यांचे डोळे फोडले, असें जेजुइटांनीं लिहून ठेविलें आहे. स्वतः डि नोबिलीचेंही जीवित धोक्यांत होतें; पण राजदरबारांत विलक्षण वजन असलेल्या एरुमलकट्टी नांवाच्या एका सरदारानें त्याला पाठीशीं घालून लोकांना शांत केलें. लोकक्षोभ ओसरल्यावर डि नोबिलीनें अपुरें राहिलेलें आपलें देवमंदिराचें बांधकाम पुरें केलें. हा ‘ जजुर्वेदी ’ चर्च पाहण्याकरितां खालच्या वर्गांतील ख्रिस्ती लोकांची अपार गर्दी लोटली व त्यावेळीं गोंसालव्ह फर्नांडिस व डि नोबिली हे एकाच जातीचे ‘ फिरंगी ’ आहेत ही गोष्ट त्यांच्या अनुयायांच्या लक्षांत आली, आणि मोठीच ओरड झाली. कांहीं लोक त्याला सोडून गेले व नवे शिष्य मिळण्याचें बंद पडलें. आपण या फिरंग्यांपैकीं नसून रोमयेथील उच्च घराण्यांतील आहें, वगैरे सांगून त्यांची समजूत पाडतां पाडतां त्याची पुरे वाट झाली.

हिंदु लोकांमधील ह्या असंतोषाला तोंड देणें डि नोबिलीला कठीण गेलें नाहीं; पण आतां घरच्या विरोधाला त्याला टक्कर द्यावी लागली. मिठाची बाहुली समुद्र प्यायला जावी आणि समुद्रांत विरावी, त्याप्रमाणें हिंदु लोकांना

ख्रिस्ती धर्मांत ओढायाला आलेला हा पाद्री स्वतः हिंदु झाला, असें जेजुईट लोकांना वाटूं लागलें. या लोकाचा पुढाकार फादर फर्नांडिस यानें घेतला होता. डि नोबिली स्वतः हिंदु व्हावयाच्या मार्गांत आहे, अशा आशयाची तक्रार त्यानें त्यांच्या मलबारांतील वरिष्ठ प्रांताधिकाऱ्याजवळ ( Provincial ) केली. हा प्रांताधिकारी डि नोबिलीचा मित्र व चाहता होता. इतकेंच नव्हे तर या Father Learzio ची आगाऊ संमति घेऊनच डि नोबिलीनें ह्या कपटनाटकाला आरंभ केला होता. त्यानें फादर फर्नांडिसची तक्रार कानामनावरच घेतली नाहीं; पण या जागीं नवा प्रांताधिकारी Father Perez आल्यावर फादर फर्नांडिसनें डि नोबिलीवरील आरोपांचा खर्डा पुनः त्याच्यापुढें सादर केला. त्याला उत्तर देण्याकरितां डि नोबिलीला पाद्रीमंडळासमोर कोचीन येथें उभें करण्यांत आलें. त्यानें आपल्या कृतीचें समर्थन केलें; पण Father Pimento नांवाच्या एका पंचाचें त्यानें समाधान होऊं शकलें नाहीं. त्यामुळें हें प्रकरण गोव्याच्या आर्चबिशपकडे गेलें. आर्च-बिशपला डि नोबिलीची बाजू पटली; परंतु फर्नांडिस व पिमेंतु हे स्वस्थ बसले नाहींत. त्यांनीं हें प्रकरण पोपपर्यंत नेऊन भिडविलें व या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत डि नोबिलीला कामावरून दूर करण्यांत आलें. डि नोबिलीनें मांडलेली आपली बाजू ग्रंथरूपानें प्रसिद्ध आहे, त्यावरून त्याचें हिंदु व ख्रिस्ती धर्मशास्त्रा-वरील प्रभुत्व दिसून येतें. हें प्रकरण १६१३ पासून दहा वर्षे भिजत पडून शेवटीं १६२३ सालीं पोप पंधरावा ग्रेगरी यानें डि नोबिलीच्या तर्फे आपला निकाल दिला. अशाप्रकारें डि नोबिली शेवटीं जरी दोषमुक्त झाला, तरी त्याच्यावरील लोकांचा विश्वास उडून त्यानें आरंभिलेल्या कार्याची जी हानि झाली ती कधींही पुढें भरून निघाली नाहीं. त्यानें १६२३ सालीं आपलें कार्य पुनश्च चालू केलें; परंतु लोकांवरील त्याची एके काळची मोहिनी राहिली नव्हती. पुढें त्यानें स्थलांतर करून अन्य ठिकाणीं जम बसविण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु त्याच्या कारस्थानाचा सर्वत्र बोभाटा झाल्यामुळें त्याला यश कुठेंच येऊं शकलें नाहीं. १६३८ सालीं तो पुनः मदुरेमध्यें आला. त्याच्या गैरहजिरींत त्याचें कार्य फादर व्हिको चालवीत होता. पंधरा वर्षांच्या मागच्ीं त्याचीं कृत्यें लोक विसरून गेले होते, व त्यांनीं त्याचें स्वागत केलें; हें पाहून डि नोबिलीनें आपलें डळमळीत आसन पुनः नीट बसविण्यास सुरुवात केली. १६३८ मध्यें फादर व्हिको मरण पावला. स्वतः काम करण्याची शक्ति डि नोबिलीच्या अंगामध्यें राहिली नव्हती, म्हणून त्यानें आपल्या मदतीला कांहीं नवीं माणसें बोलावलीं. हे पाद्री बहुतेक गोव्याला राहून आलेले असावेत. त्यांनीं तिकडच्या पद्धतीप्रमाणें हिंदु धर्मावर उघड अत्याचार सुरू केला; त्यामुळें लोक इतके बिथरून गेले कीं, त्यांनीं तिरुमल नायकाला, मदुरा व त्रिचिनापल्लीयेथील मिशनऱ्यांना पकडण्याबद्दल हुकूम

सोडण्यास भाग पाडलें. कांहीं पाद्री पळून गेले, पण डि नोबिलीला पकडलें. स्वतः तिरुमल नायक डि नोबिलीवर इतका संतापला होता कीं, स्वतःच्या हातांनीं त्याला ठार करण्याची इच्छा त्यानें व्यक्त केल्याचें सांगतात. पुढें १६४४ सालीं डि नोबिलीनें तिरुमल नायकाकडे क्षमेची याचना केली, व त्याच्या वयाकडे पाहून नायकानें त्याच्या चर्चची सरकारजमा केलेली इष्टेट परत देवविली व पूर्वींप्रमाणें त्याला आपलें कार्य शांतपणें करण्यास परवानगी दिली. डि नोबिली आतां वृद्ध झाला होता. दृष्टीही कमी झाली होती. पुढें १६४५ सालीं तो सेवानिवृत्त होऊन मयलापूर येथें एका झोंपडींत अखेरचे दिवस कंठीत १६५६ सालीं या गांवांतच निधन पावला. मरणापूर्वींचा त्याचा एक चमत्कार सांगतात तो मोठा मजेदार आहे. ख्रिस्ती लोकांनीं हिंदु लोकांवर अत्याचार केल्यामुळें ते क्षुब्ध होऊन गेले होते. त्यांच्यापासून या वृद्ध माणसाला निष्कारण उपसर्ग पोंचूं नये म्हणून त्याच्या शिष्यलोकांनीं किल्ल्यामध्यें जेथें ख्रिस्ती लोकांची विशेष वस्ती आहे अशा ठिकाणीं सुरक्षित ठिकाण म्हणून त्याला नेऊन ठेवलें. हें स्थलांतर त्याच्या प्रकृतीला मानवलें नाहीं व त्यामुळें त्याचा लवकर अंत घडून आला. मरतां मरतां, ‘ ज्या माझ्या कोठडींतून तुम्हीं मला हलविलेंत ती सुरक्षित राहील व जें ठिकाण सुरक्षित असें तुम्हीं समजतां तो हा किल्ला व नगर लवकरच जमीनदोस्त होईल, ’ असे त्यानें उद्गार काढल्याचें सांगतात. त्याचें भाकीत अखेर खरेंच ठरलें. फ्रेंच लोकांनीं मयलापुरांतून पोर्तुगीजांना हुसकावून लावलें व पोर्तुगीजांचा दोस्त गोवळ-कोंड्याचा सुलतान यानें फ्रेंचांचीही तीच अवस्था केली; पुनः फ्रेंचांनीं तिकडे येण्याचा विचार करूं नये म्हणून सुलतानानें किल्ल्याच्या भिंती पाडून टाकल्या व नगर उध्वस्त केलें. डि नोबिलीची झोंपडी मात्र सुरक्षित होती !

श्री. व्ही. रंगाचारी यानें आपल्या मथुरेंतील नायक या लेखमालेंत (The Indian Antiquary, Vol. XLVI. 1917, p. 22, ) डि नोबिलीचा मृत्यु-काल १६६० असा दिला आहे; परंतु Joseph Constant Beschi याच्या १७२९ मध्यें लिहिलेल्या तामील ग्रंथांत ता. १६ जानेवारी १६५६ असा दिला आहे, तोच खरा वाटतो. फादर बेस्की (१६८०–१७४७) हाही संस्कृतज्ञ मिशनरी असून त्यानें लिहिलेले अनेक तामील भाषेंतील अभिजात ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या दुसऱ्या जजुर्वेदी ब्राह्मणाचें हिंदी नांव ‘ वीर मौनि ’ व ‘ धैर्यनाथ स्वामी ’ असें होतें.

डि नोबिलीचा समकालीन फादर स्टिफन्स यानें जसें मराठी भाषेंत ख्रिस्त-पुराण लिहिलें आहे, तसें डि नोबिलीनें तामील व तेलगु भाषांमध्यें धर्मपर अनेक रसभरित ग्रंथ लिहिल्याचें सांगतात. संस्कृत भाषेमध्यें ‘ सत्यवेदसारसंग्रह ’ नांवाचा त्यानें एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांतील भाषेचा नमुना पाहा :—

### ईश्वरस्य स्वभावः

स च नित्यः स्वतः ह्यनन्तत्वेन लक्षितः ।
सर्वव्यापी च लोकं च सृष्टवान् देवनामकः ॥
आदिकारणकर्तासावधिराजाधिराजयन् ।
सर्वाधिकार्य प्राहुर्हि स तु सर्वोत्तमो विभुः ॥
देवसृष्टिमयो लोकः कार्यञ्चेदस्ति कारणम् ।
लोकज्ञानस्फुटो देवः सोऽनुमानेन सिद्धयति ॥

आपण ज्या वेदाचा बचाव केला आहे असें तो सांगे तो कदाचित् हाच त्याचा ‘ सत्यवेद ’ असावा !

आतां प्रस्तुत लेखाच्या आरंभीं ज्या ‘जजुर्वेदाचा’ उल्लेख केला, त्या ग्रंथाचें कर्तृत्व डि नोबिलीकडे होतें कीं काय याचा विचार करूं. मद्रासचे कलेक्टर मि. एलिस यानें आपल्या निबंधांत हा हिंदु वेदग्रंथ नाहीं, असें सिद्ध केलें आहे तें खरेंच आहे; पण त्याच्या मतें ह्या ग्रंथाचा जनक डि नोबिली किंवा दक्षिणेकडील कोणीही नसून बंगालकडील कोणीतरी जेजुइट किंवा नवख्रिश्चन असावा. ‘व’ बद्दल ‘ब’, ‘य ’ बदल ‘ज’ किंवा ‘अ’ बद्दल ‘ओ’ असें लिहिण्याची किंवा उच्चार करण्याची जी पद्धति ह्या ग्रंथांत दिसून येते, त्यावरून त्याचा उगम उत्तरेकडे आहे असें त्याचें म्हणणें आहे. याच मताचा अनुवाद Caland वगैरेंनीं पुढें केलेला आहे; परंतु हें कारण तितकेंसें सयुक्तिक दिसत नाही. पहिली एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, या जजुर्वेदाचें ( यजुर्वेदाचें ) मूळ संस्कृत हस्तलिखित उपलब्ध झालेलें नाहीं. पाँडिचरीला जेजुइट सोसायटीमध्यें सांपडलें तेंही त्याचें फ्रेंच भाषांतर. याचबरोबर ऋग्वेद, सामवेद व अथर्ववेद यांवर अशा प्रकारचे जे अन्य खंडनपर टीकात्मक ग्रंथ उपलब्ध झाले, ते मात्र संस्कृत भाषेंत आहेत; परंतु लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, ते देवनागरी लिंपीमध्यें नसून अत्यंत अशुद्ध अशा रोमन लिपीमध्यें आहेत. माझ्या मतें मूळ देवनागरीचें रोमन लिप्यंतर ( Transliteration ) करणारा हा कोणीतरी बंगालकडील अर्धवट संस्कृत शिकलेला अडाणी पाद्री असावा. धि कलिंग हिस्टोरिकल रिसर्च सोसायटीच्या जर्नलमध्यें प्रसिद्ध झालेला भारतीय वैद्यकासंबंधींचा एक निबंध त्याचे लेखक आमचे मित्र भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूटचे क्युरेटर, प्रो. गोडे यांच्याकडून नुकताच मजकडे आला आहे. त्यांतील संस्कृत उताऱ्यांत ठिकठिकाणीं वैद्यबद्दल बैद्य छापलें आहे. यावरून प्रो. गोडे यांना उत्तरेकडील ठरविणें जितकें चुकीचें तितकेंच प्रस्तुत जजुर्वेदाच्या मूळ लेखकाला बंगाली ठरविणें भ्रामक आहे. हे ग्रंथ डि नोबिलीच्या हातचे आहेत अशी दक्षिणकडे

प्रतिष्ठित ख्रिस्ती लोकांची सार्वात्रिक समजूत आहे, असें जें एलिसनें म्हटलें आहे ती त्याची समजूत खोटी ठरविण्याइतके सबळ पुरावे माझ्या मतें अद्याप पुढें आलेच नाहींत. मॅक्समुल्लरला हे ग्रंथ डि नोबिलचे आहेत, असें वाटत नाहीं. ( Lectures on the Science of Languages, Vol. I, 1885, p. 174). हे ग्रंथ त्याचे असल्याबद्दल अन्तर्गत पुरावा नाहीं व त्याच्या ग्रंथांच्या यादींत या पुस्तकांचा नामनिर्देशही नाहीं, एवढीच आपल्या मताच्या समर्थनार्थ त्यानें कारणें दिलीं आहेत. हे जुने ग्रंथ आहेत अशी लोकांची समजूत करून देण्याकरितां जे ग्रंथ बुद्ध्याच रचण्यांत आले, त्यांत त्याचा कर्ता आपला नामनिर्देश कसा करील ? व्हॉल्टेरला मिळालेल्या फ्रेंच यजुर्वेदाचें मूळ संस्कृत हस्तलिखित मि. एलिसला पाँडिचरी येथें उपलब्ध झालेलें होतें, हीदेखील मॅक्समुल्लरची समजूत चुकीची आहे. एलिसनें आपल्या निबंधांत जे उतारे दिले आहेत, ते यजुर्वेदांतील नसून सामवेदावरील हस्तलिखितांतील होत. हें मूळ हस्तलिखित रोमन लिपींत असून अत्यंत दुर्बोध आहे. त्याचा बोध होईल अशा प्रकारें शुद्ध केलेल्या देवनागरी लिप्यंतरासह नमुना म्हणून एक उतारा पुढें देतोंः

Poromo karoniko zaimeni koli kolmocho
परमकारुणिको जैमिनिः कलिकल्मष—
Bibranto sedocho brammono ozatartoto
विभ्रान्तचेतसः ब्रह्मणः अज्ञातार्थतः
Ognano bolon ouddaron monochi bibedio
अज्ञानबलं उद्धारं मनसि विवेद्य
Adohu brommo sorgion boktun arebe
आदौ ब्रह्मचर्यं वक्तुम् आरेभे
Totradohu poromanando siteno poromechoron nanamo
तत्रादौ परमानन्दचित्तेन परमेश्वरं ननाम
Oum choosero chirichan debon duxto nigroho karakon
ॐ सहस्र— शीर्षं देवं दुष्ट- निग्रह—कारकम्
Stapokon zontou adinam pronotochi zogaot gurum
स्थापकं जंतु आदीनां प्रणतोस्मि जगद्गुरुम्
Adaram chorbo lokanam anadi nidonon probum
आधारं सर्व- लोकानां अनादि निधनं प्रभुम्
Obedion chorbo majanam pronotochi mohotprobun
अभेद्यं सर्व- मायानां प्रणतोऽस्मि महत्प्रभुम्

Okioram poromon nition bichuakion bichuochon bobun
अक्षरं परमं नित्यं विश्वाख्यं विश्वसंभवम्
Chorbo totuamojon debon pronotochi poratporon
सर्व-- तत्त्वमयं देवं प्रणतोऽस्मि परात्परम्
Prodono pourouchon chidaon chorbo gnanoiko koronon
प्रधान- पुरुषं सिद्धं सर्व- ज्ञानैक- कारणम्
Porat porotoron debon pronotochi moho probun
परात्परतरं देवं प्रणतोऽस्मि महांप्रभुम्
Porongioti porom damopobitron poromon podon
परं ज्योति : परं धाम पवित्रं परमं पदम्
Chodoiko babon poromon pronotochi mahachojon
सदैकभावं परमं प्रणतोऽस्मि महाशयम्
Ton chodanado sit matron serextanam sorbo serexton
तं सदानन्दचिन्मात्रं श्रेष्ठानां सर्व- श्रेष्ठतम्
Nirgounon nioton naton pronotochi kritanzoli
निर्गुणं नियतं नाथं प्रणतोऽस्मि कृताञ्जलिः
Porecho paromonodo choronoto bossolo
परेश परमानन्द शरणागत वत्सल
Trahi ma Koruno chindo mootito namostu te
त्राहि मां करुणासिन्धो मुक्तिदाय नमोऽस्तु ते
Iti chi-chi-chikiarton brommo toutocho
इति शिष्यशिक्षार्थं ब्रह्मस्तुतस्य
Itochin chomoje nanaboturo serobomeboto narajono
एतस्मिन् समये नानावतार-- श्रवणसंभवात् नारायणो
mahamaho
महामहो

Obapotochat kretanzoli boutua bedo gourun
अवापतस्यत् कृताञ्जलिः भूत्वा वेदगुरुम्
Zoimeni richi boron prorpojo
जैमिनि- ऋषिवरं प्रापय

डि नोबिलीला किंवा अन्य कोणालाही वैदिक संस्कृतामध्यें लिहिणें शक्यच नव्हतें, व तसें लिहिलें असतें तरी त्याला वाचकही मिळाले नसते. डि नोबिलीच्या

'सत्यवेदसारसंग्रहां'तील किंवा वरील सामवेदांतील संस्कृत भाषा एकाच मासल्याची मोडकीतुटकी आहे. जैमिनि, नारायण, पैलपाद, आंगिरस, व्यास, नारद वगैरे वेदवाङ्मयाशीं संबंध असलेल्या ऋषिमुनींचीं नांवें आपल्या लिखाणांत ठिकठिकाणीं योजून प्राचीनत्वाची भ्रांति भोळ्या वाचकांच्या मनांत उत्पन्न होईल अशा प्रकारची व्यवस्था या ग्रंथांमध्यें भरपूर आहे. मराठीला मारण्याकरितां नवी कोकणी प्रांतिक भाषा जशी अलीकडे निर्माण करून या मताला अनुयायी मिळाले तसे या बनावट ग्रंथावर विश्वास ठेवणारे मूर्ख किंवा आपमतलबी लोक त्या काळींही मिशनऱ्यांना सांपडले असतील यांत नवल नाहीं. या प्रश्नाचा जास्त साधार विचार मी अन्यत्र एकाद्या इंग्रजी मासिकांत करणार आहें.

विविधवृत्त-दिवाळी अंक १९४७

० ० ०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... दि: ..................
क्रमांक .................... नों: दि: ..................

३

# आपलीं नांवें आणि आडनांवें

श्रीयुत रघुनाथ नारायण खोटे ( १८२१-१८९१ ) हे गेल्या शतकाच्या अखेरीच्या दिवसांतील मुंबईशहरांतील प्रसिद्ध सार्वजनिक पुरुष होते. मुंबईचे शेरीफ, कॉर्पोरेशनचे अध्यक्ष वगैरे मोठमोठ्या मानाच्या जागा त्यांनीं भूषविल्या होत्या. त्यांच्यासंबंधीं न्या. मू. काशीनाथपंत तेलंग यांच्याशीं सहज बोलणें चाललें असतांना न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांची विनोदबुद्धि एकाएकीं जागृत झाली व ते हसत म्हणाले,

" काशीनाथपंत ! अहो, तुमच्या जातीमध्यें **खोटे** आहेत तर आमच्या जातीमध्यें **खरे** आहेत ! " श्रीयुत दाजी आबाजी खरे हेही त्या काळीं प्रसिद्ध वकील होते, हें पुष्कळांना माहीत असेल.

" हो ना, पण आमच्या जातीमध्यें एकच **खोटे** आहेत, तर तुमच्या जातीमध्यें एकच **खरे** आहेत, " तेलंगांनीं सस्मित शांतपणें उत्तर दिलें.

काशीनाथपंतांच्या हजरजबाबीपणाचें कौतुक करतांना महादेवराव रानडे ही त्यांची आठवण नेहमीं मोठ्या प्रेमानें सांगत असत, असें म्हणतात.

**वैयक्तिक नांवें**

वरील आख्यायिका ज्या वेळीं मीं प्रथम ऐकली, त्या वेळीं आडनांव किंवा ज्यास उपनांव किंवा कुलनाम असेंही म्हणतात, त्यांची प्रथा प्रथम कशी पडली असावी, हा प्रश्न मनापुढें उभा राहिला. या प्रश्नाचा विचार करतांना वैयक्तिक नांव म्हणजे ज्यास पाळण्यांतील नांव किंवा personal किंवा Christian name असें इंग्रजीमध्यें म्हणतात, त्यांचाही उगम कसा झाला हें प्रथम पाहणें अवश्य आहे. समाजाच्या प्रथमावस्थेंत वैयक्तिक नामकरणाची पद्धति होती, असें दिसत नाहीं. अगदींच रानटी आदिवासी समाजामध्यें काय प्रकार असतो, हें पाहिल्यास याची कदाचित् कल्पना होईल. कोंकणामध्यें आमच्या शेजारीं गावडे नांवाच्या समाजामध्यें मुलगा जन्मल्याबरोबर त्याला ' चेडो ' ( मुलगा किंवा बाळ ) असें म्हणत. दुसरा मुलगा झाल्यावर त्याला ' धाकलो ( धाकटा ) चेडो ' असें नांव मिळे. तिसरा मुलगा झाल्याबरोबर त्याला आतां काय म्हणावें, असा प्रश्न

पडे; पण त्यालाही या लोकांनीं मार्ग शोधून काढला ! अशा मुलाला ते " दुधाचो चेडो " म्हणजे अंगावर पिणारा किंवा व्याकरणकार दादोबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे " थानपिता " मुलगा असें नांव देत. माझ्या लहानपणीं मीं असा एक पाऊणशें-ऐशीं वर्षांचा " दुधाचो चेडो " पाहिला होता ! आणि त्यांत आश्चर्य कसलें ? आजही आपण जवळजवळ सत्तरीच्या घरांत जाणारा ' बालगंधर्व ' पाहत नाहीं काय ? यांच्या पुढेंही जशी संतति वाढूं लागली तसे हे लोक मुलगा ज्या वारीं जन्मला असेल त्या वाराचें नांव म्हणजे सोमो, मंगळो, बुधो अशीं त्याला नांवें देत. अलीकडे ब्राह्मण लोकांच्या विशेष परिचयामुळें त्यांच्यामध्यें राम, कृष्ण, विठ्ठल, शंकर अशा प्रकारचीं देवदेवतांचीं नांवें प्रसार पावत आहेत. वरील हकीकतीवरून समाजांत वैयक्तिक नामकरणाची प्रवृत्ति कशी पडत चालली असावी, याची कल्पना करतां येते.

अगदीं मागासलेल्या समाजाची गोष्ट सोडली, तरी जुन्या काळीं वरिष्ठ समाजामध्येंही नांवें अगदीं पाळण्यांत घालतांना दिलीं जात असत कीं काय, याबद्दल शंका वाटते. राम, कृष्ण, अर्जुन, दुर्योधन वगैरे नामें त्या व्यक्तींच्या गुणकर्मांवरून पडलीं असावीं, अशीं वाटतात. त्यामुळें एकाद्या महान् पुरुषाला त्या काळीं अनेक नांवें मिळत असत.

सोळा किंवा मनुस्मृतीप्रमाणें जें बारा संस्कार सांगितले आहेत, त्यांत नामकरणाचाही अन्तर्भाव होतो. परंतु ही प्रथा बरीच मागाहून पडली असावी. या नामधेयविधिसंबंधीं मनु काय म्हणतो पहा:—

**नामधेयं दशम्यां तु द्वादश्यां वास्य कारयेत् ।**
**पुण्ये तिथौ मुहूर्ते वा नक्षत्रे वा गुणान्विते ॥**
**मङ्गल्यं ब्राह्मणस्य स्यात्क्षत्रियस्य बलान्वितम् ।**
**वैश्यस्य धनसंयुक्तं शूद्रस्य तु जुगुप्सितम् ॥**
**शर्मवद् ब्राह्मणस्य स्याद्राज्ञो रक्षासमन्वितम् ।**
**वैश्यस्य पुष्टिसंयुक्तं शूद्रस्य प्रेष्यसंयुतम् ॥**
**स्त्रीणां सुखोद्यमक्रूरं विस्पष्टार्थं मनोहरम् ।**
**मङ्गल्यं दीर्घवर्णान्तमाशीर्वादाभिधानवत् ॥**

रामायणकालीं हा नामकरणविधि अस्तित्वांत होता असें रामायणावरून दिसतें.

अतीत्यैकादशाहं तु नामकर्म तथाकरोत् ।
ज्येष्ठं रामं महात्मानं भरतं कैकयीसुतम् ॥
सौमित्रिं लक्ष्मणमिति शत्रुघ्नमपरं तथा ।
वसिष्ठः परमप्रीतो नामानि कुरुते तदा ॥

३

# आपलीं नांवें आणि आडनांवें

श्रीयुत रघुनाथ नारायण खोटे ( १८२१-१८९१ ) हे गेल्या शतकाच्या अखेरीच्या दिवसांतील मुंबईशहरांतील प्रसिद्ध सार्वजनिक पुरुष होते. मुंबईचे शेरीफ, कॉर्पोरेशनचे अध्यक्ष वगैरे मोठमोठ्या मानाच्या जागा त्यांनीं भूषविल्या होत्या. त्यांच्यासंबंधीं न्या. मू. काशीनाथपंत तेलंग यांच्याशीं सहज बोलणें चाललें असतांना न्या. मू. महादेव गोविंद रानडे यांची विनोदबुद्धि एकाएकीं जागृत झाली व ते हसत म्हणाले,

" काशीनाथपंत ! अहो, तुमच्या जातीमध्यें **खोटे** आहेत तर आमच्या जातीमध्यें **खरे** आहेत ! " श्रीयुत दाजी आबाजी खरे हेही त्या काळीं प्रसिद्ध वकील होते, हें पुष्कळांना माहीत असेल.

" हो ना, पण आमच्या जातीमध्यें एकच **खोटे** आहेत, तर तुमच्या जातीमध्यें एकच **खरे** आहेत, " तेलंगांनीं सस्मित शांतपणें उत्तर दिलें.

काशीनाथपंतांच्या हजरजबाबीपणाचें कौतुक करतांना महादेवराव रानडे ही त्यांची आठवण नेहमीं मोठ्या प्रेमानें सांगत असत, असें म्हणतात.

**वैयक्तिक नांवें**

वरील आख्यायिका ज्या वेळीं मीं प्रथम ऐकली, त्या वेळीं आडनांव किंवा ज्यास उपनांव किंवा कुलनाम असेंही म्हणतात, त्यांची प्रथा प्रथम कशी पडली असावी, हा प्रश्न मनापुढें उभा राहिला. या प्रश्नाचा विचार करतांना वैयक्तिक नांव म्हणजे ज्यास पाळण्यांतील नांव किंवा personal किंवा Christian name असें इंग्रजीमध्यें म्हणतात, त्यांचाही उगम कसा झाला हें प्रथम पाहणें अवश्य आहे. समाजाच्या प्रथमावस्थेंत वैयक्तिक नामकरणाची पद्धति होती, असें दिसत नाहीं. अगदींच रानटी आदिवासी समाजामध्यें काय प्रकार असतो, हें पाहिल्यास याची कदाचित् कल्पना होईल. कोंकणामध्यें आमच्या शेजारीं गावडे नांवाच्या समाजामध्यें मुलगा जन्मल्याबरोबर त्याला 'चेडो' ( मुलगा किंवा बाळ ) असें म्हणत. दुसरा मुलगा झाल्यावर त्याला 'धाकलो ( धाकटा ) चेडो' असें नांव मिळे. तिसरा मुलगा झाल्याबरोबर त्याला आतां काय म्हणावें, असा प्रश्न

पडे; पण त्यालाही या लोकांनीं मार्ग शोधून काढला! अशा मुलाला ते "दुधाचो चेडो" म्हणजे अंगावर पिणारा किंवा व्याकरणकार दादोबांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे "थानपिता" मुलगा असें नांव देत. माझ्या लहानपणीं मीं असा एक पाऊणशें-ऐशीं वर्षांचा "दुधाचो चेडो" पाहिला होता! आणि त्यांत आश्चर्य कसलें? आजही आपण जवळजवळ सत्तरीच्या घरांत जाणारा 'बालगंधर्व' पाहत नाहीं काय? यांच्या पुढेंही जशी संतति वाढूं लागली तसे हे लोक मुलगा ज्या वारीं जन्मला असेल त्या वाराचें नांव म्हणजे सोमो, मंगळो, बुधो अशीं त्याला नांवें देत. अलीकडे ब्राह्मण लोकांच्या विशेष परिचयामुळें त्यांच्यामध्यें राम, कृष्ण, विठ्ठल, शंकर अशा प्रकारचीं देवदेवतांचीं नांवें प्रसार पावत आहेत. वरील हकीकतीवरून समाजांत वैयक्तिक नामकरणाची प्रवृत्ति कशी पडत चालली असावी, याची कल्पना करतां येते.

अगदीं मागासलेल्या समाजाची गोष्ट सोडली, तरी जुन्या काळीं वरिष्ठ समाजामध्येंही नांवें अगदीं पाळण्यांत घालतांना दिलीं जात असत कीं काय, याबद्दल शंका वाटते. राम, कृष्ण, अर्जुन, दुर्योधन वगैरे नामें त्या व्यक्तींच्या गुणकर्मांवरून पडलीं असावीं, अशीं वाटतात. त्यामुळें एकाद्या महान् पुरुषाला त्या काळीं अनेक नांवें मिळत असत.

सोळा किंवा मनुस्मृतीप्रमाणें जें बारा संस्कार सांगितले आहेत, त्यांत नामकरणाचाही अन्तर्भाव होतो. परंतु ही प्रथा बरीच मागाहून पडली असावी. या नामधेयविधिसंबंधीं मनु काय म्हणतो पहा:—

**नामधेयं दशम्यां तु द्वादश्यां वास्य कारयेत् ।**
**पुण्ये तिथौ मुहूर्ते वा नक्षत्रे वा गुणान्विते ॥**
**मङ्गल्यं ब्राह्मणस्य स्यात्क्षत्रियस्य बलान्वितम् ।**
**वैश्यस्य धनसंयुक्तं शूद्रस्य तु जुगुप्सितम् ॥**
**शर्मवद् ब्राह्मणस्य स्याद्राज्ञो रक्षासमन्वितम् ।**
**वैश्यस्य पुष्टिसंयुक्तं शूद्रस्य प्रेष्यसंयुतम् ॥**
**स्त्रीणां सुखोद्यमक्रूरं विस्पष्टार्थं मनोहरम् ।**
**मङ्गल्यं दीर्घवर्णान्तमाशीर्वादाभिधानवत् ॥**

रामायणकालीं हा नामकरणविधि अस्तित्वांत होता असें रामायणावरून दिसतें.

अतीत्यैकादशाहं तु नामकर्म तथाकरोत् ।
ज्येष्ठं रामं महात्मानं भरतं कैकयीसुतम् ॥
सौमित्रिं लक्ष्मणमिति शत्रुघ्नमपरं तथा ।
वसिष्ठः परमप्रीतो नामानि कुरुते तदा ॥

हीं नांवें एकदां निश्चित झाल्यावर जुन्या व्यक्तिमाहात्म्यामुळें तीं नांवें पाळण्यांत मुलांना घालतांना मागाहून मिळूं लागलीं असणें शक्य आहे. अलीकडे मुलांना नांवें देतांना तीं कशीं देतात तें पाहूं—

१ पूर्वजांचीं नांवें–( तीं खालील कोणत्याही वर्गांतील असूं शकतील ).

२ देवादिकांचीं नांवें--विष्णु, शंकर, कृष्ण, दत्तात्रेय वगैरे.

३ संतांचीं नांवें--ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, वगैरे.

४ ऐतिहासिक पुरुषांचीं नांवें--शिवाजी, बाजीराव, चिमाजी, जिवबा, वगैरे.

५ राष्ट्रीय व्यक्तींचीं नांवें--सुभाष, रवींद्र, मोहनदास, सरोजिनी वगैरे.

६ नाटक, कादंबऱ्या किंवा काव्यें यांतील लोकप्रिय पात्रांचीं : बंगाली ग्रंथांचीं मराठीमध्यें भाषांतरें होऊं लागल्यापासून अशा नांवांची आयात महाराष्ट्रामध्यें फार झाली, व नवीं काव्यमय नांवें देण्याची प्रवृत्ति सुरू झाली.

**नव्या नांवांचा हव्यास**

मुलींच्या बाबतींत लक्ष्मी, पार्वती, सीता, रुक्मिणी अशीं पौराणिक किंवा गंगा, नर्मदा, गोदावरी अशी पवित्र नद्यांचीं नांवें देण्याची जुन्या काळीं प्रवृत्ति होती. तसाच कोणी रसिक असला तर शेवंती, मोगरी अशीं फुलांचीं नांवें देई. गोष्टी-कादंबऱ्यांच्या ‘ मनोरंजन ’ युगांत कमला, सरला, तरला, विमला, दया, माया, अशांसारखीं काव्यमय नांवें सुरू झालीं. अलीकडे सिनेमानटींचीं नांवें देण्याची प्रवृत्ति लोकांमध्यें बोकाळूं पाहात आहे ! हींही नांवें वरच्या कोटींतील असतात. जुन्या काळीं साधुपुरुष आपल्या लौकिक नांवाचा त्याग करून ब्रह्मानंद, पूर्णानंद, योगानंद अशीं नवीं पारमार्थिक नांवें धारण करीत. सिनेमातारकांनींही त्यांचाच कित्ता, अलीकडे गिरविलेला दिसतो. जुनीं वैयक्तिक नामें टाकून हरिणाक्षी, वनबाला अशासारखीं नवीं नांवें त्या धारण करतात. या नांवांनाही ‘ पारमार्थिक ’ नांवें म्हणावयास हरकत नाहीं. साधुपुरुषाच्या उधार परमार्थापेक्षां सिनेमातारकांचा ‘ परमार्थ ’ ( श्रेष्ठ किंवा भरपूर अर्थप्राप्ति ) रोख असतो. त्याच्याकरितां त्यांना परलोकीं ( तो असला तर ! ) जाईपर्यंत वाट पाहण्याची गरज नसते. पुष्कळ वेळां तो आगाऊही त्यांच्या पदरांत पडत असावा. ही काव्यमय नांवें देण्याच्या भरांत कसे घोटाळे होण्याचा संभव असतो याची एक आठवण या ठिकाणीं सांगतांना जरा संकोच वाटतो—पण सांगतोंच : उन्हाळ्याच्या दिवसांत भरदुपारीं कोकणांत पायीं प्रवास करीत असतांना वाटेंत एक घर लागलें. माझ्याबरोबर एक भटजी होता. या ठिकाणीं विश्रांति घेऊं, अशी त्यानें सूचना केली. मला फार तहान लागली होती. मीं ती ताबडतोब

मान्य केली. घराचे मालक बाहेरच ओटीवर कांहींतरी वाचीत बसले होते. आम्हीं आंत प्रवेश केल्यावर त्या गृहस्थानें ' या बसा ' म्हणून आमचें स्वागत केलें. तिकडच्या खुर्च्या, टेबल वगैरे व्यवस्था पाहून गृहस्थ नव्या पद्धतीचे दिसले. जराशी विश्रांति घेतल्यावर, " आम्हांला थोडें थंड पाणी प्यायला पाहिजे. " मी म्हणालों.

" अहो, मीच तें आणायला सांगणार होतों; परंतु तुम्हीं उन्हांतून नुकतेच तापून आलां आहां. प्रकृतीला इतक्यांत थंड पाणी प्यालेलें बरें नाहीं; म्हणून थांबलों. चहा करायला सांगूं का ? " तो गृहस्थ म्हणाला.

" नको नको, चहानें तहान जाणार नाहीं. आम्हांला थंड पाणीच द्या. " मीं म्हटलें.

" अग पुष्पवती, पाहुण्यांना पिण्याकरितां विहिरीचें ताजें पाणी व थोडी साखरही पण घेऊन ये. " त्यानें बाहेरूनच घरांत हांक मारून सांगितलें. त्यानें ज्या नांवानें हांक मारली, तें विचित्र नांव ऐकून मी जरा गालांतल्या गालांत हंसलों. इतक्यांत एक तरुणी पाण्यानें भरलेली घागर व पंचा घेऊन बाहेर आली.

" हातपाय व तोंड धुवून घ्या म्हणजे बरें वाटेल, " तो गृहस्थ म्हणाला. इतक्यांत त्या मुलीनें तांब्या, पंचपात्र व साखरेची वाटीही बाहेर आणून ठेविली. मीं हातपाय व तोंड स्वच्छ धुवून घेतलें व थोडी साखर तोंडांत टाकून तो पाण्याचा अर्धापाऊण तांब्या रिकामा केला; परंतु आमचे भटजीबुवा जागेवरून हलेनात !

" भटजीबुवा, तुम्हांला नको का पाणी ? मीं विचारलें. " पाणी पाहिजे, पण ' पुष्पवती 'च्या हातच कसें घेऊं ? " त्यानें मिस्किलपणें हळूच उत्तर दिलें. भलत्या वेळीं त्याचा विनोद पाहून मला राग आला.

" चावटपणा पुरे झाला ! पाणी पिऊन घ्या ! " मीं संतापून म्हटलें.

तो गृहस्थ वैश्य होता. त्याला वाटलें कीं, आपल्या हातचें पाणी या सनातनी भटजीला चालत नाहीं ! दरम्यान भटजीनें उठून शांतपणें हातपाय धुतले व त्या तांब्यांत राहिलेलें पाणी संपवून आणखीही एक तांब्या खलास केला ! शेवटीं भटजीनें त्याला त्या नांवाचा ' पारमार्थिक ' अर्थ सांगितलाच !

" अहो, आम्हांला हें काय माहीत ? ही माझी सून आहे. नुकतेंच तिचें लग्न झालें. सावित्री, पार्वती, लक्ष्मी हीं जुनीं वाटून आम्हीं हें नव्या सुधारलेल्या पद्धतीचें नांव ठेवलें. आपण म्हणालां त्या अर्थानें आम्हीं ठेवलेल्या नांवावर अद्याप तिला हक्कही प्राप्त झालेला नाहीं ! असें म्हणून तो गृहस्थ खूप मोठ्यानें हंसला व मलाही मोकळेपणानें हसण्यास वाट मोकळी झाली ! ( पुष्पवती याचा अर्थ रजस्वला असा होतो हें येथें सांगण्याची गरज आहे असें नाहीं. )

वैयक्तिक नामाचे जे आतांपर्यंत निरनिराळे प्रकार सांगितले, त्यांत आणखीही एका नामाचा उल्लेख करणें अवश्य आहे. ज्यावेळीं एकाद्या बाईला मुलें होऊन एकसारखीं दगावतात तेव्हां नवीन मुलाला मर्तो, धर्मा, भिका, मसणा, उसणा, धोंड्या अशा प्रकारचें नांव दिलें म्हणजे तो मुलगा वांचतो, अशा प्रकारचा लोकभ्रम आहे. मर्तोबा, धर्माजी, भिकोबा, धोंडोपंत या नांवाखालीं जे गृहस्थ सध्यां समाजांत वावरतांना आढळतात, तीं वरील उपायांनीं जगविलेलीं बाळें होत ! यांपैकीं कांहीं बाबतींत मृत आजोबाचें नांव नातवाला दिल्यामुळेंही त्यांना तें मिळालें असणें शक्य आहे.

आपल्या मुलाला भलतेंच नांव देणें न आवडून वरील परिस्थितींत नांव दिल्याशिवाय राहणें, असाही एक अनामिक प्रकार आहे. प्रस्तुत लेखकाच्या आईचें उदाहरण या बाबतींत देतां येईल. पाळण्यांत घालतांना तिला नांव दिलेंच नाहीं. पुढें औषध म्हणून तिला अफू देत. तेंच अफिण असें नांव तिला मिळालें !

**आडनांवाचा उगम**

लोकसंख्या ज्या वेळीं अगदीं मोजकी होती, त्या वेळीं उपरिनिर्दिष्ट वैयक्तिक एकेरी नांवावर समाजाचें भागत असे; परंतु ती वाढल्यावर हीं नांवें अपुरीं पडून त्यांची पुनरुक्ति व्हायला लागली. ठाकुरद्वारला ज्या वेळीं एकच राम असे त्या वेळीं " रामाच्या देवळासमोर " हा पत्ता ठीक चाले; परंतु तेथें अनेक राम झाल्यावर ' गोरा राम', ' काळा राम ', ' मौनीबुवांचा राम' अशीं या रामांना आडनांवें दिल्याशिवाय व्यवहार चालेनासा झाला. ' रामचंद्र ' हें विशेषनाम खरें, परंतु तें उपनांवाशिवाय मर्यादित सामान्यनामच होय. कारण ' रामचंद्र ' कोण ? रघुकुलतिलक दाशरथि रामचंद्र कीं रामचंद्र भिकाजी गुंजीकर, कीं रामचंद्र भिकाजी जोशी ? असा प्रश्न पडतो. म्हणून कौसल्येचा किंवा दशरथाचा मुलगा, लक्ष्मणाचा भाऊ, सीतेचा नवरा अशा प्रकारच्या एका किंवा अधिक शब्दांनीं त्याची व्याप्ति आपणांस निश्चित करावी लागते. अशा स्थितींत आई, भाऊ, बहीण, पत्नी यांच्यापेक्षां पिताच जास्त प्रसिद्ध असल्यामुळें व्यवहारांत वैयक्तिक नांवापुढें पितृनाम जोडण्याची प्रथा सुरू झाली. अशांपैकीं हरि केशवजी, बाळ गंगाधरशास्त्री, जगन्नाथ शंकरशेट, भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग, गोविंद नारायण, विनायक वासुदेव हीं नांवें आपल्या चांगल्या परिचयाचीं आहेत. केवळ बापाचें नांव देऊन न थांबतां आजोबा--पणजोबापर्यंत नांवें आपल्या नांवापुढें जोडल्याचें उदाहरण आहे. मराठी लघुव्याकरणाच्या १९१९ तील २४ व्या आवृत्तीवर प्रकाशकाचें नांव " वामनराव बाबाजी दादोबा पांडुरंग तर्खडकर, " असें दिलेलें आढळतें ! हीं पितृनामेंच पुढें पैतृक कुलनामें ( Patronymic

१४४०३

surnames ) झालेलीं आढळतात. वासुदेव, शंकरशेठ, कमलाकर, मदन हीं अशांपैकीं मराठी कुलनामें होत. हरभट्ट बिन कृष्णभट किंवा तुकाराम वल्लद एकनाथ अशीं मुसलमानी अमदानींत पितृनामें नमूद करण्याची पद्धति होती. इंग्रजींतील Richardson, Johnson Thompson हीं पैतृक कुलनामें उघड दिसून येतील; परंतु वरून पितृनामें न वाटणारीं अशीं आणखी कितीतरी इंग्रजी पैतृक कुलनामें आहेत. उदाहरणार्थ Powell हें Ap--Howell याचें संक्षिप्त रूप आहे. Ap म्हणजे वेल्श भाषेंत मुलगा. अशींच Bowen ( Ap—Owen ) Pritchard ( Ap—Richard ). Fitz--Gerald हें नॉर्मन पैतृक कुलनाम आहे. Fitz- मुलगा. सॅक्सन लोक वर दाखविल्याप्रमाणें Williamson असें लिहीत, किंवा son च्या ऐवजीं केवळ षष्ठीचा प्रत्यय म्हणून नांवाला s जोडीत. जसें ‘ Williams. ’

अशा नांवांना पैतृक कुलनामाचें स्वरूप तिकडे सुमारें बाराव्या शतकाच्या सुमारास येऊं लागलें असें म्हणतात. या ( १ ) पैतृक कुलनामांशिवाय आणखीही नांवें निराळ्या कारणानें पडलेलीं आहेत. तीं अशीं:–( २ ) स्थलवाचक कुलनामें, ( ३ ) अधिकारदर्शक कुलनामें, ( ४ ) व्यवसायवाचक कुलनामें, ( ५ ) गोत्रोत्पन्न कुलनामें, (६) उपाधिकुलनामें ( Nicknames ), (७) स्वीकृत कुलनामें, ( ८ ) स्वामीदर्शक कुलनामें. या नामांची आपल्याकडे सुरुवात अकरा-बाराव्या शतकांत झाली होती, असें शिलालेख किंवा ताम्रपट यांतील नामनिर्देशांवरून वाटूं लागतें; परंतु या अधिकारदर्शक नामांना कुलनामाचें आनुवंशिक ( hereditary ) स्वरूप मिळालें होतें कीं काय, हें सांगणें कठीण आहे. ‘ लीलाचरित्र ’ या महानुभावांच्या जुन्या ग्रंथामध्यें अशासारखीं नांवें आढळतातः टिकम नायक; प्रसनायक; जोगनायक; रेमनायक; गदोनायक; वामनायक; महादेव पाठक; हरिभट घाटे; गदो भांडारी; गोपाळ मंत्रि; बागडे विष्णुदेव भट; दाई भागवत; सारंग पंडित; उपाध्ये विष्णुभट; टिको उपाध्या; मंडलिक, भांडारेकार, वगैरे. हीं अधिकार–व्यवसाय–निदर्शक नामें, कीं कुलनामें हें निश्चित सांगतां येत नाहीं. व्यवसाय–अधिकारनाम व कुलनाम यांमधील भेद पुढीलप्रकारें स्पष्ट करतां येईल : एकादा मनुष्य मोठा विद्वान असून त्याच्या नांवापुढें जर पंडित असा शब्द योजण्यांत आला, तर तें त्यांचें कुलनामच असें नक्की म्हणतां येणार नाहीं; परंतु चहाचें दुकान घालून बसलेल्या एकाद्या ‘ पंडिताचें ’ खात्रीनें तें कुलनाम समजावें; किंवा वैद्य हें नाम धारण करणारा गृहस्थ जर शाळामास्तर असेल तर तेंही त्याचें कुलनाम मानण्यास हरकत नाहीं. बाकी अज्ञानरोगावर औषध देणारा आपण भिषग्वर असल्याचा जर त्याचा दावा असेल तर ती गोष्ट वेगळी !

आहे ! ज्ञानदेव एक कीं दोन, नामदेव एक कीं अनेक, वामन एक कीं पांच, अशा प्रकारचे वाद निर्माण झाले आहेत. अनेक समान नांवांच्या व्यक्तींचे ग्रंथ एकाच माणसाचे मानले जात आहेत. तर एकाच व्यक्तीच्या ग्रंथांसंबंधीं ते अनेक कर्त्यांचे असावेत अशी शंका उत्पन्न झाली आहे ! नामदेव हा तरुणपणीं वाट-मारेपणाचा धंदा करीत असे, अशा प्रकारची माहिती भावे व आजगांवकर अशा संशोधकांनीं कांहीं अभंगांच्या आधारानें दिली आहे. पाटसकरांसारख्या कांहीं व्यक्तींना हें मत मान्य नाहीं, तर पांगारकरांनीं त्यासंबंधीं मुग्धताच स्वीकारलेली आहे; परंतु वाटमारेपणा करणारा नामदेव व शिंपी नामदेव वेगवेगळे असणें अशक्य नाहीं. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या **लीळाचरित्र**-उत्तरार्ध ( सं. ह. ना. नेने ) या ग्रंथावरून हा वाटमारी करणारा नामदेव नसून **नेमदेव** होता व तो शिंपी नसून **कोळी** होता, असें दिसतें. पाहा--

" महादाइसीं पूसीलें : जी जी; वीठलविरू श्रीकृष्णचक्रवर्तीचा अवतारु बोलतातिः हें काइ जीः सर्वज्ञें ( चक्रधरानें ) ह्मणीतलें: बाइः वीठलु तो ह्मातारी एकीचा पूत्र: तो ब्राह्मणुः आणि **नेमदेव तो कोळी** : ह्मायां गुरऊः हे तीघै चोरः वळणीया घेतिः घोडेयाचें वळघे करितिः वोरपेः दरवडेः घेतिः एकु घेणें घेऊनि जाएः दोघ लागु सांवरितिः ते मंगळवेढाचेः तीहीं एकीं ठाइं वळघा केला तो माइंदरणा गाइ घेउनि गेलाः सवं लागु पडिलाः तो **नेमदेव कोळी** घाइ पडिलाः पाठीं तीए पांढरिएवरी वीठलु पडीलाः तेयाचे पुत्र आलेः तेहीं तेथ भडखंबा केलाः माता लींगस्थापना केलीः तेथ देवताअभिमानु घेतलाः लोकांचे मनोर्थ पुरउं लागलाः तेयाचिए स्त्रिए नांव लाखाइः एकी वासना लखमाइः तेयाचे पुत्र जातिः पदें करितिः ते वीठो रुक्मीणि अभंगीं घालीति : ती लोकामध्यें उपाधीतें पावलाः तो हा वीठलुः "

ही सगळी कांहींतरी नवीनच भानगड दिसते ! संशोधकांनीं हिचा विचार करावा.

अलीकडे कांहीं लेखकांनीं आपलें पैतृक नाम वापरणें सोडून दिलें आहे. यांचा बाप कोण होता, हें आपल्यामागें शोधून काढण्याचा भावी संशोधकांना यांनीं उद्योग करून ठेवलेला दिसतो !

### स्थलदर्शक कुलनामें

वर पैतृक कुलनामाचा उगम सांगितला; परंतु कित्येकदां पैतृक कुलनामा-नेंही व्यवहार भागत नाहीं. " रामचंद्र भिकाजी " म्हटलें तरी व्यक्ति निश्चित होत नाहीं. गुंजीकर कीं जोशी अशी शंका राहतेच. तेव्हां गुंजीकर हें स्थलनाम निर्दिष्ट केलें म्हणजे तो माणूस नेमका ओळखतां येतो. गुंजीकर हें स्थलदर्शक

परवांच एका छत्र्या दुरुस्त करणाऱ्यानें आपल्या चंद्रमौळी दुकानावर "**छत्रीचे डॉक्टर**" अशी पाटी लावलेली पाहिली. कांहीं वर्षांपूर्वी तर एका स्टोव्ह रिपेअर करणाऱ्यानें आपल्या कारखान्याला '**स्टोव्हचें हॉस्पिटल**' असें नांव दिलें होतें ! बाकी आडनांव याचा मूळ अर्थ 'यथार्थ नव्हे असें नांव,' असाच दिसतो. ज्ञानेश्वरांनींही या अर्थानें तो शब्द अनेक ठिकाणीं वापरलेला आहे.

**कां बधिराचे नीट कान । अपेया नाम पान ॥**
**तैसें आडनांव ज्ञान । तामसा तया ॥**

–ज्ञा. १८,५८०

महानुभावांच्या गद्य ग्रंथांमध्यें जरी आपणास कुलनामनिर्देश किंवा त्याचीं बीजें सांपडलीं, तरी आपले शब्दसृष्टीचे ईश्वर जे ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, वामन यांनीं आपल्या ग्रंथांत आडनांवांचा निर्देश केलेला नाहीं. फार काय, पण त्यांच्या मूळ लौकिक वैयक्तिक नांवासंबंधींही शंका आहे. ज्ञानदेव हें ज्ञानेश्वरांचें पारमार्थिक नाम असून त्यांचें मूळ नांव 'विद्याधर' असा शोध कै. गो. का. चांदोरकर यांनीं कांहीं वर्षांपूर्वी जाहीर केला होता. ( भा. इ. सं. मं. इतिवृत्त, श० १८३५). नामदेवाचें नामदेव हें नांव त्यांच्या नामाच्या पुरस्कारावरून पुढें पडलें असणें शक्य आहे.

**वेदांचें हें सार शास्त्रांचे गव्हार ।**
**तें जाणा अक्षर विठ्ठल नाम ॥**

\+ \+ \+

**नाम शुद्ध स्नान नाम शुद्ध संध्या ।**
**नामाविणें विद्या आणिक नाहीं ॥**

\+ \+ \+

**नामें होय गती नामें होय मुक्ति ।**
**नामयाचे चित्तीं रामनाम ॥** वगैरे.

तुकाराम या नामासंबंधींही एक शंका आहे. त्याचें मूळ नांव साधें राम असेंच असावें; पुढें तागडी घेऊन 'तुकणारा' ( कानडी शब्द ) म्हणून तुका–राम असें गांवांतले लोक म्हणूं लागले व तेंच नांव प्रचारांत आलें. जसें परशु धारण करणारा परशुराम तसा तागडीनें तुकणारा तुकाराम. हे केवळ शुद्ध तर्क झाले. एक गोष्ट खरी कीं, या लोकांनीं आपलें कुलनाम न देतां पुढील कालांतील संशोधकांच्या मागें कधींही शेवटास न जाणारा कायमचा उद्योग लावून टाकला

आहे ! ज्ञानदेव एक कीं दोन, नामदेव एक कीं अनेक, वामन एक कीं पांच, अशा प्रकारचे वाद निर्माण झाले आहेत. अनेक समान नांवांच्या व्यक्तींचे ग्रंथ एकाच माणसाचे मानले जात आहेत. तर एकाच व्यक्तीच्या ग्रंथांसंबंधीं ते अनेक कर्त्यांचे असावेत अशी शंका उत्पन्न झाली आहे ! नामदेव हा तरुणपणीं वाटमारेपणाचा धंदा करीत असे, अशा प्रकारची माहिती भावे व आजगांवकर अशा संशोधकांनीं कांहीं अभंगांच्या आधारानें दिली आहे. पाटसकरांसारख्या कांहीं व्यक्तींना हें मत मान्य नाहीं, तर पांगारकरांनीं त्यासंबंधीं मुग्धताच स्वीकारलेली आहे; परंतु वाटमारेपणा करणारा नामदेव व शिंपी नामदेव वेगवेगळे असणें अशक्य नाहीं. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या **लीळाचरित्र**-उत्तरार्ध ( सं. ह. ना. नेने ) या ग्रंथावरून हा वाटमारी करणारा नामदेव नसून **नेमदेव** होता व तो शिंपी नसून **कोळी** होता, असें दिसतें. पाहा--

" महादाइसीं पूसीलें : जी जी; वीठलविरू श्रीकृष्णचक्रवर्तीचा अवतारु बोलतातिः हें काइ जीः सर्वज्ञें ( चक्रधरानें ) म्हणीतलेंः बाइः वीठलु तो म्हातारी एकीचा पूत्रः तो ब्राह्मणुः आणि **नेमदेव तो कोळी** : म्हायां गुरऊः हे तीघै चोरः वळणीया घेतिः घोडेयाचें वळघे करितिः वोरपेः दरवडेः घेतिः एकु घेणें घेऊनि जाएः दोघ लागु सांवरितिः ते मंगळवेढाचेः तीहीं एकीं ठाइं वळघा केला तो माइंदरणा गाइ घेउनि गेलाः तवं लागु पडिलाः तो **नेमदेव कोळी** घाइ पडिलाः पाठीं तीए पांढरिएवरी वीठलु पडीलाः तेयाचे पुत्र आलेः तेहीं तेथ भडखंबा केलाः माता लींगस्थापना केलीः तेथ देवताअभिमानु घेतलाः लोकांचे मनोर्थ पुरउं लागलाः तेयाचिए स्त्रिए नांव लाखाइः एकी वासना लखमाइः तेयाचे पुत्र जातिः पदें करितिः ते वीठो रुक्मीणि अभंगीं घालीति : ती लोकामध्यें उपाधीतें पावलाः तो हा वीठलुः "

ही सगळी कांहींतरी नवीनच भानगड दिसते ! संशोधकांनीं हिचा विचार करावा.

अलीकडे कांहीं लेखकांनीं आपलें पैतृक नाम वापरणें सोडून दिलें आहे. यांचा बाप कोण होता, हें आपल्यामागें शोधून काढण्याचा भावी संशोधकांना यांनीं उद्योग करून ठेवलेला दिसतो !

### स्थलदर्शक कुलनामें

वर पैतृक कुलनामाचा उगम सांगितला; परंतु कित्येकदां पैतृक कुलनामानेंही व्यवहार भागत नाहीं. " रामचंद्र भिकाजी " म्हटलें तरी व्यक्ति निश्चित होत नाहीं. गुंजीकर कीं जोशी अशी शंका राहतेच. तेव्हां गुंजीकर हें स्थलनाम निर्दिष्ट केलें म्हणजे तो माणूस नेमका ओळखतां येतो. गुंजीकर हें स्थलदर्शक

कुलनाम होय. ' कर ' हा जुन्या काळचा षष्ठीचा प्रत्यय. प्राकृत भाषेंतून तो आला. हिंदी, बंगाली व गुजराती जुन्या वाङ्मयांत तो आढळतो. ' केलें ज्ञानदेवें **देशीकार** लेणें, ' ( ज्ञा. अ. १८ ) अशा प्रकारें ज्ञानदेवानेंही तो मराठींत वापरला आहे. चिपळूणकर, चंदावरकर, माडगांवकर म्हणजे चिपळूणचा, चंदावरचा किंवा माडगांवचा; परंतु कुलनामाचें शेवटीं ' कर ' दिसलें म्हणून तें निश्चित स्थलनाम म्हणतां येत नाहीं; कारण जयकर, विजयकर, व्यवहारकर हीं स्थलवाचक कुलनामें नाहींत. ब्रह्मांडकर हें मात्र स्थलनाम म्हणतां येईल ! ! ! अलीकडे तर्खडकर, कायकिणीकर, चंदावरकर अशा कुलनामाच्या शेवटचा ' कर ' हा प्रत्यय गाळण्याची प्रवृत्ति दिसत आहे. त्यामुळें कांहीं काळानंतर ज्याला तें गांवाचें नांव आहे हें माहीत नसेल तो त्याचा अन्य उगम शोधूं पाहील ! राजवाडे यांनीं ' किकायनाः ' या गोत्रनामापासून ' कैकेणी ' उपनामाचा उद्भव दाखविला आहे ! पाठारे, भिंगारे अशींही स्थलवाचक उपनामें दिसतात. हरि केशवजी **पाठारे** हे मुंबईतील जुन्या काळचे पांचकळशी गृहस्थ प्रसिद्धच आहेत. पाठारे प्रभु म्हणजे मूळ पाठारनामक देशविभागांतील प्रभु. पैठणकडील हा भाग दिसतो; **लीळाचरित्र**—उत्तरार्ध पाहाः—

" सर्वज्ञें ( चक्रधर ) म्हणीतलें : हें ऐसें जाईल भींगारी : **पाठारा** : होए : जी जी : भींगार गांऊं : **पाठार** देशु : कीं **पाठार** गांउं : भींगार देशु : सर्वज्ञें म्हणीतलें : साधे हो : भींगार गांउं : **पाठार** देशुः " ( पृ. १३४ ) " गोसावी कऱ्हणीकडे बीजें करिती : सर्वज्ञें म्हणीतलें : हें भींगारा **पाठार**कडे जाईल : " ( पृ. १४२ ).

पाठारे शब्दाच्या व्युत्पत्तीकरितां प्रत्येनस् ( राजवाडे ) किंवा प्रतिहारी ( जोशी ) या शब्दांकडे धांव घेण्यांत येते, त्याची आतां विशेष गरज आहे असें वाटत नाहीं. तेलंग, लाड अशीं कुलनामें देखील एका प्रकारें स्थलवाचकच असावीं. यादवांच्या राजवटींत जे सरदार तैलंगण किंवा लाट देश जिंकण्याकरितां पाठविले, त्यांना हीं नांवें मिळालेलीं दिसतात. हेमाद्रि आपल्या **व्रतखंडांत** महादेव यादवराजाची प्रशस्ति करतांना म्हणतो—

**तिलङ्गक्षितिपालतूलनिचयप्रक्षेपचंडानिलो**
**गर्जद्गुर्जरगर्वपर्वतभिदादम्भोलिदोर्विक्रमः ।**
**हेलोन्मूलितकौकङ्णक्षितिपतिः कर्णाटलाटोद्भट—**
**क्षोणीपालविडम्बनः स हि महादेवः कथं वर्ण्यते ॥ ४ ॥**

कोकणांत सिंधणदळवी म्हणजे सिंधण यादवाचे दलपति प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणें तेलंग, लाड वगैरे यादवांचे दलपति असावेत.

गुर्जर, कऱ्हाडे, कर्नाटके, कानडे, बंगाली, गुजराथी, मराठे हीं स्थलदर्शक कुलनामें होत.

**निरनिराळ्या राजवटींत अधिकारपरत्वें मिळालेलीं**

हीं नांवें पुढें वंशपरंपरागत झालीं.

( १ ) संस्कृतोत्पन्नः—देसाई ( देशपति ), भांडारी, दण्डनायक, पै ( पति ), देशपांडे, प्रभु, राज्याध्यक्ष, राजोपाध्ये, पंडितराव, कुळकर्णी, कर्णिक, प्रभुदेसाई, देशमुख, प्रधान, मंत्री, मंडलिक, संजगिरि ( संधिविग्राहक ) वगैरे.

( २ ) कानडीः–हेगडे, नाडकर्णी, नाडगौडा, शाणभाग.

( ३ ) फारसीः–सबनीस, चिटणीस खासर्नीस, तटणीस, पोतदार, हेजीब, पागेदार, हवालदार, इनामदार, चौकीदार, पोतनीस, फडणवीस, वगैरे.

पोर्तुगीज किंवा इंग्रजी राजवटींतील अधिकारनामांना महाराष्ट्रामध्यें कुलनामांचें स्वरूप मिळालेलें दिसत नाहीं. जाक, कैसरे, आंग्ले अशीं कांहीं युरोपियन वाटणारीं नांवें आहेत; परंतु त्यांचा उगम देशीच आहे. नाहीं म्हटल्यास पेयर ( Payer ) व इंजिनियर अशीं इंग्रजी व मेस्त्री ( Mestre ) व पगारे ( Pagar ) अशीं पोर्तुगीज उगमाचीं महाराष्ट्रीयांमध्यें उपनामें आढळतात.

**व्यवसायदर्शक कुलनामें**

पुरोहित, भट, उपाध्ये, बडवे, पुराणिक, भागवत, रामाणी, कीर्तने, श्रोत्रिय, गीते, गुरव, शेणवी, ज्योतिषी, पुजारी, हरिदास.

सुतार, सोनार, चांभार, वैद्य, रत्नपारखी, सराफ, महार, कुंभार, कामत, केणी, गवळे, चितारी, पारधी, पिंजारी, कोळी, न्हावी, परीट.

वरील याद्यांवरून व्यवसाय, धंदा किंवा जाति यांवरून बरींच कुलनांवें बनलीं असें दिसून येईल; परंतु उलट कुलनामाचें नांव जातीला मिळालेलींही उदाहरणें आहेत. याचें प्रसिद्ध उदाहरण म्हणजे ‘ शेणवी ’ हें होय. ‘ शेणवी ’ हें गुजराती ‘ मेहता ’ या कुलनामासारखें लेखक किंवा पंडित या अर्थीं आडनांव आहे. लेखन व शिक्षण हा व्यवसाय करणारे बरेचसे लोक दक्षिण कोंकणांतून वर आले व त्यांचें शेणवी ( Senoy ) हें कुलनाम त्यांच्या सबंध जातीला पुढें देण्यांत आलें ! शेणवी या शब्दाच्या उत्पत्तीसंबंधीं अनेकांनीं अनेक तर्क केलेले आढळतात. भारतइतिहास संशोधकमंडळाच्या शके १८३४ ( चैत्र भाद्रपद ) च्या अहवालांत वि. का. राजवाडे यांनीं एक ‘ मेस्तकपुस्तक ’ प्रसिद्ध केलें आहे, त्यांत ते लिहितात–

“ ह्या मेस्तकांत शणवई, शणोपण, हा शब्द चार वेळ आला आहे. शणवई म्हणजे कारकून असा येथें अर्थ आहे.

( १ ) श्रेणीपति–सेणीवइ–सेणीवी–सेणवी. श्रेणी म्हणजे व्यापाऱ्यांचा किंवा कारागिरांचा संघ. त्याचा मुख्य म्हणजे श्रेणीपति.

( २ ) सैन्यपति–सेण्णवइ–सेणवी. सेनापति म्हणजे शेणवी.

ह्या दोन्ही व्युत्पत्ति येथें कारकून किंवा कुळकरणी या अर्थी लागू पडत नाहींत. तेव्हां शणवइ, शेणोई या शब्दाचें तिसरें आणीक कांहींतरी मूळ आहे. सेनापति व श्रेणीपति हे तर दोन अर्थ आहेतच; परंतु कारकून असा तिसराही एक अर्थ आहे, ह्यांत संदेह नाहीं. ”

राजवाड्यांनीं सुचविलेला ह्या तिसऱ्या अर्थाचा उगम काय असेल याचा विचार करून ही समस्यापूर्ति करतां येते तर पाहूं: ज्ञानेश्वरी व महानुभाव वाङ्मय यांसारख्या जुन्या मराठींत सिहाणें, सिहाणा किंवा शिहाणा असा शब्द फार आढळतो. त्याचा उगम ‘ शिक्षाज्ञ ’ असें राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरींत सुचविलेलें आहे. लीलाचरित्रामध्यें ‘ सीक्षाशास्त्र ’ ( भा. २, पृ. २५ ) किंवा ‘ सीक्षापण ’ ( “ ऐसें गोसावीं सीक्षापण केलें ” ) असा शब्द अनेक वेळां आलेला आहे. ‘ हाति--साहानी ’ म्हणजे हत्तींना शिकवणारा ( Trainer ) असा शब्दही कवीश्वर भास्करांच्या शिशुपालवधांत सांपडतो. त्यावरून शिक्षाज्ञपति किंवा शिक्षापणपति असा शेणवी या शब्दाचा उगम असणें अशक्य नाहीं. शेणवी किंवा शणै हें कुलनाम केवळ सारस्वत ब्राह्मणांमध्येंच नसून वैश्य व कोकणी मराठे या जातींमध्येंही आढळतें. सेनवी असें कुलनाम चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंमध्येंही आहे. शेणवी हें व्यवसायवाचक कुलनाम पुढें ज्ञातिवाचक कसें झालें हें पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. आरंभीं विशेषतः राम हें नांव धारण करणारे बाणकोटकडील बाले लोक मुंबईत येऊं लागल्यामुळें रामा हें विशेषनाम गडीवाचक सामान्यनाम सध्या आपण झालेलें पाहतों. महाराष्ट्रीयेतर लोकांमध्यें तर गड्याचें मूळ नाम लक्ष्मण, कृष्ण किंवा विठ्ठल असें कांहींही असलें, तरी ‘ रामा ’ याच नांवानें ते त्याला हांक मारतात व तोही बिचारा मुकाट्यानें ओ देतो ! त्याप्रमाणें शेणवी हें कुलनाम नसलेलीं कामत, पै अशीं घराणींही पुढें स्वतःला शेणवी म्हणवूं लागलीं !

व्यवसायवाचक कुलनाम जातिवाचक कसें झालें हें वर दाखविलें. याच्या उलट जातिवाचक कुलनामाचें नांव व्यवसायालाही मिळालेलें उदाहरण आहे. मुंबई येथें इंग्रजी अंमल प्रस्थापित झाल्यावर प्रथम कारकुनीचा मक्ता केवळ पाठारेप्रभु यांकडे होता. याचा परिणाम असा झाला कीं, प्रभु हा क्लार्क याचा प्रतिशब्द बनला. हेडक्लार्क म्हणजे ‘ हेडपरभू ’ असें जुन्या इंग्रजी कागदपत्रांत अधिकारपद ( designation ) निर्दिष्ट केलेलें आढळतें. तसें ‘ क्लार्क पाहिजे ’ याबद्दल ‘ परभू पाहिजे ’, अशी जाहिरात त्याकाळीं देत असत. बाकी हा ‘ परभु ’

कोणत्याही धर्मांचा किंवा जातीचा चाले, हें येथें निराळें सांगण्याचें कारण नाहीं! The Institute of Actuaries Year Book 1948–1949 च्या ३११ पृष्ठावर Parbhoo Jamshed Fardoonji असें पारसी विद्यार्थ्यांचें नांव नुकतेंच आढळलें! नानाभाई हरिदास नांवाचे गेल्या शतकांत एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेले. त्यांच्यासंबंधीं नुकतीच एक गोष्ट आमच्या एका मित्रांनीं सांगितली. प्रथम वकिली करीत होते, त्या वेळीं त्यांना जीं मुलें झालीं, तीं आपलें आडनांव वकील म्हणून लावीत. पुढें ते जज्ज झाले, त्या वेळीं झालेलीं मुलें जज्ज असें आडनांव धारण करूं लागलीं. ही जर माहिती खरी असेल, तर ती मोठ्याच मौजेची म्हटली पाहिजे.

## गोत्रोत्पन्न कुलनामें

गोत्रांवरूनही कांहीं आडनांवें आलेलीं आहेत, असें अत्रे, अगस्ती, भारदे ( भारद्वाज ) या देशस्थ ब्राह्मणांतील आडनांवांवरून दिसून येतें; परंतु राजवाडे यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या प्रथमसंमेलनवृत्तांत गोत्रोत्पन्न कुलनामें म्हणून याद्या दिल्या आहेत तीं आडनांवें धारण करणारीं आज जीं घराणीं वेगळींच गोत्रें पाळीत असलेलीं दिसून येतात. उदाहरणार्थ, काणे हें चित्पावनांतील उपनांव 'कानीनाः' किंवा 'कर्णायनाः' या गोत्रनामावरून झालें असा राजवाड्यांचा शोध आहे; परंतु काणे घराण्याचें गोत्र 'शांडिल्य' असलेलें दिसून येतें. यावरून एकतर राजवाड्यांनीं कसातरी बादरायण संबंध जोडला असेल, किंवा त्यांचें म्हणणें नीट मला कळलें नसणेंही शक्य आहे.

## उपाधि कुलनामें

इंग्रजीमध्यें ज्याला Nicknames म्हणतात, त्यांचेंच येथें उपाधिनामें असें मराठीकरण केलें आहे. राजवाडे ज्याला गोत्रोत्पन्न म्हणतात तें 'काणे' हें उपनाम, श्री. ना. गो. चापेकरांच्या मतें उपाधिनाम आहे. त्याचें उदाहरण घेतलें म्हणजे उपाधिनाम म्हणजे काय, हें स्पष्ट होईल. श्री. चापेकर लिहितात,

'कुंटे उपनांवाचें मूळ संस्कृत कुंठ ह्या शब्दांत असल्यास आळशी, मूर्ख अशा अर्थानें कुंठे=कुंटे नांव सिद्ध झालें असावें: श्राद्धाला वर्ज्य ब्राह्मण सांगितले आहेत ते येणेप्रमाणें :—

**काणाः कुण्ठाश्च मण्ठाश्च मूकान्धबधिरा जडा: ।**
**कुनखाः कुष्ठिनश्चैव दुर्नग्ना विद्धमेहना : ।।**
**अतिदीर्घा अतिऱ्हस्वा अतिस्थूला भृशं कृशाः ।**
**निर्लोमा नातिलोमानो गौराः कृष्णा अतीव ये ।।**

ह्यांत काणे, कुंटे, गोरे, काळे हे पितृकर्माला अयोग्य समजल्याकारणानें त्यांचीं नांवें रूढ झालीं."

'काणा' म्हणजे तिरव्या डोळ्यांचा, हें येथें सांगण्याचें कारण नाहीं. हीं उपाधिनामें कशीं आलीं हें पाहणें मोठ्या मौजेचें आहे. शहाणे, सहस्रबुद्धे अशीं गुणवाचक गौरवास्पद कुलनामें पुढील पिढीनें अभिमानानें धारण करावींत, हें स्वाभाविक आहे; परंतु आगलावे, घरबुडवे, ओंगळ, खुळे, गाढवे अशा प्रकारचीं निंदायुक्त कुलनामें माणसांनीं आपल्या नांवांपुढें अभिमानानें लावावींत हें नवल नाहीं काय ? अशीं कांहीं बरींवाईट विविध उपाधिनामें पुढें देतों. तीं कशीं पडलीं असावीं, हें ठरविणें वाचकांवरच सोपविलेलें बरें—

( अ ) अघोर, अपराधे, अविचारी, विचारे, अबुध, खुळे, पिसे, पिसाट, वेडे, शहाणे, जडबुद्धे, सहस्रबुद्धे, खुशामते, कठोर, कृतांत, करंटे, काळ, काळभैरव, काळसर्प, कुलट, घनघोर, टोळभैरव, जाचक, डोईजड, टवाळे, शंख, असुरे, अंधारे, उचले, ओंगळ, ठक, फटिंग, भामटे; छिचोर, छाकटे, गुंड, नागडे, नागवे, बानचोद, रावण, भिकारी, चोर, चेंड्र, लफंगे, लोभे, रागे, रडके, वैतागे, मेंगे, किरकिरे, नरके, गुघाणे, कपाळफोडे, पोटफोडे, कानफाडे, जीवघेऊ, डोईफोडे, बापमारे, कानफाटे, गांडफाडे, आगलावे, फुकट, घरबुडवे, विध्वंस, उत्पात, खरे, खोटे, गोडबोले, मातीखावे, खळ, कुरूप, जगभांडे, ढोंगीराव, थापे, दांडगे, दैत्य.

( आ ) मुके, लंगडे, रोडे, लठ्ठे, मोठे, नकटे, अंधक, तिरवे, थट्टे, मिसाळ, दीडमिसे, खाडे, टकले, पांगुळ, काणे, काळे, गोरे, ढवळे, ढेरे, पोटभरे, मोने, लांबे, पंगु, खुजे, ठेंगणे, ठेंगे, घार्से, निळे, पांढरे, साने, बहिरे, जात्यंध.

( इ ) काने, कूल्हे, गांडे, जांगे, टांगे, नाके, हाडे, जबडे, हाते, चवाथे, नवाथे ( नवहस्त ), डोके, डोळे, पोटे, उदरे, कपाळे, गुडघे, दुतोंडे, दाडे, पावले, पोले, जघने.

( ई ) कांबळे, धोत्रे, परकर, कापडे, टोपे, पटकुरे, आंग्ले, लंगोटे, तुमाने.

( उ ) औषधराव, रोगे, ओखदे, आरोग्ये, खोकले, खाकरे, ओक, शिंके, तपकीर, हागे, भरणे, हगवणे, गाभणे.

( ऊ ) आंबे, फणसे, पोफळे, भेंडे, आवळे, अंजिरे, कणसे, काकडे, कारिंदे, जांभ, पडवळ, रताळे, महाळुंग, रिठे, एरंडे, सदाफुले, वटाणे, नाचणे, फुटाणे, गाजरे, नारिंगे, सुरण.

( ए ) कवडे, कपोत, कुकडे, गरुड, चक्रवाक, चंडोल, कोकीळ, जटायु,

टिटवे, बगळे, राजहंस, हंस, मयूर, वाघुळे, मोरे, कावळे, टोळ, ससाणे, साळुंके, गरुड, पाखरे, कीर, झुरळे, तोते.

( ऐ ) अस्वले, कुत्ते, गाढवे, गेंडे, वाघ, घोडे, बोके, पाल, पोळ, जंबूक, जांबुवंत, हनुमंत, घोरपडे, डुकरे, रेडे, बोके, सरडे, ससे, शिंगे, घोडमारे, खेकडे, गाडबैल, गायतोंडे, घोडतोंडे, चित्ते, ढोर, तट्टे, केसरी, पंचानन, कोल्हे, फणींद्र, फणीवर, लांडगे, बाळसरप, मुंगे, मुंगळे, कीडे, बरडे.

( ओ ) दुधे, दहे, दही, ताक, ताके, लोणे, तुपे, दुधभाते, पोहे, मांडे, श्रीखंडे, वरणे, खिरे, उंडे, लाडू, करंजे, कडबोळे, नेवरे, ताकभाते, भातखंडे, तांबोळी, मेतकुटे, भाकरे, ताकपिरे, ताकतोडे.

( औ ) गोड, गोडे, गोडसे, साखरे, तिखे, हिरवे, कडु, भोजने, सहस्र-भोजनी.

( अं ) पांचे, पन्नासे, हजारे, साडे, अष्टपुत्रे, सातपुते, बारपुते, वीसपुते, दशकंठ, छत्तीस, एकबोटे, नवहस्त, चवाथे.

( अः ) लोखंड, तांबे, लोखंडे, कथले, पितळे, दगडे, कोळसे, लोहे, माणके, हिरे, माणिक, सुवर्ण, कांचन, जंगले, पर्वते, डोंगरे, शिखरे, सागर, नाले.

अशा प्रकारच्या आणखीही नामावल्या देतां येतील.

## स्वीकृत कुलनामें

वरील उपाधिनामांमध्यें अशीं कांहीं आडनांवें आहेत कीं, तीं धारण करणें त्या कुटुंबीयांना लज्जास्पदच वाटेल. येथें तीं उद्धृत करणें मला कठीण वाटलें व कांहीं तर दिलींच नाहींत. अशा नांवांचा त्याग करून त्या घराण्यांनीं नवीं नांवें स्वीकारण्यास कांहीं हरकत नाहीं. जुनीं आडनांवें निंदास्पद नसतांही नवीं कुलनामें धारण केल्याचीं उदाहरणें आहेत. सुप्रसिद्ध मासिक मनोरंजनाचे संपादक कै. काशीनाथ रघुनाथ मित्र यांचें मूळ नांव आजगांवकर असें होतें. त्यामुळें पुष्कळ लोकांची समजूत ते महाराष्ट्र–भाषाभूषण जगन्नाथ रघुनाथ आजगांवकरांचे बंधु अशी होती ! पुढें बंगाली वाङ्मयाशीं परिचय झाल्यावर बंगाली पद्धतीचें ‘ मित्र ’ हें आडनांव धारण करण्याची त्यांची लहर लागली ! पाठारे प्रभूंमध्यें जयकर, विजयकर, धैर्यवान्, अजिंक्य, कीर्तिकर, ब्रह्मांडकर अशीं जीं वीरश्रीयुक्त आडनांवें प्रचलित आहेत, तीं त्यांनीं अलीकडे धारण केलीं असावींत. जुन्या कागदपत्रांत तसा निर्देश मलातरी आढळला नाहीं. ‘ राम बाळकृष्णजी ’ अशासारखें व्यक्ति-नाम व पितृनाम देण्याची त्यांच्यामध्यें मागें पद्धति असे. प्रभु किंवा परभु असेंही उपनाम कांहीं पत्रांमध्यें व्यक्तिनामापुढें लावलेलें आढळतें; परंतु परभु या नांवाला कारकून असा अर्थ प्राप्त झाल्यामुळें तें वापरणें त्यांना कमीपणाचें वाटूं लागलें

असावें. तसेंच शेणवी या आडनांवाला जातिवाचक अर्थ प्राप्त झाल्यामुळेंच तें वापरणें पुढें बंद पडलेलें दिसतें.

१८५७ सालीं मुंबई युनिव्हर्सिटीची स्थापना झाल्यावर उपनांवें नमूद करण्याची प्रथा पडली, असें म्हणतात. रा. ब. दादोबा पांडुरंग हे १८६४ पासून युनिव्हर्सिटीच्या सीनेटचे व १८८२ पर्यंत आर्टस् व कायदा या फॅकल्टींचे सभासद होते. मौज ही कीं, युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरमध्यें त्यांचें दरवर्षी नांव छापलें जाई व त्याच्या खालीं कित्येक वर्षी ( Surname not known ) अशी तळटीप दिलेली आढळे !

## देशी ख्रिस्त्यांचें हिंदी नामकरण !

हिंदुस्थानमध्यें एक मोठा ख्रिस्ती समाज आहे कीं ज्यांनीं नांवें, आडनांवें, रीतिरिवाज व पोषाक पाश्चात्यांचा उचलला आहे. या कॅथलिक ख्रिस्ती लोकांना बळजबरीनें हिंदु धर्मांतून ख्रिस्ती धर्मामध्यें ओढलें असून पाश्चात्य संस्कृति त्यांच्यावर सक्तीनें लादली गेली आहे, अशी इतिहास साक्ष देतो. यांना आरंभीं ख्रिस्तीधर्माची दीक्षा देतांना बाप्तिस्माचे वेळीं जो धर्मपिता ( God-Father ) असे त्याचेंच नांव व आडनांव मिळे. पुष्कळ वेळां असें होई कीं, बाप्तिस्माचे वेळीं बापाला व मुलाला किंवा दोघां बंधूंना निरनिराळे धर्मपिते असत व त्यांना धर्मपित्यांचीं भिन्न आडनांवें मिळत ! याचें येथें एकच उदाहरण सांगतों. कुळें विठू पै नांवाच्या राय ( गोवा–सासस्ट ) येथील हिंदु गांवकरीला १५६०–६६ च्या दरम्यान बाटविण्यांत आलें. बाप्तिस्माविधि करतांना त्याला पेरु पार्‍हस् ( Pe. Pero Parras ) नांवाचा पाद्री धर्मपिता मिळाला. हा पाद्री वसई पाठशाळेचा प्राचार्य ( Director ) होता. या पैला पुढें पेरु पार्‍हस् असें वर सांगितल्याप्रमाणें धर्मपित्याचें नांव मिळालें. त्याच्या दोघां मुलांना वेगवेगळे धर्मपिते लाभल्यामुळें एकाला बस्त्यांव बार्बोझ ( Bastiao Barboza ) व दुसऱ्याला जुवांव रांजेल ( Joao Rangel ) अशीं नांवें व उपनांवें मिळालीं, असें अनुक्रमें १५९४ व १६०९ च्या कागदपत्रांत नमूद आहे. सुप्रसिद्ध मराठी क्रिस्तपुराणकार तोमस स्टिफन्स यानें विठू पै नांवाच्या गांवकराच्या मुलाला बाप्तिस्मा दिला व या त्याच्या धार्मिक पुत्राला त्याच्या धर्मपित्याचें तोमास इस्तेव्हं ( Thomas Estevao ) हें नांव मिळालें ( १५९५ ). पोर्तुगीज सत्तेखालील हे गांवठी पोर्तुगीज हीं नवीं ख्रिस्ती नांवें लावून मिरवूं लागले; परंतु कारवार-मंगळोरकडील ख्रिस्ती जुनी हिंदु आडनांवेंही वापरीत. बेस्ट कंपनीचा नुकताच नेमलेला एक वरिष्ठ अधिकारी शणोय ( शेणवी ) हें उपनाम धारण करणारा ख्रिस्ती आहे, असें वृत्तपत्रांत वाचलें. पोर्तुगीज सत्तेबाहेरचे ख्रिस्ती

' प्रभु-कुयेल्यु ' अशींही मिश्र उपनांवें लावीत किंवा लावतात, असें कॅनरा गॅझेटिरमध्यें नमूद आहे. अलीकडे बदललेल्या राजकीय परिस्थितींत कांहीं देशाभिमानामुळें व पुष्कळसे स्वराज्यांत यापुढें गांवठी पोर्तुगीज म्हणविण्यांत स्वार्थाला धोका आहे, असें पाहून हिंदी म्हणवूं लागले आहेत. चारपांच वर्षांमागें " Who is a Goan ? " या मथळ्याखालीं एक लेखमाला लिहून देशी ख्रिस्त्यांनीं ख्रिस्ती धर्मांत राहूनही जुनीं हिंदी आडनांवें पुनः धारण करावींत म्हणजे ते इतर देशबांधवांना परके वाटणार नाहींत व हें त्यांच्या स्वाभिमानाला शोभून दिसेल असें मत मीं प्रतिपादन केलें होतें. या माझ्या मताचा सोल्लेख पुरस्कार १९४७ सालीं येथील कावसजी जहांगीर हॉलमध्यें भरलेल्या ग्रँड गोवा-प्रदर्शनांत मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांनीं उद्घाटनाच्या वेळीं केला व त्याच वेळीं कांहीं ख्रिस्ती गृहस्थ मजकडे येऊन, " आम्हीं जुनीं नांवें धारण करण्यास तयार आहोंत; परंतु आम्हांस तीं माहीत नाहींत, " असें मला खेदपूर्वक म्हणाले. " तुम्हांला तुमच्या हिंदु पूर्वजांचीं आडनांवें माहीत नसतील, परंतु तुमचें घरदार कुठें आहे तीं गांवें तरी ठाऊक आहेत कीं नाहींत ? प्रियोळकर, चंदावरकर अशीं स्थलदर्शक आडनांवें घ्या, " मीं उत्तर दिलें. " छे हो ! माझ्या गांवाचें नांवही आडनांवाप्रमाणें बदललें असून त्याला Santa Cruz असें म्हणतात. " एक गृहस्थ बोलला, आणि तेथें मोठाच हंशा पिकला ! ' तुमचें जुनें आडनांव मला सांगता येणार नाहीं, परंतु तुमच्या गांवांचें नांव मी थोड्याशा प्रयत्नानें सहज सांगूं शकेन. आणि गांवांचें नसलें तरी प्रांताचें ' गोमंतक ' किंवा गोवेकर असें आडनांव घ्यायला तुम्हांला काय हरकत आहे ? मीं विचारलें. हा गृहस्थ ठकबुद्धीनें माझी चेष्टा करावयाला कदाचित आला असेल; परंतु कांहीं गृहस्थ प्रामाणिक बुद्धीनेंही आले होते, यांत शंका नाहीं. योग्य वाटलें त्याप्रमाणें वागण्याचें मनोधैर्य त्यांच्यामध्यें नसेल, एवढेंच. पणजीच्या पाठशाळेच्या एका ख्रिस्ती प्राध्यापकानें आपल्या मुलीला ' सीता ' असें वैयक्तिक नाम ( Christian name ) दिलेलें आहे. मंगळूर येथें निघणाऱ्या Konkani Dirven ( कोंकणी द्रव्य ) नांवाच्या नियतकालिकाचा रौप्यमहोत्सव अंक मला अलीकडेच पहावयास मिळाला. त्यांत Indian Names for Indian Christians या लेखांत ख्रिस्ती वैयक्तिक नांवांचें संस्कृतीकरण करून एक मोठी नामावलि देण्यांत आली आहे. उदाहरणार्थ. Adolfo = Noble hero — महावीर. Albert = Illustrious —महाशय. Alexander = Defender of men-लोकपालक. Andrus = Strong, manly—पुरुषोत्तम. Augustine = Great Lord— महेश्वर, वगैरे.

ज्या ख्रिस्ती गृहस्थांना आपलीं जुनीं हिंदु कुलनामें माहीत नसतील त्यांनीं आपल्या परदेशी कुलनामाचें संस्कृतीकरण करावें. वेळीं अवेळीं वेदमंत्र व

गीतेंतील श्लोक यांचा घोष करून भारतीय अभिमानाचा आव आणणाऱ्या ‘ मास्कारेञ्जस् ’ पाद्रीनें छत्रे असें भारतीय आडनांव कां धारण करूं नये ?

फादर तोमस स्टिफन्सच्या ख्रिस्तपुराणाच्या आरंभीं जोडलेल्या गास्पार द सां मिगेल नांवाच्या फ्रांसिस्कन पाद्रीनें केलेल्या मराठी प्रशस्तीमध्यें त्याच्या नांवाचें स्टिफन्स म्हणजे मुकुट असें मराठीकरण केलेलें आढळतें :—

तोमस ह्मणिपे पाताळ । तेआचें सत्वज्ञान अठाव अकळ ॥
पर पुराण वाक्य निर्मळ । शब्द खोल गंभीर ॥
इस्तेव्हं नामाचा विवरु । जैत्य मकुटाचा वरु ॥
तो सिरीं सोभे परिकरु । तेआ ठाईं ॥

जुनीं नांवें सरकारी रीतीनें बदलून घेण्यास फार खर्च येतो, असें म्हणतात. कांहीं ख्रिस्ती लोकांनीं हीच मोठी अडचण भारतीय नांवें घेण्याच्या आपल्या आड येते, असें मला सांगितलें. हिंदु हें परकीयांनीं आपणांस दिलेलें निंदाव्यंजक अर्थाचें नांव, अशी समजूत आहे; परंतु इंदुपासून हिंदू लोकवाचक नांव आलें असेंही मानण्यास आधार आहे. कसेंही असो. हिंदुस्थानला भारत हें जुनें नांव देण्याचें ठरलें आहे तर रक्तानें हिंदी असलेल्या या ख्रिस्ती लोकांनाही आपल्यावर जुलमानें लादलेली परदेशी नांवें बदलून भारतीय नांवें घेण्यास भारतसरकारनें कांहीं काळापुरती तरी सवलत देणें न्यायाचें होईल. ज्यांना नांवें बदलावयाचीं असतील त्यांनीं तीं सहा महिन्यांत बदलल्यास कोणताही खर्च येणार नाहीं, असें जाहीर करावें व गॅझेटचा एक खास अंक काढून नव्या नांवांना मान्यता द्यावी. या संधीचा फायदा घेऊन ज्यांचीं आडनांवें ओंगळ असतील त्यांनींही तीं बदलून घ्यावीं, अशी माझी सूचना आहे.

ओंगळ आडनांवांबरोबर ज्यावेळीं परदेशी नांवावरदेखील बहिष्कार घातला जाईल त्यावेळीं उपरिनिर्दिष्ट स्वीकृत कुलनामें या नामविभागांत भर पडेल.

## स्वामित्वदर्शक कुलनामें

गोमंतकामध्यें शिलिमखान असें ब्राह्मणांमध्यें आडनांव आहे ! या मुसलमानी नांवाचा ब्राह्मणांत कसा प्रवेश झाला. याचा विचार करतां शिलिमखान या नांवाच्या सरदाराचा कारभारी असल्यामुळें हें नांव त्या गृहस्थाला चिकटलेलें असावें अशी शंका येते. भोंसले हें मराठ्यांतील आडनांवही गोमंतकांत ब्राह्मणांमध्यें आहे. शेजारच्या सावंतवाडी संस्थानच्या भोंसल्याच्या पदरीं नोकरी केल्यामुळें हें धन्याचें आडनांव नोकराला मिळालेलें दिसतें. घोरपडे हें मराठ्यांमधील आडनांव ब्राह्मणांमध्यें सांपडतें. त्याचाही उगम, यजमानाचें आडनांव पुरोहितानें घेतलें असें म्हणतात. जुन्या पिढींतल्या मुंबईकरांना भाऊ रसूल हें नांव अपरिचित

नाहीं. रसूल म्हणजे Russel. या नांवाच्या इंग्रजाकडे नोकरीला असल्यामुळें भाऊला ‘ रसूल ’ असें लोक म्हणूं लागले. वास्तविक त्याचें खरें नांव ‘ लक्ष्मण रामचंद्रजी. ’ मात्र ‘ रसूल ’ हें कुलनाम त्याच्या घराण्याला कायमचें चिकटलें नाहीं. त्याची संतति अजिंक्य हें आडनांव लावतात. धन्याचें नांव नोकराला कसें लावलें जातें त्याचें हें एक आणखी उदाहरण आहे.

विस्तारभयास्तव वर जीं निरनिराळीं आडनांवें सांगितलीं तीं कोणकोणत्या जातींमध्यें आढळतान, हें नमूद केलें नाहीं; परंतु येथें एक सूचना द्यावीशी वाटते कीं, आडनांवापासून जात ओळखूं पहाणें धोक्याचें आहे. शेणवी हें आडनांव वैश्य, मराठे व कायस्थांमध्येंही असल्याचें वर सांगितलेंच आहे. आठवले, उपाध्याय, कीर्तने, खरे, खोटे, गाडगीळ, गोडबोले, गोरे, कुळकर्णी, फाटक, आचार्य, रानडे, लेले, कऱ्हाडे हीं ब्राह्मणी आडनांवें मराठ्यांमध्येंही सांपडतात, असें रा. के. बी. देशमुख यांचा ‘ क्षत्रियांचा इतिहास ’ या पुस्तकावरून दिसतें. आडनांवाच्या इतिहासावरून समाजाचा इतिहास शोधतां येईल; पण तो पूर्वग्रहविरहित-मनानें लिहिला पाहिजे. याकरितां निरनिराळ्या घराण्यांतील जुने कागदपत्र व नाशिक–पंढरपूर येथील पुरोहितांच्या वह्या तपासल्या पाहिजेत. अनेक वर्षें खपून करण्यासारखें हें काम आहे. त्याला सहज हजारबाराशें पानें खर्चावीं लागतील. दिवाळीच्या अंकांतील चारदोन पृष्ठांत आज त्याचा साकल्यानें विचार होणें अशक्य आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

विविधवृत्त–दिवाळी अंक १९४९

◎ ◎ ◎

## ४

# ग्रंथ, ग्रंथप्रेम व ग्रंथवेड

झालीं वीसवर वर्षे त्या गोष्टीला. ठाकुरद्वारच्या काळ्या रामाच्या देवळाजवळ एका नेमक्या ठिकाणीं एक बाई नेहमी संध्याकाळच्या वेळीं भाजी विकत बसलेली दिसे. म्यां त्या काळीं मुंबईत बिऱ्हाड केलें नव्हतें. अर्थात् तिच्याकडून भाजी विकत घेण्याचा मला कधींही प्रसंग येत नसे; परंतु दररोज ' विविध-ज्ञानविस्तार ' ऑफिसांतून गिरगांवांत माझ्या निवासस्थानाकडे जातांना या बाईभोंवतीं गिऱ्हाईकांची मोठी गर्दी गोळा झालेली मी पाहात असें. एक दिवस त्या बाजूनें जातांना मोठा मौजेचा प्रसंग मला पाहावयास मिळाला. त्या बाईपुढें एक वाणी पिशवी पुढें करून उभा; आणि ती बाई त्याला म्हणते, " शेट, तुम्हीं माझ्याशीं लग्नच करा ना; म्हणजे ही सगळीच भाजी तुमची होईल ! " त्या वाण्याचा कावरबावरा व ओशाळा चेहरा पाहून व त्या भाजीवालीचे ते विलक्षण उद्गार ऐकून मी तर आश्चर्यचकितच झालों ! शेजारीं एक गृहस्थ हंसत उभा होता. त्याला मीं हा काय प्रकार आहे, असा प्रश्न केला. त्याच्याकडून कळलें तें असें : त्या वाण्यानें त्या भाजीवालीला भेंड्यांचा दर विचारला व तिनें रत्तल सहा आणे सांगितला. " दोन आणे रत्तल देतेस का ? " त्या वाण्यानें विचारलें. " मींच स्वतः पांच आणे रत्तल भेंडे आणलेत, मग तुम्हांला तीन आणे नुकसान करून कशी देऊं ? " बाई म्हणाली. हे तिचे उद्गार ऐकून तो वाणी पुढें जाऊं लागला; परंतु त्या बाईला त्याला अद्दल घडवावयाची होती. " शेट-शेट ! इकडे या ! " असें म्हणून बाईनें त्याला परत बोलाविलें. त्या वाण्याला वाटलें कीं बाई दोन आण्याला रत्तल भाजी देण्यास राजी आहे ! म्हणून त्यानें परत फिरून पिशवी पुढें केली; तोंच ती बाई वर सांगितलेले शब्द बोलली ! त्या दिवसापासून मीं असा धाक घेतला आहे कीं कधीं भाजी विकत घ्यावयाची झाली, कीं बाईकडून घेत नाहीं व घेतलीच तर मुळींच दराकरितां घासाघीस करीत नाही ! भेंड्यांची भाजी ही अशी कांहीं अप्राप्य वस्तु नाहीं, कीं तिच्याकरितां त्या वाण्याला त्या बाईशीं लग्नच करणे भाग पडावें ! या बाईकडे नसली, तर दुसऱ्या बाईकडे किंवा तिसऱ्या बुवाकडे मिळेल; परंतु अशा कांहीं आणखी दुर्मिळ वस्तु असतात, कीं त्या प्राप्त करून घेण्याकरितां एकाद्या बाईच्या गळीं माळ घातल्याशिवाय गत्यंतर नसतें !

Cap.1.

G. Satemanita, anny vcharita, aisse mhannatàssi quitea ?

S. Quiteà bhauarthià Christauana, IESV Christachy see satemanuchy, taissichi, zari yecade uello ti muqhĩ ucharunchy zaita, tàri tichè qhatira maranna paualoi tàri, muqhĩ ucharunchy.

G. Mannussu Christaõ zalea nimitim, connu manu, conni uhaddiua taca zoddata ?

S. Paramesparacho dharma putru hounu, suarguicho ddaizy zata.

G. Anny Christaũ nhoe to ?

S. Ho aissalo saitanacho gulamu. anny suarguinchea ddaizaea chucata.

G. Christaũ nãua conna uaraunu amacā labalã ? IE-

स्टिफन्सकृत दौत्रिन क्रिस्तां, गोमंतक १६२२

( मराठी–गोमंतकी–भाषेचा जुन्यांतला जुना मुद्रित उपलब्ध ग्रंथ )

श्रीभगवानुवाच ऊर्ध्वमूलमधःशाख
मश्वत्थंप्राहुरव्ययं छंदांसियस्यपर्णानि
यस्तंवेदसवेदवित् १ अधश्चोर्ध्वंप्रसृ
तास्तस्यशाखागुणप्रवृद्धाविषयप्रवा
लाः अधश्चमूलान्यनुसंततानिकर्मानु

बंधीनिमनुष्यलोके २ नरूपमस्येह
तथोपलभ्यतेनांतोनचादिर्नचसंप्रतिष्ठा
अश्वत्थमेनंसुविरूढमूलमसंगशस्त्रे
णदृढेनछित्वा ३ ततःपदंतत्परिमार्गि
तव्यंयस्मिन्गतानिवर्ततिभूयः तमे

श्रीभगवद्गीता, मिरज १८०५

( नाना फडणीस यांनीं मुद्रित करावयास लावलेली ठोकळाछाप गीता )

श्रीमन्तास् म्हटली तद्नन्तर श्रीमन्त काय
बोलतेत श्रीमन्ताचा मनोद्य काय आहे?
जो श्रीमन्ता वा मनोद्य असेल त्याच प्रमाणे
वर्तणुक करूं ।

अहो एक गोष्ट कानांत आयकून जा
साहेबांचे कानांत म्हणून जे आज्ञा करीत ते
सत्वर येऊन आम्हास् सांगा तद्नन्तर आप
ले विचारांत जे गोष्ट दृढ येईल ते करूं ।
तुम्हीं इकडे या कांहीं गोष्ट म्हणायाची
आहे आयकून जा त्वरेने त्याहांस समागमे
घेऊन या । तिकडे त्यांहांचे जवळ जा आम्
चा निरोप विनय पूर्वक सांगा तेही
आयकून सत्वर स्वार होऊन येतील आ
ज त्याहासही आज्ञा घ्या देऊन आणा ।
अहो तुम्हास् कांही विचारही आहे उद्या
ईंगरेजाचा मोटा दिवस होईल तरि ईंगरेज
मोटी खुशी करतील तोफा फार सोडतील
स

डॉ. कॅरेनें केलेलें **मराठी भाषेचें ग्रामर**, श्रीरामपूर १८०५
( हिंदुस्थानांतील पहिलें मराठी देवनागरी मुद्रण )




काहणी ॥१॥ लांडगा आणि येडका यांची

एक्या पर्वतावरून एक निर्मळ पाण्याचा ओ
हळ येत होता तेथें येक्या उष्णकालीं एक दि
वसीं एक लांडगा व एक येडका उभयतांही
एक्याच मुहूर्तीं पाणी प्यावयास आले लांड
गा उन्नत प्रदेशीं उभा राहिला होता व येड
का खालपट प्रदेशीं काहीं दूर अंतरानें उभा
होता लांडग्याचे मनीं कोण्या प्रकारें ही येड
क्यासीं दाटवलें भांडणें करावयाचें होतें तद
नुसार येडक्यास विचारूं लागला जें अरे येड
क्या निर्मळ आहे तें पाणी डहुळून मला प्याव

बालबोध मुक्तावलि, तंजावर १८०६ (?)

(इसापनीतीचें सचित्र मराठी भाषांतर)



डॉ. रॉबर्ट ड्रमंड याचा गुजराती, मराठी व इंग्रजी या भाषांचा व्याकरणविषयक ग्रंथ, मुंबई १८०८.

(मोडी मुद्रणाचा पहिला मराठी ग्रंथ)

( ८९ )

एकेनगरांत दरिद्री ब्राह्मण राहातहोता त्याला ए प.
क्या यजमानाने गाइची दोन वांसरें दिली मग त्या
ने तृणादिक आहार घालून ती मोटी पुष्ट केली त्यां
स पाहून एक चोर हातो दावें घेउन त्यांच्या हरणा
र्थ निघाला तों वाटेत एक ब्रह्मराक्षस ज्याचे दंत विक्रा
ळ नासिका दीर्घ केश पिंगट आरक्त नेत्र असा पाहू
न तो चित्तांत भय पावला तेव्हां त्यास पुसतो तुं को
ण आहेस मग तो ह्मणतो मी सत्यवचननामा राक्षस
आहे परंतु तुं कोण तेसमई तो ह्मणतो मी चोर दरि
द्रीब्राह्मणाच्या दोन गाई आहेत त्या हरण करावया
सिं जातों तेकाळी तो बोलिला मित्रा तो ब्राह्मण प
वित्र आहे यास्तव मीही त्यास भक्षीन ह्मणजे दोघाचें
कार्य होईल असें त्याचें बोलणे ऐकून उभयतां तेथे
गेले तों ब्राह्मण निजला होता त्याला भक्षावा ह्मणून
राक्षस चालिला त्यास चोर बोलतो गडया मी याचें
गोयुग्म नेईन मग तुं यास भक्ष तेव्हां राक्षस ह्मणतो स
ख्या गाईच्या शब्देवरून जर ब्राह्मण जागृत जाहाला
तर हा सर्व उद्योग राहील यास्तव मी अगोधर त्या
स भक्षितों मग तुं निर्भय गाई ने चोर ह्मणतो तुं त्या

स

**पंचोपाख्यान**, मुंबई १८२२

( केवळ मराठी भाषेचा देवनागरींत छापलेला मुंबईतील पहिला ग्रंथ. हा अलीकडेच सांपडला असून याची प्रत पुण्याच्या महाराष्ट्र ग्रंथालयांतील शंकर गणेश दाते संग्रहांत आहे. )

 मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 69495 दि: 10.2.45
क्रमांक 5896 नों: दि: 28/3/60 

## ग्रंथासाठीं लग्नग्रंथि

पोस्टाचीं तिकिटें गोळा करण्याचा कांहीं लोकांना विलक्षण नाद असतो. अशांपैकींच कुणी एक बाई होती. तिच्याकडे एक फार दुर्मिळ असा 'स्टॅंप' होता. दुसरा असाच एक स्टॅंपकलेक्टर होता. त्यानें तो स्टॅंप तिच्याकडून मिळ-विण्याची पराकाष्ठा केली. शेवटीं सगळे उपाय थकल्यावर त्यानें तिच्याशीं लग्नच लावलें व तिच्याबरोबर तो स्टॅंपही आपलासा केला, असें सांगतात !

स्टॅंप गोळा करण्याच्या नादाप्रमाणें जुनीं पुस्तकें संग्रहीत करण्याचा कांहीं लोकांना नाद असतो. इंग्लंडमध्यें रिचर्ड हेबर ( Richard Heber, 1773-1833) नांवाचा एक मोठा ग्रंथसंग्राहक होऊन गेला. त्याचीं इंग्लंडप्रमाणें पॅरिस व युरोपांतील आणखी एक-दोनचार ठिकाणीं स्वतःचीं ग्रंथसंग्रहालयें होतीं. जवळ जवळ तीन लाख ग्रंथ त्याच्याकडे होते. तरीपण त्याची ग्रंथसंग्रह करण्याची इच्छा अतृप्तच होती. त्याची समकालीन कुमारी रिचर्डसन क्युरर ( Miss Richardson Currer, 1785-1861 ) नांवाची एक बाई असाच ग्रंथसंग्रह करीत असे. तिच्याकडे हेबरजवळ नसलेले कांहीं ग्रंथ होते. ते हस्तगत करण्याकरितां तो तिच्याशीं विवाहबद्ध होण्याच्या विचारांत होता, असें कॅंब्रिज विद्यापीठाचें ग्रंथ-शास्त्राचे प्राध्यापक Mr. Seymour de Ricci यांनीं एका ठिकाणीं नमूद केलें आहे. तें सांगून प्रो. रिक्सि पुढें पृच्छा करतो— "—was he more interested in the lady or in her books ?" प्रो. रिक्सीचा हा शेरा जेव्हां मीं वाचला तेव्हां कित्येक वर्षांपूर्वींचा या लेखाच्या सुरुवातीला कथन केलेला भाजीवालीचा प्रसंग मला आठवल्याखेरीज राहिला नाहीं.

हौसेला मोल नाहीं असें म्हणतात; परंतु तिलाही कांहींतरी सीमा पाहिजेच ना ? ग्रंथसंग्रहाचा नाद असलेल्या माणसांचे युरोपांत दोन वर्ग पाडिले जातात. Bibliophile आणि Bibliomane. ज्या एकाद्या विषयाचा अभ्यास असतो, त्या विषयाच्या व्यासंगाला उपयुक्त अशा पुस्तकांचा संग्रह करणारा पहिल्या वर्गांत येईल. आपण त्याला ग्रंथप्रेमी म्हणूं; परंतु आपणांस गरज नसलेले ग्रंथ केवळ ते फार जुने आहेत, किंवा ते विचित्र बांधणीचे, आकाराचे किंवा कागदाचे आहेत, अशा कोणत्या ना कोणत्या छांदिष्ट दृष्टीनें वाटेल तितके पैसे खर्च करून ते मिळविणारा—an indiscriminate collector of books —हा दुसऱ्या वर्गांत मोडतो. त्यांना आम्हीं ग्रंथवेडे असें नांव देऊं. युरोप किंवा अमेरिका येथें पॅरिसचें बिब्लिओतेक नासियोनाल किंवा इंग्लंडांतील ब्रिटिश म्युझियम यांच्यासारखीं जीं विराट ग्रंथसंग्रहालयें आहेत, तीं या दुसऱ्या वर्गांतील ग्रंथवेड्यांचीं स्मारकें म्हणावयास हरकत नाहीं; कारण मुख्यतः अशा

निरनिराळ्या ग्रंथवेड्यांनीं जमविलेल्या वैयक्तिक ग्रंथसंग्रहामुळेंच त्यांना आजचें हें प्रचंड स्वरूप प्राप्त झालेलें आहे.

### पांचाऐवजीं पांच हजार

दोनचार वर्षांपूर्वीं एका सेकंडहँड पुस्तकाच्या दुकानदारानें मला एक गमतीची हकीकत सांगितली. हा आमचा स्नेही परस्थ असून मुंबईत कित्येक वर्षांपासून स्थायिक झालेला आहे. त्यानें कथन केलेली हकीगत अशी :– मुंबईत फोर्टमध्यें एक जरीपुराण्या मालाचा मुसलमान दुकानदार होता. त्याच्या दुकानांत जुन्या मोडतोडीच्या वस्तु व जुनीं कचरावजा पुस्तकें अस्ताव्यस्त पडलेलीं असत. एके दिवशीं एक अमेरिकन गृहस्थ त्याच्या दुकानावरून जात असतां त्याचें लक्ष त्या दुकानांत धुळींत पडलेल्या पुस्तकांकडे गेलें. त्यानें त्यांपैकीं एक पुस्तक उचलून त्याची किंमत काय, अशी त्या मुसलमानाला पृच्छा केली. आमच्यासारख्या गबाळ वेषांतील एकादें गांवठी गिऱ्हाइक असतें तर त्यानें चार-आठ आण्यापेक्षां जास्त किंमत सांगितली नसती; परंतु त्या अमेरिकन गृहस्थाचा गोरा रंग व ऐटबाज पोशाख पाहून त्या मुसलमानाच्या तोंडाला पाणी सुटलें व त्यानें आपल्या स्वार्थ-बुद्धीला जितका म्हणून कांहीं ताण देतां येईल तितका देऊन पांचसात रुपये किंमत सांगितली. त्या अमेरिकन गृहस्थानें तिकडचीं तीनचार पुस्तकें उचलून तीं घेऊन आपल्याबरोबर ये, असें त्या दुकानदाराला म्हटलें व त्याप्रमाणें तो गेला. आपल्या निवासस्थानाकडे आल्यावर त्या अमेरिकन गृहस्थानें पांच हजार रुपये मोजून त्या मुसलमानाच्या पुढें ठेविले ! आपण कांहींच्याबाहींच भलतीच किंमत मागितली व त्यामुळें हा साहेब रागावला असून आपली चेष्टा करतो आहे, असें वाटून तो दुकानदार ते पैसे घेण्यास कांकूं करूं लागला. तो अमेरिकन गृहस्थ म्हणाला, "हे मी तुला कमीच पैसे देतों आहें. तूं दहा हजार रुपये मागितले असतेस तरी तेही दिले असते !" त्या दुकानदाराची आतां खात्री झाली कीं, साहेब कांहीं रागावलेला नाहीं. अल्लाच्या कृपेनें आज हें एक मूर्ख गिऱ्हाइक सांपडलें, असें मनांत भावून तो आपल्या दुकानांत गेला व तो सारा कचरा व जुना माल फुंकून टाकून या नव्या भांडवलावर त्यानें मोठ्या प्रमाणावर दुसरा धंदा सुरू केला !

दोनतीन वर्षांमागें गोरेगांव येथें कुलाबा जिल्हा ग्रंथालयपरिषद भरली होती. त्या वेळीं या गोष्टीचा मीं माझ्या अध्यक्षीय भाषणांत उल्लेख केला. ज्या-प्रमाणें एकादा हरिदास आपल्या कीर्तनास रंग भरावा म्हणून पुराणांतल्या असंभाव्य गोष्टी सांगतो, त्याप्रमाणें मीही माझ्या भाषणास रोचकता यावी म्हणून कांहींतरी अशक्य गप्पा सांगतों आहे, असेंच कांहीं श्रोत्यांना वाटलें असावें.

दोघां सुविद्य मित्रांनीं लगेच या गोष्टींच्या शक्यतेबाबत माझ्याकडे शंकाही व्यक्त केली. आजही हा लेख वाचणाऱ्यांपैकीं कांहींजणांना 'दिवाळी'च्या खास अंकांतील लेखाला खमंगपणा आणण्याकरितां मी कांहींतरी लिहितों आहे असेंच वाटेल. ज्यांना आपल्या महाराष्ट्राबाहेर जगांत काय चाललें आहे याची वार्ता नाहीं, त्यांना ही गोष्ट अशक्य वाटणें साहजिक आहे. अशा लोकांच्या माहितीकरितां 'टाइम्स'च्या गेल्या वर्षाच्या लिटररी सप्लिमेंटच्या ता. २९-३-४७ च्या अंकांतील एक उतारा जशाचा तसा देतों:—

"On the evening of January 28, 1947, the highest price ever reached at auction by a printed book, *viz.* $ 151,000 (£ 37,750) was paid at the Parke-Bernet Galleries, New York, by the Rosenbach Company, for an unobtrusive, though handsomely bound. octavo, bearing no place or printer's name, but dated 1640, and entitled "*The Whole Booke of Psalmes, Faithfully translated into English Metre,*" Printed in fact, at Cambridge, in New England, by Stephen Daye. *The Bay Psalm Book*, as it is commonly called was the first printed in English America; and when to this unique importance in the field of America is added the book's extreme rarety, it is not surprising that it brought a sensational price."

## दहा लाख पाहिजेत ?

या ग्रंथाचा विशेष इतिहास देण्याचें येथें कारण नाहीं. वास्तविक आमच्याकडील 'हरिपाठाचें अभंग,' 'मनाचे श्लोक' अशांसारख्या धार्मिक चोपड्यांच्या मालिकेंतीलच हें एक पुस्तक. हें पुस्तक अद्वितीय आहे, असेंही नाहीं. लिलांव पुकारणाऱ्यांच्याच म्हणण्याप्रमाणें अन्यत्र या पुस्तकाच्या अकरा ज्ञात प्रती आहेत. म्हणजे शेक्सपियरच्या पहिल्या फोलियोच्या दसपट व माझारिन बायबलच्या जवळ जवळ सहापट त्याची दुर्मिळता ठरली. याहीपूर्वीं छापलेलें अमेरिकेंतील पुस्तक "An Almanack for the year 1639 by William Peirce Mariner" हें आहे असें म्हणतात. तें अनुपलब्ध आहे. याची प्रत कुणालाही उपलब्ध झाल्यास दहा लाख रुपये सहज मिळूं शकतील !

वर सांगितलेलें जरीपुराणा दुकानदारानें विकलेलें पुस्तक The Bay Psalm Book प्रमाणें दुर्मिळ असावें. ज्या वेळीं इंग्लिश लोकांनीं अमेरिकेंत प्रथम वसाहत केली, त्या वेळीं पहिल्यानेंच काढलेल्या एका मासिकाचे ते अंक होते, असें कळतें. अमेरिकेंत मासिक काढण्याचा प्रयत्न प्रथम बेंजामिन फ्रांक्लिन

यानें १७४१ सालीं केला; परंतु फ्रांक्लिन मासिक काढतो, हें कळतांच अँड्रू-ब्रॅडफोर्ड यानें घाई करून याच वर्षी फिलादेलफिया येथें ता. १३ फेब्रुवारी रोजीं American Magazine हें मासिक प्रसिद्ध केलें. पुढें तीनच दिवसांनीं फ्रांक्लिनच्या मासिकाचा पहिला अंक बाहेर पडला. त्याचें नांव General Magazine and Historical Chronicle असें होतें. या चुरशीचा परिणाम व्हायचा तोच झाला. ब्रॅडफोर्डच्या मासिकाचे तीनापेक्षां जास्त अंक निघाले नाहींत व फ्रांक्लिनचें मासिक सहा अंक प्रसिद्ध झाल्यावर बंद पडलें! वरील हकीगत जर खरी असेल तर यांपैकींच ते अंक असतील. असो. त्यामुळेंच त्या अमेरिकन प्रवाशानें त्या दुकानदारानें मागितलेल्याच्या हजारपट रक्कम खूष होऊन दिली असावी. ३७७५० पौंड म्हणजे साधारणतः ( पंधरा रुपये पौंड धरला तर ) ५, ६६,२५० एवढे रुपये होतात. चॉसर, शेक्सपियर किंवा मिल्टन अशां-सारख्या कवींची स्वाक्षरी असलेली जुनी प्रत केवळ विभूतिपूजेमुळें बहुमोल ठरावी हें कळतें; परंतु Bay Psalm Book सारख्या पुस्तकाला एवढें मोल यावें हें अमेरिकन लोकांचें ग्रंथवेड पाहून आपल्याकडे शहाण्या लोकांना वेडच लागावयाचें! हें पुस्तक कातड्यावर छापलेलें नसून कागदीच आहे हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. केवळ लिलांवामध्यें इरेस पडून या पुस्तकाची किंमत वाढविली गेली असेंही म्हणतां येत नाहीं. ह्या पुस्तकाचा १९४७ च्या जानेवारींत लिलांव झाला; परंतु १९४६ सालीं *From My Library Walls* ( A kaleidoscope of Memories ) नांवाचें एक पुस्तक Mr. William Dana Orcutt ( लंडन ) यानें लिहिलें आहे, त्यांत तो या पुस्तकासंबंधीं म्हणतो, " This volume is the most valuable book printed on paper in the world -worth even more than the famous Gutenberg Bible, a reasonable cash estimate being perhaps $ 2,50,000. " म्हणजे या संकल्पित किंमतीपेक्षां लिलावांत वास्तविक नव्याण्णव हजार डॉलर कमीच किंमत आली, हें यावरून स्पष्ट दिसून येईल.

**आमचे फुकटे**

आमच्याकडे अशा प्रकारचे ग्रंथवेडे ( Bibliomanes ) लोक तर नाहींतच, पण ग्रंथप्रेमींही विरळाच सांपडतात. स्वतः ज्ञानदेवानें हातानें लिहिलेली ( Autograph ) ज्ञानेश्वरीची मूळ प्रत, किंवा रामदासांच्या हातचा दासबोध अगर तुकारामबुवांची स्वाक्षरी गाथा मिळून जर कुणी उद्यां लिलांवाला काढिली, तर या प्रत्येकाला चार-पांचशेंच काय, पण शंभर रुपये देऊन विकत घेणारें गिऱ्हाइक सांपडेल कीं काय, याविषयीं शंका आहे! आपले 'शहाणे' लोक

म्हणतील कीं सुवाच्य अशी छापील ग्रंथाची प्रत बाजारांत जर दोनतीन रुपयांस मिळते, तर एवढे पैसे खर्च कराच कशाला ?

आपल्याकडील ग्रंथोत्पत्तीचा इतिहास अवलोकन केला तर ग्रंथ विकत घेण्याची संवय आपल्याकडे मुळापासूनच असलेली दिसत नाहीं. जुन्या काळीं लेखनवाचन ब्राह्मणापुरतेंच मर्यादित होतें. ब्राह्मण लोक स्वतःच्या उपयोगाकरितां म्हणून पुस्तकें लिहून काढीत. कांहीं धंदेवाईक लेखक असत. ते गीता किंवा भागवत यांसारखें ग्रंथ लिहून ठेवीत व धनिक लोक ते त्यांच्याकडून विकत घेऊन ब्राह्मणांना दान करीत. ह्या धनिक लोकांना ग्रंथांची आवड असे, असें नाहीं. केवळ पुण्यार्जनाकरितां म्हणून ते ग्रंथ विकत घेऊन ब्राह्मणांना देत. त्यामुळें ग्रंथ म्हणजे शक्य तोंवर तो फुकटांत मिळावयाचा, ही प्रवृत्ति आजही आपल्यामध्यें दिसून येते. प्रथमच पुस्तकें जेव्हां छापण्यांत येऊं लागलीं; त्या वेळीं त्यांना कशा प्रकारची मागणी होती हें मुंबई सदर दिवाणी अदालतच्या रजिष्ट्रारनें चीफ सेक्रेटरीला ता. १६ आक्टो. १८२९ रोजीं जो रिपोर्ट सादर केला आहे, त्यावरून दिसून येतें. तो लिहतो,

"It appears also to the Judges that it is essential the Government should consent for some years to give Books gratis, to every School-Master willing to take and use them. The kind of books should be those of Arithmetic, short Histories, moral tales distinct from their own false legends, Natural History, and some short voyages and Travels-Books of this kind, the judges believe have been already translated and printed at the cost of Government, and is evident they cannot be sold, it is at least better that they should be distributed in this manner than allowed to go to destruction."

विशेषतः गंभीर विषयावरील पुस्तक जर असेल तर ग्रंथालयेंदेखील तें मोफत पदरांत पाडणाचा आजही प्रयत्न करतात ! नवीन लेखकप्रकाशकांनीं याविषयींचे आपले अनुभव प्रसिद्ध करण्यासारखे आहेत.

ग्रंथसंग्रह करण्याची आवड युरोपांत इंग्लंडपेक्षांही जर्मनी किंवा फ्रान्समध्येंच जुन्या काळीं जोरांत होती, असें दिसतें. जॉन लिलँड नांवाच्या संशोधकानें ता. १५ जुलै १५३६ सालीं क्रॉम्वेलला एक पत्र लिहिलें आहे, त्यांत त्यानें राजग्रंथ-संग्रहालयाकरितां हस्तलिखितें गोळा करण्याची आवश्यकता प्रतिपादून, "The Germans do send daily young scholars hither that spoileth them and cutteth them out of libraries, returning home and putting them abroad as monuments of their own country."

यानें १७४१ सालीं केला; परंतु फ्रांक्लिन मासिक काढतो, हें कळतांच अँड्र्‌-ब्रॅडफोर्ड यानें घाई करून याच वर्षी फिलादेलफिया येथें ता. १३ फेब्रुवारी रोजीं American Magazine हें मासिक प्रसिद्ध केलें. पुढें तीनच दिवसांनीं फ्रांक्लिनच्या मासिकाचा पहिला अंक बाहेर पडला. त्याचें नांव General Magazine and Historical Chronicle असें होतें. या चुरशीचा परिणाम व्हायचा तोच झाला. ब्रॅडफोर्डच्या मासिकाचे तीनापेक्षां जास्त अंक निघाले नाहींत व फ्रांक्लिनचें मासिक सहा अंक प्रसिद्ध झाल्यावर बंद पडलें ! वरील हकीगत जर खरी असेल तर यांपैकींच ते अंक असतील. असो. त्यामुळेंच त्या अमेरिकन प्रवाशानें त्या दुकानदारानें मागितलेल्याच्या हजारपट रक्कम खूष होऊन दिली असावी. ३७७५० पौंड म्हणजे साधारणतः ( पंधरा रुपये पौंड धरला तर ) ५,६६,२५० एवढे रुपये होतात. चॉसर, शेक्सपियर किंवा मिल्टन अशां-सारख्या कवींची स्वाक्षरी असलेली जुनी प्रत केवळ विभूतिपूजेमुळें बहुमोल ठरावी हें कळतें; परंतु Bay Psalm Book सारख्या पुस्तकाला एवढें मोल यावें हें अमेरिकन लोकांचें ग्रंथवेड पाहून आपल्याकडे शहाण्या लोकांना वेडच लागावयाचें ! हें पुस्तक कातड्यावर छापलेलें नसून कागदीच आहे हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. केवळ लिलांवामध्यें इरेस पडून या पुस्तकाची किंमत वाढविली गेली असेंही म्हणतां येत नाहीं. ह्या पुस्तकाचा १९४७ च्या जानेवारींत लिलांव झाला; परंतु १९४६ सालीं *From My Library Walls* ( A kaleidoscope of Memories ) नांवाचें एक पुस्तक Mr. William Dana Orcutt ( लंडन ) यानें लिहिलें आहे, त्यांत तो या पुस्तकासंबंधीं म्हणतो, " This volume is the most valuable book printed on paper in the world -worth even more than the famous Gutenberg Bible, a reasonable cash estimate being perhaps $ 2,50,000. " म्हणजे या संकल्पित किंमतीपेक्षां लिलावांत वास्तविक नव्याण्णव हजार डॉलर कमीच किंमत आली, हें यावरून स्पष्ट दिसून येईल.

### आमचे फुकटे

आमच्याकडे अशा प्रकारचे ग्रंथवेडे ( Bibliomanes ) लोक तर नाहींतच, पण ग्रंथप्रेमींही विरळाच सांपडतात. स्वतः ज्ञानदेवानें हातानें लिहिलेली ( Autograph ) ज्ञानेश्वरीची मूळ प्रत, किंवा रामदासांच्या हातचा दासबोध अगर तुकारामबुवांची स्वाक्षरी गाथा मिळून जर कुणी उद्यां लिलांवाला काढिली, तर या प्रत्येकाला चार-पांचशेंच काय, पण शंभर रुपये देऊन विकत घेणारें गिऱ्हाइक सांपडेल कीं काय, याविषयीं शंका आहे ! आपले ' शहाणे ' लोक

म्हणतील कीं सुवाच्य अशी छापील ग्रंथाची प्रत बाजारांत जर दोनतीन रुपयांस मिळते, तर एवढे पैसे खर्च कराच कशाला ?

आपल्याकडील ग्रंथोत्पत्तीचा इतिहास अवलोकन केला तर ग्रंथ विकत घेण्याची संवय आपल्याकडे मुळापासूनच असलेली दिसत नाहीं. जुन्या काळीं लेखनवाचन ब्राह्मणापुरतेंच मर्यादित होतें. ब्राह्मण लोक स्वतःच्या उपयोगाकरितां म्हणून पुस्तकें लिहून काढीत. कांहीं धंदेवाईक लेखक असत. ते गीता किंवा भागवत यांसारखें ग्रंथ लिहून ठेवीत व धनिक लोक ते त्यांच्याकडून विकत घेऊन ब्राह्मणांना दान करीत. ह्या धनिक लोकांना ग्रंथांची आवड असे, असें नाहीं. केवळ पुण्यार्जनाकरितां म्हणून ते ग्रंथ विकत घेऊन ब्राह्मणांना देत. त्यामुळें ग्रंथ म्हणजे शक्य तोंवर तो फुकटांत मिळवयाचा, ही प्रवृत्ति आजही आपल्यामध्यें दिसून येते. प्रथमच पुस्तकें जेव्हां छापण्यांत येऊं लागलीं; त्या वेळीं त्यांना कशा प्रकारची मागणी होती हें मुंबई सदर दिवाणी अदालतच्या रजिष्ट्रारनें चीफ सेक्रेटरीला ता. १६ आक्टो. १८२९ रोजीं जो रिपोर्ट सादर केला आहे, त्यावरून दिसून येतें. तो लिहतो,

"It appears also to the Judges that it is essential the Government should consent for some years to give Books gratis, to every School-Master willing to take and use them. The kind of books should be those of Arithmetic, short Histories, moral tales distinct from their own false legends, Natural History, and some short voyages and Travels-Books of this kind, the judges believe have been already translated and printed at the cost of Government, and is evident they cannot be sold, it is at least better that they should be distributed in this manner than allowed to go to destruction."

विशेषतः गंभीर विषयावरील पुस्तक जर असेल तर ग्रंथालयेंदेखील तें मोफत पदरांत पाडणाचा आजही प्रयत्न करतात ! नवीन लेखकप्रकाशकांनीं याविषयींचे आपले अनुभव प्रसिद्ध करण्यासारखे आहेत.

ग्रंथसंग्रह करण्याची आवड युरोपांत इंग्लंडपेक्षांही जर्मनी किंवा फ्रान्समध्येंच जुन्या काळीं जोरांत होती, असें दिसतें. जॉन लिलँड नांवाच्या संशोधकानें ता. १५ जुलै १५३६ सालीं क्रॉम्वेलला एक पत्र लिहिलें आहे, त्यांत त्यानें राजग्रंथ-संग्रहाल्याकरितां हस्तलिखितें गोळा करण्याची आवश्यकता प्रतिपादून, "The Germans do send daily young scholars hither that spoileth them and cutteth them out of libraries, returning home and putting them abroad as monuments of their own country."

अशी जोराची तक्रार केली आहे. आपल्या इकडील भारतीय हस्तलिखितें जर्मनींत किती गेलीं त्यांची तर गणतीच नाहीं. याबद्दल कधीं कोणास दुःख झालें आहे काय? " a catalogue of Oriental Manuscripts collected in Indoostan by Samuel Guise, ( Bombay ) 1792 " या ग्रंथावरून किती मागें हा प्रकार सुरू झाला होता, त्याची कल्पना करतां येते. पॅरिसमधील Bibliotheque Nationale १५९३ मध्यें स्थापन झालें व तेथें जवळजवळ पंचेचाळीस लाख ग्रंथसंग्रह आहे. ब्रिटिश म्युझियम जवळजवळ दोनशें वर्षांनंतर स्थापन झाल्यामुळें तिकडची ग्रंथसंख्या पॅरिस बिब्लिओतेकएवढी नाहीं. जवळ-जवळ दहा लाखांचें या दोनही संग्रहांत अंतर आहे; परंतु ब्रिटिश म्युझियम जरी उशीरां म्हणजे अठराव्या शतकाच्या उतरार्धाच्या आरंभीं १७५३ मध्यें स्थापन झाला तरी पूर्वीच्या निरनिराळ्या वैयक्तिक ग्रंथसंग्रहांमुळें त्याला आजचें स्वरूप प्राप्त झालें आहे. सर रॉबर्ट कॉटन, विल्यम कुर्टेन, हॅन्स स्लोएन, रॉबर्ट हार्ले यांच्या संग्रहांवर तो उभारला गेला. पुढें त्यामध्यें निरनिराळ्या खासगी संग्रहांची भर पडली. त्याकाळचे हे बहुतेक ग्रंथसंग्राहक मोठमोठे अमीरउमराव, बिशप किंवा राजे असे बडे लोक असत. पुढें इतर लोकांमध्येंही ही ग्रंथसंग्राहकवृत्ति फैलावत चालली. कांहीं मोठ्या लोकांनीं आपले संग्रह ब्रिटिश म्युझियमला देणगी-दाखल दिले, तर कांहीं राजांनीं व धनाढ्य लोकांनीं खासगी संग्रह विकत घेऊन ते राष्ट्राला अर्पण केले. अनेक ओहोळ मिळून नदी व्हावी व अशा अनेक नद्या शेवटीं सागराला मिळाव्या, त्याप्रमाणें लहान लहान संग्रह बड्या संग्राहकाकडे जावे, त्यानें मग हे संग्रह ब्रिटिश म्युझियम किंवा ऑक्स्फर्डचें सुप्रसिद्ध बोल्डेयन ग्रंथालय ( Boldeian Library ) अशासारख्या ग्रंथागारांमध्यें समाविष्ट करावे असा तिकडील रिवाज आहे. आपल्याकडे ग्रंथवेडे ( Bibliomane ) असे लोक नाहींत; परंतु जे कांहीं ग्रंथप्रेमी ( Bibliophile ) लोक असतात, त्यांच्या संग्रहांची अखेर वाताहतच होते. युरोपांत किंवा अमेरिकेंत ग्रंथांची स्वतंत्र बाजारपेठ आहे. Messrs Sotheby & Co. सारख्यांच्या दुकानांमध्यें या पुस्तकांचा लिलांव होतो, व प्रत्येक पुस्तक सुरक्षित ठिकाणीं जाऊन पडतें.

### आमचें लेखी ज्ञानभांडार

आपल्याकडील रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांचा ग्रंथसंग्रह फर्ग्युसन कॉलेज लायब्ररीला देण्यांत आला, त्यामुळें सुरक्षित राहिला; परंतु डॉ. भाऊ दाजी, रा. ब. गोपाळराव देशमुख, न्या. मू. रानडे, न्या. मू. तेलंग, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, राजारामशास्त्री भागवत यांच्या वैयक्तिक ग्रंथ-

संग्रहांचें पुढें काय झालें, तें समजत नाहीं. डॉ. भाऊ दाजी, न्या. मू. तेलंग यांची स्वाक्षरी असलेले किंवा त्यांना युरोपांतील विद्वानांनीं भेटीदाखल पाठविलेले कांहीं ग्रंथ मुंबईच्या ग्रंथालयांमध्यें केव्हां केव्हां आढळतात. दादाभाई नौरोजी यांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह अंधेरीच्या इस्माइल कॉलेजला मिळाला असल्याचें कळतें. अशासारख्या थोर पुरुषांच्या छापील ग्रंथसंग्रहापेक्षांही त्यांच्या खासगी पत्र-व्यवहारसंग्रहाला फार महत्त्व आहे; कारण छापील ग्रंथ अन्यत्र सांपडणें शक्य असतें; परंतु हें लेखी ज्ञानभांडार एकदां नष्ट झालें, म्हणजे त्यांतील माहितीला आम्हीं कायमचे मुकतों. खासगी पत्रव्यवहारामध्यें पुष्कळ वेळां छापील ग्रंथामध्यें न सांपडणारी अशी महत्त्वाची माहिती मिळूं शकते. बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, रानडे, चिपळूणकर, भांडारकर, डॉ. भाऊ दाजी, आगरकर, तेलंग, टिळक, ज्योतिबा फुले वगैरे जुन्या, किंवा अगदीं अलीकडचे म्हणजे श्री. कृ. कोल्हटकर, शिवरामपंत परांजपे, गडकरी, वामन मल्हार जोशी, केळकर, खाडिलकर अशा नव्या लोकांनीं आपल्या मित्रांना पाठविलेलीं हजारों पत्रें जिकडे तिकडे खासगी संग्रहांत असूं शकतील. तीं मिळवून त्यांचा संग्रह करण्याचा प्रयत्न कोणी तरी मध्यवर्ती संस्थेनें करण्यासारखा आहे. नाहीं तर तीं नष्ट होऊन जातील यांत शंका नाहीं. युरोपांत अशा प्रकारच्या पत्रांचा संग्रह करण्याविषयीं अहमहमिका लागलेली असते, आणि तीं मिळविण्याकरितां प्रत्येक तशाच महत्त्वाच्या पत्राला शेंकडों पौंड द्यावयाला लोक तयार असतात.

## आपले ग्रंथप्रेमी

युरोपांतील ग्रंथांनाच तेथें अशी मागणी आहे असें नाहीं; तर आपल्याइकडील ग्रंथही फार मोठ्या किंमतीला विकले जातात. कांहीं वर्षांमागें ‘ वसंतविलास ’ नांवाचा एक सचित्र गुजराती हस्तलिखित ग्रंथ चौदा हजार रुपये किंमतीला एका अमेरिकन गृहस्थानें विकत घेतला असें कळतें. तो सध्यां अमेरिकेंतील एका ग्रंथालयामध्यें संगृहीत झाला आहे. मूळ मालकाची हा ग्रंथ विकण्याची इच्छा नव्हती; परंतु त्याला नकळतांच तो विकला गेला, असें समजतें. खुद्द हिंदुस्थान-मध्येंही कांहीं ग्रंथसंग्राहक आहेत. १९४५ च्या ऑक्टोबरमध्यें सर कावसजी जहांगीर यांनीं शेख सादीच्या गुलिस्तानची एक सोळाव्या शतकांतील हस्त-लिखित सचित्र प्रत साडेपांच हजार रुपयांना विकत घेतली. हा ग्रंथ हैदराबादच्या एका कस्टमच्या अधिकाऱ्याचा होता. तो बी. एच्. रझवी नांवाच्या इसमानें मूळ मालकाच्या संग्रहांतून पळवून सर कासवजींना आणून विकला. हें प्रकरण कोर्टांपुढें आलें होतें. पुढें त्याचें काय झालें समजलें नाहीं. अंधेरीच्या एका श्रीमान् गृहस्थांनीं आपला बहुमोल ग्रंथसंग्रह मला कांहीं दिवसांपूर्वीं दाखविला.

पुण्याचे रा. शंकरराव दाते यांनीं १८७४ पर्यंतच्या मुद्रित मराठी ग्रंथांचा बहुमोल संग्रह केला आहे. त्यावरून आपल्याकडेही तुरळक कां होईना ग्रंथ-संग्राहक माणसें आहेत, असें म्हणतां येतें. आणखीही बरेच खासगी ग्रंथसंग्रह मीं पाहिले; परंतु त्यांच्या मूळांशीं कांहीं विशिष्ट योजना ( plan ) दिसली नाहीं. हा पूर्वसंकल्प किंवा योजना म्हणजे काय याची कल्पना १९४५ सालीं मुंबई येथें ग्रंथप्रदर्शन उघडते वेळीं मीं केलेलें भाषण वाचल्यास कळून येईल ( '**पंचारति**' पहा ); त्याचा पुनरुच्चार मीं या ठिकाणीं करीत नाहीं. ग्रंथाचा प्रत्येक ग्राहक ( buyer ) हा ग्रंथांचा संग्राहक ( collector ) असतोच असें नाहीं; ग्राहक व संग्राहक यांमधील Michael Sadler यानें दाखविलेला भेद मोठा मार्मिक आहे. तो म्हणतो.

" All book-collectors are book-buyers, but because you may be a book-buyer you are not necessarily a book-collector, It is impossible to become a genuine and sensible book-collector unless you are fond of reading, but not everyone who is fond of reading is–or is capable of becoming–a book collector.

A book–buyer, however intelligently he may select his purchases, buys at random, actuated by no motive except the acquisition of books he wants to read or would like to possess for their appearance sake. The book-collector buys according to a plan. This plan *centres* on books in which he takes a real literary interest, but it may well have outlying implications which involve the purchase of books in which he takes no personal interest at all; at which, once he is satisfied that they are the marginal items his collection really reguires, he may never look again. The man who is fond of reading assembles only such volumes as he wants to read. The collector has probably read and thoroughly digested the books which form the basis of his collection; but he will also hunt for books he has neither the wish nor the intention to read, because, without them, his collcction by the standards he has set himself, will not be ccmplete. "

**रद्दीच्या भावांत रत्नें**

वरील व्याख्येप्रमाणें ज्यांना संग्राहक ( collector ) असें नांव देतां येईल. अशा व्यक्ति महाराष्ट्रांत कितीशा सांपडतील ? वडिलोपार्जित घरांत असलेलीं,

कांहीं ग्रंथप्रकाशकांनीं किंवा ग्रंथकारांनीं भेटीदाखल पाठविललीं किंवा आश्रयार्थ इच्छेविरुद्ध गळ्यांत बांधलेलीं; व्यवसायानिमित्त किंवा वाचनाच्या आवडीनें विकत घेतलेलीं; इतरांकडून वाचण्यास म्हणून आणून दडपलेलीं किंवा निरनिराळ्या ग्रंथालयांतून लांबवलेलीं; सहज दिसलें व स्वस्त मिळालें म्हणून जवळ केलेलीं; अशींच पुस्तकें खाजगी ग्रंथसंग्रहालयांत जास्त आढळतात. युरोपांत निरनिराळ्या ग्रंथसंग्राहकांनीं आपले अनुभव नमूद केलेले ग्रंथ आहेत. आपल्याकडे धुळ्याचे श्री. शंकरराव देव यांनीं 'रामदासी संशोधन' या ग्रंथांत हस्तलिखितें गोळा करतांना आलेले कांहीं अनुभव नमूद केलेले आहेत, ते मनोरंजक आहेत. युरोप-अमेरिकेंत खास ग्रंथसंग्रहकार्यार्थ वाहिलेलीं नियतकालिकें आहेत. जुन्या ग्रंथांचे जे लिलांव होतात, त्यामुळेंही तिकडे लोकांमध्यें ग्रंथसंग्राहकवृत्ति वाढण्यास फार मदत होते. आपल्याकडे जुन्या फर्निचरचे लिलांव होतात; परंतु पुस्तकांचे होत नाहींत. जुन्या काळीं मुंबईमध्यें ते होत असावेत. कारण रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं १८७८ सालीं "स्वीदनबोर्ग ह्यांच्या मताविषयीं एका हिंदु गृहस्थाचे विचार" या विषयावर जो एक निबंध लिहिला आहे, त्याच्या आरंभीं ते लिहितात, "सुमारें दहा वर्षें झालीं; एके दिवशीं मी मुंबईच्या किल्ल्यांत फिरत असतां एका जागेंत लिलांव होत होतें आणि जेथें लिलावांत घालण्यांत तयार केलेलीं जुनीं पूस्तकें होतीं, तेथें मी शिरलों" वगैरे. अर्थात् हे लिलांव इंग्रजी पुस्तकांचे. मराठी जुनीं पुस्तकें रद्दीच्या भावानेंही कुणी विकत घेईल कीं काय याबद्दल शंका आहे. असें सांगतात कीं, पुण्याच्या एका हायस्कूलच्या सुपरिंटें-डेंटनीं पुष्कळशीं दुर्मिळ मराठी पुस्तकें लायब्ररीकरितां म्हणून गोळा केलीं. पुढें हे जुने सुपरिंटेंडेंट जाऊन त्यांच्या जागीं दुसरे एक नवे शहाणे गृहस्थ आले. त्यांनीं या जुन्या पुस्तकांना वाचकांची मागणी नाहीं म्हणून एका जरी-पुराणेवाल्या माणसाला बोलावून तीं रद्दीच्या भावानें विकून टाकलीं!!! १९४५ सालीं पंतप्रधान श्री. बाळ गंगाधर खेर यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईला मराठी ग्रंथालय परिषद भरली. या वेळीं एक दुर्मिळ ग्रंथांचें प्रदर्शन उघडण्यांत आलें होतें, याचा उल्लेख वर आलाच आहे. या प्रदर्शनांत ठेवण्याकरितां म्हणून १८५० च्या पूर्वींच्या पुस्तकांची एका प्रख्यात ग्रंथसंग्रहालयाकडे कांहीं दिवस अगोदर मागणी करण्यांत आली होती व अशीं पुस्तकें देण्याचें त्या ग्रंथालयाच्या अधिकाऱ्यांनीं कबूलही केलें. पुढें प्रदर्शनाच्या पूर्वीं ज्या वेळीं पुस्तकें पाठविण्याबद्दल त्यांना लिहिलें, त्या वेळीं १८५० मागचीं पुस्तकें जुनीं झाल्यामुळें तीं काढून टाकण्यांत आलीं असें उत्तर आलें! एका कुठल्यातरी ग्रंथसंग्रहालयाचा वार्षिकोत्सव एका भाषाकारणी गृहस्थाच्या अध्य-क्षतेखालीं साजरा झाला होता. त्या वेळीं "ग्रंथालयांना मधून मधून जुलाब

दिले पाहिलेत, " असे त्यांनीं उद्गार काढल्याचा रिपोर्ट एका वृत्तपत्रांत वाचल्याचा आठवतो. ग्रंथालयांना जुलाब देणें म्हणजे जुने ग्रंथ काढून टाकणें असा जर त्याचा अर्थ असेल, तर अशा मित्रांपासून ग्रंथालयांना संभाळा, असेंच म्हणावें लागेल ! ठेवण्यास जागा नाहीं म्हणून एकाद्या व्यक्तीस किंवा संस्थेस आपल्या संग्रहास जुलाब द्यावयाचे असतील तर त्यांनीं या पुस्तकांचा नाश न करतां तीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहाल्याकडे पाठवावीं.

## मराठींतील पहिलें छापील पुस्तक

जुनें पुस्तक म्हणजे त्याला कांहीं किंमत नाहीं, तें फुकटांत मिळविण्याच्या लायकीचें, अशी आपल्याकडे सार्वत्रिक समजूत आहे. ज्या वेळीं एकादें दुर्मिळ पुस्तक मी खरेदी करतों, त्या वेळीं त्याला किती पैसे दिले हें मी कुणाला सहसा सांगत नसतों. कारण यांत माझे स्वतःचे पैसे जाऊन उलट मूर्खपणा माझ्या पदरांत येण्याचा संभव असतो. बाकी आम्हीं भारी किंमत कितीही दिली, तरी वर सांगितलेल्या Bay Psalm Book शीं त्याची किंमतींत तुलना थोडीच व्हावयाची आहे ! बेडकानें पोट फुगवून बैलाची बरोबरी करण्यासारखें हें धाष्टर्य होईल !

' थी बे साम बुक ' या अमेरिकन पुस्तकाचें, ते अमेरिकेंतील पहिलें छापील उपलब्ध पुस्तक म्हणून कालदृष्टया महत्त्व आहे. या दृष्टीनें मराठींतील पहिलें छापील पुस्तक कोणतें हें ठरविणें मोठें गुंतागुंतीचें आहे. तसें पाहिलें तर पहिला छापील मराठी ग्रंथ म्हणजे पाद्री तोमास इस्तेव्हम् ( फादर तोमस स्टिफन्स ) याचें ख्रिश्चन पुराण. हा ग्रंथ १६१६ सालीं प्रसिद्ध झाला; परंतु ही पहिल्या मुद्रणाची किंवा त्याच्या १६४९ व १६५४ या अनुक्रमें दुसऱ्या व तिसऱ्या आवृत्तीच्या प्रती जगांत कुठेंही उपलब्ध नाहींत. सध्यां उपलब्ध असलेली या पुराणाची १९०७ सालीं मंगळोर येथें छापलेली प्रत कांहीं हस्तलिखितांवरून तयार केलेली आहे. या ग्रंथाची भाषा मराठी असली, तरी लिपि रोमन. यानंतर दुसरा मराठी छापील ग्रंथ म्हणजे गोमंतकांतील ब्राह्मणी बोलींत लिहिलेल्या फादर स्टिफन्सचा प्रश्नोत्तररूप ' दौत्रिन क्रिस्तां. ' याच्या दोनच प्रती जगांत उपलब्ध आहेत. एक पोर्तुगालच्या सरकारी ग्रंथसंग्रहालयांत व दुसरी रोममध्यें पोपच्या लायब्ररींत. समाधानाची गोष्ट म्हणजे ह्या ग्रंथाची यथामूल ( Facsimile ) प्रत लिस्बन युनिव्हर्सिटीचे संस्कृतचे प्रोफेसर डॉ. मारियान सालडाणा यांनीं संपादून पोर्तुगाल सरकारनें १९४५ सालीं प्रसिद्ध केली आहे. रोमन लिपींतला उपलब्ध असा हा जुन्यांतला जुना छापील मराठी ग्रंथ होय. याच्यानंतर ' बॉंबे क्युरियर 'मध्यें १८०२ सालीं मोडी लिपींत छापलेल्या मराठी जाहिराती

आढळतात. ( The Bombay Courier 17-7-1802 ). त्यांस ग्रंथ असें नांव देतां येणार नाहीं. देवनागरीमध्यें छापलेला पहिला मराठी ग्रंथ म्हणजे डॉ. विल्यम कॅरेकृत १८०५ सालीं श्रीरामपूर येथें छापलेला A Grammar of the Marathi Language हा होय. याच्या आरंभींच "Books in the Mahratta Language are generally written in the Devunaguri character, but the character commonly used in business is the Moorh, Types in the Moorh character not having yet been cast in Bengal the Devunaguri will be used in this work," असें म्हटलें आहे. या पहिल्या आवृत्तीची या भागांत असलेली माझ्या संग्रहांतील एकच प्रत होय असें वाटतें. आणखी दुसरी प्रत कलकत्त्याच्या एकाद्या लायब्ररींत असणें शक्य आहे. या ग्रंथाची जी १८०८ मध्यें दुसरी आवृत्ति निघाली, तिला मोडी टाइप वापरण्यांत आला आहे. तसेंच श्रीरामपूरला आणखी जे कांहीं मराठी ग्रंथ मुद्रित झाले, ते बहुतेक सर्व मोडीमध्यें आहेत. माझ्याकडे यांपैकीं **हितोपदेश** ( १८१५ ) हा अत्यंत दुर्मिळ ग्रंथ आहे, याची दुसरी प्रत ब्रिटिश म्युझियममध्यें आहे.

श्रीरामपूरला बायबलाच्या मराठी भाषांतराचें काम १८०४ सालीं सुरू होऊन नवा करार १८११ सालीं व जुना करार १८१५ सालीं पुरा झाला. १८१३ सालीं अमेरिकशन मिशन मुंबईमध्यें आलें व १८१७ या वर्षी मात्थीच्या शुभवर्तमानाचा व १८१८ सालीं प्रेषेतांचीं कृत्यें यांचाही तर्जुमा त्यांनीं छापिला असें ' ज्ञानोदयांत ' ( १५ जाने. १८५६ ) नमूद आहे; परंतु मुंबई मिशनरी संस्थांमध्यें किंवा अन्यत्र कोठेंही त्यांची प्रत मला अद्यापि पाहावयास मिळाली नाहीं.

सरकारमार्फत प्रसिद्ध झालेलें मुंबईतील मराठी **उपलब्ध** हिंदु **पुस्तक** म्हणजे ' विदुरनीति ' हें होय. हें कुरियर प्रेसमध्यें १८२३ सालीं मुद्रित झालें. या पुस्तकाकरितां सर चार्लस विल्किन्स यानें पाडलेला देवनागरी टाइप वापरण्यांत आलेला आहे; परंतु याच्याहीपूर्वीं सरकारमार्फत ' पंचोपाख्यान ' हें पुस्तक मुद्रित झालें असावें असें वाटूं लागतें. ता. २१-१०-१८२२ चें माधवराव अनंत रास्ते यांनीं मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन याला पाठविलेलें पत्र उपलब्ध आहे. हें पत्र म्हणजे एका मुद्रित मराठी पुस्तकाची पोंच होय. त्यांत माधवराव अनंत लिहितो, " जंजिरे मुंबईस हाली छापखान्यांत महाराष्ट्र भाषेंत पंचोपाख्यान बालबोध लिपींत यंत्रेंकरून बुकें वाचावयास तयार केलीं आहेत. हा चमत्कार आवलोकनांत यावा म्हणौन बुक पाठविलें आहे, स्वीकार होऊन मनन व्हावें

म्हणून लिहिलें तें कळलें व बुक पाठविलें तें पावलें. त्याचा स्वीकार करून बहुत खुषी हासल जाहाली. "

या पंचोपाख्यानाच्या प्रतीचा मला अद्याप थांग लागलेला नाहीं. ब्रिटिश म्युझियमच्या कॅटलागमध्यें जी पंचोपाख्यानाची प्रत आहे तिच्यावर १८२४ असा मुद्रणकाल नमूद आहे. वरील माधवराव अनंताचें पत्र एल्फिन्स्टनला पोंचल्याची तारीख "पौ. ता. १ माहे नवेंबर सन १८२२" अशी आहे. पेशवे दप्तरांत (भा. ४२, पत्र १२, पृ. ५२) छापतांना चूक झाली व १८२४ मध्येंच तें पुस्तक प्रथम प्रसिद्ध झालें म्हणावें तर ता. ४ ऑक्टोबर १८२३ च्या बॉंबे-क्यूरियर ' च्या अंकांत त्याची जाहिरात सांपडते ती अशी—

"वीकावया करितां बहुतेक बुकें माराष्ट्रग्रंथाचीं पंचोपाख्यान व विदुर-नीतीचीं आहेत याची कींमत रुपये ८ इंग्रज साहेबलोकांस व गावचे लोकांस रुपये ३ आणि वीदुरनीती साहेबलोकांस रुपये ६ व गावचे लोकांस रुपये २ प्रमाणें हरकोणास पाहिजे असल्यास कौरीयर हाफीसांत येऊन पांडुरंग दळवी हेडपरभु यांचजवळ मीळेल. तारीख ३ आक्टोबर सन १८२३."

कूरियर प्रेसमध्यें सर चार्लस विल्किन्सचे टाइप केव्हां आले हें कळण्यास मार्ग नाहीं. शनिवार ता.९ ऑगस्ट १८२३ च्या कूरियरमध्यें पहिल्यानेंच देवनागरी लिपींत जाहिरात आढळते, हेंही लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जवळ-जवळ एक वर्ष आधीं टाइप येऊन ते जाहिरातीकरितां कां वापरण्यांत आले नाहींत, हेंही कोडेंच आहे !

**महत्त्वाचें वर्ष**

चालू वर्ष हें ग्रंथसंग्रहालयचळवळीच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. गेल्या सालींच डेव्हिड ससून लायब्ररीचा शतसांवत्सरिक समारंभ मुंबईत साजरा झाला. यंदा गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटी व पुण्याचें नगरवाचनालय यांचा शत-सांवत्सरिक वार्षिकोत्सव आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या यंदाच्या सुवर्ण-महोत्सवाची तयारीही जोरांत चालू असलेली दिसते. म्हणूनच हा विषय यंदा मीं माझ्या लेखाकरितां निवडला. गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटी म्हटली म्हणजे तिच्यामध्यें एकूण एक मुद्रित गुजराती ग्रंथ असावा. पुणें नगरवाचनालय किंवा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांच्या बाबतींतही मराठी ग्रंथांविषयीं हीच अपेक्षा आहे; परंतु या सर्व ग्रंथसंग्रहालयांतील जर ग्रंथसंग्रह पाहिला, तर त्यांच्या चालकांची अशी दृष्टि किंवा योजना होती, असें दिसत नाहीं. मागें काय झालें तें झालें; यापुढें ही अपूर्णता काढून टाकण्याचा भगीरथ प्रयत्न सध्यांच्या चालकांनीं करणें अवश्य आहे. मराठी ग्रंथसंग्राहलयानें मराठीमध्यें प्रसिद्ध झालेलें प्रत्येक

लहान-मोठें व बरेंवाईट पुस्तक व प्रत्येक पुस्तकाची दरएक आवृत्ति संगृहीत करण्याचें ध्येय ठेवलें पाहिजे. प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं असें एक संग्रहालय असावें. खेड्यापाड्यांतील वाचनालयांत असें ध्येय पुढें ठेवतां येणें शक्य नाहीं, हें मी जाणतों.

मुंबई सरकारनें प्रांतभर खेडोपाडीं ग्रंथालयाचें जाळें पसरविण्याची चळवळ चालू केली आहे. या चळवळीचे जनक पंतप्रधान श्रीयुत बाळासाहेब खेर यांचा उत्साह व अपेक्षा किती दांडग्या आहेत हें त्यांच्या सार्वजनिक प्रसंगीं काढलेल्या व खाजगी बैठकींतील उद्गारांवरून कळून येतें; परंतु लोकांनीं तितक्याच कळकळीनें व प्रामाणिकपणें सरकारशीं सहकार्य केल्याशिवाय ही चळवळ यशस्वी होणें शक्य नाहीं.

सर्वसाधारण वाचकांची चालू गरज भागविणारीं वाचनालयें पैशांच्या जोरावर हवीं तितकीं निर्माण करतां येतील; परंतु ज्या ठिकाणीं आपणास मागेल तें मराठी पुस्तक मिळूं शकेल असें ग्रंथसंग्रहालय उभारणें हें तितकें सोपें काम नाहीं. या कार्याला केवळ पैशाचें पाठबळ अपुरें पडतें. डोळ्यांत तेल घालून जुने दुर्मिळ ग्रंथ जमविण्याची संग्राहक वृत्ति असलेलीं त्याला माणसें लागतात. ग्रंथप्रेमी माणसांपेक्षां ग्रंथवेड्या लोकांचा अशा ग्रंथालयांना जास्त उपयोग होतो. या लोकांनीं मिळविलेलीं पुस्तकें कधीं ना कधीं एकाद्या ग्रंथसंग्रहालयाला मिळूं शकतात. ग्रंथसंग्रहालयाच्या चालकांनीं जागरूक मात्र राहिलें पाहिजे.

पश्चिमेकडील ग्रंथालयांना तेथील लोकांचें ग्रंथवेड किती उपकारक ठरलें आहे हें तिकडील ग्रंथालयांचा इतिहास पाहिला म्हणजे कळून येतें. आपल्याकडे असें ग्रंथवेड नाहीं; परंतु त्यानें आपल्या समाजांत एकदां मूळ धरल्यावर तें चालू ग्रंथालयांना युरोप-अमेरिकेंतील ग्रंथवेडाप्रमाणें तारक होण्याऐवजीं मारक होण्याचाच पुष्कळ संभव आहे ! सांदीकोपऱ्यांतून दुर्मिळ पुस्तकें मिळवून तीं हजारों रुपये खर्चून मिळविणारे आपल्याकडे ग्रंथवेडे किती निर्माण होतील कळत नाहीं. उलट चालू ग्रंथालयांतील पुस्तकें निरनिराळ्या युक्त्यानीं लांबवून स्वतःच्या खासगी संग्रहांत भर घालणारे ‘ शहाणे ’ लोक निर्माण होण्याचा फार धोका आहे, असें चालू अनुभवावरून वाटूं लागतें, आपल्या इकडील ग्रंथालयांचा कारभार या बाबतींत फारच भोंगळ असतो, हें मला दुःखानें सांगितलें पाहिजे. सगळेंच पुस्तक लांबवणें जेथें शक्य नाहीं, तेथें त्याचीं जरूर असलेलीं पानें रेझरब्लेडनें कापून, काढलेलीं मीं अनेक ग्रंथालयांमध्यें पाहिलेलीं आहेत.

ब्रिटिश म्युझियममध्यें या बाबतींत फार दक्षता घेतली जाते. ट्रस्टीची किंवा स्टँडिंग कामिटीची आधीं परवानगी घेतल्याशिवाय म्युझियममध्यें कोणाला

वाचक म्हणून प्रवेश मिळत नाहीं. वाचकांना स्वतंत्र खोली असते व त्यांच्या तैनातीला एक योग्य अधिकारी जागृत तिष्ठत असतो. तो कां तो पाहा:—

" that a proper officer do constantly attend in the said room, so long as any such person, or persons, shall be there: and for the greater care and convenience of the said persons as well as security of the collection, it is expected.

आपल्या इकडील ग्रंथसंग्रहालयांच्या चालकांनीं वाचकांच्या तात्पुरत्या सोयीपेक्षांही ग्रंथांच्या सुरक्षितेबद्दल जास्त जपणें अवश्य आहे. पुस्तक हें वाचना-करितांच असतें हें खरें; परंतु तें जर सुरक्षित राहिलें, तरच तें वाचवयाला मिळेल ना ? आपणास आजच्याच वाचकांची सोय पाहून उपयोग नाहीं, तर हजार-बाराशें वर्षांनंतरच्या भावी वाचकांनाही आजचीं पुस्तकें वाचावयास शिल्लक कशीं राहातील हेंही पाहिलें पाहिजे.

विविधवृत्त — दिवाळी अंक १९४८

० ० ०

## ५

# बापांवर बेट्यांचा बहिष्कार

वडिलगांवचे जहागीरदार माणकोबा हिरोजी नवासरे यांना ना ना म्हणतां म्हातारपणीं एक मुलगा झाला. अनेक नवसांनीं पुत्ररत्न प्रसवली म्हणून जहागीरदारबाईनीं मुलाला मोठ्या कौतुकानें 'नवसु' असें नांव ठेविलें. नवासऱ्यांनीं एका नामांकित ज्योतिष्याकडे मुलाची जन्मवेळ देऊन त्याचें टिपण करविलें. ज्योतिषीबुवा म्हणाले, "जहागीरदारसाहेब, हा मुलगा पुढेंमागें तुमचें खचित नांव काढील!" हें भविष्य ऐकून नवासऱ्यांना फार आनंद झाला. ज्योतिषीबुवाच्या हातावर त्यांनीं पन्नास रुपये ठेविले.

दिवस गेले. महिने गेले. वर्षें गेलीं. नवसु लहानाचा मोठा होऊं लागला. श्रीमंतांचा एकुलता एक मुलगा असल्यामुळें त्याचे लाड होऊं लागले. अपेक्षाच्या ठेंचा मधूनमधून खात खात, शाळा व हायस्कूल यांमधला शिक्षणक्रम संपवून तो कॉलेजांत गेला. मुलासंबंधीं त्याच्या आईबापांच्या ज्या अपेक्षा होत्या, किंवा ज्योतिषीबुवांसारख्यांच्या भविष्यकथनानें निर्माण केल्या होत्या, त्या फोल ठरल्या. अलीकडे तो नवकवि बनला होता. कधींमधीं लघुकथा व कविताही लिहीत असे. त्याच्या कवितांचा व इतर लेखनाचा अर्थ जरी त्यांच्या वडिलांना कळत नसे, तरीपण आपल्या बाळ्याचें नांव छापून आलेलें पाहून त्यांना संतोष होई. पण हा संतोष निर्भेळ नव्हता. 'नवसु नवासरे,' असें तो आपलें नांव प्रसिद्ध करी. आपल्या वडिलांचें (नवसु माणकोबा नवासरे असें बापासह) नांव तो कधींही चुकूनमाकूनदेखील देत नसे. जहागिरदारांना याचें फार दुःख होई. "हा मुलगा तुमचें नांव पुढेंमागें खचित काढील," या भविष्याची त्यांना नेहमीं आठवण होई. एके दिवशीं जुने ज्योतिषीबुवा भेटले असतां आपली मनोव्यथा त्यांनीं त्यांच्यापुढें मांडली व हा मुलगा बापाचें नांव काढील, हें त्यांचें भविष्य खोटें ठरत असल्याबद्दल संताप व्यक्त केला. ज्योतिषीबुवा उत्तरले,

"जहागीरदारसाहेब, माझं भविष्य शंभर टक्के खरं उतरलं आहे! तुम्हींच आपला गैरसमज करून घेतला, यांत माझा दोष नाहीं. आपल्या स्वाक्षरींत आपला चिरंजीव तुमचं नांव योजित नाहीं, हीच तर तुमची तक्रार आहे! मी तर हेंच– तुमचं तो नांव काढील असं–सांगितलं होतं!"

माणकोबांच्या चिरंजीवांप्रमाणें आपल्या बापाचें "नांव काढणाऱ्या" चिरंजीवांची संख्या अलीकडे वाढत चालली आहे. कांहीं काळानें महाराष्ट्रांत बाप नांवाला ( अर्थात् मुलांच्या नांवांत ) शिल्लक राहणार नाहीं, अशीं चिन्हें स्पष्ट दिसत आहेत. या गंभीर परिस्थितीचा विचार करून या अनिष्ट प्रकाराला आळा घालण्याकरितां अखिल महाराष्ट्रांतील पित्यांची परिषद गेल्या १५ सप्टेंबर १९६१ रोजीं मुंबई येथील बिर्ला पितुश्रीसभागारांत भरली होती. तिचा वृत्तांत पुढील प्रमाणें आहे :

आरंभीं ईशस्तवन, स्वागतगीत वगैरे सभेचे औपचारिक प्राथमिक विधि उरकल्यावर परिषदेचे नियोजित अध्यक्ष श्रीमंत माणकोबा हिरोजी नवासरे स्थानापन्न होऊन म्हणाले,

" महाराष्ट्रांतील पिते हो, आज आमच्यावर आलेल्या एका गंभीर आपत्तीचा विचार करण्याकरितां आम्हीं येथें जमलों आहोंत. सोवळें, पुणेरी जोडा, पगडी, मिशी, गोव्यांतील वैष्णव ब्राह्मणांची तांबडी टोपी अशा गोष्टींचें समाजांतून जसें उच्चाटन झालें आहे, तीच स्थिति हळुहळू बापांचीदेखील ( मुलांच्या नांवांतून ) होणार आहे ! पन्नास वर्षांमागें खाणावळींत सोवळें न नेसतां जेवावयास बसणारे दोनचारच गृहस्थ असत. त्यांची निराळी पंगत मांडण्यांत येत असे. पुढें त्यांची संख्या एवढी वाढली कीं, त्यांची पंगत मुख्य होऊन सोवळें नेसणाऱ्या लोकांची निराळी पंगत मांडण्यांत येऊं लागली. आज खानावळींतच काय, पण धर्ममार्तंडाच्या घरांतूनही सोवळ्याचें अजीबात उच्चाटन झालें आहे. लोकमान्य टिळकांच्या वेळीं तांबड्या पुणेरी जोड्याचें केवढें प्रस्थ होतें ! पण आज इतरत्र सोडाच; परंतु खुद्द पुण्यांतही पुणेरी जोडा दिसेनासा झाला आहे ! क्वचित एकाद्या महत्त्वाच्या सभेच्या वेळीं आपल्या ठेवणींतला जोडा बाहेर काढून महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार तो वापरून डुलत डुलत चालतांना दिसतात. पगडीचीही हीच अवस्था ! श्मश्रुविरहित मुखकमल पन्नाससाठ वर्षांमागें अभद्र मानलें जाई; पण आज मिशी म्हणजे काय याचें प्रात्यक्षिक दाखवावयाचें झाल्यास शिवाजीचें चित्रच पुढें करावें लागेल ! गोमंतकांतील लोकांना आपल्या वैष्णव ब्राह्मणांची एके काळची लोकप्रिय तांबडी टोपी पाहावयाची झाल्यास मुंबईच्या राणीच्या बागेंतील म्युझियममध्येंच केवळ दिसेल !

" अलीकडे गेल्या पंधरावीस वर्षांत मुलांच्या नांवांतून बापाला अर्धचंद्र देण्याची प्रवृत्ति बळावत चालली आहे. शंभर सवाशें वर्षांमागें व्यक्तिनाम व वडिलांचें नांव एवढ्यांत नांवाचें भागे. उदाहरणार्थ हरि केशवजी, बाळ गंगाधरशास्त्री, दादोबा पांडुरंग, बाबा पदमनजी, धाकजी दादाजी, गोविंद नारायण, भाऊ दाजी, विश्वनाथ नारायण अशीं कितीतरी नांवें सांगतां येतील. मुंबईत

युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यावर आडनांव नांवाला जोडण्याची प्रथा विशेष सुरू झाली. रा. ब. दादोबा पांडुरंग हे १८६४ पासून सीनेटचे व १८८२ पर्यंत आर्ट्स व कायदा या फॅकल्टीचे सभासद होते. युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरमध्यें त्यांचें नांव ज्यावेळीं छापलें जाई, त्यावेळीं तळटिपेंत " Surname not known " असें कित्येक वर्षें लिहिलेलें आढळे !

" व्यक्तीच्या नांवांत त्याच्या वडिलांच्या नांवाला फार मोठें महत्त्व आहे. गांवांत राम नांवाचे अनेक असतात. त्यापैकीं अमुक एक राम म्हणून ओळखण्याकरितां अमक्याचा भाऊ, अमुक आईचा किंवा बापाचा मुलगा अशी कांहींतरी विशेष खुण सांगांवी लागते. बापच विशेष प्रसिद्ध असल्यामुळें स्वाभाविकच व्यक्तिनामाला पितृनाम जोडण्यांत येऊं लागलें. ही केवळ आमच्याचकडे पद्धति होती, असें नव्हे. मुसलमानी अमदानींत हरभट बिन कृष्णभट किंवा तुकाराम वल्लद एकनाथ अशीं पितृनामें नमूद करण्याची रीत असे. अशीं कांहीं पितृनामें पुढें आडनांवेंच बनलीं. उदाहरणार्थ शंकरशेट, कमलाकर, वासुदेव, मदन. कांहीं वेळां बापाच्या नांवाला आडनांव मानण्याचीही चूक होते. शंकर गणेश दाते आपल्या मराठी वाङ्मयसूचींत बाबा पदमनजी यांतील पदमनजी हें नांव आडनांव मानतात. वास्तविक तें बाबांच्या वडिलांचें नांव. त्यांचें खरें आडनांव मुळे. पुढें बाबांचीं मुलें, नातवंडें पदमनजी या नांवाचा आडनांवाप्रमाणें उपयोग करूं लागलीं. अशा पैतृक आडनांवांला इंग्रजी भाषेमध्यें Patronymic Surnames असें म्हणतात. सुप्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकार Samuel Johnson याचें Johnson हें पैतृक उपनाम आहे. Johnson म्हणजे Son of John—जॉनचा मुलगा. अशींच Richardson. Hudson. Thompson, Wilson वगैरे नांवें सांगतां येतील. मुंबईची सुप्रसिद्ध Powell & Co. हें नांव आपल्याला माहीत असेल. Powell म्हणजे Ap-Howell याचें संक्षिप्त रूप. Ap म्हणजे वेल्श भाषेंत मुलगा. Powell म्हणजे Howell चा मुलगा. असें सध्यां पुन: पुन: कानावर येणारें नांव Bowen ( Ap-Owen ). किंवा आणखी सांगावयाचें म्हणजे Pritchard ( Ap—Richard ). Fitz-Gerald हेंही असेंच पैतृक उपनांव आहे. Fitz म्हणजे मुलगा. Fitz-Gerald म्हणजे Gerald चा मुलगा. Monior Williams ह्या प्रसिद्ध संस्कृत कोशकाराचें नांव आपण ऐकिलेंच असेल. Williams हें Williamson चें संक्षिप्त रूप होय. सॅक्सन लोक Son च्या ऐवजीं केवळ षष्ठीचा प्रत्यय s जोडतात. वासुदेव या बापाच्या नांवानें श्रीकृष्ण प्रसिद्ध आहे. श्रीरामालाही आपण दाशरथी राम म्हणून ओळखतों. पांडव या नांवानें धर्मार्जुन ज्ञात आहेत. यावरून मुलाच्या नांवाशीं बापाचें नांव किती निगडीत आहे हें कळून येईल;

परंतु अलीकडील मुलांनीं बापाच्या नांवाला गचांडी दिली आहे, ही खेदाची गोष्ट होय ! ( शेम शेम, धिक्कार धिक्कार, अशा श्रोतृसमुदायांतून आरोळ्या उठतात ). या अनिष्ट प्रकाराचा उगम काय याचा शोध करून त्यावर इलाज करण्याकरितां आपणांस या ठिकाणीं पाचारण करण्यांत आलें आहे. ”

वरील आशयाचें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्रीकृष्ण वसुदेव यादव नांवाचे एक वक्ते बोलण्यास उभे राहिले. ते म्हणाले, “ अध्यक्षांनीं आपल्या विद्वत्ताप्रचुर भाषणांत आजच्या गंभीर परिस्थितीची आम्हांस उत्तम प्रकारें जाणीव करून दिली आहे. आजचे साहित्यिक चिरंजीव बापांच्या नांवांवर बहिष्कार घालतात, याचें कारण त्यांची अनुप्रासाची आवड दिसते. अनुप्रासयुक्त स्वतःचें नांव व आडनांव यामध्यें बापाच्या नांवांची त्यांना अडगळ वाटते ! आजच्या अध्यक्षांचें नांव माणकोबाऐवजीं ‘ नवरस ’ असें असतें तर त्यांच्या चिरंजीवांनीं त्याचा त्याग केला नसता. ‘ नवसु नवरस नवासरे ’ असें तें लिहिलें असतें ! अनुप्रासाचा हव्यास एवढा दांडगा असतो कीं, आपल्या बापाचें नांवच तें काय, पण स्वतःचें वैयक्तिक नांवदेखील माणूस टाकतो. याचें प्रत्यक्ष उदाहरण प्रल्हाद केशव अत्र्यांचें. संपादक व प्रकाशक म्हणून कायद्याकरितां ते सबंध नांव देतील; परंतु इतर ठिकाणीं केवळ आचार्य अत्रे असें अनुप्रासयुक्त नांव योजतील. हा त्यांच्या गुरूंचा वारसा आहे ! अनुप्रासाची राम गणेश गडकऱ्यांची आवड त्यांच्या साहित्यांत ठिकठिकाणीं दिसून येते. त्यांनीं आपल्या बापाचें नांव ‘ काढलें ’ नाहीं याचें कारण त्यांचें व्यक्तिनाम व उपनाम याच्यामध्यें अनुप्रास साधत नव्हता. याच्या उलट त्यांच्या वडिलांचें नांव व उपनाम याच्यामध्यें तो साधे. राम गणेश गडकरी या ऐवजीं गणेश राम गडकरी असें जर त्यांचें नांव असतें तर त्यांच्या नांवांत ‘ राम ’ राहिला नसता ! केवळ ‘ गणेश गडकरी ’ असेंच त्यांनीं नांव वापरलें असतें. आजचीं बरींचशीं साहित्यिकांचीं नांवें अशीं अनुप्रास-युक्त आढळतील. उदाहरणार्थ गंगाधर गाडगीळ, प्रभाकर पाध्ये, अनंत अंतरकर, ( श्रोत्यांतून एक आवाज “ अनंत काणेकर, मंगेश पाडगांवकर, या नांवांत अनुप्रास नाहीं ! ” ). थांबा, त्याचाही पण खुलासा करतों. गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः हें वचन प्रसिद्धच आहे. हे लोक केवळ अनुकरणानें अशा गोष्टी करतात. याबद्दल एक गोष्ट सांगतों : बऱ्याच वर्षांमागें आमच्या गांवीं एक मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते, त्यांचा झगा पाठीवर मध्येंच एके रात्रीं उंदिरांनीं कुरतडला. त्या जागीं मधोमध पाठीवर त्यांनीं पिंपळाच्या पानाच्या आकाराचें ठिगळ लावून घेतलें व तो अंगरखा ते वापरूं लागले. झालें, त्या दिवसापासून गांवचे सारे लोक नवा अंगरखा शिवून घेतांना पाठीवर पिंपळपान लावूं लागले ! ती एक फॅशनच बनली ! ”

राम दशरथ रघुवंशी म्हणाले, "श्रीयुत यादव यांनीं जें आपल्या दुर्दशेचें निदान केलें तें प्रत्ययोपादक आहे; परंतु या प्रकाराच्या मूळाशीं आजची महागाईही असावी. साहित्यिक लोक फौंटन पेनें वापरतात. अलीकडे किंकच्या शाईची किंमत वाढली आहे. कागदही महाग झाला आहे. बापाचें नांव कमी केलें म्हणजे शाई व कागद यांची बचत होतेच, शिवाय तेवढे जुळाऱ्याचेही श्रम कमी होतात!" (श्रोत्यांमध्यें "न. चिं. केळकर, एस्. एम्. जोशी अशीं नांवें लिहावीं म्हणजे बापाला बगल न देतां काटकसर होईल!" वक्ते बसतात).

गणेश शंकर कैलास उठून बोलूं लागले, "अध्यक्ष महाराज, माझ्या पूर्वींच्या वक्त्यांनीं जें आपल्या रोगाचें निदान केलें, त्यापेक्षां मी तें वेगळें करणार आहें. मला वाटतें कीं आपण आहे त्यापेक्षां लहान भासविण्याची मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति याच्या मूळाशीं असावी. आपलें वय चोरण्याची इच्छा केवळ बायकांमध्येंच असते असें नाहीं; ती तरुणांमध्येंही असते. मिशा काढून पुरुष क्लीन कट कां करतो? मिशा जड होतात म्हणून? नाहीं, तर आपण आहों त्यापेक्षां वयानें कमी दिसावा म्हणून! मिशा नसल्या, नकली दांत लावले आणि केंसांना कलप चोळला म्हणजे साठ वर्षांचा पुरुष सहज चाळीस वर्षांचा म्हणून खपून जातो! बापाचें नांव 'काढण्यांत' आपलें वय कमी भासावें हाच हेतु असावा. राम दामोदर जोशी, असें नांव वाचलें किंवा ऐकिलें म्हणजे तो प्रौढ वाटतो; परंतु राम जोशी असें नांव पाहिलें म्हणजे तो अल्पवयस्क पोरटेला असावा, असा ग्रह होतो. बाई हें उपपद गाळल्यावर स्त्रियाही कमी वयाच्या वाटतात. म्हणूनच शांताबाई जोशी लिहिण्याऐवजीं शांता जोशी असें नांव लिहिणें त्या पसंत करतात.

डॉ. अभिमन्यु अर्जुन पांडव यांनीं आणखी एक कल्पना पुढें आणिली. ते म्हणाले, "आजचे तरुण आपल्या नांवांतील वडिलांचें नांव गाळतात, याच्या मूळाशीं बायकांचें अनुकरण असावें. 'जन खुळावले। सकल उलट चालले.' तरुणी केंसाला कातरी लावून पुरुषाप्रमाणें पँट व कोट वापरतात; याच्याविरुद्ध तरुणांचा आजचा सचित्र रंगीत बुशकोट म्हणजे बायकांचा पोलकाच! बायकांचीं साधारणपणें सौ. काशीबाई कानिटकर, सौ. लक्ष्मीबाई टिळक, सौ. मालतीबाई बेडेकर अशीं एकेरी नांवें वापरतात. (वास्तविक पुरुष जसें बापाचें नांव लावतात तसें बायकांनीं नवऱ्याचें नांव लावावें अशी अपेक्षा असते.) त्याचें हें अनुकरण दिसतें!" आणखी एक वक्ता मध्येंच उठून म्हणाला, "जुन्या काळीं नाटक व सिनेमा यांच्याशीं सबंध असलेल्या कांहीं नटांना विशिष्ट परिस्थितींत आपल्या जन्मदात्याचें नांव ठाऊक असणें शक्य नव्हतें. ते केवळ स्वतःचें एकेरी नांव वापरूं लागले. त्याचेंच अनुकरण इतरांनीं पुढें केलें असा माझा तर्क आहे."

अध्यक्ष म्हणाले, " या विषयावर आतांपर्यंत झाली तेवढी चर्चा पुरे झाली. बापाचें नांव 'काढण्या'च्या मूळाशीं असलेलीं जीं कारणें आतांपर्यंत पुढें आलीं तीं सर्वच जरी सर्वांशीं खरीं नसलीं, तरी प्रत्येकांत कांहींतरी तथ्यांश असावा. या चर्चेपासून आम्हां बापांनीं पुष्कळ बोध घेतां येण्यासारखा आहे. आमच्या वडिलांनीं आम्हांस दिलेलें नांव आतां बदलणें शक्य नाहीं; पण यापुढें आमच्या मुलांना नांवें देतांना आपणांस विशेष काळजी घ्यावी लागेल. याविषयीं सहज आठवलेली गोष्ट सांगतों. शंकरराव साठे नांवाच्या एका मित्राला तीन मुलींच्या मागून एक मुलगा झाला. स्वारी माझ्याकडे येऊन, मुलाला नांव काय ठेवावें म्हणून विचारूं लागली. त्याचा आनंद पाहून मला जास्त विचार करावा लागला नाहीं. म्हटलें, " ठेवा नांव आनंद ! "

" मग तो गाढव बनेल ! " साठे एकदम खिन्नतेनें उद्गारले ! त्यांच्या बोलण्याचा मला अर्थ कळला नाहीं. " तो कसा ? " मी विचारलें.

" अहो, आनंद शंकर साठे या नांवाचीं इंग्रजी आद्याक्षरें लिहिलीं ( A. S. S. ) म्हणजे तो गाढव नाहीं का बनणार ? " शंकररावांच्या या दूरदृष्टीचें मला मोठें कौतुक वाटलें. आपल्या मुलाच्या नांवाची पुढेंमागें चेष्टा होईल, ही अडचण त्यांनीं जाणली. अशा परिस्थितींत एकाद्या, चिरंजीवानें बापाचें नांव ' काढलें ' तर त्याला दोष देतां येणार नाहीं ! ' लोकसत्ते'च्या सन्मान्य संपादकांच्या नांवावर कांहीं कुटाळ लोक कोटी नाहीं का करीत ? त्यांच्या टीकेला भीक न घालतां त्यांनीं आपलें नांव कायम ठेविलें आहे, याबद्दल या परिषदेच्या वतीनें मी त्यांना धन्यवाद देतों. राजेश्री के. नारायण काळे यांनीं आपल्या स्वतःच्या ' केशव ' या नांवाचा संक्षेप करून आपला बाप जो नारायण त्याला महत्त्व दिलें ही केवढी पण कौतुकाची गोष्ट आहे !

" आजच्या तरुणांना नांवांत बाप जड झाला आहे, म्हणून तें हलकें करण्या-करितां त्याचें नांव गाळतात; पण जुन्या काळीं केवळ बापच तो काय, पण आजा व पणजा यांचाही भार त्या काळचें तरुण सहन करीत ! दादोबा पांडुरंग यांच्या लघुव्याकरणाच्या १९१९ सालच्या ( आवृत्ति २४ ) प्रतीवर प्रकाशकांचें नांव " वामनराव बाबाजी दादोबा पांडुरंग तर्खडकर " असें छापलेलें आढळतें ! असो. तरी आतां या अनिष्ट प्रकाराला आळा कसा घालावा, यासंबंधीं सूचना सभासदांनीं पुढें मांडाव्या. "

संभाजी शिवाजी भोसले यांनीं अशी सूचना पुढें आणिली कीं, जे तरुण आपल्या बापाचें नांव ' काढतात ' त्यांचा वारसाहक्क नष्ट व्हावा व बापाची इस्टेट त्याला मिळूं नये. यावर माधव नारायण पेशवे म्हणाले, " असें केल्यानें बापच अडचणींत येतील ! कारण कुळकायद्यामुळें आज वडिलोपार्जित इस्टेटींत

अर्थ राहिलेला नाहीं. शिवाय तीही फारच थोड्यांच्या बाबतींत असते. फॅमिली प्लॅनिंग नसल्यामुळें आजच्या वडिलांनीं मुलांना मागें ठेविलेली इस्टेट म्हणजे त्यांच्या बहिणींचे विवाह व भावंडांचें शिक्षण, यांची जबाबदारी ! यापेक्षां बापाचें नांव असल्याखेरीज लेख किंवा कविता छापावयाचीच नाहीं, असा सक्त नियम झाला पाहिजे; परंतु स्वतः कांहीं संपादकांनींच बापाचें नांव 'काढलेलें' असल्या-मुळें असा नियम अस्तित्वांत येणें अशक्य झालें आहे. याकरितां तसा कायदाच मुळीं झाला पाहिजे. कायद्याशिवाय कोणतीही सुधारणा कशी होणें शक्य नाहीं, हें सति, बालविवाह, दारूबंदी वगैरे कायद्यांच्या इतिहासावरून कळून येईल. आपला बाप कोण हें ज्यांना ठाऊक नाहीं, असे कांहीं लोक असतात. असे लोक वगळून बाप कोण हें ठाऊक असलेल्या एकाद्या चिरंजीवाची पितृनामविरहित नांवाखालीं जर कविता, लघुकथा, निबंध किंवा अन्य कोणतेंही लिखाण प्रसिद्ध झालें तर लेखकावर, संपादकावर, प्रकाशकावर, व मुद्रकावर खटला भरण्यांत यावा व त्या लिखाणांत जेवढे शब्द असतील तेवढ्या नव्या पैशांचा प्रत्येकाला दंड ठोठावण्यांत यावा ! गुन्हा दुसऱ्यांदा केल्यास नव्या पैशांऐवजीं तेवढे रुपये दंड करावा. टोपणनांव या कायद्याखालीं अर्थातच येणार नाहीं. या कायद्याला जे उचलून धरतील अशाच उमेदवारांना येत्या निवडणूकींत महाराष्ट्रीय बापांनीं आपलीं मतें द्यावीं. असा कायदा घडवून आणण्याकरितां एक दहा सभासदांची समिति नेमण्यांत यावी व या दहा जणांचें आपल्या लोकहितेच्छु मुख्यमंत्र्यांकडे शिष्टमंडळ पाठवावें, अशी माझी सूचना आहे. पानशेतचें धरण फुटून पुण्याचीं घरें वाहून गेल्यावेळीं ते संकटाला धांवले, तर चिरंजीवांच्या मूर्खपणाच्या महा-पुरांत महाराष्ट्रांतील सारे बाप ( अर्थात् त्यांचीं नांवें ) बुडून जात असतांना ते स्वस्थ बसून पाहातील काय ? "

या सूचनेला दुजोरा देतांना बाळ गंगाधर जांभेकर म्हणाले, " मुख्य मंत्र्यांकडे या पितृपरिषदेचें शिष्टमंडळ पाठवावें, या परिषदेपुढें आलेल्या सूचनेला मी आनंदानें पाठिंबा देतों. मुख्यमंत्र्यांनीं काटकसरीकरितां म्हणून तरी असा कायदा लवकर पास करून घेतला पाहिजे. महाराष्ट्रांतील संशोधनसंस्था सरकारच्या मदतीवर चाललेल्या असतात. आज शिवाजीचा जन्मकाल कोणता यासंबंधीं संशोधक डोकेफोड करीत आहेत ! आगरकरांसारख्यांचा जन्मकाल निश्चित नाहीं ! बापाच्या नांवाखेरीज आपलें लिखाण प्रसिद्ध करण्याची प्रथा अशीच चालू राहिल्यास यांचा बाप कोणता, हा भावी संशोधकांना प्रश्न पडेल ! आज जसा शिवाजीच्या जन्माच्या बाबतींत फाल्गुन कीं वैशाख असा वाद चालू आहे, तसा भावी मराठी भाषेच्या शिवाजींच्या बापाच्या बाबतींत तो गोविंद गोपाळ किंवा तिसराच कोण असे वाद निर्माण होतील। ज्ञानदेवानें जर ज्ञाने-

श्वरींत व अभंगांत आपल्या बापाचा स्पष्ट निर्देश केला असता, तर ज्ञानेश्वर एक कीं दोन असा संभ्रम भारद्वाजांना उत्पन्न झालाच नसता ! वामन नांवाच्या कवींनीं जर आपआपल्या बापांचे उल्लेख केले असते, तर वामनपंडित एक कीं पांच असें बाळकृष्ण अनंत भिडयांना कोडें पडलें नसतें. फार कशाला ? सुप्रसिद्ध दमयंती-स्वयंवराचा कर्ता रघुनाथपंडित यानें जर आपला बाप कोण हें नमूद करण्याकरितां थोडी आणखी शाई खर्चिली असती, तर हा कवि कोण हें ठरविण्यास प्रियोळकरांना एवढे कष्ट पडलेच नसते व त्यांच्यासंबंधीं कांहींतरी निश्चित त्यांना सांगतां आलें असतें. मुक्तेश्वरानें ' तो मुद्गल चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत । ', ' चिंतामणिसुत मुद्गलीं तें सुख ठेलें । ', ' मुद्गल चिंतामणि अनुसरे जाणा । ', असे ठिकठिकाणीं आपल्या जनकाचे नामोल्लेख केल्यामुळें त्याच्या व्यक्तीसंबंधीं निश्चित त्यांना सांगतां आलें. मूळ मुद्यावर येऊन बोलावयाचें म्हणजे आजच्या साहित्यिकांचे बाप कोण याचें संशोधन करण्याकरितां सरकारास अनेक संशोधनमंडळें स्थापन करावीं लागतील, आणि सगळा पैसा अशा संशोधनांत खर्च झाल्यामुळें नाट्योत्सव, तमाशे वगैरे महत्त्वाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांकरितां सरकारजवळ पैसा शिल्लक राहणार नाहीं ! या भावी अडचणी लक्षांत घेऊन मुख्य मंत्री असा कायदा पास करून घेतील, याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. ”

हा ठराव टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत एकमतानें पास झाला आणि ' संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ' या चालीवर ' बापाचा कायदा झालाच पाहिजे', अशा गर्जनांनीं सारें आकाश निनादून गेलें !

शेवटीं अध्यक्षांसहित दहाजणांचें एक शिष्टमंडळ नेमण्यांत आल्यावर आभारप्रदर्शन, हारतुरे वगैरे औपचारिक गोष्टी होऊन परिषदेचें काम संपले.

* * *

शिष्टमंडळाचा उत्साह दांडगा होता. मुख्यमंत्र्यांना भेटण्याचा दिवस व वेळ त्यांच्याकडून निश्चित समजून घेतल्यावर नव्या सचिवालयामध्यें ही मंडळी त्यांना भेटण्यास गेली. मुख्यमंत्री कांहींतरी महत्त्वाच्या कामांत निमग्न असल्यामुळें त्यांची गांठ पडण्यास तास अर्ध्या तासाचा अद्याप अवधि होता. म्हणून शिष्टमंडळाचे सभासद मंत्र्यांच्या व अधिकाऱ्यांच्या पाट्या वाचीत सचिवालयांत इकडे तिकडे येरझारा घालूं लागले. पाहतात तों काय, बहुतेक मंत्र्यांच्या व अधिकाऱ्यांच्या पाट्यांवर त्यांच्या बापांचीं नांवेंच नाहींत ! ' यशवंतराव चव्हाण ' असें एकेरी नांव लिफ्टमधून उतरल्याबरोबर वाचून तर त्यांचा धीरच खचला ! Doctor heal thyself असें म्हणण्याचा प्रसंग ! अशा स्थितींत मुख्य मंत्र्यांना भेटून कांहीं उपयोग नाहीं; त्यांचा व आपला वेळ मात्र फुकट जाणार, याबद्दल

त्यांची खात्री झाली व आल्या पावलीं परत फिरण्याचें त्यांनीं ठरविलें. लगेच लिफ्टांतून ते खालीं उतरले. या प्रश्नाचा कांहींतरी सोक्षमोक्ष लावल्याखेरीज परत घरीं जावयाचें नाहीं असा त्यांचा पूर्ण निर्धार होता. भर्तृहरीनें म्हटलेंच आहे :

रत्नैर्महार्हैस्तुतुषुर्न देवा
न भेजिरे भीमविषेण भीतिम् ।
सुधां विना न प्रययुर्विरामं
न निश्चितार्थाद्विरमन्ति धीराः ॥

राज्यसरकारकडे दाद लागणार नाहीं, असें दिसल्यावर केंद्रसरकारकडे दिल्लीला धांव घेण्याचें त्यांनीं ठरविलें. बोरीबंदरवर जाण्याकरितां ते टॅक्सी शोधूं लागले; परंतु इतक्यांत मांजराच्या गळ्यांत घांट कशी बांधावी, अशी ज्याप्रमाणें एका उंदरानें शंका काढली होती त्याप्रमाणें एक सभासद म्हणाला, " दिल्लीला जाऊन तरी काय वळणार आहे ? स्वत: महामंत्री पंडित जवाहरलाल नेहरू एकेरी नांवच लावतात. ' जवाहर मोतीलाल नेहरू ' असें नांव त्यांनीं लिहिलेलें नाहीं. राष्ट्रपति राजेंद्र प्रसाद यांचाही तोच प्रकार. पंडित गोविंद वल्लभ पंत यांनीं बापाचें नांव ' काढलें ' नव्हतें; परंतु आमच्या सर्वांच्या दुर्दैवानें ते बिचारे वारले ! आतां आकाशांतील बापाशिवाय आपणाला कोणीच त्राता नाहीं ! "

शिष्टमंडळाचे अध्यक्ष श्री. नवासरे आवेशानें गर्जले, " Do or die ! बापांच्या या कार्याकरितां आकाशांतील बापाकडेदेखील जाण्याची आमची तयारी आहे; परंतु पृथ्वीवरील ( सचिवालयांतील ) बापाकडे सहाव्या मजल्यावर जाण्यास जसा जिना किंवा लिफ्ट येथें आहे, तसा आकाशांतील बापाकडे जाण्यास नाहीं ! "

" एवढीच अडचण असल्यास मी हा पहा तुम्हांला स्वर्गांत जाण्याचा लिफ्ट दाखवितों ! माझ्या मागून या, " सभासदांपैकीं एकजण म्हणाला.

त्याच्या मागून बाकीचे नऊही सभासद हळुहळू मुकाट्यानें जाऊं लागले. गेट वे ऑफ् इंडियाजवळ पोंचल्यावर शिवाजीच्या पुतळ्याला त्यानें सर्वांना नमस्कार करावयास लावला व किनाऱ्यावर गेल्यावर, पुढें अथांग पसरलेल्या महासागराकडे बोट दाखवून तो म्हणाला, " आकाशांतील बापाकडे जाण्याचा लिफ्ट तो हा ! यांत उतरा, म्हणजे मध्यें कोणताही मजला न लागतां एकदम टॉप फ्लोअरवर–स्वर्गांत जाऊन पोंचाल ! "

त्याचे ते शब्द ऐकिल्यावर आधीं अध्यक्षांनीं आणि त्याच्यामागून इतर नऊही सभासदांनीं समुद्रांत पटापट उड्या घेतल्या !

* * *

आकाशांतील बाप या पृथ्वीवरील बापांच्या शिष्टमंडळाचें गाऱ्हाणें ऐको आणि नवसु नवासरे व ज्या ज्या इतर चिरंजीवांनीं म्हणून आपआपल्या बापाचें नांव ' काढलें ' आहे, ते ते तें पुनः लावोत ! बाप झिंदाबाद.

रत्नदीप, दिवाळी अंक १९६१

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६९४९१ वि: टिळक
क्रमांक ९६९६ नों: दि: ६/३/६०

# ६

## चमत्कारांचा चमत्कार

सन १९२० च्या ऑगस्टमधील गोष्ट. लोकमान्य टिळक दिवंगत झाले होते. मी त्या वेळीं धारवाड येथें होतों. ही दुःखद बातमी ज्या दिवशीं धारवाडांत येवून धडकली त्याच दिवशीं—कीं त्यांच्या दुसऱ्या दिवशीं हें मला आज बरोबर आठवत नाहीं—एक विचित्र हूल गांवांत उठली. तिकडे एका तळ्याच्या कांठावर एक मारुतीचें देवालय होतें. त्या मारुतीच्या उटींतून म्हणे टिळक दिसत होते ! जो तो त्या देवळाकडे धांव घेऊं लागला, आणि 'हो', 'हो', ' हो ', ' हो ', करीत देवळाबाहेर पडूं लागला. ही बातमी ऐकून मीही तारुण्यसुलभ कुतूहलानें प्रेरित होऊन त्या देवळांतील गर्दींत घुसलों आणि मोठ्या प्रयासानें कसाबसा मूर्तीपर्यंत जाऊन पोंचलों; पण नवलाची – नव्हे दुःखाची—गोष्ट ही कीं, मारुतीच्या ' टिळकांत ' टिळक मला दिसतच ना ! सर्वांना टिळकांचें दर्शन घडतें; पण मलाच तें होत नाहीं, हा माझा कमीपणा इतरांना कळूं नये म्हणून मी माझा चेहरा शक्य तितका वरून आनंदी करून देवळाबाहेर पडलों. एकदोन माणसांनीं मला दरवाजावर अडवून, " खरंच काय हो टिळक दिसतात ? " असा प्रश्न केला. मीं त्यांचें बोलणें ऐकलेंच नाहीं, असा बहाणा करून तेथून निसटलों. आणखी कांहीं पावलें पुढें गेल्यावर एका बाईनें हाच प्रश्न मला कानडींत केला. ती मला काय विचारते हें मला कळलें; पण मीं तिला " कन्नड बरदुल्ला " ( मला कानडी कळत नाही ) असें सांगून वेळ मारून नेली.

आमच्या क्लबमध्यें रात्रीं जेवतांना मंडळी त्या मारुतीच्या उटींतील टिळकांचें मोठ्या उत्साहानें वर्णन करीत होती. जी मंडळी देवळांत गेली नव्हती ती आपणांस दुर्दैवी समजून मोठ्या भाविकतेनें या गप्पा ऐकत होती. मला तर देवळांत जाऊनही टिळक दिसले नव्हते ! माझी निराशा लोकांना कळूं नये म्हणून मीं या दुसऱ्या वर्गांतील मंडळीसारखी वृत्ति राखली. पूर्वरात्रीं ' टिळकां'च्या गप्पांत विशेष प्रामुख्यानें भाग घेणाऱ्या एका गृहस्थास दुसऱ्या दिवशीं एकीकडे गांठून मीं म्हटलें, " काय हो, तुम्हीं तर रात्रीं टिळकांना मारुतीच्या उटींत पाहिल्याच्या गप्पा करीत होता; पण मीं स्वतः तिकडे अगदीं जवळून मारुती पाहिला, तरी टिळकबिळक मला कांहीं दिसले नाहींत हें कसें ! "

" मला तरी कुठें काय दिसलें आहे ! लोक दिसतें म्हणतात; आपणच कां नाहीं म्हणा ! " असें म्हणून तो गृहस्थ मिस्किलपणें हसूं लागला.

हाच प्रश्न मीं आणखी दोघांना बाजूला नेऊन विचारला; आणि त्यांच्या-कडूनही मला असेंच उत्तर मिळालें ! त्या वेळीं मला लहानपणीं ऐकलेल्या एका गोष्टीची आठवण झाली. एका पाद्रीला चर्चमध्यें प्रवचन करावयाचें होतें; पण ऐन वेळीं आजारी पडल्याकारणानें त्याला तें करणें अशक्य झालें. त्या वेळीं आपल्या एका सहकारी पाद्रीवर ही कामगिरी त्यानें सोंपविली आणि ती त्यानें मोठ्या आनंदानें स्वीकारलीही. हा दुसरा पाद्री अगदीं सामान्य बुद्धीचा माणूस होता. पूर्वतयारी करण्यास एका तासाचीही सवड नसतां हें त्याचें प्रवचन कसें वठेल, ही पहिल्या पाद्रीला काळजीच होती; पण दुसऱ्या दिवशीं जो तो कालचें प्रवचन फारच उत्कृष्ट झाल्याचें पहिल्या पाद्रीजवळ येऊन सांगूं लागला. पहिल्या पाद्रीला दुसऱ्या पाद्रीची विद्वत्ता माहीत होती. ' अडला हरी 'सारखी स्थिति होऊनच ही कामगिरी केवळ वेळ निभावून नेण्याकरितां त्यानें या दुसऱ्या पाद्रीला सांगितली होती. तेव्हां या पाद्रीला बोलावून, " काल प्रवचनांत आपण अजब असें काय सांगितलें ? " असा पहिल्या पाद्रीने प्रश्न केला. त्याला या प्रवक्त्या-कडून उत्तर मिळालें तें असें—

" एकंदर भाविक श्रोतृगण जमल्यावर, ' जे कोण पुण्यवान व खिस्तावर पूर्ण निष्ठा असलेले लोक असतील त्यांनाच मात्र माझें भाषण ऐकूं येईल; पापी व पाखंडी लोकांना तें ऐकूं जाणार नाहीं,' असें मीं प्रथम सांगून टाकलें व मग तासभर केवळ प्रवचन केल्याप्रमाणें तोंडाची उघडझाक व हातवारे तेवढे केले ! " यावर आणखी जास्त मल्लिनाथी करण्याची गरज आहे, असें वाटत नाहीं. चमत्कारांचा उगम पुष्कळदां मनुष्यस्वभावाच्या कोणत्या दुर्बलतेंत असतो ही गोष्ट यावरून कळून येईल.

चमत्कारांचा पगडा जनमनावर या विसाव्या शतकांतील शास्त्रीय युगांतही केवढा असतो याची कल्पना पोर्तुगालांतील फातिमादेवीच्या नुकत्याच झालेल्या हिंदुस्थानांतील दिग्विजयानें चांगलीच सिद्ध झालेली आहे. या मूर्तीच्या आगमना-मुळें केवळ खिस्तीच नव्हे, तर हिंदु, पारशी असे अन्यधर्मीय रोगीदेखील दीर्घ आजारांतून खडखडीत बरे झाले, असे चमत्कार वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेले पाहिले. या देवीच्या आगमनप्रसंगीं गर्दींत चेंगरून मेलेलीं माणसें मात्र जिवंत झाल्याचें वाचलें नाहीं. शेवटीं तर ही मूर्तीच अपघातानें खालीं पडून फुटल्याची बातमी आली !

चमत्कार दोन प्रकारचे असतात. एक अशक्य व दुसरा असंभाव्य. मेलेल्या माणसाला जिवंत करणें हा पहिल्या वर्गातील चमत्कार; परंतु सहसा न

घडणारी पण अशक्य नाहीं आणि तिचा कार्यकारणभाव बुद्धिगम्य आहे, अशी गोष्ट दुसऱ्या वर्गांत घालण्यास हरकत नाहीं. दुसऱ्या वर्गांतील चमत्काराचा कार्यकारणसंबंध समजला म्हणजे त्यांतील चमत्कृति नष्ट होते. पुष्कळदा तो योगायोगाहि असतो.

पहिल्या वर्गांतील चमत्कारांचा चमत्कार असा आहे कीं, तो स्वतः पाहिलेला कोणीच सांपडत नाहीं. अत्यंत प्रामाणिक माणूसही भाविकपणानें आपल्याला पूज्य असलेल्या व्यक्तीनें असा चमत्कार केल्याचें लिहील; पण तो आपण पाहिला किंवा स्वतः केला असें सांगणार नाहीं. असा जर कोठें उल्लेख असेल तर एक तर तो भाग प्रक्षिप्त असावा अथवा ती त्याची कविकल्पना, भ्रांति किंवा लबाडी असावी, असें मानण्यास विशेष हरकत दिसत नाहीं. सेंट फ्रान्सिस झेवियरनें कितीतरी मृतांना जीवदान दिल्याचें त्याच्या चरित्रकारांनीं लिहून ठेवलें आहे. पण त्याच्या उपलब्ध पत्रांमध्यें या गोष्टीचा बिलकूल उल्लेख मला आढळला नाहीं. याविषयीं कांहीं खिस्ती धर्माधिकाऱ्यांकडे चर्चा केली असतां, असें होण्याचें कारण झेवियरचा विनय होय, असें मला त्यांनीं सांगितलें.

पण नामदेवाला ह्या विनयाचा लाभ त्याचे भक्त देऊं इच्छीत नाहींत. शीखांच्या आदिग्रंथांमध्यें नामदेवाच्या नांवावर असलेलीं कांहीं पदें आहेत. त्यांमधील एका पदांत बादशहानें एका गायीला ठार करून, " पुन्हा जिवंत करून दाखीव, नाहीं तर तुझें डोकें उडवितों, " असें नामदेवाला सांगितल्याचा उल्लेख आहे. आपल्या भक्तावरील हें संकट पाहून—

**" पांखतण बाज बजाईला**
**गरुड चडे गोविंद आईला**
**अपने भगतपरि की प्रतिपाल**
**गरुड चडे आये गोपाल. "**

म्हणजे पंख फडफडणाऱ्या गरुडावर बसून श्रीविष्णु आला व पुढें त्यानें ती गाय सजीव केली, असा आशय आहे. या पदाचें कर्तृत्व आद्य नामदेवाकडे नसून तेंच नांव धारण करणाऱ्या त्याच्या शिष्यप्रशिष्यांपैकीं एकाद्यानें हें पद रचलें असावें, असें माझें मत आहे. शंकराचार्य, कबीर, नानक यांच्या गादीवर बसणारे त्यांचे शिष्य-प्रशिष्य आपल्या गुरूंचेंच नांव लावीत असें दिसतें. असें मत प्रतिपादन करणें म्हणजे आद्य नामदेवाचें महत्त्व हिरावून घेणें होय, असें त्यांच्या भक्तांना वाटतें. अशा बाबतींत विशेष वाद घालून त्या भाविक लोकांच्या भावना विनाकारण दुखविण्यांत अर्थ नाहीं.

कांहीं लोक अशा चमत्कारांच्या पुरस्कारार्थ पाश्चात्य विद्वानांचा आधार पुढें करतात. यापेक्षां प्रत्यक्ष आपण पाहिलेले चमत्कार जर ते प्रसिद्ध करतील तर चमत्कारांवर लोकांचा जास्त विश्वास बसेल. छापखान्याचें बिल फुगून तें देण्याकरितां मुद्रकाकडून विलक्षण तगादा लागला असतां एक अज्ञात इसम किंवा पोस्टमन एकाएकी तेवढी रक्कम किंवा तितक्या रकमेची मनीऑर्डर घेऊन आला, असें लक्ष्मणराव पांगारकरांनीं आपल्या आत्मचरित्रामध्यें लिहिल्याचें आठवतें. यावरून दामाजीच्या काळीं पंढरीनाथ जसें विठू महाराचें रूप धारण करी तसें पांगारकरांच्या काळीं त्यानें पोस्टमनचें रूप धारण केलें, असें दिसतें. हा उपरिनिर्दिष्ट चमत्कार म्हणजे केवळ योगायोगही असेल. पांगारकर जसे वारकरी सांप्रदायाचे तसे धुळ्याचे शंकररावजी देव हे रामदासी सांप्रदायाचे निस्सीम भक्त आहेत. आपलें सारें आयुष्य त्यांनीं रामदासांच्या सेवेला वाहिलेलें आहे. त्यांना रामदासांनीं दर्शन दिलें किंवा त्यांना समर्थांचा साक्षात्कार झाला किंवा अन्य चमत्कार त्यांनीं अनुभवला कीं काय, अशी मीं त्यांच्याकडे नुकतीच पृच्छा केली असतां, त्यांनीं तसें कांहीं झालें नसल्याचें सांगितलें.

मीं स्वतः अनुभवलेले असे तीन चमत्कार कथन करतों. अर्थात् हे सर्व दुसऱ्या वर्गांतील आहेत.

'रा. ब. दादोबा पांडुरंग' ह्या माझ्या ग्रंथाचे दोन्ही भाग ज्या वेळीं छापून तयार झाले, त्या वेळीं प्रास्ताविक भाग, परिशिष्ट व सूचि छापत असतां पुस्तकांत घालण्याचे फोटो छापून काढावे म्हणून मीं ही सर्व सामुग्री मुद्रक श्रीयुत बा. ग. ढवळे यांच्या स्वाधीन केली. "अहो, हें तुम्हीं सगळं जमवलं खरं; पण त्यांत दादोबांची सही दिसत नाहीं ती ?" ती सामुग्री पाहून श्री. ढवळे म्हणाले.

"नाहीं खरी ! दादोबांची मराठी सही जंगजंग पछाडलें असतां कुठेंच मला सांपडली नाहीं. सरकारी दप्तरांत त्यांच्या अनेक सह्या आहेत त्या सर्व इंग्रजी. मराठीचे पाणिनि म्हटले जाणाऱ्यांची इंग्रजी सही देण्यापेक्षां मुळींच न दिलेली बरी, असं मला वाटलं. म्हणून मीं तिचा फोटो घेतला नाहीं." मीं अगदीं खिन्नपणानें उत्तर दिलें.

आत्मचरित्राच्या हस्तलिखितांवरून दादोबांच्या मराठी हस्ताक्षराचा नमुना मिळालाच होता. तेव्हां मराठी नसली तरी इंग्रजी स्वाक्षरी देणें योग्य होईल, असें शेवटीं आम्हीं ठरविलें. त्या दिवशीं बुधवार होता ( २६ मार्च १९४७ ). संध्याकाळीं सरकारी दप्तरखान्यांत जाऊन दादोबांची स्पष्ट सही असलेला एक चांगलासा कागद मीं शोधून काढला. दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं चार वाजतां त्याचा फोटो घेण्याकरितां फोटोग्राफरला तेथें बोलाविलें. फोटो घेऊन झाल्यावर पुरस्कार लिहिण्यासाठीं पुस्तकाचा दुसरा भाग कौन्सिलहॉलमध्यें जाऊन पंतप्रधान

श्री. बाळासाहेब खेर यांना द्यावयाचा होता. त्या दिवशीं मीं फारच दमलों होतों. नेहमीं मी बस किंवा ट्रॅम गांठून घरीं परत जातों; पण त्याच दिवशीं संध्याकाळच्या वेळीं बस किंवा ट्रॅम मिळेपर्यंत फार वेळ क्यूमध्यें तिष्ठत राहावें लागेल असा विचार मनांत येऊन, चर्चगेट गांठून रेल्वेनेंच जाण्याचें मीं ठरविलें. मला चर्नी-रोड स्टेशनवर उतरावयाचें होतें; पण चर्नीरोड स्टेशन आलें याचें भान न राहून तेथें न उतरतां अखेर मी ग्रँटरोडला उतरलों. फार दमून गेलों असतांही तेथें असलेल्या सेकंडहँड पुस्तकांच्या दुकानांपैकीं एकांत जाण्याचा मला अनावर मोह झाला. मला पाहिल्याबरोबर दुकानांतील एक पोऱ्या मजकडे येऊन म्हणाला, " शेट, पलीकडचा पुस्तकांचा ढीग तुम्हीं पाहिला नाहीं ! " तिकडे जाऊन पाहतों तों मला वरच संस्कृत भागवताची एक बांधलेली पोथी आढळली. त्या पोथीच्या मुखपृष्ठावर ' दादोबा पांडुरंग ' अशा देवनागरी व इंग्रजी सह्या होत्या. दादोबा पांडुरंगांनीं ' प्रभाकर ' पत्राच्या अंकांत ज्या भागवताच्या आवृत्तीसंबंधीं लेख लिहिला ती हीच त्यांची १८३९ सालची प्रत होती. मला दादोबांची देवनागरी सही मिळाल्याबद्दल जो आनंद झाला, त्यापेक्षा तो ग्रंथ ज्या परिस्थितींत मिळाला त्या बनावाचा मोठा चमत्कार वाटला, हें येथें सांगावेसें वाटतें.

मला एक जुनें हस्तलिखित बाड मिळालें. त्याचीही हकीकत अशीच चमत्कार म्हणण्यासारखी आहे. दोन वर्षांपूर्वीं गोमंतकांत हस्तलिखितांचा शोध करीत फिरत असतां माशेल या गांवीं आमच्या एका जवळच्या आप्तांच्या येथें रात्रीं वसतीला राहिलों. त्यांच्याकडील हस्तलिखितांचा शोध मीं एकदोन वर्षांपूर्वीं केलाच होता. त्यामुळें पुन्हा करावा असें मला वाटलें नाहीं. सकाळीं चहा व फराळ झाल्यावर दुसऱ्या गांवांत हस्तलिखितें शोधण्याकरितां जावें म्हणून जवळच पांचदहा मिनिटांच्या अंतरावर असलेल्या बसस्टँडवर जाऊं लागलों. घराबाहेर पडून दोनचार मिनिटें झालीं नाहींत तोंच मला एकाएकी भोवळ आली व जवळच असलेल्या दुकानाचा मीं आश्रय केला. माझ्याबरोबर आमचे मेहुणे बसस्टँडपर्यंत मला पोंचविण्याकरितां म्हणून आले होते. ते म्हणाले, " आतां परत घरीं चला नि बरं वाटल्यानंतर मग जा. " त्यांचें म्हणणें मान्य केल्या-शिवाय मला गत्यंतरच नव्हतें. घरीं आल्यावर मी आरामखुर्चीवर बसलों व सहज वाचण्याकरितां म्हणून जवळचें पुस्तकांचें कपाट उघडतों तों त्यांत शंभरावर प्रसिद्ध व अप्रसिद्ध मराठी काव्यें असलेलें एक भलेंमोठें जुनें हस्तलिखित बाड दिसलें. तें अत्यंत महत्त्वाचें आहे. मला जी घेरी आली ती तें पुस्तक न घेतां जाऊं नये म्हणून तर नसेल ? त्याच्यापूर्वीं मला कधीं अशी घेरी आली नव्हती व त्याच्या-नंतरही अद्याप कधीं आलेली नाहीं. रक्तदाबाची मला भीति वाटली; पण ती अखेर खोटी ठरली.

चमत्काराशिवाय नमस्कार नाहीं, अशी म्हण आहे. जुन्या काळीं आपल्या प्रत्येक संताला त्यामुळें चमत्कार चिकटविण्यांत येवूं लागले. ज्या मराठी कवींनीं चमत्कार केले नाहींत किंवा त्यांनीं चमत्कार केल्याचें जाहीर झालें नाहीं, त्यांचें नांव व कविता हीं दोन्हीही लुप्त होऊं लागलीं. मुक्तेश्वर, रघुनाथपंडित, सामराज हे अशांपैकींच होत. यांची कविता अलीकडे आणि तीही अंशतःच उपलब्ध झालेली दिसते. आधुनिक साहित्यिकांच्या मागें जर कांहींतरी भानगड नसेल, तर तो 'ख्यातनाम', 'प्रथितयश' बनणें कठीण होतें! आधुनिक साहित्यिकांना चमत्कार करतां आले नाहींत, तरी त्यांनीं चमत्कारिकपणा तरी करावा. राजवाडे, केतकर, गडकरी यांच्या वाङ्मयगुणांपेक्षा कांहीं लोक त्यांच्या चमत्कारिक वर्तनाचेंच विशेष कौतुक करतांना दिसतात. विद्यमान कविलेखकांमध्यें अशीं चमत्कारिक पात्रें नाहींत असें नाहीं; पण त्यांचा येथें निर्देश नकोच.

आणखीही एक अशीच गोष्ट सांगण्यासारखी आहे. दर गुरुवारीं मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या ग्रंथसमितीची सभा असते. अशा एका गुरुवारीं मला अंगांत जरा ताप होता; तरीपण तसेंच महत्त्वाचें काम असल्यामुळें ऑफिसांत जावें लागलें. संध्याकाळीं ऑफिस सुटल्यावर प्रकृति ठीक नसल्यामुळें ग्रंथसमितीच्या सभेला न जातां मीं घरीं जाण्याचा विचार केला; पण पुन्हा विचार केला कीं, जर मी सवेतन कामाला ऑफिसांत जाऊं शकतों, तर निर्वेतन कामाला ग्रंथसंग्रहालयांत जाण्यास अडचण कां यावी? असा विचार करून ठाकुरद्वाराकडे जाणाऱ्या बसमध्यें मी तीनदा चढलों; पण मर्यादित संख्येपेक्षां माणसें जास्त झाल्यामुळें मला प्रत्येक वेळीं खालीं उतरावें लागलें! पुढें व्हिक्टोरिया मिळेल म्हणून मी चालतच गिरगांवपर्यंत गेलों. तिकडे एक सेकंडहँड बुकसेलर धांवतधांवत दुकानाबाहेर येऊन मला म्हणाला, "तुमच्याकरितां एक पुस्तक ठेवलं आहे. आतां तुम्हीं भेटलां नसतां, तर दुसऱ्या एका गिऱ्हाइकाला देणार होतों." आशियासंबंधींचें वर्णनात्मक डच भाषेंतील १६८० मध्यें (म्हणजे शिवाजी वारले त्या सालीं) मुद्रित झालेलें व सुंदर चित्रें असलेलें हें पुस्तक होतें. याच्याइतकें जुनें पुस्तक मजजवळ दुसरें नाहीं. त्यानें मागितले ते पैसे देऊन मीं तें पुस्तक ताबडतोब विकत घेतलें. पुस्तक मिळाल्यामुळें मला मोठा आनंद झाला. ताप आहे म्हणून जर ऑफिसांतून मी परस्पर घरीं गेलों असतों किंवा बसमधून मला पुनःपुन्हा उतरावें लागलें नसतें, तर या ग्रंथाचा लाभ मला झाला नसता.

ग्रंथांच्याऐवजीं देवाच्या भक्तीमुळें असे चमत्कार किंवा योगायोग घडले असते, तर भाविक माणसानें हे सर्व ईश्वरी चमत्कारच मानले नसते काय? हस्तकौशल्य, योगसामर्थ्य किंवा जादू यांच्या साहाय्यानें दुसऱ्यानें केलेल्या विस्मय-

कारक गोष्टी कार्यकारण न समजल्यामुळें आम्ही चमत्कार मानतों. वरील आठवणींतील चमत्कारांचें स्वरूप अशांपैकीं नाहीं हें उघड दिसून येणारें आहे. चमत्कार म्हणतां येणारे विस्मयकारक अनुभव जर बिलकूल अतिशयोक्ति न करतां निरनिराळ्या लोकांनीं प्रसिद्ध केले, तर त्यांवरून कांहीं सिद्धान्त बांधणें शक्य होईल असें वाटतें.

मनोहर–एप्रिल १९५१

◎ ◎ ◎

## ७

# जुन्या काळच्या शाळांतील शिक्षेचे प्रकार

अलीकडे अगदीं लहान मुलें मॉंटेसरी किंवा इतर प्राथमिक शाळांमध्यें मोठ्या हौसेनें जातांना ज्या वेळीं मी पाहातों, किंवा अशा शाळांतील एकंदर आनंदी वातावरण ज्या वेळीं अवलोकन करण्याचा मला प्रसंग येतो, त्या वेळीं पन्नास वर्षांमागील आमच्या बालपणांतील प्राथमिक शाळेंतील दुःखदायक 'शिक्षे'ची मला आठवण होते व आजच्या मुलांचा हेवा वाटतो. ईश्वरानें आम्हांला जन्माला घालण्यांत विनाकारण फार घाई केली, असाही विचार मनांत आल्याखेरीज राहात नाहीं.

वास्तविक 'शिक्षा' या शब्दाचा धात्वर्थ 'शिक्षण' किंवा 'ज्ञानदान' असा आहे. मोल्स्वर्थच्या कोशामध्यें 'शिक्षा' या शब्दाचे "Instruction, teaching, communication of knowledge," असे अर्थ दिलेले आढळतील. Punishment (किंवा पंडितमंडळाच्या कोशाप्रमाणें 'पारिपत्य') हा दुय्यम अर्थही मोल्स्वर्थनें दिलेला आहे; परंतु तो अर्थ 'शिक्षा' या शब्दाला मागाहून प्राप्त झालेला.

जुन्या काळच्या कॅथॉलिकांच्या 'इंक्विझिशन' या संस्थेच्या यातनायंत्राची ज्याप्रमाणें आजच्या लोकांना माहिती नाहीं, त्याप्रमाणें जुन्या काळच्या प्राथमिक शाळांतील 'शिक्षे'च्या प्रकारांची आजच्या पिढींतील मुलांना कल्पनाही असणें शक्य नाहीं. त्यांची तपशीलवार माहिती कोठें माझ्या तरी पाहाण्यांत नाहीं. दूध पांढरें आहे, मीठ खारट आहे किंवा साखर गोड आहे, हें लिहून ठेवावें लागतें काय ? त्याप्रमाणें प्राथमिक शाळांतील हे शिक्षेचे प्रकार त्या काळीं इतके सर्वसामान्य होते कीं, त्यांची निराळी नोंद करून ठेवण्याची कोणालाही आवश्यकता वाटली नसावी.

चालू शतकाच्या आरंभीं मीं जे हे शिक्षेचे प्रकार स्वतः अनुभवले, पाहिले किंवा ऐकिले ते या ठिकाणीं कथन करतों व इतरांनींही जे क्वचित् लिहून ठेविलेले आढळले त्यांचीही माहिती देतों :—

माझें जन्मस्थान जें गोमंतक तेथें जुन्या काळीं 'शणैमामी' शिक्षणपद्धति असें जिला आज तिकडे म्हणतात, ती चालू होती. 'शणैमाम' म्हणजे शेणवी-

मामा; अर्थात् तात्या पंतोजी. मुंबई प्रांतांत आधुनिक शिक्षणपद्धति सुरू होण्या-पूर्वींच्या कोंकणांतील शिक्षणपद्धतीची जी माहिती कॅ. जर्विसनें आपल्या एका शिक्षणविषयक रिपोर्टांत दिली आहे, तिच्यामध्यें आणि या ' शणैमामी ' शिक्षण-पद्धतीमध्यें विशेष फरक नाहीं; कारण या शणै ( शेणवी ) लोकांच्याच हातांत कोंकणांतील सारें प्राथमिक शिक्षण आपल्या वेळींदेखील होतें, असें प्रा. धोंडो केशव कर्वे यांनीं आत्मचरित्रांत नमूद करून ठेविलें आहे. गोव्यांतील कांहीं भागांत अगदीं अलीकडे म्हणजे १९१०–१२ पर्यंत या जुन्या शणैमामी किंवा शेणवाई पद्धतीनें शिक्षण दिलें जात असल्याचें मीं पाहिलें आहे.

माझें प्राथमिक शिक्षण जें झालें तें मात्र नव्या पद्धतीनें शिकलेल्या शिक्षकाच्या हाताखालींच झालें. गोव्यांत सरकारी मराठी शाळा आजदेखील नाहींत; परंतु आमचें घर एका खेडेगांवांत अगदीं एका बाजूला असल्यामुळें तेथें खाजगी मराठी शाळेचीही सोय होण्यासारखी नव्हती. एकदोन मुलांकरितां घरांत स्वतंत्र शिक्षक ठेवणें, तो थोडक्यांत मिळणें आणि मिळाला तरी फार दिवस टिकणें कठीण होतें. शिवाय बाहेरचीं चार माणसें घरांत सतत जेवायला राहिलीं तरी त्या काळीं लोकांना विशेष पर्वा नसे; परंतु चार रुपये उचलून महिन्याकाठीं मास्तराला देणें घरांतील कर्त्या माणसांना जड जात असे. त्यामुळें प्राथमिक शिक्षणाकरितां आम्हां भावंडांची आमच्या आजोळीं ( अस्नोडें नांवाच्या गांवीं ) रवानगी करण्यांत येत असे. या ठिकाणीं आजोबांच्या मालकीच्या लहानशा एका दुमजली बंगलींत शाळा भरत असे. या शाळेंतील मास्तर आमच्या आजोबांकडेच जेवायास राही; मग शिकणारीं मुलें घरांत असोत किंवा नसोत. गांवांतील इतर लोकांच्या मुलांकडून फी मिळे तोच मास्तरचा पगार होता.

माझ्यापेक्षां तीन वर्षें वयानें वडील असलेला माझा बंधु तिकडे आधींच जाऊन शिकण्याकरितां राहिला होता. शाळेला जाण्याचें माझें पांच वर्षांचें वय होतांच माझीही तिकडे एक दिवस रवानगी करण्यांत आली. मी प्रथम जातांना मोठ्या उमेदीनें नाचत-उडत गेलों; परंतु तिकडे गेल्यावर माझा उत्साह मावळला. आधींच आईची व धाकट्या भावंडांची आठवण होऊन मला रडूं येत असे. त्यांत मास्तर घरांतच असल्यामुळें दिवसाचे चोवीस तास कोंडवाड्यांत असल्या-सारखें होई. शाळेची वेळ सकाळीं साधारण सहा ते दहा व संध्याकाळीं अडीच ते साडेसहा अशी असे. शाळा घरापासून चारपांच मिनिटांच्या अंतरावर होती. शाळेंत मी, माझा बंधू आणि आमचे दोन मामा असे जात असूं. येतांजातांना नेहमीं बरोबर मास्तर असत.

मास्तरांनीं प्रथम प्रथम मला मारलें नाहीं. तरीपण इतर मुलांना व विशेषतः आमच्या मामांना ते छड्यांनीं झोडपूं लागले म्हणजे मी फारच घाबरून जात असें.

प्रसिद्ध व्याकरणकार रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं आत्मचरित्रांत या बालकांच्या मनःस्थितीचें चांगलें वर्णन करून ठेविलें आहे. ते लिहितात, " लहानपणीं शाळा आणि पंतोजी यांचें फार भय असतें, आणि हा शाळेला जाण्याचा त्रास आणि पंतोजींचें भय पुष्कळ वर्षेंपर्यंत मनांत असतें. मला वाटतें मला तर हें भय मी बारातेरा वर्षांचा होई तेथपर्यंत सारिखें होतें. त्यांत अगदीं कोमल वयांत म्हणजे सुमारें पांचापासून आठ वर्षांपर्यंत तर पंतोजी म्हटला म्हणजे मोठा भयंकर दिसे. त्याची ती मुद्रा, त्याच्या हातांत छडी, आणि त्या छडीनें तो दुसऱ्या पोरांस मारतांना पाहिलें म्हणजे तो लहान मुलांस काळासारिखा भयंकर दिसे. मी ज्या शाळेंत होतों, त्या शाळेच्या पंतोजीस अशी कधीं कधीं वरल्या मुलांकडून हिसाबाची झडती घेण्याची हुक्की येत असे...पोर चुकलें म्हणजे त्याच्या पाठीवर छडी मारी. मग पोर रडून म्हणे, " नाहीं. नाहीं. पंतोजी, चुकलों. ही वेळ माफ करा. " असें जेव्हां मी दुरून बसून पाहीं; आणि मला तर यांत कांहींच समजत नसे, तेव्हां मला वाटे कीं, जर आतां मजवर पाळी आली तर मीं हिसाब कसा सांगावा आणि मला त्या छडीचा मार खावा लागेल. म्हणोन पंतोजीनें लहान मुलांस भय वाटेसें कांहीं करूं नये; कारण तितक्या लहान वयांत मुलांस पंतोजीचा हेतु तर कांहीं समजत नाहीं, परंतु उलटें त्यांच्या कोमळ मनास आणि शरीरास इजा मात्र होते. पंतोजीनें लहान मुलांशीं फार ममतेनें बोलावें, आणि खेळत खेळत त्यांस शिकवावें. म्हणजे त्यांस मोठा आनंद वाटतो, व त्यांस तो पंतोजी आवडतो. " चांगल्या पंतोजीनें काय करावें, हें जें दादोबांनीं सांगितलें आहे, त्याच्या अगदीं उलट कल्पना आमच्यावेळीं प्रचलित होती ! मास्तर काय शिकवितो, कसा शिकवितो त्याच्या शिकविण्याचा मुलांच्या कोवळ्या मनावर दूरवर काय परिणाम होईल, हें कोणीही पाहात नसे. मास्तराची नुसती चाहूल ऐकिली म्हणजे मुलांचा थरकांप झाला कीं तो मास्तर चांगला, असें त्या काळीं लोक समजत. ' अमुक ठिकाणीं एक फारच चांगला मास्तर आहे. त्या मास्तराचा केवळ हुंकार कानीं पडला म्हणजे मुलांना भयानें लघुशंका होते, ' असे उद्गार मी त्या काळीं ऐकत असें. " छडी लागे छम् छम् विद्या येई घम् घम् " हें त्या काळचें वचन प्रसिद्धच आहे. देशी छडीच्या जोडीला त्या काळीं विदेशी ' पालमेत्री ' नांवाचें मुलांना मारण्याचें एक शस्त्र असे. ' पालमातोरियु , ( Palmatorio ) हें त्याचें मूळ पोर्तुगीज भाषेंतील नांव. या लांकडी आयुधाचा आकार व स्वरूप झाऱ्या-सारखें असे. तळहातावर ( Palma ) त्याचा आघात करावयाचा म्हणून त्याला पालमा–तोरियु नांव मिळालें होतें; परंतु त्याचें ' पाणमुत्री ' असेंही शुद्धीकरण ( ! ) झालें होतें; पण तोच त्याचा खरा अर्थ असें आम्हीं मुलें समजत असूं. ' पाणमुत्री ' जोरानें हातावर मारल्यावर मुलाची तुमान ओली होते म्हणून या

हत्याराला अशी संज्ञा प्राप्त झाली, अशी आमची प्रामाणिक कल्पना होती. हें शस्त्र पोर्तुगीज प्राथमिक शाळांत सर्वत्र चालू असे. या शाळेंत मराठी शिक्षण संपादून पोर्तुगीज शाळेंत गेलेल्या कोणातरी एका जुन्या विद्यार्थ्यानें पोर्तुगीज शाळेंतून ही 'पाणमुत्री' पळवून आमच्या मास्तरांना नजर केली होती. ती मास्तरांच्या टेबलावर नेहमीं दिसे; परंतु मास्तर तिचा फारसा उपयोग करीत नसत. कारण, त्यांची स्वदेशी छडीवरच जास्त निष्ठा होती! छडी हाताशीं नसली म्हणजे मग गालगुच्चे, गुद्दे, चापट्या, चिमटे, असा खुराक मधून मधून मिळे. याखेरीज शिक्षांचे जे निरनिराळे प्रकार असत त्यांचेंही आठवतें तसें मी खालीं वर्णन करतों :—

१ **उभें राहाणें**—वर्गातील बाकीचे मुलगे बसले असतां एकाच मुलाला एक हात वर करून उभें करणें.

२ **खुर्ची**—खुर्चीवर बसल्याप्रमाणें भिंतीला पाठ टेकून बसावयाचें.

३ **आंगठे धरणें**—ओणवें राहून पायाचे आंगठे धरणें. या वेळीं मानेवर धोंडाही ठेवीत. तो खालीं पडला तर मुलाला जादा मार मिळे.

४ **उठाबशी**—उजव्या हातानें आपला डावा कान व डाव्या हातानें उजवा कान धरून उठाबशी करणें.

५ **जोड उठाबशी**—दोघां विद्यार्थ्यांनीं एकच अपराध केला तर त्यांना एकमेकांचे कान धरून उठाबशी करण्यास सांगत. यांपैकीं एक मुलगा उंच व दुसरा ठेंगणा अशी जोडी असली म्हणजे दोघांचे फार हाल होत.

६ **घोडा**—चालावयास येण्यापूर्वीं लहान मुलें ज्याप्रमाणें हातापायांनीं जनावराप्रमाणें चालतात त्याप्रमाणें चालणें. कधीं कधीं त्याच्या पाठीवर दुसऱ्या लहान मुलाला बसवीत. असा स्वार होण्याचा मान प्रथम मला पुष्कळदां मिळे.

७ **एका पायावर उभें राहाणें**—असें उभें राहून दुसरा पाय जमिनीला लावला कीं छडीचा मार मिळे.

८ **डावा हात नाकाला**—वर्गातील मुलांना रांगेनें उभे करणें. वरच्या मुलांला विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर सांगतां न आल्यामुळें खालचा जो मुलगा तें उत्तर बरोबर देईल त्यानें वरच्या मुलाच्या नाकास आपला डावा हात लावून वरच्या नंबराला जाऊन उभा राहाणें.

९ **गुडघे घालणें**—गुडघे जमिनीवर टेकून राहाणें.

१० **होरगया**—ज्या वेळीं एकादा मुलगा शाळेंत न येण्याबद्दल हट्ट धरून घरीं राही, त्या वेळीं हा शिक्षेचा प्रकार अंमलांत येई. मुलगा शाळेंत जाण्यास तयार नाहीं, असें त्याच्या पालकाकडून शाळेंत कळविण्यांत आल्यावर कांहीं जवानमर्द विद्यार्थ्यांची त्याच्या घरीं रवानगी करण्यांत येई. असे विद्यार्थी बहुतेक

ब्राह्मणेतर जातींतील असत. घरीं कांहीं काम नसलें म्हणजेच शेतकरी, गवंडी, भंडारी, सुतार वगैरे लोक आपल्या मुलांना शाळेंत पाठवीत. त्यामुळें त्यांच्या मुलांचें शिक्षण नियमित होत नसे. माझ्या वेळच्या कांहीं विद्यार्थ्यांना मिशाही होत्या, असें मला आठवतें. हे मुलगे मास्तरांशीं या शिक्षादानांत सहकार्य करण्यास नेहमींच अत्यंत उत्सुक असत; कारण तेवढाच वेळ त्यांची अभ्यासांतून सुटका होई ! जातांना झाडाच्या फांद्या ते बरोबर घेऊन जात. यमदूतांसारखे हे मास्तरांचे दूत आलेले पाहातांच साधारण मुलगा वठणीवर येऊन मुकाट्यानें शाळेंत जाण्यास तयार होई; परंतु तसाच खप्पी मुलगा भेटला म्हणजे मग त्याच्या अंगाला फांद्या बांधीत व त्याला उचलून ' होर-गया '; ' होर-गया ', ' होर-गया ' असें तोंडानें मोठ्यानें ओरडत ते मुलगे त्याला शाळेमध्यें घेऊन येत. शाळेंत आल्याबरोबर त्या मुलाला मास्तरांकडून भरपूर चोप मिळे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. शिमग्यांत होळीच्या दिवशीं सुपारीचें झाड तोडून असेंच ' होर-गया ' म्हणून नाचविण्याची गोमंतकांत कांहीं भागांत पद्धति आहे, त्याचीच ही नक्कल असे. परदुःखं शीतलम् ! शाळेंत असा कांहीं प्रकार असला म्हणजे बाकीच्या मुलांचे तेवढे तास दोन तास मौजेंत व आनंदांत जात. या शिक्षेचा मुलांना इतका भयंकर धाक असें कीं, एकादा मुलगा शाळेंत जाण्यास कांकूं करूं लागला म्हणजे या शिक्षेची आठवण देतांच तो गुपचूप शाळेचा रस्ता सुधारी. अशी शिक्षा सहन करणारे बहुतेक खालच्या जातींतील निढावलेले मुलगे असत. मीं दोनचार तरी ह्या शिक्षेचे प्रसंग पाहिल्याचें आठवतें.

११ **गोळास टांगणें**:—शाळेंतील एका तुळईला नारळाच्या काथ्याचा दोरखंड बांधलेला असे. तो दोनही हातांनीं मुलाला घट्ट धरावयास सांगून कांहीं काळ त्याला लोंबत ठेवीत, आणि कधीं कधीं तर त्याला खालून छड्यांनीं मारही देण्यांत येई.

याहीपेक्षां तीव्रतर प्रकार म्हणजे त्याला अशा स्थितींत टांगलेला असतां त्याला तांबडे मुंगळे डसविणें हा होय. या मुंगळ्यांना गोव्यांत ' हुमले ' असें म्हणतात. हे मुंगळे काजू, आंबा, फणस वगैरे झाडांवर पानांचीं घरटीं करून असतात. असें घरटें असलेली एक फांदी आणून मुलाच्या अंगावर झाडली म्हणजे हे तांबडे मुंगळे त्याच्या अंगाला कडकडून चावा घेतात. अशा प्रकारची शिक्षा देण्याकरितां हुमल्यांचीं घरटीं असलेल्या डहाळ्या शाळेंत एकदां दोनदां आणलेल्या मला माहीत आहेत; परंतु प्रत्यक्ष त्यांचा मुलावर प्रयोग केल्याचें मला आज स्मरत नाहीं. हे मुंगळे जास्त जोरानें डसावें म्हणून आधीं मुलाच्या अंगावर गुळाचें पाणी शिंपडून ते त्याच्यावर टाकण्यांत येतील, अशी मास्तरांनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४४०३
शाखा

मुलांना धमकी दिलेली मीं पुष्कळदां ऐकिली आहे; परंतु तिची अंमलबजावणी केल्याचें पाहिलेलें नाहीं.

वर 'जो गोळाला टांगण्याचा' शिक्षाप्रकार सांगितला, त्याला मुंबई-बेळगांवकडे 'घोडीवर चढविणें' किंवा 'घोडीवर देणें' असें नांव असे. बाबा पदमनजी यांनीं आपल्या वेळचे शिक्षेचे प्रकार नमूद केले आहेत. बेळगांवांतील आपल्या सरकारी मराठी शाळेंतील विद्याभ्यासासंबंधीं माहिती देतांना 'अरुणोदय' या आत्मचरित्रांत बाबा पदमनजी लिहितात, "शिक्षेचे प्रकार जुन्या गांवठी शाळेप्रमाणें होते. म्हणजे **घोडीवर चढविणें**, पाठीवर पाट्या ठेवणें, कान धरून उठाबशी करावयास लावणें, जमिनीवर हाताचें एक बोट टेकावयास व एक पाय मागें उचलावयास लावून ओणवें करणें, इत्यादि. वेतानेंही मुलांस खूप बडवीत."

वरील 'घोडीवर चढविणें' म्हणजे काय हें मला न कळल्यामुळें मीं माझ्या एकदोन साठपांसष्ट वर्षांच्या स्नेह्यांना त्याचा अर्थ विचारतां त्यांनाही नीट खुलासा करतां आला नाहीं, मोल्स्वर्थच्या कोशामध्यें (आवृत्ति २, १८५७) 'घोडी' या शब्दाचा पुढीलप्रमाणें अर्थ दिलेला आहे—"The loop or cord from which offending schoolboys are suspended by the hands."

या शिक्षाप्रकारास 'घोडी' असें नांव कां मिळालें हें समजत नाहीं.

**१२ व्हडलें गोंय दाखविणें**—मुलाच्या दोनही कानाला धरून त्याला वर उचलणें, याला व्हडलें गोंय ( थोरलें गोंवें ) दाखविणें असें म्हणत. कोंकणप्रांतीं कांहीं भागांत याला 'सूर्याचीं पिलें दाखविणें' असें म्हणत.

दहा साडेदहा वाजतां शाळा सुटून घरीं आल्यावर आम्हीं स्नान करून पेज जेवत असूं. पुनः दुपारीं आम्हांला पाट्यापुस्तकें घेऊन मास्तरांजवळ खोलींत बसावें लागे. मास्तर खाटेवर झोंपत असत. त्यांचा डोळा लागला असें पाहिल्यावर आम्हीं हळूच जरा बाहेर जात असूं. मध्येंच मास्तर जागे झाले आणि 'कोठें गेलास' म्हणून विचारलें म्हणजे 'एकीला' किंवा 'बेकीला' असें कांहींतरी त्यांना उत्तर मिळे !

घर ही जरी अशा प्रकारें आमची शाळाच बनली होती तरी गालगुच्चे किंवा चिमटे यांच्यासारखा 'मुका' मार सोडून इतर प्रकारची घरच्या मंडळीच्या लक्षांत येईल अशी बोलकी शिक्षा मास्तर घरीं सहसा देत नसत. घरांतील वचपा शाळेंत गेल्यावर काढीत. एकदां मी दुपारीं पेज जेवीत असतां कोणीतरी बरोबरच्या मुलांपैकीं एकानें माझी भलतीच खोडी केली. त्याबरोबर रागानें मीं हातांतील पेजेंतील भाताची उंडी त्याच्यावर फेंकून दिली. इतक्यांत माझ्या दुर्दैवानें त्या ठिकाणीं मास्तर आले ! झालें; आज संध्याकाळीं याचें प्रायश्चित

शाळेंत मला मिळणार, हें मला कळून चुकलें. संध्याकाळीं मास्तरांनीं कांहींतरी निमित्त काढून अपेक्षेप्रमाणें माझ्यावर अशा जोरानें छड्या मारल्या कीं, अंगाला जखम होऊन तींतून भळाभळ रक्त वाहूं लागलें. लगेच प्रथमोपचार सुरू झाला. शाळेच्या भिंती, विटांसारख्या गोव्यांत मिळणाऱ्या खाणींतील तांबड्या दगडांच्या केलेल्या असत. त्यांना तिकडे ' चिरे ' असें म्हणतात. या तांबड्या चिऱ्यांना मधून मधून चुन्यासारखा पांढरा भाग असतो. मुलांना जखम झाली म्हणजे चुना नखानें खरवडून तो जखमेमध्यें भरीत. संध्याकाळीं घरीं जातांना मास्तरांनीं, ही जखम आजीबाईंना दाखवायची नाहीं अशी मला सक्त तांकीद दिली; परंतु दुसऱ्या दिवशीं स्नानाला जाण्याच्या वेळीं अंगाला तेल लावतांना पणजीबाईंनीं ही जखम पाहिली आणि मी न सांगतांच खरा प्रकार तिला कळून आला. तिनें ही जखम आजींना दाखविली आणि दोघींनींही अश्रू ढाळल्याचें मला आठवतें; परंतु त्यासंबंधीं मास्तरांना कधीं विचारलें नाहीं, अशी कडक शिस्त घरांत होती.

गोविंद बाबाजी जोशी नांवाच्या वसईच्या एका चळवळ्या गृहस्थांनीं आपली ' रोजनिशी ' १८९६ सालीं प्रसिद्ध केली आहे. तिच्यामध्यें १८४६ पूर्वीं आपल्या बालपणांतील शाळांतील परिस्थितीसंबंधीं ते लिहितात :—

" या वेळीं सांप्रतप्रमाणें अभ्यासावरून क्लासांत बसण्याचे नंबर किंवा मार्क वगैरे कांहींएक नसत; परंतु " मायनस मार्कांचे " जागीं मार मात्र पूर्ण असे. पंतोजी विद्यार्थ्यांस शिक्षा करीत. त्यांचा प्रकार :—

१ वेताच्या बारीक छड्या मारणें.

२ उठाबशा करविणें.

३ आंगठे धरविणें.

४ मानेवर गुंज अथवा खडा ठेवणें. मानेवरील गुंज अगर खडा पडला तर मार पुनः मिळत असे, सबब मुलें चिकट पदार्थ मानेस लावीत असत.

५ घोडीवर चढविणें.

६ पाणमुत्री मारणें. पाणमुत्री म्हणजे झाऱ्यासारख्या आकृतीची, लांकडाची मध्यें भोकें पाडलेली बनवीत असत. ती गुरुराज विद्यार्थ्यांचे हाताचीं बोटें जरा वांकवून तळहातावर आठदहा वेळां किंवा त्यांच्या रागाच्या धोरणाप्रमाणें मारीत असत.

७ कोलदांडा घालणें-कोलदांडा म्हणजे हात बांधून हातांत गुडघे आणावयाचे आणि हात गुडघे यांचे मधील भोकांत आडवी काठी घालून ठेवावयाची. नंतर त्यास त्याच स्थितींत जमिनीवर उताणा ठेवावयाचा.

या सर्व शिक्षांचा अनुभव हें पुस्तक लिहिणाऱ्यानें घेतलेला आहे. "

कोंकणांत किंवा महाराष्ट्राच्या इतर भागतच असे शिक्षेचे प्रकार होते असें नाहीं, तर हिंदुस्तानांतील इतर प्रांतांतही ते होते. बंगाल्यांतील हे शिक्षेचे कांहीं प्रकार " कलकत्ता रिव्ह्यू " मध्यें ( पुस्तक ४, १८४७ ) एका लेखकानें नमूद केले आहेत, ते उपरिनिर्दिष्ट आपल्याकडील प्रकारांपेक्षांही फारच राक्षसी स्वरूपाचे दिसतात; ते असे :—

( १ ) अपराधी मुलाला ओणवें राहावयास सांगून त्याच्या पाठीवर एक व मानेवर एक अशा दोन जड विटा ठेवीत. जर ह्यांपैकीं एकादी साधारण अर्ध्या तासाच्या ठराविक मुदतीच्या आंत खालीं पडली तर त्या मुलाला छडीचा खुराक मिळे.

( २ ) मुलाला एका पायावर उभा करीत. ठराविक मुदतीच्या आंत जर त्यानें उचललेला दुसरा पाय जमिनीला टेकला तर त्याला झोडपण्यांत येई.

( ३ ) मुलाला आपली एक तंगडी मानेला अडकवून विचित्र स्थितींत जमिनीवर बसविण्यांत येई.

( ४ ) मुलाला दोन विटांवर दोन पाय ठेवून आपलें डोकें खालीं तंगड्यांमध्यें घालावें लागे व तंगड्यांमधून हात घालून आपले दोनी कान पकडावे लागत.

( ५ ) डोकें खालीं करून शेजारच्या झाडाच्या फांदीला कांहीं मिनिटें मुलाला लोंबकळत ठेवीत.

( ६ ) मुलाचे हात व पाय घट्ट बांधून शाळेच्या वरील वांशाला अडकविलेल्या फिरकीच्या ( pully ) साहाय्यानें दोरीनें वर उचलीत.

( ७ ) खाजकोलती ( nettle ) चें पान पाण्यांत बुडवून मुलाच्या अंगाला चिकटविण्यांत येई. त्यामुळें भयंकर वेदना होऊन अंग सुजे; परंतु खाज येणाऱ्या अंगाला दुःखशमनार्थ हात लावण्यास त्याला मनाई असे. तसा त्यानें प्रयत्न केल्यास वर आणखी चोप देण्यांत येई.

( ८ ) खाजकोलतीचीं पानें किंवा एकादें मांजर किंवा दुसरा असाच एकादा त्रासदायक प्राणी यासह मुलाला एका गोणांत घालीत आणि तो गोण जमिनीवरून गडबडा फिरवीत नेत.

( ९ ) कांहीं हात जमीन मोजण्यास सांगत व त्याच्या खुणा नाकाच्या शेंड्यानें जमिनीवर कराव्या लागत.

( १० ) मुलाला आपले कान पकडून जोरानें ओढावे लागत आणि ते जर योग्य प्रकारें ताणले नाहींत तर त्याला मार मिळे.

( ११ ) मुलाचे दोन पाय व दोन हात चार मुलगे धरीत व वर उचलून झोंके देत व नंतर जमिनीवर आदळीत.

( १२ ) दोन मुलगे मुलाच्या दोन्ही बाजूला उभे राहून त्याचे कान पकडून ओढीत व अशा स्थितींत त्याला धांवायला सांगत.

( १३ ) ज्यांनीं अपराध केलेला असेल अशा दोन मुलांना एकमेकांच्या डोक्यावर डोकें जोरानें आदळण्यास लावीत.

( १४ ) जो मुलगा सकाळीं सर्वांआधीं शाळेंत येई, त्याला हातावर छडीचा एक तडाखा मिळे. दुसऱ्या मुलास दोन, तिसऱ्यास तीन असें हें छड्यांचें प्रमाण सारखें वाढत जाई. पहिल्यानें येणाऱ्या मुलाकडे मागाहून येणाऱ्या मुलांच्या हातावर छड्या देण्याची कामगिरी सोंपविण्यांत येई.

हे जे वर 'शिक्षे'चे प्रकार वर्णन केले, त्यांवरून विद्यार्थ्यांच्या मनांत आपल्या गुरूविषयीं कोणत्या भावना वास करीत असतील त्याची सहज अटकळ करतां येईल. या प्रकाराचा सूड उगविण्याकरितां मुलें काय उपाय योजीत याचीही माहिती उपरिनिर्दिष्ट निबंधांत सांपडते; ती अशी :—

( १ ) पंतोजीला हुक्का तयार करून देतांना मुलें तंबाकूमध्यें मिरची किंवा असेच दुसरे जलाल पदार्थ मिसळीत. पंतोजीनें हुक्क्याचा एक झुरका घेतल्याबरोबर त्याला ठसका बसे व तो खोकून खोकून हैराण होई. या वेळीं शाळेंतील सारीं मुलें पोट धरधरून हंसत.

( २ ) पंतोजी ज्या चटईवर बसत तिच्या खालीं तो येण्याच्या अगोदर कांटे किंवा खिळे पसरून ठेवीत.

( ३ ) रात्रीच्या वेळेला पंतोजीला गांठून झाडाच्या आड लपून त्याच्यावर विटा किंवा दगड फेंकीत.

( ४ ) पंतोजी लवकर मरावे म्हणून मुलें कालीमातेची प्रार्थना व नवस करीत.

शाळा चुकविण्याचे तर मुलांचे अनेक मार्ग असत. शाळेला जाण्याबद्दल आईबापांनीं आग्रह करतांच मुलगा आपण 'भाताला शिवेन' अशी धमकी देई. कारण, परजातीचा किंवा वहाणासह मुलगा भाताला शिवला म्हणजे तो विटाळला, असें त्या काळीं मानीत व त्यानें स्नान केल्याशिवाय कोणीही त्याला शिवत नसत. किंवा मुलगा अशा कांहीं अस्वच्छ व घाणेरड्या ठिकाणीं जाऊन दिवसभर राही कीं, त्या ठिकाणीं मास्तर किंवा त्याचे दूत विटाळाच्या भयानें जाण्यास धजत नसत. तळ्यामध्यें जाऊन डोक्यावर मातीचें मडकें घेऊन विद्यार्थी राहात. त्या बाजूनें येणाऱ्याजाणाऱ्याला वाटे कीं, हें मातीचें मडकेंच पाण्यावर तरंगत आहे ! उंच झाडावर चढून शेंड्यांवर जाऊन बसणें, हाही एक शाळा टाळण्याचा मार्ग असे. एक मुलगा तर सतत तीन दिवस नारळीच्या झाडावर चढून शेंड्यावर

जाऊन बसला होता, असें नमूद आहे ! आपणांस नेण्यास येणाऱ्या लोकांच्या अंगावर तो नारळ फेंकीत असे.

एकादे दिवशीं शाळा टाळावयाची असली म्हणजे आम्हीं डोकें दुखतें किंवा पोटांत दुखतें, असें सांगून आजारी असल्याचें ढोंग करीत असूं; पण बंगाल्यांतील उपरिनिर्दिष्ट जालीम प्रयोग आपल्याकडे कोणी केल्याचें मला माहीत नाहीं.

मास्तरांना अद्दल घडविण्याचा प्रकार मात्र एका भंडारी जातीच्या मुलानें केलेला मला आठवतो. खाजकुइलीच्या शेंगेवर जीं मखमलीसारखीं कुसें असतात तीं गोळा करून अगदीं सकाळीं येऊन शाळा उघडतांच त्यानें मास्तरांची खुर्ची व टेबल यांवर सर्वत्र पसरून ठेविलीं. मास्तर आपल्या आसनावर आरूढ होतांच त्या कुसांमुळें त्यांच्या सर्वांगाला एवढी विलक्षण खाज सुटली व असह्य वेदना झाल्या कीं, मास्तर तसेच परत घरीं गेले व त्या दिवशीं सकाळच्या वेळी शाळेला सुट्टी मिळाली !

गुजरात, कर्नाटक, आंध्र, तामीळ वगैरे हिंदुस्तानाच्या इतर भागांतील जुन्या काळच्या शाळांतील शिक्षांची अशी माहिती एकत्र करून ती प्रसिद्ध केल्यास मोठी मनोरंजक होईल व आजचीं मुलें ती वाचून आपणांस उशिरां जन्मास घातल्याबद्दल परमेश्वराला दुवा दिल्याखेरीज राहाणार नाहींत !

रत्नदीप–दिवाळी अंक १९५७

० ० ०

# ८

## " श्रेष्ठ धर्म कुठला बोला ? "

### ( एक आठवण )

" प्रियोळकर तुम्ही का ? वा ! तुम्हांला तर गेले चार दिवस आम्हीं साऱ्या मुंबईभर सारखे शोधीत आहोंत ! रावसाहेब तुम्हांला भेटूं इच्छित आहेत !"

आमच्या ' स्वयंसेवक ' ( गोवा ) छापखान्याकरितां श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमधील अखंड टाइप विकत घेण्याकरितां म्हणून मी तेथें गेलों असतां काळें जाकिटवाले एक गृहस्थ, छापखान्याचे मालक कै. अनंतराव मोरमकर, गरजले !

" कोण रावसाहेब ? " मीं आश्चर्यचकित होऊन प्रश्न केला ?

" ' विस्तारांत ' लेख लिहितात ते प्रियोळकर तुम्हींच ना ? "

" होय ! " मी उत्तरलों.

" मग त्याचे संपादक रावसाहेब मोरमकर तुम्हांला माहीत नाहींत ? " असें म्हणून ते मोठ्यानें हंसले. आतां माझ्या डोक्यांत प्रकाश पडला. मोरमकरांचा व माझा पत्रव्यवहार होता, पण त्यांची रावसाहेब ही उपाधी मला परिचित नव्हती. १९२३ सालीं मुंबईत मी बी. ए. ची परीक्षा देण्याकरितां म्हणून आलों होतों. माझा मुख्य विषय मराठी हा होता. त्या वेळीं बी. ए. च्या मराठी विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा घेतली जाई. परीक्षक एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रो. टिपणीस व प्रो. द. वा. पोतदार हे होते. तोंडी परीक्षा घेण्याची जागा मुंबई मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या पोटमाळ्यावर होती. मला एक-दोन प्रश्न विचारल्यावर, ' तुम्हीं प्रियोळकर का,' असा प्रो. पोतदारांनीं प्रश्न केला व इतरांच्या परीक्षा आटोपे-पर्यंत मला खालींच बसावयास सांगितलें. परीक्षांचें काम संपल्यावर, त्या वेळचे ' इंदुप्रकाश' चे संपादक रा. न. र. फाटक यांच्याकडे उतरले होते, तेथें ते मला घेऊन गेले. रा. फाटकांचा व रावसाहेबांचा फार घरोबा होता. त्यांनींच मी मुंबईत आल्याचें रा. सा. मोरमकरांना सांगितलें व त्यांच्या सांगण्यावरूनच आरंभीं वर्णन केल्याप्रमाणें माझा शोध सुरू झाला.

रावसाहेब मोरमकर त्या वेळीं फणसवाडींत राहात असत. अनंतरावांनीं छापखान्यांतील एक नोकर दिला व त्याच्याबरोबर मी त्यांच्या बिऱ्हाडीं गेलों.

प्रथम इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर, तुम्हीं पुढें काय करणार, असा मला त्यांनीं प्रश्न केला. खर्च भागविण्यापुरती येथें कोठेंतरी नोकरी धरून एम्. ए. चा अभ्यास करूं इच्छितों, असें त्यांना मीं सांगितलें. मीं मुंबईतच राहाणार हें ऐकून त्यांना बरेंच समाधान झालें. " मग आमच्याकडे येत जा. ' विस्तारा 'च्या कामांत आम्हांला तुमची मदत पाहिजे आहे, " असें म्हणून त्यांनीं अभिप्रायाकरितां म्हणून माझ्याकडे कांहीं पुस्तकें दिलीं. त्यांची प्रकृति नादुरुस्त असल्यामुळें प्रसिद्धीकरितां आलेल्या लेखांची निवड व संपादन करावयाला ते मला सांगत व मीं लिहिलेले अभिप्राय व संपादित केलेले लेख यांवर नजर फिरवून चर्चा करीत. अशाप्रकारें मी रोज त्यांच्याकडे जात असें. पुढें ऑक्टोबरच्या सुमारास त्यांचा आजार वाढला व मलाही मलेरियानें एकाएकीं गांठलें. सुमारें पंधरावीस दिवस त्यांची व माझी अशा रीतीनें भेट होऊं शकली नाहीं. पुढें त्यांची प्रकृति कशी काय आहे, हें विचारण्याकरितां पत्र देऊन एक माणूस मीं श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमध्यें पाठविला. उत्तरादाखल त्यांचा मृत्युलेख असलेला ' विस्ताराचा ' अंकच तो बरोबर घेऊन आला !

मलेरियानें सतावल्यामुळें मुंबईची हवा माझ्या प्रकृतीला मानवत नाहीं, अशी मी आधींच कल्पना करून घेतली होती. त्यांत मुंबईत राहून कांहींतरी साहित्यसेवा करण्याची संधि मिळत होती, तीही रावसाहेब मोरमकरांच्या निधनामुळें नाहींशीं झाल्यामुळें मीं मुंबईला कायमचा रामराम ठोकण्याचा निश्चय केला व दुसऱ्याच दिवशीं गोव्याला जाणारी बोट पकडली.

गोव्यांत गेल्यावर माझ्या प्रकृतींत लवकरच आराम पडला, आणि आतां पुढें काय करावें, हा माझ्यापुढें प्रश्न उभा राहिला. माझ्या बरोबरच बी. ए. परीक्षा पास झालेल्या माझ्या एका सहाध्यायी मित्रानें वेंगुर्लें येथें एका खासगी हायस्कुलमध्यें शिक्षकाची नोकरी पत्करिली होती. या संस्थेंत एक जागा रिकामी आहे आणि तिकडची हवा गोव्यासारखीच असल्यामुळें सध्यां तरी मीं ही नोकरी धरावी, अशा आशयाचें त्याचें मला आग्रहाचें पत्र आलें.

याच वेळीं प्रो. धर्मानंद कोसंबी गोव्यांत प्रौढ मुलींची एक शाळा स्थापन करण्याच्या विचारांत होते. मीं या संस्थेंत काम करावें अशी मनीषा त्यांनीं एक-दोनदां मजजवळ व्यक्त केली होती; परंतु मुलांकरितां प्रथम एक हायस्कूल स्थापन करून त्यांच्यांतूनच पुढें शक्य तर मुलींकरितां शाळा अस्तित्वांत आणावी, असें माझें मत मीं त्याच्यापुढें मांडलें. त्याचा ते विचार करीत होते. वेंगुर्ल्यांत मला कायम राहावयाचें नव्हतेंच; परंतु सध्यां घरीं रिकामी बसून राहाण्यापेक्षां शिकविण्याचा अनुभव मिळेल म्हणून मीं त्या शाळेंतील ही नोकरी स्वीकारली व जून १९२४ मध्यें तेथें जाऊन कामावर रुजू झालों. या वेळीं वेंगुर्लें येथें एक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम ४७५१९ दि: ७/१९६१
क्र ९६७६ नों दि २६/३/६०

राष्ट्रीय शिक्षणाची शाळा होती. तिचे मुख्याध्यापक दर रविवारीं संस्थेच्या मदतीकरितां गांवांत भिक्षा मागत. भिक्षेकरितां म्हणून असे एके दिवशीं ते मजकडे आले असतां, कांहीं दिवसांनीं त्यांच्या शाळेतर्फे सुरू होणाऱ्या श्रीगणेशोत्सवांत मीं एक व्याख्यान द्यावें, अशी त्यांनीं अगत्याची विनंती केली. कोंकणांत श्रीगणेशचतुर्थीच्या सणाचें फार मोठें प्रस्थ असतें; त्यामुळें हायस्कूलला एक आठवडा सुटी मिळे. मी त्या दिवसांत गोव्याला घरीं जाण्याचें ठरविलें होतें. या गडबडींत मला व्याख्यानाची तयारी करावयास सवड मिळेल, असें मला वाटत नव्हतें; तरीपण त्या निष्ठावंत कार्यकर्त्याचा शब्द मला मोडवेना. शक्य झालें तर व्याख्यान देईन, नाहींपेक्षां दोनचार कविता गाऊन दाखवीन, असें सांगून मीं त्यांना वाटेला लावलें. श्रीगणेशचतुर्थीनंतर गोव्याहून बोटीनें मी परत आलों, त्याच दिवशीं संध्याकाळीं माझ्या भाषणाकरितां दिवस ठेवला होता. मी व्याख्यानच देणार असें ऐकून चालकांना बरें वाटलें व त्यानंतर दोन कविता गाऊन दाखविण्याबद्दल त्यांनीं गळ घातली. त्याप्रमाणें मीं तीन कविता गाऊन दाखविल्या. त्यांपैकीं दोन कविता कोणत्या हें मला आज आठवत नाहीं. तिसऱ्या ज्या कवितेनें मोठी खळबळ उडवून दिली, ती आजच्या परिस्थितींतही आकर्षक वाटण्यासारखी असल्यामुळें खालीं देतों :—

## श्रेष्ठ धर्म कुठला बोला ?

( दुर्भाटपासून पणजीस गेलेल्या मांडवी नदींतून रात्रींच्या वेळीं होडीनें जातांना, जुन्या गोव्यापासून किंचित् अंतरावर सुमारें रायबंदरच्या सुमारास पाहिलेला भयजनक प्रकार व गोविंद सुकाणूवाल्यानें कथन केलेली करुण कहाणी )

( चाल–उद्धवा शांतवन कर जा )

**बोलली बोल हे बाला ।**
**‘ श्रेष्ठ धर्म कुठला बोला ? ’ ॥ धृ० ॥**
**फिरतांचि दृष्टि कालाची । उलथती चंड डोलारे !**
**साम्राज्यें वैभवशाली । मिळताति धुळीला बा रे !**
**रावाचे बनती रंक । देखुनियां हृदय थरारे !**
**रोमाची झाली माती !**
**आर्यांच्या झोळी हातीं !**
**कैसरनृप तृण धरि दांतीं !**
**अडवील कोण वद काला । येतांचि तयाचा घाला !**

( २ )

गोमंतक सुवर्णभूमि । कन्यका सुभारतभूची,
संपदा–शौर्य–यशवंती । नृपनगरी या कोंकणची–
होती; परि आतां कसाचि ? । जाहली बटिक परक्यांची !
जणुं जनकनंदिनी सीता,
लंकेंत झुरे दुःखार्ता,
ही सती तशी निज कांता—
आठवी महाराष्ट्राला । गुंफिते अश्रुंची माला !

( ३ )

चवथिच्या चांदण्या रात्रीं । चंद्राची छकुली कोर,
नव नाव डुले आकाशीं । तो अफाट दरिया थोर,
मांडवींत अमुची नौका । प्रतिबिंब जणूं गुलजार !
देखुनी जुन्या गोव्याचीं
शिखरें सु–धवल चर्चांचीं,
कीं पृष्ठें इतिहासाचीं ।
वदलों गद्‌गदुनि—" काला ! । मोठाच तुझा हा घाला ! "

( ४ )

' मोठाच–खरा–हा–घाला । श्रेष्ठ धर्म–कुठला बोला ! '
हा ध्वनी आर्त युवतीचा । मम कर्णपथीं आदळला !
पडसादचि मद्वचनाचा । कीं सळसळला हा वल्हा ?
ऐकूं ये पुन्हां ते शब्द !
"—हें काय अरे गोविंद ? "
"—छू ! छू ! कर गडबड बंद !
सांगेन पुढें तुज सगळें " । बोलला सुकाणूवाला !

( ५ )

नाव ती पुढें लव जातां । "—हं ! पहा तटावर आतां ! "
तो वदला तिकडे बघतां । अंगावर आला कांटा !
सोडुनी पाय पाण्यांत । देखिली स्त्री कुणी रडतां !
मानेवर कुंतलभार,
घट्ट घे उराशीं पोर,
चुंबि त्या मटामट फार !
ऐकिलें पुन्हां वचनाला । " श्रेष्ठ धर्म–कुठला–बोला ! "

(१४)

" क्रोधांध दुष्ट चांडाळ । वच बोलुनि कांहींबाहीं,
हाणिली लाथ जोरानें । कासाविस झाली बाई !
बाळही भुई आदळला । निश्चेष्टित पडली माई ?
शुद्धीवर जेव्हां आली,
बाळास कवळुनी वदली—
" पतकरूं कुणा यावेळीं
हिंदु वा पत्निधर्माला ? "। " श्रेष्ठ-धर्म-कुठला-बोला ? "

( १५ )

" घल आ-इ दु-धाला माला " । निष्पाप बोलला बाळ,
" घल आइ हिंदु घलमाला ! " । वाटले असे तिज बोल !
बोलला बालमुखिं चिंती । वैकुंठनाथ वेल्हाळ !
कल्पना घोर तिज सुचली,
मांडवी नदी आठवली !
दचकली बावरी वदली—
ठेवीन कुठें परि बाळा : । अंधार चहुकडे झाला !

( १६ )

ठेविला जरी या मागें । बाटवोनि ख्रिस्ती बाळा-
करितील. हाय दुर्दैवा ! । होईल काळ गोताला !
कुलकलंक मागें असला । राहूं न आर्यधर्माला ! "
चुंबुनी पुसे त्या माय
" येतोस मजसवें काय ? "
—नभिं चमकत बिजली जाय—
देखिलों हांसतां बाळा । " हा तयार निघण्या झाला ? "

( १७ )

" रात्र ती कृष्ण अंधारी । धांवतां अडखळे बाळी !
मांडवी तटावर येतां । फोडिली दीर्घ किंकाळी !
ऐकुनी कृष्ण-कैतानें । पातला धराया जवळीं !
बाळास उरीं कवळून,
ती घेत उडी रोखून,
बोल हे-हेच बोलून—
" मोठाच-खरा-हा-घाला । श्रेष्ठ-धर्म-कुठला बोला ? "

(१८)

आरडोनि मी मोठ्यानें । बोलिलों-" सोड शंकेस !
साध्वि ! तुवां या दिव्यानें । अर्चिलेंचि निज धर्मास.
आर्यधर्म तुमच्या योगें । वांचला आजवर खास ! "
तों नवल घडे; तेथून—
तारका चकाकत दोन—!
करिति नभःपथिं उद्गमन !
राहिल्या जडून नभाला । तो प्रकार पुढतिं न दिसला !

(१९)

उपनांव काय वदुं त्याचें ? । छे । नाहीं सांगायाचें !
ऐकुनी तदुपनामाच्या । गळतील अश्रु लोकांचे !
दावुं का तारकाद्वय तें । भूषवी नभा जें साचें.
जाउं द्या सूर्य अस्तासी,
उगवोत तारकारासी,
दावीनचि खास तुम्हांसी
अट एक असे परि त्याला । श्रेष्ठ धर्म कुठला बोला ? ।

दुसऱ्या दिवशींचे नियोजित वक्ते कांहीं कारणामुळें येऊं शकत नसल्यामुळें त्या दिवशीं, तेथील मिशन हायस्कुलांतील एक पदवीधर शिक्षक ख्रिस्तचरित्रावर बोलणार, असें जाहीर करण्यांत आलें. या हिंदी ख्रिस्ती गृहस्थांसंबंधीं मी पुष्कळच ऐकत होतों; परंतु त्यांना पाहाण्याचा कधींही योग आला नव्हता. हे स्वतः रसिक मराठी कवि होते. पुष्कळ हिंदु मुलें त्यांच्या नादीं लागलीं होतीं, आणि बाहेर व्याख्यानांत व वर्गांतही हिंदुधर्माची ते नेहमीं निंदा करतात, अशी लोकांची तक्रार होती. त्यांच्या व्याख्यानाच्या वेळीं हिंदु लोक, ख्रिस्ताचें त्यांनीं नांव उचारल्याबरोबर ताशे बडवितात, असेंही लोक सांगत ! माझ्या कविता-गायनाच्या दुसऱ्याच दिवशीं सकाळीं कांहीं विद्यार्थी, मीं गाइलेल्या कवितांची नक्कल करून घेण्याकरितां म्हणून मजकडे आले. माझ्या कवितागायनाच्या वेळीं सदर ख्रिस्ती गृहस्थ हजर होते व त्यांच्या मुद्रेवरील त्यावेळच्या छटांवरून ते आपल्या व्याख्यानांत मजवर टीका केल्याशिवाय राहणार नाहींत, असें त्यांपैकीं एक विद्यार्थी मला म्हणाला.

ठरल्याप्रमाणें ख्रिस्तचरित्रावरील त्यांचें व्याख्यान रसाळ व वक्तृत्वपूर्ण असेंच झालें. आमच्या विद्यार्थ्यानें व्यक्त केलेली शंका मात्र अगदींच अनाठायीं नव्हती. आपल्या व्याख्यानाच्या शेवटीं मला उद्देशून पांचदहा मिनिटें, " अरे

कवे, तूं अशा प्रकारचीं काव्यें रचून परधर्माविषयीं तरुणांचीं मनें कलुषित करूं नकोस, " अशा अर्थाचें त्यांनीं वक्तव्य केलें ?

मला त्याला उत्तर देणें प्राप्तच होतें. मी बोलण्यास उभा राहिलों. यावेळीं गोवा हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश, डॉ. नोरोञ्ज यांनीं लिहिलेल्या गोव्यांतील हिंदूंच्या जुन्या ख्रिस्तीकरणावरील एका ग्रंथाचें ' विविधज्ञानविस्तारा-' करितां मीं परीक्षण लिहिलें होतें, व तें त्या मासिकांत प्रसिद्धही झालें होतें. कै. गजानन भास्कर वैद्य प्रसिद्ध करीत असलेल्या हिंदु मिशनरीच्या वाचनानें प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांच्याही लीला माझ्या चांगल्याच परिचयाच्या झाल्या होत्या. या कॅथलिक व प्रॉटेस्टंट मिशनऱ्यांच्या दुष्कृत्यांच्या सुमारें अर्धा पाऊण तास मीं पाढा वाचला ! क्रिस्त जरी केवढाही मोठा असला, तरी त्याच्या नांवावर चालणाऱ्या धर्माचा प्रसार त्याच्या शिकवणीच्या अगदीं विरुद्ध मार्गांनीं हिंदु-स्थानांत करण्यांत आला व येत आहे, आणि परधर्मनिंदा ही ख्रिस्ती मिशनऱ्यांचेंच मुख्य भांडवल असल्याचें मीं सांगितलें. हिंदुधर्म जगांतील सर्वांत परधर्मसहिष्णु असा धर्म आहे. परधर्माची निंदा करण्याचें ह्या हिंदु धर्मीयांना कधींही कारण पडलें नाहीं, आणि मीं तर ती मुळींच केलेली नाहीं. आपण साप साप म्हणून निष्कारण दोरी बडवीत आहां. स्वार्थाला वश होऊन गोव्यांतील एक हिंदु तरुण ख्रिस्ती धर्म स्वीकारतो व आपल्या पत्नीवर तो पत्करण्याची बळजबरी करतो. स्वधर्मरक्षणाकरितां ती आपल्या मुलासहित मांडवी नदींत उडी घेते. अशा प्रकारें हिंदुधर्मरक्षण केलें खरें, पण त्यामुळें पत्नीधर्म बुडाला, अशी तिला भ्रांति पडते. हिंदुधर्म व पत्नीधर्म यांपैकीं श्रेष्ठ कोणता, अशी शंका उत्पन्न झाल्यामुळें तिला पिशाचयोनि प्राप्त होते आणि **श्रेष्ठ धर्म कुठला बोला** ? अशी ती सतत ओरडत राहते ! ( वरील कवितेंत जाड्या टाइपांत छापलेले शब्द या पिशाचाच्या तोंडचे आहेत. ) पुढें कवीनें तिनें रक्षण केलेला हिंदु धर्मच श्रेष्ठ असें निक्षून सांगितल्यामुळें तिची संशयनिवृत्ति होऊन तिला सद्गति प्राप्त होते. " श्रेष्ठ धर्म कुठला बोला ? " या शब्दांत हिंदुधर्म व ख्रिस्तीधर्म यांची तुलना नसून पत्नीधर्म व हिंदुधर्म यांची तुलना आहे, अशा आशयाचें माझें भाषण झालें.

हा एकंदर प्रसंग अनपेक्षित होता. श्रोते तन्मय होऊन ऐकत होते. एकादी टांचणी जमिनीवर पडली असती तरी तिचा आवाज त्या वेळीं ऐकूं आला असता ! तो ख्रिस्ती गृहस्थ पुनः प्रत्युत्तर देण्यास जेव्हां उभा राहिला तेव्हां तर लोकांच्या उत्सुकतेला पारावारच राहिला नाहीं. आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं माझें सारें म्हणणें कबूल केलें. आपला हिंदुस्थानांतील धर्म एवढा थोर असतां हे परके लोक सहा पैशांचीं पुस्तकें वांटून आपली निंदा करतात. हिंदी ख्रिस्त्यांची स्थिति

तर अतिशयच वाईट आहे. हिंदु बांधव त्यांना जवळ करीत नाहींत आणि हिंदी खिस्त्यांचें पार्सल बांधून युरोपांत पाठविल्यास तें लाथ मारून परत करण्यांत येईल. जवळ जवळ असे शब्द त्याच्या उत्तरांत होते.

खिस्तावरील त्यांची निष्ठा निस्सीम होती याबद्दल मला शंका नाहीं; परंतु यावेळीं त्याचा देशाभिमान उफाळून वर आला होता. हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पुष्कळ हिंदी खिस्ती अलीकडे देशाभिमानी झालेले दिसतात. एके काळीं स्वतःला पोर्तुगीज म्हणविणारे अनेक गोवानीज आज राष्ट्रीय चळवळीच्या आघाडीला असलेले आपण पाहतों. पूर्वीं Christianity म्हणजे Westernity अशी समजूत होती व अजून ती नाहींशीं झालेली नाहीं. परकीय राज्य स्थिर करण्याच्या कामीं खिस्ती धर्माचा उपयोग आजवर करण्यांत आला. अलीकडील एका इटालियन प्रवाशानें हिंदी खिस्त्यांचें वर्णन ' bread and butter Christians ' अशा शब्दांत केलें आहे ! अशा स्थितींत तीस वर्षांमागें भारताबद्दल अभिमान बाळगणाऱ्या या बाणेदार गृहस्थाचें कौतुक केलें पाहिजे.

या प्रसंगाची हकीकत दुसऱ्या दिवशीं गांवभर पसरली. हिंदु धर्माचा निंदक म्हणून प्रसिद्ध असलेला तो खिस्ती गृहस्थ अशी कबुली देईल, या गोष्टीवर कोणाचा विश्वासच बसेना ! या व्याख्यानाचा रिपोर्ट लिहून द्यावा, असा या शाळेंत शिक्षक असलेल्या स्थानिक ' किरात ' नांवाच्या पत्राच्या संपादकांनीं मला फार आग्रह केला; परंतु एक तर त्या गृहस्थाला त्याच्या प्रसिद्धीकरणानें वरिष्ठांकडून त्रास होईल आणि शिवाय माझ्या आईला ऑपरेशनकरितां तेथील मिशनच्या हॉस्पिटलमध्यें लवकरच आणावयाचें असल्यामुळें, अशावेळीं तो प्रसिद्ध होणें मला इष्ट वाटलें नाहीं. पुढें हें ऑपरेशन होऊन त्याचा कांहीं उपयोग नाहीं असें ठरल्यावर तिला परत घरीं नेली. शेवटीं हा रिपोर्ट मला लिहून द्यावा लागला व बऱ्याच उशिरां तो प्रसिद्ध झाला. मिशनच्या अधिकाऱ्यांच्या तो नजरेस आल्यावर, असे उद्गार आपण काढले होते कीं काय, अशी पृच्छा सदर खिस्ती गृहस्थाला करण्यांत आली, आणि बाणेदारपणें त्यांनीं ' होय, ' असें उत्तर दिल्यावर त्यांना जागेवरून कमी करण्यांत आलें, असेंही माझ्या कानावर आलें. पुढें त्यांची—माझी एकदोनदां गांठ पडली; परंतु या गोष्टीच्या खरेखोटेपणाबद्दल प्रश्न करणें मला बरोबर वाटलें नाहीं.

माझी आई ता. ३१ डिसेंबर १९२४ रोजीं वारली. माझ्याकडे मॅट्रिकचे दोन विषय असल्यामुळें तिच्या आजारांत व मृत्यूनंतरही शाळा सहसा मीं चुकविली नाहीं; कारण माझ्यापायीं विद्यार्थ्यांचें नुकसान होऊं देणें बरोबर नव्हतें. माझ्या प्रकृतीवर या सर्वांचा विलक्षण परिणाम झाला होता. आमच्या शिक्षकमित्रांच्या लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहिली नाहीं. प्रिलिमिनरीच्या प्रश्नपत्रिका

काढून दिल्यावर परीक्षा चालू आहेत तोंपर्यंत एक आठवडाभर तुम्हीं मुंबईला जाऊन या, म्हणजे तुम्हांला बरें वाटेल, असा त्यांनीं मला आग्रह केला. त्याप्रमाणें जानेवारी १९२५ च्या अखेरीस मीं मुंबईला आलों. माझी वरील कविता 'विविध-ज्ञानविस्तारा'च्या डिसेंबरच्या अंकांत नुकतीच प्रसिद्ध झाली होती. मुंबईत आल्यावर मी श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमध्यें गेलों. त्या वेळीं या कवितेसंबंधीं श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व माधवराव पटवर्धन ह्यांच्याकडून आलेलीं प्रशंसापर पत्रें रामभाऊ तटणीस यांनीं मला दाखविलीं. माझ्या कवितेनें कोंकणांतील एका गांवांत उडवून दिलेली खळबळ 'किरातां' तील रिपोर्टावरून त्यांना चांगलीच माहिती असल्याचें दिसलें. रामभाऊ तटणीस यांना मीं या वेळीं प्रथमच पाहिलें. प्रो. नरहरपंत फाटक यांनीं 'रावसाहेबां'चें नातू म्हणून त्यांचा मला परिचय करून दिला. या वेळीं 'विविध वृत्त' साप्ताहिक त्यांनीं नुकतेंच सुरू केलें होतें. तेथील या पांच–सहा दिवसांच्या मुक्कामांत मी त्यांच्याकडे रोज जात येत असें. एके दिवशीं अनंतराव मोरमकर व रामभाऊ तटणीस या दोघांनींही मीं मुंबईला येऊन 'विस्तारा'चें काम पाहावें, असा फारच आग्रह केला व मलेरियाची माझी भीतिही त्यांनींच घालविली. त्याप्रमाणें मीं वेंगुर्ल्याला गेलों व लगेच शाळेचा राजीनामा देऊन मुंबईत पुनः येऊन स्थायिक झालों व माझ्या जीवितक्रमाला निराळेंच वळण मिळालें. त्याला माझी सदर कविताही कांहीं अंशीं कारण झाली असणें शक्य आहे.

विविधवृत्त–दिवाळी अंक १९५५

◎ ◎ ◎

# ९

## कादंबरीलेखनाच्या फंदांत मीं कसा अडकलों ?

सुमारें एका वर्षामागें पुण्याच्या कॉन्टिनेन्टल प्रकाशनाच्या दुकानांत गेलों होतों. तिकडून परत निघतांना मालक रा. कुलकर्णी म्हणाले, " मुंबईला परत जातांना गाडींत वाचण्यास एकादें पुस्तक देऊं कां ? "

" द्या, पण अगदीं अलिकडे प्रसिद्ध झालेलें ! " मीं उत्तरलों.

त्यांनीं बांधून दिलेलें पुस्तक कोणतें आहे हें न पाहतां तें घेऊन तसाच मी घाईघाईनें बाहेर पडलों.

दुसऱ्या दिवशीं गाडींत बसल्यावर मला त्यांच्या पुस्तकाची आठवण झाली. मीं बॅग उघडली आणि पुस्तक बाहेर काढलें. वेष्टन सोडून पाहतों तों तें " अखेरचें बंड "–प्रा. फडक्यांच्या एका कादंबरीची संक्षिप्त आवृत्ति. ती कादंबरी आहे हें पाहून माझ्या कपाळाला आंठ्या पडल्या. एके काळीं मी कादंबरीचा एक अधाशी वाचक होतों. मला आठवतें कीं, लहानपणीं ' निहालकुंवर ' नांवाची एक चारशेंवर पृष्ठांची भलीमोठी कादंबरी मीं सबंध रात्र जागून वाचून पुरी केली होती; कारण आमचे बंधु ज्याच्याकडून ती आणली, त्याला ती दुसऱ्याच दिवशीं परत करणार होते. अलीकडे मीं कादंबऱ्या वाचल्या असतील; पण त्या परीक्षेला नेमल्यामुळें प्रश्न काढण्याकरितां. किंवा एकाद्या लेखकमित्रानें भेटीदाखल दिल्यास केवळ भिडेखातर. वेळेच्या अभावीं अलीकडे मौजेकरितां कादंबरी वाचणें मला जमत नाहीं. कादंबरीच्या ऐवजीं हें जर एकादें भाषाशास्त्र, संतवाङ्मय, चरित्र, इतिहास किंवा तत्त्वज्ञान अशासारख्या विषयावरचें पुस्तक असतें तर तें मीं जास्त आस्थेनें वाचलें असतें. सुभाषचंद्र बोस यांच्या चरित्रावर प्रा. फडके यांनीं एक कादंबरी लिहिली आहे, असें मीं ऐकलें होतें. " अखेरचें बंड " ही तीच असावी अशी मला शंका आली. कांहीं का असेना, इतक्या प्रेमानें प्रकाशकमित्रांनीं गाडींतील वेळ घालविण्याकरितां पुस्तक दिलेलें आहे म्हणून मीं तें वाचावयास सुरुवात केली; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, पुस्तक वाचून पुरें झालें तेव्हांच मीं तें हातांतून खालीं ठेवलें. याचें कारण प्रा. फडक्यांची आकर्षक लेखनशैली हेंच केवळ म्हणतां येणार नाहीं. कादंबरीच्या अवगुंठनाखालीं तें एका प्रख्यात महाराष्ट्रीय नटाचें चरित्र आहे, असें

मला आढळलें. चरित्र म्हणून तें मीं वाचलें. अशा प्रकारची कादंबरी लिहिण्यापेक्षां सरळ चरित्रच कां लिहूं नये ? कदाचित् कायद्याचा दंडुका चुकविण्याकरितां कादंबरीचा आश्रय करावा लागत असेल. या कादंबरीचा नायक व त्याच्याभोंवतालचीं इतर पात्रें यांच्या ज्या भानगडी या चरित्रांत चित्रित केल्या आहेत त्या सर्वच वस्तुस्थितीला पूर्णपणें धरून आहेत कीं काय, हें मला माहीत नाहीं. सत्य असल्या तरी त्यांचें चित्रण अशाप्रकारें करणें औचित्याला कितपत धरून होईल, हाही प्रश्नच आहे. कादंबरीचा चरित्रावर टाकलेला पडदा अगदींच झिरझिरित आहे. प्रि. गोविंद चिमणाजी भाटे यांनीं " प्रेम कीं लौकिक ? " या नांवाखालीं आत्मचरित्रात्मक अशी एक कादंबरी लिहिली आहे; पण तेच स्वतः तिला जबाबदार आहेत. " भंगलेलें देऊळ " या नांवाची रा. ग. त्र्यं. माडखोलकर यांनीं एक कादंबरी लिहिली आहे. तीहीपण अशाच कांहीं व्यक्तींवर आधारलेली आहे, असें मला या कादंबरीमुळें दुखवलेल्या एका व्यक्तीकडूनच प्रथम कळलें. एकादा कादंबरीकार ज्या वेळीं आपल्या पात्रांचें स्वभावचित्रण करतो, त्या वेळीं तो जगावेगळें कांहीं सांगत नसतो. आपल्याभोंवतीं जीं माणसें वावरतात, त्यांच्या स्वभावांतील वैशिष्ट्यें टिपून घेऊन तो आपलीं पात्रें निर्माण करीत असतो; परंतु हीं पात्रें अशीं असावींत कीं, हीं स्वभाववर्णनें कुणाचीं त्या व्यक्ती लोकांना सहसा कळूं नयेत. भ्रमर हा निरनिराळ्या फुलांतून मध गोळा करतो व आपल्या पोळ्यांत सांठवतो; परंतु तो कोणत्या फुलांतून घेतला हें सहसा ओळखतां येत नाहीं. तसेंच या पात्राचें असलें पाहिजे; परंतु या कादंबरींत प्रत्यक्ष व्यक्ती सहज कळून घेतात; किंवा पुष्कळदां तशा त्या लोकांना कळाव्या असाच लेखकांचा बहुधा हेतु असावा. अशा वेळीं ऐतिहासिक कादंबरीच्या बाबतींत जें पथ्य पाळावयाचें तेंच अशा आधुनिक व्यक्तिप्रधान कादंबरींत पाळलें पाहिजे.

महात्मा गांधींच्या वधावर स्टॅन्ले वोल्पर्ट् नांवाच्या एका इंग्रजानें " नाईन् अवर्स् टु राम " नांवाची एक कादंबरी अलीकडेच लिहिली आहे. तिचा परिचय प्रा. ना. सी. फडके यांनीं 'किर्लोस्कर' मासिकांत नुकताच ( ऑगस्ट ) करून दिलेला आहे. त्यांत ते लिहितात,

" ऐतिहासिक कादंबरी लिहिणाऱ्याला सत्य आणि कल्पित यांचें मिश्रण करावेंच लागतें. त्यानें आपल्या कलाकृतीच्या रंगतीसाठीं प्रत्यक्ष व्यक्तीच्या भोंवतीं कांहीं कल्पित व्यक्ती उभ्या केल्या तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं; परंतु हें करतांना प्रत्यक्ष इतिहासाला कुठें धक्का लागणार नाहीं, अशी खबरदारी त्यानें घेतलीच पाहिजे. वोल्पर्ट्साहेबांनीं ही खबरदारी तर घेतली नाहींच; पण शिवाय आणखीहि एक चमत्कार केला आहे. त्यांनीं सावरकरांचा 'धोंडो कानेटकर' केला

आहे. वल्लभभाईंचा 'पी. के. शंकराचार्य राव' बनविला आहे. एका मोठ्या संस्थानाच्या महाराजांना 'शिवाजी राव' बनविला आहे. त्यांच्या मंत्र्यांना 'शामा प्रल्हाद' असें नांव देऊन श्यामाप्रसाद यांच्याशीं वाचकांनीं घोटाळा करावा अशी व्यवस्था केली आहे. बिर्लांना 'गुप्ता' केलें आहे आणि जें बिर्ला हाऊस गांधीवधामुळें जगभर प्रसिद्ध झालें आहे, त्याला नांव दिलें आहे 'गुप्ता-हाऊस'!

"लेखकाचा हा स्वैरपणा सर्वस्वीं निषेधार्ह आहे...गोडसेचे 'गुरुजी' असे उल्लेख करून लेखकानें जें-जें लिहिलें आहे तें अशा धोरणानें कीं, वाचकाला वीर सावरकरांची आठवण व्हावी. मग 'धोंडो कानेटकर' या भिकार नांवाची योजना कशासाठीं? लेखकाची कदाचित् कल्पना असेल कीं, प्रत्यक्ष खऱ्या नांवांना बगल देऊन कल्पित नांवांचा वापर केला कीं बदनामीच्या लचांडांतून आपण सुटूं आणि त्या व्यक्तीचें मनःपूत चित्रण आपण करूं शकूं; परंतु बोल्पर्ट्साहेबांच्या लक्ष्यांत हें आलें नाहीं कीं, कायद्याच्या कांटेकोर कात्रींतून सुटण्याची त्यांची ही क्लृप्ति जरी यशस्वी झाली तरी भारतीय जनतेच्या न्यायासनासमोर त्याला उभें राहावें लागेलच. बिर्ला हाऊसच्या उद्यानाचा कानाकोंपरा लेखकानें वर्णिला आहे. पण त्याची कादंबरी वाचणाऱ्यांच्या मनांत अशी नोंद होईल कीं, गांधीजींचा खून झाला गुप्ता हाऊसाच्या उद्यानांत, बिर्ला हाऊसच्या नव्हे! अविवाद्य ज्ञात अशा ऐतिहासिक पुराव्याचा हा धडधडीत विपर्यास आहे."

प्रा. फडके यांनीं व्यक्त केलेल्या या संतापयुक्त विचारांशीं मी सहमत आहें. प्रा. फडके यांनीं हें पथ्य "अखेरचें बंड" ही कादंबरी लिहितांना स्वतः कितपत पाळलें आहे, हें मात्र मला सांगतां येणार नाहीं. प्रा. फडके यांच्या लिखाणांत एक गोष्ट मला खटकली तीही थोडेसें विषयांतर झालें तरी या ठिकाणीं नमूद करण्याची परवानगी घेतों. उपरिनिर्दिष्ट बोल्पर्ट् या फडतूस इंग्रजाचा उल्लेख करतांना ठिकठिकाणीं 'बोल्पर्ट्साहेब' असा त्यांनीं केलेला आहे.

साहेब म्हणजे स्वामी. शिवाजीनें करविलेल्या राजव्यवहारकोशामध्यें,

"राजा ज्ञेयः पादशाहः स्वामी साहेब ईरितः ॥"

अशी पहिलीच ओळ आहे. इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत होतें तोंपर्यंत इंग्रज आमचे 'साहेब' म्हणजे स्वामी होते. इंग्रजांचा उल्लेख 'साहेब' असा न केल्याबद्दल एका मिशनरी 'साहेबा'नें कोणातरी स्वाभिमानी महाराष्ट्रीय व्यक्तीवर अराजक म्हणून जोराची तक्रार केल्याचें मुंबई सरकारच्या दप्तरखान्यांत किंवा अन्यत्र कोठेंतरी वाचल्याचें मला आठवतें. भारत स्वतंत्र झाल्यावर इंग्रजांना 'साहेब' असें संबोधण्याचें आतां बिलकूल कारण राहिलेलें नाहीं; परंतु दीडशें वर्षें जी आपल्याला संवय लागली आहे ती आपली सुटत नाहीं. अजूनही आपले पुष्कळ

लोक इंग्रजांचा उल्लेख ‘ साहेब लोक ’ असा बोलण्यांत व लिहिण्यांत करतात ! शरीरानें आपण स्वतंत्र झालों असलों तरी आपल्या मेंदूची गुलागगिरी अद्याप सुटलेली नाहीं, त्याचें हें लक्षण आहे ! असो.

एकाद्या प्रत्यक्ष व्यक्तीला आपल्या कादंबरीमध्यें किंवा नाटकामध्यें लोकांना कळून येईल अशा प्रकारें उभें करणें हें अगदीं गर्ह्य आहे, असें मानणाऱ्यांपैकीं मी एक आहें; पण स्वतः माझ्याच हातून असें कृत्य घडलें आहे. मात्र त्याच्या मुळाशीं सद्हेतु होता. कांट्यानें कांटा काढतों ना, तसा. त्याचें असें झालें :

१९३० सालीं नुकतीच नाताळची सुटी पडली होती. डिसेंबरची २४ तारीख होती. रविवारीं किंवा अशा सुटींच्या दिवशीं श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमध्यें नियमानें जमण्याचा आमचा शिरस्ता होता. रा. अनंतराव मोरमकर व रामभाऊ तटणीस सकाळीं आठ वाजतांच हजर होत. बाकीची मंडळी हळूहळू साडेआठ-पर्यंत जमत. मला त्या दिवशीं तिकडे जावयाला जरा उशीरच झाला होता. मी आंत शिरतों तों कसल्यातरी विषयावर जोराची चर्चा चालली होती. मी बसून स्वस्थपणें ऐकूं लागलों. डॉ. केतकरांची “ब्राह्मणकन्या” ही कादंबरी त्यावेळीं नुकतीच प्रसिद्ध झाली होती. तिच्यामध्यें संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांना उभें करून त्यांची चेष्टा व कांहीं जातींचा उपमर्द केल्याबद्दल हे लोक संतापले होते, असें दिसलें. प्रो. वसंतराव नाईक यांनीं या कांदबरीवर जोराची टीका झाली पाहिजे, असें मत व्यक्त केलें. रा. सखाराम राव नांवाचे एक संशोधकवृत्तीचे परभु गृहस्थ होते. त्यांनीं ही कामगिरी रा. वा. नाडकर्णी यांच्यावर सोंपवावी, असें सुचविलें व तें सर्वांना मान्य झालें. रा. नाडकर्णी हे एक मार्मिक आणि चुरचुरीत लिहिणारे गृहस्थ होते. पानिपत व पेशवे दप्तर यांच्यावरील ‘ विविधज्ञानविस्तारा’मधील त्यांचे लेख प्रसिद्ध आहेत. त्या सर्वांचें बोलून झाल्यावर मीं हळूच म्हटलें, “ मग डॉ. केतकरांचा जाहिरातीचा खर्च वांचला म्हटलें पाहिजे. ” “ तो कसा ? ” कोणीतरी विचारलें. “ तुम्हीं टीका केली म्हणजे त्यांच्या कादंबरीची आयतीच जाहिरात होईल व तिच्याकरितां वेगळा खर्च त्यांना करावा लागणार नाहीं. शिवाय, डॉ. केतकरांनीं राज-वाड्यांना आज नव्यानेंच उभें केलें आहे असें नाहीं. “ गोंडवनांतील प्रियंवदें- ” तील इतिहाससंशोधक राजवाडेच होते. लाला लजपतराय यांनाही आपल्या एका कादंबरींत त्यांनीं ओढलें आहे. ही त्यांची नेहमींचीच खोड आहे ! ”

“ मग तुम्हीं काय करावें म्हणतां ? ” रा. अनंतराव मोरमकरांनीं विचारलें. त्यांचा माझ्या मतावर फार मोठा विश्वास होता.

"या गोंडवनांतील गांवगुंडावर तुम्हीं एकादी कादंबरी प्रसिद्ध करा." मी उत्तरलों.

"एकदम मान्य! ही कादंबरी तुम्हीच लिहा. 'विविधवृत्ता'च्या नव्या वर्षाच्या पहिल्या अंकापासूनच सुरू करूं. ठरलें!" रामभाऊ म्हणाले. सर्वांनीं उभें राहून या ठरावाला मी "नाहीं, नाहीं" म्हणत असतांना दुजोरा दिला!

मी 'विविधवृत्ता'मध्यें अधूनमधून स्वतःचें नांव न देतां गोष्टी लिहीत असें; परंतु स्वतंत्र कादंबरी मी लिहूं शकेन, असें मला कधींच वाटलें नाहीं. 'विविधवृत्ता'च्या दिवाळी अंकामध्यें मीं नाटकेंही लिहीत असें. तीं वाचून रा. रघुवीर सावकार यांनीं आपल्या नाटकमंडळीकरितां एक नाटक लिहिण्याबद्दल मला विनंति केली होती; पण मला आत्मविश्वास नसल्यामुळें मीं त्यांना होकार दिला नाहीं; परंतु कादंबरी लिहिण्याच्या बाबतींत या लोकांना माझ्या होकाराची गरजच नव्हती. अराजक लोकांमध्यें त्यांपैकीं एकाद्या सभासदावर एकादी कठीण कामगिरी सोंपविल्यावर त्यानें ज्याप्रमाणें आपला जीव धोक्यांत घालून ती मुकाट्यानें मान्य करावी लागते, त्याप्रमाणें आमच्या या मंडळीचा खाक्या होता! नाताळच्या सुटीचे दहा दिवस मोकळे मिळाले म्हणून मीं खुषींत होतों. तोंच ही विलक्षण कामगिरी अंगावर पडल्यामुळें मीं अगदीं बेचैन होऊन गेलों.

ठरल्याप्रमाणें दोन-तीन दिवसांतच मीं कादंबरीचें पहिलें प्रकरण लिहून दिलें; परंतु पुढील प्रकरणें दर आठवड्याला नियमितपणें लिहून होतील किंवा नाहींत, याची मला भीति पडली. दुसरें प्रकरणही वेळेवर लिहून झालें; पण तिसरें प्रकरण लिहावयास घेतलें तोंच मला अंगांत ताप भरला. ताप असतांनाच मीं तिसरें प्रकरण लिहून पुरें केलें; पण मी आजारी आहें हें कळल्याबरोबर रा. श्रीपादराव वर्दे यांनीं तिसरें प्रकरण लिहिलें व कंपोजला दिलेंदेखील. मीं माझें तिसरें प्रकरण वेळेवर पाठविलें; पण रा. वर्दे यांचें 'शास्त्रीनाथ' नांवाचें हें प्रकरण कंपोज होऊन राहिल्यामुळें 'विविधवृत्ता'च्या १८ जानेवारी १९३१ च्या अंकांत तेंच प्रसिद्ध झालें. तेवढी मला एक आठवडा विश्रांति मिळाली. पहिलीं दोन प्रकरणें लोकांना बरींच आवडल्यामुळें पहिल्या दोन प्रकरणांचा कंपोज, स्वतंत्र ग्रंथरूपानें कादंबरी छापावी म्हणून, तसाच ठेवण्यांत आला होता; परंतु ताप टायफॉइड्च्या वळणावर गेल्यामुळें स्वतः ग्रंथकाराचाच ग्रंथ आटोपण्याची भीति निर्माण झाली आणि कंपोज सोडण्यांत आला. रा. वर्दे यांनीं 'शास्त्रीनाथ' हें प्रकरण इतिहाससंशोधक राजवाडे यांच्यावरच लिहिलें होतें. त्यांच्यावर हें प्रकरण लिहिलें ही गोष्ट मला बिलकूल आवडली नाहीं. मीं लिहून ठेवलेलें तिसरें प्रकरण चौथें म्हणून छापण्यांत आलें. पांचवें

प्रकरण अंथरुणावर असतांनाच मीं लिहून दिलें. ताप गेला होता; पण अशक्तताही बरीच होती.

कादंबरीला "गोंडवनांतील गांवगुंड" असें नांव देण्यांत आलें होतें. माझ्या नांवावर ती प्रसिद्ध करावयाला अर्थात्च माझी तयारी नव्हती. त्यामुळें "देशसेवक, नागपूर" हें तिचा लेखक म्हणून नांव रा. तटणीस यांनीं दिलें. 'देशसेवक' नांवाचें एक वृत्तपत्र नागपूरला १९०७ च्या सुमारास निघत असे. त्याचे संपादक अच्युत बळवंत कोल्हटकर हे होते. त्यामुळें या कादंबरीचे जनक कोल्हटकरच असावेत असा लोकांचा समज व्हावा, असा 'देशसेवक' हें नांव लेखक म्हणून देण्यामागचा तटणिसांचा हेतु असावा; परंतु १९३१ सालींच कोल्हटकर वारले. "माझें रामायण" या कादंबरीचे कर्ते कै. दत्तो अप्पाजी तुळजापूरकर हे या कादंबरीचे लेखक आहेत, असाही पुष्कळांचा दृढ समज होता; कारण 'विविधवृत्त' व तुळजापूरकर यांचे संबंध फारच निकट व प्रेमाचे होते. त्यामुळें असा संशय लोकांनीं घेणें अस्वाभाविक नव्हतें. अशा प्रकारचें लेखन ही माझ्या लेखनाची प्रकृति नसून विकृति असल्यामुळें माझा संशय कोणालाही येणें शक्यच नव्हतें. या क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या कादंबरीसंबंधीं तटणिसांना मधूनमधून पत्रें येत. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनीं या कादंबरीसंबंधीं प्रशंसापर मजकूर लिहून तिचा लेखक कोण, हें जाणण्याची उत्कट इच्छा व्यक्त केली होती. तें पत्र तटणीस यांनीं मला दाखविलें होतें; परंतु त्यांनीं गौप्यस्फोट मुळींच केला नाहीं. एकदां 'विविधज्ञानविस्तारा'चे एक ऋणानुबंधीं लेखक नागपुरचे नीळकंठ बळवंत भवाळकर हे श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमध्यें आले होते. त्यांनीं या कादंबरीचा लेखक कोण हें सांगण्याबद्दल तटणिसांना फारच गळ घातली. प्रत्यक्ष भवाळकर पुढें असल्यामुळें त्यांना 'नाहीं' म्हणणें तटणिसांना कठीण गेलें. मी जवळच बसलों होतों. तटणिसांनीं प्रथम माझ्याकडे पाहिलें. मीं मान खालीं केली. मग त्यांनीं माझ्याकडे अंगुलिनिर्देश केला. मी या कादंबरीचा लेखक या गोष्टीवर भवाळकरांचा कितपत विश्वास बसला असेल सांगवत नाहीं. 'दीनबंधु' पत्राचे संपादक रा. नवले हे एके दिवशीं विविधवृत्तकार्यालयांत आले होते. त्यांनीं माझ्यादेखतच तटणिसांना सांगितलें कीं, आपण तुमचें 'विविधवृत्त' वाचतों तें मुख्यतः या कादंबरीकरितां.

या कादंबरीचा नायक गिरिधर तो तर प्रत्यक्षसृष्टींतील व वाचकांना कळावा, अशाच हेतूनें रंगविला होता. बाकीचें प्रत्येक पात्र रेखाटतांना माझ्या दृष्टीसमोर सत्यसृष्टींतीलच व्यक्ती होत्या; पण त्या कोण हें कळूं नये, अशी खबरदारी मीं घेतली होती. इतर कादंबरीकार स्वभावचित्रण करतांना सत्यसृष्टींतीलच व्यक्ती आधाराला घेतात कीं अगदीं स्वकपोलकल्पित निर्मिति करतात, हें

मला माहीत नाहीं. गिरिधराचें पात्र बनवितांना डॉ. केतकरांचें आत्मचरित्रपर व इतर लिखाण, तसेंच त्यांच्यासंबंधीं इतरांनीं लिहिलेलें वाङ्मय व त्यांचे वाद-विवाद मीं नजरेखालीं घातले होते. पहिलीं कांहीं प्रकरणें मात्र अगदींच कल्पित असावींत. गिरिधराच्या तोंडीं घातलेली भाषा तर पुष्कळ ठिकाणीं डॉ. केत-करांचीच होती. याच्या जोडीला डॉ. केतकरांसंबंधीं ऐकलेल्या जुन्या गोष्टींचा उपयोग केला होता. मुंबई सरकारचे एक डेप्युटी सेक्रेटरी गोविंद मल्लिनाथ ठेंगे हे केतकरांचे कॉलेजांतील सहाध्यायी होते, असें वाटतें. त्यांनीं केतकरांसंबंधीं निवेदन केलेल्या कॉलेजांतील पुष्कळ मौजा प्रो. वसंतराव नाईक यांच्या तोंडून ऐकल्या होत्या. विमलावतीचा प्रेमप्रसंग यांपैकींच एक होय. गिरिधराच्या अमेरिकेंतील वास्तव्यासंबंधीं जीं वर्णनें आहेत तीं अगदीं वास्तव होतीं; कारण अमेरिकेंतील समाजस्थिति, विद्यार्थीजीवन, वृत्तपत्रें, वगैरे-वगैरेसंबंधीं देशी व परदेशी लोकांनीं लिहिलेले अनेक ग्रंथ व लेख वाचूनच हीं वर्णनें करण्यांत आलीं होतीं. स्वतः अमेरिकेंत कांहीं वर्षें राहून आलेल्या एकाद्या व्यक्तीलादेखील इतकीं बिनचूक वर्णनें कदाचित् करतां आलीं नसतीं. स्वतः केतकरांना या माझ्या कादंबरीचा लेखक कोण असावा याबद्दल संभ्रम उत्पन्न झाला होता, असें त्यांच्या एका निकटवर्ती तरुणानेंच मला सांगितलें. अशी कोणीही व्यक्ति त्यांच्या लक्ष्यांत न आल्यामुळें या कादंबरीचे लेखक प्रा. न. र. फाटक हे असावेत अशी शेवटीं त्यांनीं आपली समजूत करून घेतली होती असेंही, याच गृहस्थाकडून मला कळलें. या कादंबरीचा कर्ता कोण हें ‘ विविधवृत्ता ’च्या अगदीं निकटवर्ती चार-पांचजणांनाच माहीत होतें; परंतु हें गौप्य बाहेर फुटलेंही असावें. रा. ढवळे यांनीं आपला कर्नाटक छापखाना शींवला हालविला, त्यावेळीं सत्यनारायण केला होता. त्यावेळीं मी कोण हें कळल्यावर तेथील पुजारी, “ आम्ही तुमची कादंबरी अत्यंत उत्सुकतेनें वाचीत होतों, ” असें मला उद्देशून म्हणाले. हा गौप्यस्फोट झाल्याचें पाहून मी तिकडून हळूच सटकलों ! १९५१ सालीं कारवारच्या साहित्यसंमेलनाच्या वेळीं रा. चं. वि. बावडेकर यांनीं संमेलनाच्या अध्यक्षांचा परिचयात्मक जो लेख ‘ मनोहर ’ मासिकांत लिहिला, त्यांत या गौप्यावरील पडदा जाहीर रीतीनें दूर केला. १९३१ सालमध्यें एकंदर ५१ आठवडे झाले होते व या कादंबरीचीं एकंदर एकावन्न प्रकरणें प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं माझीं पन्नास व वर्दे यांचें एक होतें. कादंबरी संपण्यापूर्वी एका शुक्रवारीं सकाळीं नेहमींप्रमाणें कादंबरीचें प्रकरण छापखान्यांत देऊन परत घरीं येत असतांना डॉ. केतकर ठाकुरद्वारच्या नाक्यावर तारेच्या खांबाला टेकून उभे असलेले मला दिसले. मला पाहतांच ते म्हणाले, “ प्रियोळकर, कुठें चाललां ? ”

“घरीं. ” मीं उत्तर दिलें.

"चला, मींहीपण तुमच्याबरोबर येतों."

"या." असें मीं म्हटल्यावर आम्हीं दोघेही ऑपेरा हाऊसकडे जाणाऱ्या सात नंबरच्या ट्राममध्यें चढलों. यावेळीं मी गांवदेवीला राहत असें व एकटाच बिऱ्हाडीं होतों. आम्हीं घरीं आलों; इतक्यांत माझ्याकरितां खाणावळींतून जेवणाचा डबा आला. "तुम्ही आधीं जेऊन घ्या. माझ्याकरितां गडी दुसरा डबा आणील. ऑफिसला जायला मला अद्याप पुष्कळ वेळ आहे," असें मीं त्यांना सांगितलें; परंतु ते जेवायला कबूल झाले नाहींत. घरांत लाडू, चिवडा, करंज्या, वगैरे खाद्यपदार्थांचा भरपूर सांठा होता. त्यांपैकीं मीं त्यांच्यापुढें कांहीं पदार्थ ठेवले. 'चहा, कॉफी नको म्हटल्यावरून मीं त्यांना ग्लास भरून थंड पाणी दिलें. आपल्या खिशांतून त्यांनीं एक लहानशी बाटली काढून त्यांतील द्रव्यांत एक काडी बुडविली व ती पुनः ग्लासांतील पाण्यांत घातली. पाणी निर्जंतु करण्याचा हा विधि असावा.

"विविधवृत्तांतील कादंबरीचा लेखक कोण तें तुम्हांला ठाऊक आहे काय? त्याला बरीच माहिती असावी असें वाटतें." फराळ खातां-खातां ते मला म्हणाले. आपल्या घरीं आलेल्या पाहुण्याला वस्तुस्थिति सांगणें कठीण होतें, आणि न सांगणेंही कठीण होतें! मी फारच अस्वस्थ झालों. युधिष्ठिराप्रमाणें 'नरो वा कुंजरो वा' असा बाणा मीं स्वीकारला. "अहो, तटणिसांचा गौप्य राखण्याचा बंदोबस्त कडक आहे. 'विविधवृत्तां'त प्रसिद्ध होणारे लेखक कोण हें स्वतः लेखक व संपादक यांच्याखेरीज इतरांना क्वचित्‌च माहीत असतें. अशा स्थितींत या कादंबरीचा लेखक कोण, हें मला कसें सांगता येईल?" असा उलट त्यांनाच मीं सवाल केला आणि विषय बदलला! डॉ. केतकर हे गेंड्याच्या कातडीचे मोठे निगर्गट्ट मनुष्य आहेत अशी पुष्कळांची समजूत आहे; परंतु कोणत्यातरी वादाचा निर्देश करतांना, "अशा वादांत निष्कारण मनाला त्रास होतो," असे त्यांनीं उद्‌गार काढले होते, असें मला आठवतें. यावरून ते बाहेरून दाखवितात त्याप्रमाणें निगर्गट्ट नसून हळव्या मनाचे असावेत, अशी मला शंका आली. "गोंडवनांतील गांवगुंड" या कादंबरीचा त्यांच्या मनावर काय परिणाम झाला हें मला सांगतां येत नाहीं; परंतु १९३० सालीं ती प्रसिद्ध झाल्यानंतर त्यांनीं पुढील पांच वर्षांत एकही कादंबरी लिहिली नाहीं. १९३६-३७ या वर्षांत 'स्त्री' मासिकांत "विचक्षणा" या नांवाची एक कादंबरी डॉ. केतकरांनीं प्रसिद्ध केली. १९३८ सालीं त्यांच्या निधनोत्तर "भटक्या" नांवाची त्यांची दुसरी एक अपूर्ण कादंबरीही प्रसिद्ध झाली आहे. या दोनही कादंबऱ्या मीं स्वतः वाचलेल्या नाहींत; परंतु त्या वाचलेल्या एका-दोघां मित्रांना विचारलें असतां, या

कादंबरींत त्यांनीं प्रत्यक्ष व्यक्तींना उभें करून दुसऱ्याची टोपी उडविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं, असें मला कळलें. तें कसेंही असो. माझ्या मनावर मात्र या कादंबरीचा विलक्षण परिणाम झाला. अशा लेखनाचा मला इतका कंटाळा आला कीं, वर्तमानपत्रामध्यें आणि तेंही ललितलेखन करण्याचें मीं गेल्या तीस वर्षांत अजिबात सोडून दिलें आहे.

कलायुग–दिवाळीअंक १९६२

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
........ नों: वि: ........

१०

## माझे कांहीं टीकाकार

मत्सरग्रस्त अभिज्ञांच्या जाचामुळें भर्तृहरीवर ' जिरालें निजांगींच पांडित्य माझें, ' असें म्हणण्याचा प्रसंग आला. अशा प्रकारचा त्रास मराठी साहित्य-सेवकांना प्राचीन काळापासून कमीजास्त प्रमाणानें भोगावा लागला आहे. ज्ञानेश्वरादि भावंडें संन्याशाचीं मुलें म्हणून त्यांचा धार्मिक पूर्वग्रहांमुळें छळ झाला आहे असें म्हणूं; परंतु एकनाथालाही मत्सरी लोकांचा जाच सहन करावा लागला होता, असें त्याच्या उद्‌गारांवरून दिसून येतें. भावार्थरामायणाच्या आरंभीं तो आपल्या टीकाकारांना उद्देशून म्हणतो,

ग्रंथ निंदिती अथवा वंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ती ।
हे श्रीजनार्दनाची युक्ति । उपदेश एकांतीं निजगुह्यार्थ ॥
कथा निंदिती वंदिती जनीं । ते माउली माझे दोनी ।
निंदक ते सखी जननी । मजलागूनी कृपाळु ॥
जैसे जननीचे करतळ । वरीवरी क्षालिती बाह्यमळ ।
निंदक सबाह्य कलिमळ । करी निर्मळ निजवदनें ॥
यालागीं निंदकचि तत्वता । साह्य सखा परमार्था ।
त्या निंदकातें निंदितां । दोषी सर्वथा स्वयें होय ॥
निंदा म्हणिजे परमामृत । निंदा निर्द्वंद्व सुखस्वार्थ ।
निंदक न पाहे निजस्वार्थ । अति समर्थ परोपकारी ॥
जेथें निंदा सुखरूप समाय । त्याचे मस्तकीं वंदूं पाय ।
धन्य धन्य त्याची माय । जो निंदा साहे निर्द्वंद्व ॥
आतां किती सुचवूं परिहार । परिहार तोचि अहंकार ।
**मी होऊं पाहें कवीश्वर । हा अपराध थोर मजमाजी ॥**

एकनाथाला टीकेचे घाव सहन करावे लागले, याचें खरें कारण तो सुधारक होता हें नव्हे; वरील शेवटच्या ओवींत तें वाचावयास सांपडेल. एकनाथाचा नातु जो मुक्तेश्वर त्यालाही टीकेचे चटके बसले होते, असें आदिपर्वाच्या आरंभींच्या त्याच्या हृदयद्रावक उद्‌गारांवरून दिसून येतें. निंदकांना उद्देशून तो लिहितो,

भक्षित परनिंदेची विष्ठा । पापदेह पोसिती मोठा ।
शूकरकुकर्मांचे वाटां । कुसंग संगी चालती ॥
येका अवगुणाची मासी । दावुनि सत्कविकथारसीं ।
अनंत गुणांचे गोड ग्रासीं । अरुचि आणी भोजना ॥

माझी स्वतःची अलीकडे अशी समजूत झाली कीं, मुक्तेश्वराचीं जीं पुढील पर्वें उपलब्ध नाहींत, याचें कारण बेजबाबदार निंदकांच्या त्रासामुळें त्याची 'जीर्णमङ्गे सुभाषितम्' अशी स्थिति झाली असली पाहिजे.

तुकाराम अशा टीकेचें निराळें कारण देतो :

निंदा स्तुती करवी पोट । सोंग दाखवी बोभाट ।
जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥

जुन्या काळीं परनिंदा करण्याकरितां माणसाला जिव्हा हेंच एक साधन होतें. पुढें द्विजिव्हा म्हणजे लेखणी हें एक नवें साधन उपलब्ध झालें. मुद्रणकलेच्या द्वारें तिचा प्रभाव आणखी वाढला. मत्सरग्रस्त मनाची जाचक मळमळ ओकण्याकरितांच नव्हे, तर "तेवढेंच ज्ञानप्रकाशांत" म्हणून प्रसिद्धिलोलुपतेनेंही वृत्तपत्रांकडे किंवा अन्य नियतकालिकांकडे उठल्यासुटल्या धांव घेण्याचा लोकांना मोह होऊं लागला.

चूक सुधारण्याच्या शुद्ध हेतूनें केलेल्या टीकेला निंदा कधींही म्हणतां येणार नाहीं. अशा तऱ्हेचें दोषदिग्दर्शन समाजकल्याणाकरितां हवेंच असतें; परंतु एकाद्याला बदनाम करण्याकरितां किंवा केवळ स्वतःचा शहाणपणा दाखविण्याकरितां ज्यावेळीं माणूस लेखणी हातांत धरतो, त्यावेळीं त्या टीकेला निंदा म्हणावें लागतें. या निंदेंतही ज्यावेळीं खरेंच दोष दाखविलेले असतील, त्यावेळीं अशी टीका उपयुक्तच ठरते. 'निंदक आमुचा सखा । आमुचीं पापें धुतो फुका,' असें एकनाथानें ज्याचें वर्णन केलें आहे तो असा टीकाकार होय; परंतु मुळांत दोष नसतांच किंवा एकादीदुसरी क्षुल्लक चूक दाखवून सगळाच ग्रंथ टाकावू ठरविण्याचा प्रयत्न करणाऱ्याची टीका ही नुसती निंदाच नसून शुद्ध चिखलफेक म्हणावी लागेल.

टीकाकार या प्राण्याची पैदास आपल्याच देशामध्यें फार आहे, असें प्रत्येक ग्रंथकाराला वाटतें. सुप्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकार Joao de Barros हा आपल्या हिंदुस्थानच्या इतिहासाच्या दुसऱ्या दशकाच्या (Decadas) प्रस्तावनेंत लिहितो, "हा आमचा प्रयत्न जरी वाचकांच्या पसंतीला सर्वस्वी उतरला नाहीं, तरी त्यांना दुरुस्तीकरितां कांहीं मजकूर दिल्यासारखें होईल व जिचें पीक आपल्या देशामध्यें फार आहे अशा टीकेलाही कांहीं साधन मिळेल. अशा प्रकारें

कांहीं लोकांनीं छान आहे असें म्हणून माना डोलवण्यास व बाकीच्यांनीं वाईट म्हणून नाकें मुरडण्यास आम्हीं पात्र होऊन सर्वांनाच उपयोगी ठरूं. ''

टीकेला प्रवृत्त करणारी परोत्कर्षअसहिष्णुता ही महाराष्ट्रांत इतरांपेक्षां जास्त आहे, असें पुष्कळांचें म्हणणें आहे. महाराष्ट्रीय व गुजराती या दोनहि समाजांमध्यें पुष्कळच वावरलेले प्रसिद्ध बौद्ध पंडित प्रौ. धर्मानंद कोसंबी हे दोनहीं समाजांचे स्वभावविशेष सांगतांना एकदां मला म्हणाले, " गुजराती माणूस त्याच्या स्वार्थाच्या मार्गांत जर दुसरा आला तर त्याला कापून काढील; पण स्वतःचें नुकसान न होतां आपल्या शेजाऱ्याचा उत्कर्ष झालेला त्याला पहावतो; परंतु महाराष्ट्रीय माणसाच्या असहिष्णुतेला दुसरा माणूस त्याच्या मार्गांत यावयालाच पाहिजे असें नाहीं. '' डॉ. बाबासाहेब जयकर यांनीं यासंबंधीं मला एक गमतीदार गोष्ट सांगितली. ते म्हणाले, " जिवंत मासे पकडले म्हणजे ते पाट्यांबाहेर उडून जाऊं नयेत म्हणून त्यांवर जाळें टाकावें लागतें; पण खेंकड्याच्या पाट्यावर तसें जाळें किंवा झांकण घालावें लागत नाहीं. एका कोळ्याला याचें कारण विचारलें असतां त्यानें सांगितलें कीं, एकादा खेकडा वर चढूं लागला म्हणजे बाकीचे खेकडे त्याचे पाय मागें ओढतात, आणि त्यामुळें आम्हांला वर झांकण घालण्याचें कारणच राहत नाहीं. '' ही दुसऱ्याचे पाय मागें ओढण्याची वृत्ती केवळ आम्हां महाराष्ट्रीयांमध्येंच आहे असें नसून खेंकड्यांमध्येंही आहे, असें बाबासाहेबांचें म्हणणें आहे ! ! औंधचे कै. बाळासाहेब पंतप्रतिनिधींनीं एक कथा सांगितली ती अशीः— एक माणूस होता. रात्रीं घरीं आल्यावर तो ओक्साबोक्सी रडूं लागला. त्याच्या बायकोला आपल्या यजमानाचा स्वभाव ठाऊक होता. तिनें नवऱ्याला विचारलें, " तुमच्या कनवटीची एकादी दिडकी हरवली तर नाहीं ना ? '' त्या माणसानें उत्तर दिलें, " नाहीं ! '' बायकोनें पुनः विचारलें, " मग तुम्हांला इतकें दुःख व्हायला दुसरें काय कारण असणार?'' " एक गृहस्थ दुसऱ्या माणसाला पैसा देतांना मीं पाहिला ! '' नवरा उत्तरला ! कांहीं माणसांना स्वतःच्या पदरचें खर्चलें म्हणजेच दुःख होतें, असें नाहीं; दुसऱ्याचा फायदा हेंही ते स्वतःचें नुकसान समजतात !

ज्यांच्या हिताकरितां मी माझ्या अल्प शक्यनुसार खपलों अशा स्वकीयांपैकीं कांहीं लोकांनीं मला वेळोवेळीं इतका जाच दिला आहे कीं, ह्या लोकांचा माझ्यावर इतका रोष कां, हें मला अद्याप कळलेलें नाहीं. याच्या उलट कांहीं परकीय लोकांनीं मला इतकी सहानुभूति दाखविली आहे, आणि माझ्या कार्यांत इतकी मदत केली आहे कीं, ह्या लोकांचा माझ्यावर लोभ कां हें मला समजलेलें नाहीं. यामुळें महाराष्ट्रांसंबंधीं ( यांत कोंकणचाही अन्तर्भाव होतो ) एका प्रकारची अढी माझ्या अंतःकरणांत मूळ धरून बसली होती; परंतु अलिकडे ' नवनीता'च्या

प्रसिद्धीनंतर मला जे विविध अनुभव आले, त्यामुळें महाराष्ट्रांत कृतज्ञताबुद्धि प्रचंड प्रमाणांत वसत आहे, याची मला पूर्ण खात्री पटली.

'नवनीत' हा ग्रंथ कै. परशुराम बल्लाळ गोडबोले यांनीं तयार केला, आणि १८५४ सालीं तो प्रथम प्रसिद्ध झाला. अगदीं अलीकडची गोष्ट सांगावयाची म्हणजे १९१८ सालीं या पुस्तकाची सोळावी आवृत्ति निघाली, आणि पांचच वर्षांनीं म्हणजे १९२३ सालीं त्याची सतरावी आवृत्ति काढावी लागली. यावरून या ग्रंथाची विलक्षण लोकप्रियता कळून येईल. हीही आवृत्ति पांचसात वर्षांच्या अवधींतच संपली असावी, कारण सुमारें वीस वर्षांमागें आमच्या वडिलांनीं त्यांच्या शेवटच्या आजारांत 'नवनीता'ची आपणास प्रत पाठविण्याबद्दल मला लिहिलें, आणि मुंबई व पुणें येथील कोणत्याही पुस्तकांच्या दुकानांत ती न मिळाल्यामुळें मीं त्यांना मराठी प्राचीन कवींचे कांहीं स्वतंत्र ग्रंथ गोळा करून पाठवून दिले. आम्हीं मित्रमंडळी एकत्र जमलों म्हणजे 'नवनीता'च्या प्रकाशनाच्या निकडीसंबंधीं नेहमींच गोष्टी चालत. कै. बाळासाहेब खेर यांच्याकडेही यासंबंधीं मीं बोललों होतों; परंतु एकादी गोष्ट मान्य झाली तरी इतर कामांच्या गर्दीमुळें ती प्रत्यक्ष अमलांत आणणें त्यांना शक्य होत नसे. १९४५ च्या सुमारास J. F. Royle याच्या Essay on the antiquity of Hindoo medicine ह्या १८३७ सालीं प्रसिद्ध झालेल्या ग्रंथाचें मुंबई सरकारमार्फत पुर्नमुद्रण व्हावें, अशी मीं त्यांना सूचना केली. सुप्रसिद्ध सर्जन डॉ. व्यं. मं. कायकिणी यांनीं सरकारला तसें अधिकृत पत्रही लिहिलें. पुढें हा ग्रंथ छापावा असें सरकारनें ठरविलें आणि त्यावेळचे आरोग्यमंत्री डॉ. गिल्डर यांनीं म. म. डॉ. पां. वा. काणे यांना या ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याबद्दल विनंतीही केली होती, येथपर्यंत इतिहास मला माहीत आहे; परंतु पुढें हें प्रकरण कुठें बारगळलें मला माहीत नाहीं. 'नवनीता'-चा प्रश्न कै. पु. मं. लाड यांनीं हातीं घेतल्यामुळें तो मार्गाला लागला. १९५० च्या सुमारास 'नवनीता'च्या नव्या आवृत्तीच्या संपादनाचें काम तुम्हीं पत्कराल काय, अशी शिक्षणखात्याच्या सचिवांकडून मला पत्रद्वारें विचारणा करण्यांत आली. यावेळीं सरकारी गॅझेटिअरच्या वाङ्मयखंडाच्या मराठी विभागाचें काम माझ्याकडे सोंपविण्यांत आलें होतें; त्यामुळें हें 'नवनीता'चें नवें काम माझ्या हातून लवकर पुरें होणार नाहीं, असें मीं त्यावेळचे शिक्षणखात्याचे सचिव श्रीयुत राव यांना भेटून सांगितलें. ते म्हणाले, "कांहीं हरकत नाहीं. आम्हांला मुळींच घाई नाहीं. गॅझेटिअरचें काम पुरें झाल्यावर तुम्हीं नवनीताचें काम हातीं घेऊं शकतां." अशा प्रकारें 'नवनीता'च्या संपादनाचें काम माझ्याकडे आलें.

'नवनीत' प्रथम १८५४ सालीं प्रसिद्ध झाल्याचें वर लिहिलेंच आहे. या नव्या आवृत्तीला 'शताब्दि आवृत्ति' नांव देऊन ती १९५४ सालीं

वाचकांना उपलब्ध करावी, असें मीं ठरविलें व त्याप्रमाणें प्रस्तावना व कोश यांच्या खेरीज या ग्रंथाची मुद्रणप्रत मीं १९५३ च्या आरंभींच तयार केली; परंतु छापखान्याच्या कांहीं अडचणींमुळें ( यांत छापखान्याच्या लोकांचाच दोष होता असें मात्र नव्हे ) मुद्रणाचें काम भिजत पडलें व हा ग्रंथ १९५७ सालच्या अखेरीला छापून तयार झाला. त्यांतही या ग्रंथाची किंमत तीन रुपयांपेक्षां जास्त ठेवूं नये, असा सरकारकडे मीं आग्रह धरल्यामुळें व यावेळीं मी काशी व कलकत्ता या भागांत दौऱ्यावर असल्यामुळें किंमत किती ठेवावी, या प्रश्नाचा निकाल लागून ग्रंथ लोकांच्या हातीं पडण्यास १९५८ साल उजाडलें.

प्रथम असा एक विचार माझ्यापुढें होता कीं, जुन्या नवनीतांतील जास्त असलेले कांहीं कवींचे उतारे कमी करून तितकेच नव्या कवींचे उतारे घालावे; म्हणजे ग्रंथाची पृष्ठसंख्या वाढणार नाहीं व किंमतही जास्त ठेवावी लागणार नाहीं; पण असें केल्यानें कित्येकांस चांगले तेवढे उतारे कमी केले, अशी ओरड करण्यास संधी मिळाली असती. म्हणून जुने उतारे कमी करूं नये आणि नवे उतारे शक्य तितके थोडे आणि छोटे घ्यावे, असें मीं ठरविलें. तळटीपांतील शब्दांचे अर्थ बरीच चर्चा होऊन मागें स्थिर झाले असल्यामुळें त्यांत बदल करावयाचा झाल्यास तसें करतांना फार काळजी घ्या, असा एका मित्रानें सावधगिरीचा इशारा दिला. त्यामुळें हे अर्थ ट्रेनिंग कॉलेजच्या अनेक प्रिन्सि-पालांच्या दृष्टीखालून वेळोवेळीं गेले असल्यामुळें बरोबर असतील, असें गृहीत धरून चाललों व त्यांकडे द्यावयाला पाहिजे तितकें घाईत लक्ष दिलें गेलें नाहीं, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. ' नवनीता ' च्या मुद्रणाचें हें काम तीनचार वर्षें रेंगाळत पडलें होतें. कधींतरी इतर कामांत व्यग्र असतांना मध्येंच एकाद्या फार्मचीं प्रुफें हातीं यावीं. त्यामुळें मागचें पुढचें अवधान राखणें कठीण होई. शिवाय इंग्रजी मुद्रणाच्या बाबतींत सरकारी छापखाना कितीही कार्यक्षम असला तरी देशी मुद्रणाच्या बाबतींत तिकडे दुर्लक्षच आहे. अशा प्रकारचें काम करण्याचा सरावही तेथील कामकऱ्यांना फारसा नव्हता. दर खेपेला बदल्या होऊन नव्या माणसांच्या हातीं हें काम जावयाचें. यामुळें मीं अगदीं टेकीला आलों. तरीपण वेळोवेळीं आलेल्या कांहीं महाराष्ट्रीय असिस्टंट मॅनेजरांनीं आपुलकीनें सहकार्य केल्यामुळें हें काम इतपत तरी झालें. ज्या परिस्थितींत हें संपादन व मुद्रण झालें तिचा विचार करतांना या आवृत्तींत मुद्रणाचे व इतर दोष राहून जातील, याबद्दल माझ्या मनांत अस्वस्थता असे. म्हणूनच " जुन्या आवृत्तींतील दोष काढून टाकण्याचा जरी या आवृत्तींत प्रयत्न केला असला, तरी या आवृ-त्तींतही अवधानामुळें मुद्रणाचे किंवा अन्य कांहीं दोष राहून गेले असणें अगदीं शक्य आहे. वाचकांनीं कृपा करून ते आमच्या नजरेस आणल्यास किंवा अन्य

कांहीं सूचना केल्यास ' नवनीता ' ची पुढची आवृत्ति तयार करतांना उपयोगी पडावी म्हणून सरकारकडे एक शुद्ध प्रत तयार करून देण्याची आमची मनीषा आहे," असें मीं प्रस्तावनेंत लिहिलेंही होतें. नवनीताच्या जुन्या आवृत्तींत ( १९२३ ) एका समाधिशकाचा १३ हा तळटीपेतील आंकडा टाईप फुटून १२ सारखा दिसत होता. दुर्दैवानें नव्या आवृत्तींत तो १२ असा अनवधानानें छापला गेला. एका संत-सांगात्यानें ही चूक वृत्तपत्रांमध्यें प्रसिद्ध केली, याबद्दल मीं त्यांचा आभारी आहें; परंतु या संधीचा फायदा घेऊन अशा चुका वाचकांनीं संपादकांना कळवाव्या व या चुकांचें स्वतंत्र परिशिष्ट तयार करून तें नवनीताच्या ग्राहकांना विनामूल्य देण्यांत यावें, अशी सूचना करून हें सर्वच पुस्तक चुकांनीं भरलें आहे, अशी लोकांची समजूत व्हावी, अशीही त्यांनीं व्यवस्था करून ठेविली.

प्रसिद्धीचा मोह टाळून ज्या सज्जनांनीं एकदम वर्तमानपत्रांकडे धांव न घेतां आपले आक्षेप खासगी पत्रद्वारें कळविले त्यांचा मी फार ऋणी आहें. दादरचे एक गृहस्थ लिहितात, " पूर्वींच्या नवनीतमध्यें सासरची पाठवणी होती, ती या कॉपीमध्यें आपण समाविष्ट न केल्यामुळें फारच उणीव भासते. तरी ती स्वतंत्र छापून घेऊन प्रत्येक अंकाबरोबर फ्री द्यावी ही सूचना आहे. " ' सासरची पाठवणी ' हें काव्य केरळकोकिळकर्त्या आठल्यांचें दिसतें. तें नवनीतांत येईल कसें ?

दुसरे पुण्याचे एक गृहस्थ कळवितात, " पुढील आवृत्तींत मुद्रितदोष राहाणार नाहींत, या दृष्टीनें मुद्रितें कटाक्षानें तपासलीं पाहिजेत. सहजरीत्या नजरेखालीं प्रत घातली तेव्हां त्यांत खालील मुद्रितदोष आढळले, ( १ ) रामदास पृ. सं. १९९—चन्द्री लागली नयनीं ।। येथें ' चन्द्री' ऐवजीं ' तन्द्री ' पाहिजे. ( २ ) वामन पंडित—पृ. सं. १३१ टीप ' पतनेचा भाऊ ' येथें ' पुतनेचा भाऊ ' असें पाहिजे. आणखीही बरेच असतील, पण वानगीदाखल दोन दोषस्थळें आपणांस कळविलीं आहेत. " वरील ' चन्द्री ' संपादकांनीं नवी बाहेरून कोठूनतरी आणिली नाहीं. नवनीतांत ती मूळचीच आहे. जुन्या ग्रंथांतही ती अनेक ठिकाणीं दृष्टीस पडते. उदाहरणार्थ पहा— येकांच्या बैसल्या अमृतकळा । येकांस **चंद्री** लागली डोळां । येकें कांपतीं चळचळां । दैन्यवाणी ।। ३-५-४ ( श्रीमत् दासबोध— शं. श्री. देव, आवृत्ति ३ री ). माझ्यापुढें असलेल्या नव्या नवनीताच्या प्रतींत ' पुतनेचा भाऊ ' असेंच आहे. पुढें हा ऊकार छापतां छापतां उडालेला दिसतो. त्याला घट्ट पकडून ठेवणें संपादकांच्या हातांत नसतें. आणखी एक मुंबई ( १३ ) चे गृहस्थ लिहितात, " आपण संशोधन करून प्रकाशित केलेलें " नवर्नात " नुकतेंच पाहण्यांत आलें. एका वाङ्मयरत्नाचा पुन्हां पैलू पाडून नवीन लाभ झाल्याचा आनंद वाटला; परंतु त्यांत चाळून पाहतां श्री राम

जोशी या कवीचा छेकापन्हुति अलंकाराचा एकुलता एक फटका " अंबरगत परि पयोधरातें, ' कोठेंही सांपडेना. विद्यार्थिदशेंत तो जुन्या नवनीतांत वाचल्याचें स्मरण आहे. तरी तो आपण कांहीं हेतूनें गाळला काय ? व तो हेतु कोणता हें कळविल्यास आभारी होईन. प्रस्तावनेंत कांहींही न गाळल्याचा उल्लेख आहे. " हा ' फटका ' जर नवनीतांत कधीं नव्हताच तर तो गाळण्याचा हेतु कोणता, हें संपादक कसें सांगणार ?

केवळ संपादकाला खासगी पत्र लिहिण्यापेक्षां वर्तमानपत्रांत तें प्रसिद्ध करून आपल्या शोधाचा व ज्ञानाचा फायदा असंख्य वाचकांना करून देण्यांतही कांहीं वावगें नाहीं. एक गृहस्थ नवनीतामध्यें शेवटीं छापलेल्या पांडुरंगाच्या आरतीसंबंधीं एका वृत्तपत्रामध्यें लिहितात, " त्यांतील पांडुरंगावरील आरतींत फक्त ३ च कडवीं किंवा चरण दिले आहेत. क्रमांक ३ व ४ चीं कडवीं (' धन्य वेणूनाद ' आणि ' ओवाळूं आरत्या ') गाळलीं आहेत. संपादक श्री. प्रियोळकरांसारखे साक्षेपी आणि पुस्तक सरकारी अधिकृत प्रकाशन यामुळें हीं कडवीं अनवधानानें गळलीं, असें म्हणवत नाहीं. " या आरतीसंबंधीं आणखीही बरीच चर्चा प्रसिद्ध झालेली माझ्या नजरेस आली. या चर्चिकांपैकीं एकानेंही हीं कडवीं गाळलीं असें विधान करण्यापूर्वीं तीं प्रथम नवनीतांत खरो-खरच होतीं कीं काय, हें पाहाण्याकडे लक्ष दिलें नाहीं. ही आरती ' नवनीता 'च्या १८५४ च्या पहिल्या आवृत्तीमध्यें नव्हती. १८५७ च्या दुसऱ्या आवृत्तीमध्यें ती प्रथम अंतर्भूत झाली असावी. माझ्या संग्रहीं असलेल्या नवनीताच्या १८६० सालच्या आवृत्तीपासून पुढील सर्व प्रतींत अठराव्या आवृत्तीप्रमाणेंच ही आरती आहे, मग तीं कडवीं गाळलीं असा या संपादकावर निष्कारण गहजब कां ? या जादा कडव्यांचें अस्तित्व मला अज्ञात होतें, असें मात्र नव्हे. १८७७ सालीं वासुदेव मोरेश्वर पोतदार यांनीं प्रसिद्ध केलेला एक आरतीसंग्रह मजजवळ आहे. त्यांत हीं कडवीं आढळतात; परंतु ' नवनीता ' मध्यें तीं नव्यानें घालण्याची मला आवश्यकता वाटली नाहीं. ' नवनीत ' हें पुस्तक मुलांमुलींच्या हातांत जाणें अपेक्षित असल्यामुळें त्यांच्या वयाच्या मानानें कांहीं आक्षेपार्ह शब्द असल्यामुळें कांहीं चरण किंवा आर्यार्ध मागच्या संपादकांनीं गाळले आहेत. त्यांत मीं ढवळा-ढवळ केली नाहीं. नामदेव-तुकारामाच्या अभंगांत प्रक्षिप्त अभंग ठरविण्याचें अत्यंत मतभेदाचें कार्य असल्यामुळें तें मीं टाळलें.

येथील एका साप्ताहिकांत ' साहित्य-मंथन ' या सदराचा आश्रय करून (१८-५-५८ च्या अंकांत) कोणातरी अनामक लेखकानें टीकालेखनाचा विक्रमच केला आहे ! वास्तविक माझ्या माहितीप्रमाणें सरकारनें हा ग्रंथ कोठल्याही संपादकाकडे अभिप्रायाकरितां पाठविलेला नाहीं. असें असतांना पोंच

व अभिप्रायाकरितां राखलेल्या सदरांत हा ग्रंथ ओढून प्रियोळकरांची शोभा करण्याची आपली हौस या लेखकानें पुरवून घेतली आहे. मोघम विधानें करून दुसऱ्याला हास्यास्पद करण्याच्या कामांत हा टीकाकार पटाईत दिसतो. तो लिहितो, " प्रियोळकर संपादक म्हणतांच ज्या ठराविक गोष्टींची अपेक्षा होते, त्या या नवनीतांत पुऱ्या होतात. पहिली म्हणजे फादर स्टीफन्सकृत ख्रिस्तपुराणांतील उतारे. दुसरी अपेक्षा इंग्रजी उतारेमय प्रवचन. " या दोनही गोष्टी बऱ्या कीं वाईट, हें ह्या लेखकानें स्पष्ट केलेलें नाहीं; पण नर्मोक्तीचा हा एक मासला हें वाचकाला सहज दिसून येणारें आहे. ' नवनीता 'च्या प्रस्तावनेंत निरनिराळे धर्म, पंथ व जाती यांचे प्रातिनिधिक उतारे देण्याचा हेतु स्पष्ट केला आहे. सर्व धर्माच्या व सर्व जातींच्या लोकांमध्यें मराठी ही आपली मायबोली आहे, असा अभिमान नवनीताच्या वाचनानें जागृत व्हावा, असा हेतु होता. मराठी जाणणाऱ्या अनेक ख्रिस्ती लोकांनीं नवें नवनीत खरेदी केलेलें मला माहीत आहे. त्यांत एक युरोपियनही आहे. दुसरें, इंग्रजी उतारे देण्याचें कारण, ते वाचकांना मूळांत पहावयास मिळणें कठीण आहे. हजारामध्यें एकादाच वाचक असा असेल कीं, ज्याला इंग्रजी कळत नाहीं. त्याला सहज आपल्या शेजाऱ्याकडून ते समजून घेणें शक्य आहे; परंतु मोघम विधानें केलीं असतां चोखंदळ वाचकाचें समाधान होत नाहीं. उदाहरणार्थ, मुंबई गॅझेटिअरमधील एक विधान वाचून त्याच्या खरेपणाविषयीं मला शंका आली. आधार दिले होते; पण उतारे नव्हते. इंडिया ऑफिसमधून हे मूळ उतारे मागवून पाहिले तर या आधारांवरून गॅझेटिअरमधील विधान निराधार असल्याचें दिसून आलें ! ( The Printing Press in India, pp 32—38 पहा ) यावरून सप्रमाण लिहिण्याची माझी ही पद्धति उपयुक्त कीं टाकाऊ, हें वाचकांना ठरवितां येईल.

रामदास, मोरोपंत, तुकाराम यांना एकेरी संबोधिल्याबद्दल व कांहीं कवींचे ज्ञातिनिर्देश असल्याबद्दल या लेखकानें नाक मुरडलें आहे. ही पद्धति जुनीच आहे व ती बदलण्याची मला आवश्यकता मुळींच वाटली नाहीं. एकेरी संबोधण्यांत या संतांना देवाची पदवी दिली आहे. " अहो देवा, तुम्हीं आम्हांला राखा, " अशी अनेकवचनी भाषा वापरल्यानें देवाचें महत्त्व वाढेल काय ? शंभर वर्षांमागच्या लोकांपेक्षां आपण या बाबतींत फार शहाणे झालों आहोंत, ही या लेखकाची कल्पना भ्रामक आहे. कै. पु. म. लाडांना या टीकाकारापेक्षां तुकारामासंबंधीं कमी आदर किंवा कमी औचित्यविचार होता, असें मला वाटत नाहीं; पण त्यांनीं आपल्या तुकारामचरित्रांत तुकारामाचा निर्देश एकेरी शब्दांतच केलेला आहे. ' नवनीतां 'तील ज्ञातिनिर्देश गाळून समाजांतील जातिभेद नष्ट होणार नाहीं. असे निर्देश राहूं देण्यांत कांहीं बिघडलें असें मुळींच वाटत नाहीं. तळटीपांसंबंधीं

खुलासा वर केलाच आहे; पण टीकाकारानें त्यासंबंधीं घेतलेले आक्षेप सगळेच विचारार्ह आहेत असें नाहीं. त्याच्या आक्षेपांचा एक मासला पहा :–" चौगुणीनें जरि पूर्ण शीत भानू " ( पृ०८६ ) यांत सोळा कलां ऐवजीं चंद्राला ६४ कला कां द्याव्या ? शीतगुणाची चौगुणी आहे; पूर्णांशाच्या १६ कळांऐवजीं ६४ केल्यानें चंद्राचें शीतपण कसें वाढेल ? म्हणजे १६ दिवसांत त्याचें पूर्ण बिंब व्हायचें तें ६४ दिवसांत होईल. हा अर्थ कवीला अभिप्रेत नाहीं. "

( नव्या नवनीतांतील हा पाठ,

चौगुणीही जरि पूर्ण शीत-भानु । नळाऐसा तरि कला –निधी वानूं ॥

असा २५६ पृष्ठावर आहे. )

" चिकित्सक दृष्टीनें छाननी " करण्यास निघालेल्या या टीकाकारास शीतगुणाची चौपट दिसते व तो नवनीतांत दिलेला अर्थ ( १६ × ४ = ६४ कला हा ) चुकीचा मानतो. " नळाऐसा तरि कला-निधी वानूं " हा पुढचा चरण वाचण्याची जर त्यानें तसदी घेतलीं असती तर कवीला चतुर्गुण कलानिधित्व अभिप्रेत आहे, शीतत्व नाहीं, हें त्याला सहज कळून आलें असतें; परंतु समग्र दिंडीदेखील आहे तशी न वाचतां दूषण देण्याची त्याला विलक्षण घाई सुटलेली दिसते !

पाठभेदासंबंधीं हा टीकाकार लिहितो, " चिरार्जितीं अगदीं " ( पृ. ४०० ) हा पाठ घेण्याऐवजीं " चिरार्चितीं अगदीं " हा पाठ पत्करल्यानें थोडा विचित्र अर्थ पदरीं येतो. घरांत जुनीं औषधें जपून पैदा करून ठेवतात; त्यांची पूजा करीत नाहींत. " दुर्दैव त्या बारामतीकर कवीचें कीं, हें ज्ञान शिकविण्यास प्रस्तुत टीकाकार त्याच्या काळीं हयात नव्हता ! कारण ' चिरार्चितीं अगदीं ' हा पाठ ' नवनीता ' च्या नव्या आवृत्तीच्या संपादकाचा स्वकपोलकल्पित नसून तो अस्सल मोरोपंतांचा आहे. ( मोरोपंतकृत **आर्याभारत**, खंड २, सं० रा. द. पराडकर, पुणें १९१२, पृ. ५० पहा ). संस्कृतमध्यें ' अर्चित ' याचा अर्थ ' महित ' म्हणजे ( honoured, esteemed, revered ) असाही असून तो तळटीपांत स्पष्ट केलाच आहे.

मोरोपंती काव्याचा ' शाब्दिक कसरत ' असा उल्लेख करणाऱ्या या माणसाचा अहंकार किती उग्र आहे, हें दिसून येईल. लहान तोंडीं हा मोठा घांस आहे. टीकाविषयक ग्रंथकाराची फजिती करण्याकरितां हा टीकाकार किती पुढें जाऊं शकतो याचें आणखी एक उदाहरण पहा. तो लिहितो,

" अद्यापही श्री. प्रियोळकरांनीं मोरोपंतकृत अष्टोत्तरशत रामायणें पाहिलीं नाहींत कीं काय ? कारण, " हीं रामायणें १०८ आहेत असें म्हणतात " ( पृ. ३४५ ), असा पोकळ हवाला संपादकांनीं दिला आहे. एकंदरीनें असें दिसतें कीं,

संपादकांची चौकस दृष्टि सर्वत्र पोंचली नाहीं. कदाचित् विद्यार्थी मदतनिसांवर ते विसंबले असावे. अशा शंभरी उत्सवाबाबत–नवनीताची नवी आवृत्ति काढतांना–अधिक काळजी हवी होती."

"अद्यापही श्री. प्रियोळकरांनीं मोरोपंतकृत अष्टोत्तरशत रामायणें पाहिलीं नाहींत कीं काय?" असा प्रश्न विचारण्याऐवजीं हीं एकशेंआठ रामायणें अमुक ठिकाणीं प्रसिद्ध झालीं आहेत, असा जर टीकाकारानें **भरीव हवाला** दिला असता तर प्रियोळकरांच्या व वाचकांच्या ज्ञानांत बरीच भर पडली असती; परंतु नव्या टीकाशास्त्राचा हा एक अभिनव प्रकार दिसतो कीं, असे प्रश्न फेंकून ग्रंथकर्त्याला हास्यास्पद ठरवावा आणि त्या विषयावर प्रकाश तर मुळींच पाडूं नये! त्याच्या प्रश्नाला उत्तर द्यावयाचें म्हणजे प्रियोळकरांनीं हीं अष्टोत्तरशत रामायणें पाहिलेलीं तर नाहींत; पण तीं कुठें असल्याचेंही त्यांच्या ऐकिवांत नाहीं. माझ्या संग्रहीं स्वतः परशुरामतात्यांच्या हातचें एक टिपण आहे. त्यावरून तात्यांना केवळ ७१ रामायणें माहीत होतीं, असें दिसतें. 'सर्वसंग्रहांत' जवळजवळ इतकींच म्हणजे ७० प्रसिद्ध झालीं होतीं.

'काव्यसंग्रहांत' केवळ ७४ प्रसिद्ध झालेलीं दिसतात. पराडकरप्रतींत अपूर्ण धरून ८७ मराठी रामायणें सांपडतात व संस्कृत धरल्यास ९० होतील. यासंबंधीं उपोद्‌घातांत कै. न. चिं. केळकर लिहितात, "प्रस्तुत (रामायणांच्या हप्त्याचे एकंदर तीन खंड असून तिसरा खंड केवळ संस्कृत कवितेचा आहे. पहिल्या खंडांत २९, दुसऱ्या खंडांत ५८ व तिसऱ्या खंडांत ३ याप्रमाणें तिन्ही खंडांत मिळून ९० रामायणें संग्रहित केलीं आहेत. यापैकीं 'त्रुटित' म्हणून जें रामायण छापलें आहे तें बहुधा स्वतंत्र म्हणून गणण्यास योग्य नसल्याचाहि संभव आहे. म्हणजे अष्टोत्तरशत संख्येपैकीं ९० किंवा ८९ रामायणांचा निकाल लागला. बाकीच्या १८।१९ रामायणांची वाट काय?" (पुढें पांगारकर यांनीं १९०२ सालीं केलेल्या यादीची चर्चा करून श्री. केळकर लिहितात) "...पंतांच्या अष्टोत्तरशत रामायणांची जुळणी कोणी करून दिली तर आम्हांस नको आहे असें नाहीं; परंतु ती कशीतरी करून दाखवून भागत नाहीं. सर्व कागदपत्रांचें सूक्ष्म पर्यालोचन करून व सर्व शंकांचें समालोचन करून ती दाखविली पाहिजे."

स्वतः पांगारकरांनीं १९०८ सालीं प्रसिद्ध केलेल्या 'मोरोपंत (चरित्र आणि काव्यविवेचन)' या ग्रंथांत ८७ रामायणांची माहिती दिली असून "(८८) हें कोठें गहाळ झालेलें आहे," असें म्हटलेलें आहे.

श्रीधर विष्णु परांजपे हे 'केकावली'च्या दुसऱ्या खंडांत (आ. ४ थी, १९२५) 'परिशिष्ट आ' मध्यें रामायणांची यादी देतात त्यांत ही संख्या त्यांनीं ९६ पर्यंत वाढविली आहे व "बाकीची तस्करोपद्रवांत गाहाळ झालेलीं,"

असें म्हटलें आहे. अशा स्थितींत आमचे टीकाकार इतक्या जोरानें ज्या अर्थी उपरिनिर्दिष्ट प्रश्न करतात, त्यावरून हीं गहाळ रामायणें त्यांच्या संग्रहीं असलीं पाहिजेत. कृपा करून त्यांनीं तीं आतां लोकांना उपलब्ध करावीं, म्हणजे मराठी वाङ्मयावर त्यांचे अनंत उपकार होतील.

'नवनीता'ची ही नवी आवृत्ति निर्दोष आहे असा संपादकाचा मुळींच दावा नाहीं, हें प्रस्तावनेच्या शेवटीं केलेल्या उपनिर्दिष्ट विनंतीवरून स्पष्ट कळून येणारें आहे. त्यांत चुका असतील. सवड होतांच मींच मिळतील ते दोष शोधून काढून पुढील आवृत्तीच्या वेळीं उपयोगी पडावी म्हणून सरकारकडे शुद्ध प्रत देण्याची शक्य तर व्यवस्था करून ठेवणार आहें. कोणी चुका दाखविल्यास मला दुःख होईल तें चुका दाखविल्याबद्दल नसून माझ्या नजरेंतून त्या सुटल्याबद्दल; दाखविलेल्या चुका खऱ्याच असतील तर त्या शोधण्याचें माझें काम हलकें झाल्या-बद्दल मला समाधानही वाटेल. वृत्तपत्रांकडे ज्यांना धांव घ्यावयाची असेल त्यांनीं वर दाखविल्याप्रमाणें टीकाकारांच्या अज्ञानानें ग्रंथकार नाहक बदनाम होणार नाहीं, याबद्दल काळजी घ्यावी. वृत्तपत्रांतील टीकेचा धोका असा असतो कीं, अज्ञान-मूलक टीकेमुळें आपल्यासंबंधीं लोकांचा गैरसमज होत असलेला ग्रंथकाराला हात चोळीत पाहावा लागतो; पण उठल्याबसल्या होत असलेल्या अशा निरर्गल टीकांना नेहमींच उत्तरें देतां येत नाहींत.

गेलीं सुमारें तीस वर्षें मिळत नसलेलें 'नवनीत' महाराष्ट्राला अल्प किंमतीला उपलब्ध करून दिलें, याबद्दल बक्षीस म्हणून संपादकासंबंधीं गैरसमज करून घेणें व इतरांचा करून देणें, हें कांहीं महाराष्ट्राच्या कृतज्ञतेचें द्योतक नाहीं. मग वर निर्दिष्ट केलेली 'महाराष्ट्राची कृतज्ञता' ती कुठली? या प्रश्नाचें उत्तर: वर उल्लेखिलेले सगळेच आक्षेपक असद्हेतुप्रेरित होते असें मुळींच नाहीं. पुष्कळांचे आक्षेप चुकीचे असले तरी निष्कपट व प्रामाणिकपणाचे होते, आणि चारदोन टीकाकार म्हणजे तरी सगळा महाराष्ट्र कुठें आहे? चार कोटी महाराष्ट्रीयांमध्यें अशा वृत्तीचीं चारदोन माणसें आढळल्यास त्यांत नवल कसलें? 'नवनीत' ज्या-वेळीं प्रथम प्रसिद्ध झालें, त्यावेळीं जवळ जवळ महिनाभर शेकडों सद्गृहस्थांनीं मला भेटतील तिकडे "नवनीत उपलब्ध करून देऊन तुम्हीं आमच्यावर फार मोठे उपकार केले," अशा आशयाचे कृतज्ञतेचे उद्गार काढले. केवळ मुंबईमध्येंच नव्हे, तर पुणें व इतर ज्या ज्या ठिकाणीं मीं गेलों तेथेंही महाराष्ट्राच्या कृतज्ञतेचा मला हाच प्रत्यय आला आणि अजूनही येत आहे. खरा महाराष्ट्र तो हा आहे. कृतज्ञता सामान्यत्वें मुकी किंवा passive असते, तर कृतघ्नता बोलकी किंवा active असते. माझी गांठ पडली आणि मला ओळखलें म्हणून या कृतज्ञ माणसांनीं आपला भाव व्यक्त केला. मुद्दाम पत्र पाठवणें किंवा भेटणें हें कृतज्ञ मनुष्य सहसा करणार नाहीं

परंतु कृतघ्न माणूस मात्र सातांसमुद्रांपलीकडे जाऊन तुमच्या विरुद्ध जिकडेतिकडे नगारे बडवील !

टांकीचे घाव सोसल्याशिवाय देवपणा येत नाहीं, असें म्हणतात. टीकेच्या घावांचेंही असेंच महत्त्व वर्णन केलें जातें. टांकीचे घावं घालणारा मूर्तिकार कुशल शिल्पकार असला तर पाषाणाला देवत्व प्राप्त होईल. नाहींतर त्याची मूर्ति बनण्या-आधीं तो पाषाण फुटून त्याचें चूर्ण होईल. टीकेचेंही असेंच आहे. टीकाकार जर विद्वान्, सहृदय व विवेकी असेल तर त्याची टीका उपयुक्त ठरेल; परंतु तो जर अज्ञान, खुनशी व मत्सरी असेल तर ः"जीर्णमंगे सुभाषितम्," अशी ग्रंथकाराची स्थिति होण्याचाच फार संभव असतो. आतांपर्यंत अशा बेजबाबदार टीकाकारांच्या तावडींत सांपडल्यामुळें किती व्यक्ति व संस्था रसातळाला गेल्या असतील हें एकस्या परमेश्वरालाच माहीत !

आलमगीर–दिवाळी अंक १९५८

◎ ◎ ◎

# ११

## " गाईला घांस घाला ! "

डोक्यावर हिरव्यागार गवताची टोपली, बरोबर एक गाय, एका हातांत गाईच्या गळ्यांतील दोरी व दुसऱ्या हातांत ताज्या गवताची जुडी, अशा प्रकारच्या बाईचें ध्यान मुंबईकडे सकाळच्या वेळीं नेहमीं दृष्टीस पडतें. कधीं कधीं गाई, कधीं मधीं बाई व कधीं कधीं दोघेंही, सवत्स असलेलीं दिसतात ! बाई सवत्स असली म्हणजे तिच्या बालकाचा झोळणा तिच्या गळ्याला अडकविलेला असतो. वृत्तपत्रें विकणारे पोरे, कांदेबटाटे, चणेकुरमुरे किंवा अशाच इतर वस्तु विकणारे फेरीवाले ज्याप्रमाणें निरनिराळे हेल काढून आपल्याकडे गिऱ्हाइकाचें लक्ष वेधीत असतात, त्याप्रमाणें ' गाईला चारा घाला, ' किंवा ' गाईला घांस घाला ', असें मोठमोठ्यानें ओरडत या गोग्रासवाल्या बाया शहरभर पुण्याचा विकरा मांडीत असतात ! आपण ज्या वेळीं एकादें वृत्तपत्र, भाजी किंवा फुलें खरेदी करतों, त्या वेळीं आपल्या पदरांत पैशाच्या बदली कांहीं ना कांहीं माल पडतो; पण गोग्रासवाल्या बायांच्या हातावर दिडकी ठेवून तिच्याकडून घेतलेली गवताची जुडी तिच्याच गाईला चारावी लागते ! आपल्या पदरांत अदृष्ट असें पुण्य पडतें असें म्हणतात आणि म्हणूनच तर आपण हा सौदा करतों !

एके दिवशीं सकाळच्या वेळीं चौपाटीवरून फिरून मीं परत येतांना, अशीच एक बाई " गाईला घांस घाला, " अशी मोठ्यानें घोषणा करीत फिरत होती ! तिला पाहून एका वाण्याच्या भाविकतेला भरतें आलें; किंवा त्याला पुण्याचा लोभ सुटला असेंच म्हणा ना ! तो गृहस्थ थांबला; खिशांत हात घालून पैशांचें पाकिट त्यानें बाहेर काढलें व त्यांतून एक दिडकी मोठ्या सावधगिरीनें ( नाहीं तर अधेली गेली तर–! ) उचलून ती त्यानें हळूच त्या बाईच्या हातावर ठेविली आणि बाईच्या हातांतील गवताची जुडी तिच्या बरोबरच्या गाईच्या तोंडीं देणार, इतक्यांत त्याला दुसरी अशीच एक गाय येतांना दिसली. या वाणी लोकांची दृष्टि नेहमीं व्यावहारिक असते. त्याला वाटलें, आपण दिडकी तर एवींतेवीं खर्चिलीच आहे. अर्थात् त्या जुडींतलें अर्धें गवत पहिल्या गाईला देऊन राहिलेलें गवत दुसऱ्या गाईला घालावें, म्हणजे एका दिडकींत दोन गाईंना ग्रास दिल्याचें पुण्य पदरांत पडेल. असा विचार करून अर्धें गवत त्यानें पहिल्या गाईला घातलें व

राहिलेलें गवत दुसऱ्या गाईला देण्याकरितां तो पुढें जाऊं लागला. त्या गुजराती गृहस्थाचा बेत त्या बाईच्या लक्षांत आल्याखेरीज राहिला नाहीं. तिनें त्याच्या धोतरालाच हात घातला आणि ती म्हणाली—

" शेट, चालला कुठें ? "

" बाय, हे तुमीं काय करते ? हा थोडा गवत आमी दुसऱ्या गायला देते. " तिच्या हातांतून आपल्या धोतराचा सोगा सोडवीत सोडवीत तो गुजराती म्हणाला.

" नाहीं, तसं तुम्हांला करतां येणार नाहीं. तें गवत तुम्हीं माझ्याच गाईला घातलं पाहिजे. दुसऱ्याच्या गाईला मीं तें तुम्हांला घालूं देणार नाहीं. " आतां त्याच्या कोटाला दुसऱ्या हातानें जास्तच घट्ट पकडून ती मस्तवाल घांटीण बोलली.

" पण तेच्यामधि काय झ्याला ? मीं तर अख्खी दिडकी देऊन गवत विकत घेतला. मी तो तुमच्या गाईला घालेल, दुसऱ्या गाईला घेल किंवा मींच स्वतः खायेल ! गवत माज्या झ्याला ! " तो गुजराती म्हणाला.

बाई मोठी खट्याळ होती ! आजूबाजूची मंडळी गोळा होऊं लागली. या भांडणाचा शेवट काय झाला, हें पाहण्यास मीं थांबलों नाहीं. मुंबईत गर्दी जमविण्याच्या गमती अशा नेहमींच्याच असतात.

## आतां हात दाखवतों

घरीं पोंचण्यापूर्वींच मी हा प्रकार अजिबात विसरूनही गेलों. घरांत पाय ठेवतों तो एक गृहस्थ मार्गप्रतीक्षा करीत तिष्ठत बसलेला !

" काय गोविंदराव, गांवाहून केव्हां आला ? आणि एवढ्या सकाळीं कोणीकडे ? " मीं कांहींतरी बोलावयाचें म्हणून बोललों !

" आपली नक्की गांठ पडेल म्हणून तर मीं अगदीं सकाळीं आलों, पण आपण बाहेर ! बरं झालं. एकदांची भेट झाली. " तो गृहस्थ म्हणाला. हा गृहस्थ कोंकणांतील एका संस्थेचा सेक्रेटरी होता व मीं त्या संस्थेचा तहाहयात सभासद व्हावें म्हणून तो कित्येक दिवस मला हैराण करीत होता. मी साधा वर्गणीदार होतों; परंतु इतक्यांत त्याला समाधान नव्हतें. याचकरितां तो पुष्कळ दिवसांनीं फिरून एकदां प्रयत्न करण्याकरितां म्हणून आला असेल असें वाटून मीं म्हटलें,

" माफ करा. मला सध्यां तरी आपल्या विनंतीला मान देण्यास सवड नाहीं. "

" पण मी हल्लीं त्या संस्थेचा सेक्रेटरी नाहींच आहें! मोठें कारस्थान करून गांवच्या लोकांनीं माझा ' नरिमन ' केव्हांच करून टाकला; पण मी थंड बसणारा लेचापेचा माणूस नाहीं. " असें म्हणून आपल्या प्रतिपक्षाची खोडकी जिरविण्याचे व ती संस्था धुळीला मिळविण्याचे आपले बेत त्यानें मला मोठ्या आवेशानें सांगितले. ते काय होते तें या ठिकाणीं सांगण्याचें कारण नाहीं. मला आश्चर्य वाटलें तें हें कीं, जो गृहस्थ इतके दिवस संस्थेच्या प्रेमाच्या मोठमोठ्या गोष्टी सांगून तिचा आमरण सभासद होण्याकरितां माझा जीव खात होता, तो तेथून स्थानभ्रष्ट झाल्याबरोबर संस्थेच्या अभिमानाला पारखा होऊन एकदम तिचा कसाई कसा बनला !! लगेच मला, " गाईला चारा घाला " म्हणून सारी मुंबई डोक्यावर घेणाऱ्या त्या गोग्रासवाल्या घांटणीची आठवण झाली, बाईची गोभक्ति केवढी दांडगी ! गाईच्या प्रेमानें सकाळपासून संध्याकाळपर्यंत संबंध मुंबई ती वणवण भटकत होती व समाजांत गोभक्तीचा व पर्यायानें पुण्याचा प्रसार करीत होती; पण तीची ही गोभक्ति कोठपर्यंत ? जोंपर्यंत तिच्या हातावर एक दिडकी पडून गवताची जुडी तिच्याच गाईच्या भक्ष्यस्थानीं पडेल व त्या गाईचें दूध तिलाच मिळेल तोंपर्यंत ? आमच्या समाजांतील निरनिराळ्या चळवळींकडे पाहिलें म्हणजे वारंवार मला दहापंधरा वर्षांमागें पाहिलेल्या या घांटणीची आठवण होते. आपल्या सार्वजनिक चळवळीच्या मुळाशीं देशाभिमानाच्या सात्त्विक भावनेपेक्षां वैयक्तिक स्वार्थ व बडेजाव असल्यामुळें त्या यशस्वी होत नाहींत. आपल्यामधील भांडणाचा उगम या अहंकारांत आहे. केवढ्याही मोठ्या राष्ट्रकार्याचा विध्वंस आपल्या या स्वार्थी मनोवृत्तीमुळें आपणांस करण्यास लाज वाटत नाही. आपल्या लोकांचा हा मोठा राष्ट्रीय दुर्गुण आहे, यांत शंका नाहीं. आपल्या पारतंत्र्याला हाच दोष कारण झाला, असें मागचा इतिहास पाहिला असतां दिसून येतें.

## 'राष्ट्रीय ' दुर्गण

स्वातंत्र्यप्राप्तीच्या या पहिल्या वाढदिवसाच्या प्रसंगीं आपल्या पारतंत्र्यांत आपलें कोणते दुर्गण कारण झाले हें समजून घेणें हिताचें ठरेल; कारण तें योग्य प्रकारें समजून घेऊन आपण त्याला टाळण्याची आतांपासूनच योग्य ती काळजी घेतली म्हणजे इतक्या परिश्रमांनीं मिळविलेलें स्वातंत्र्य पुनः गमावण्याचा आपल्यावर प्रसंग येणार नाहीं.

फ्रान्सिस्क लुइज गॉमिस नांवाचे एक गोव्याचे डॉक्टर पोर्तुगालच्या पार्लमेंटचे सभासद होते. त्यांनीं इतिहास, अर्थशास्त्र वगैरे विषयांवर पोर्तुगीज भाषेंत अनेक ग्रंथ लिहिले आहेत. इंग्लंडचे जॉन स्टुअर्ट मिल व फ्रान्सचे मिशेल शिव्हालिये अशांसारखे महापंडित त्यांचे चाहते होते. त्यांनीं हिंदुस्थानच्या पार्श्व-

भूमीवर " ब्राह्मण " या नांवाची एक पोर्तुगीज भाषेंत कादंबरी लिहिली असून ती १८६६ सालीं लिस्बन येथें प्रसिद्ध झाली आहे. या कादंबरींत एके ठिकाणीं डॉ. फ्रान्सिस्क लुइज् गॉमिस म्हणतो,

" इंग्लंडनें हिंदुस्थान जिंकला नाहीं. हिंदुस्थान त्याला बहाल करण्यांत आला. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा महान् शत्रु हिंदुस्थानच होय. निरनिराळ्या राजघराण्यांची आपापसांतील चुरस, निरनिराळ्या जातींमधील तेढ आणि निरनिराळ्या धर्मांतील वैर यांमुळें त्याच्या चिलखतांत वार करण्यास रीघ सांपडला आणि नव्या डेव्हिडनें गोलियेथला जखमी केला. हिंदुस्थानांत केवळ एकच धर्म, एकच राजघराणें व एकच जात असती, तर ' हिंदुस्थान ' अजिंक्य ठरला असता. बहुमुखी ब्रह्मा हास्यास्पद होय. त्याला एकच तोंड असतें तर तो जगाला भारी होऊन राहिला असता ! "

**घरभेदेपणा**

परकीय लोकांना हिंदुस्थानांत जो प्रवेश मिळाला, त्याला परकीय लोकांची शक्ति हें कारण नसून आपल्या लोकांमधील फुटीर वृत्ति कारणीभूत झाली आहे, हें इतिहासाचे अवलोकन केलें असतां दिसून येतें. डॉ. गॉमिस हे इंग्लंडला येथील लोकांनीं हिंदुस्थान आपण दान केला, असें म्हणतात; पण मुसलमानांना किंवा पोर्तुगीजांना आम्हींच होऊन हिंदुस्थानांत प्रवेश मिळवून दिला, हेंही तितकेंच खरें नाहीं काय ? आपल्या लोकांची जर त्यांना आंतून मदत नसती, तर त्यांच्या सत्तेचीं पाळेंमुळें हिंदुस्थानच्या भूमींत कधींही रुजलीं नसतीं. महंमद कासीमची सिंधवर स्वारी आठव्या शतकाच्या आरंभीं झाली. हिंदु-मुसलमानांमधील ही पहिलीच चकमक होय. या लढाईंत दाहीरचा जो पराभव झाला, त्याला एक प्रमुख कारण आपल्या लोकांचा घरभेदीपणा होता, असें इतिहासांत नमूद आहे. आल्बुकेर्कला गोवें मिळवून देण्यांत तिमोजा व मलराव या दोघां सरदारांनीं भाग घेतला होता, हीही गोष्ट प्रसिद्धच आहे. हिंदुस्थानांत इंग्रजांचा प्रवेश कसा झाला, हें सर्वांना माहीत आहे. हिंदुस्थानचा इतिहास म्हणजे आपल्या लोकांच्या घरबुडवेपणाचा इतिहास होय, असें म्हणावयास हरकत नाहीं. आम्ही दुर्बल होतों, किंवा कमी पराक्रमी होतों, म्हणून जिंकले गेलों, ही गोष्ट खोटी आहे. सर रिचर्ड फ्रान्सिस बर्टन १८५१ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या एका ग्रंथांत म्हणतो.

" Our empire in the East has justly been described as one of opinion that is to say, it is founded upon the good opinion entertained of us by the natives and their bad opinion of themselves.... *Everyone knows that if the people of India could be unanimous for a day they might sweep us from their country as dust before a whirwiud.*"

## आचार्य पदाचें प्रस्थ

सर रिचर्ड बर्टन हा १८४२ सालीं मुंबई हिंदी फौजेमध्यें शिरला व कित्येक वर्षें हिंदुस्थानांत राहून इकडील भाषा व समाज यांचा त्यानें सूक्ष्म अभ्यास केला. अशा विद्वानानें दिलेली ही कबुली अत्यंत महत्त्वाची आहे. आमच्यामध्यें एकोपा नाहीं किंवा घरभेदेपणा आपल्यामध्यें पुनः पुनः उचल खातो, याचें कारण आपल्यामध्यें एकराष्ट्रीयत्वाची व्यापक भावना नाहीं किंवा ती असली तरी तिच्यापुढें आपला वैयक्तिक स्वार्थ किंवा अहंकार नमत नाहीं, हेंच होय. जुन्या काळीं हिंदुसमाजामध्यें द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत, केवलाद्वैत, अशांसारखे शाब्दिक कीस काढून व निष्कारण वाद निर्माण करून आपले शहाणे लोक समाजांत फूट पाडीत, व आपलें स्वतःचें आचार्यपदाचें प्रस्थ माजवीत. कालपरवां सहकारिता, असहकारिता या नांवाखाली पक्षोपपक्ष माजवून पुढारीपणा मिरविण्यांत येऊं लागला. अलीकडे बहुजनभाई, साथी अशा पक्षांची सांथ जोरांत आहे. त्याचें कारण वैयक्तिक अहंकाराचा उद्रेक होय, असें वाटूं लागतें. एके काळीं वैभवाच्या शिखरावर पोंचलेलें व पुढें हलाखीला आलेलें रोमन राष्ट्र यांची तुलना करतांना मेकॉले यानें Lays of the Ancient Rome या काव्यांत एके ठिकाणीं जे उद्गार काढले आहेत, त्यांची या ठिकाणीं आठवण होते. जुन्या रोमन लोकांविषयीं तो म्हणतो,

Then none was for a party
Then all were for the state
The Romans were like brothers

पण आतां,

As we wax hot in faction
In battle we wax cold.

## वैयक्तिक अहंकार

मेकॉलेनें काढलेले हे उद्गार आमच्या सध्याच्या परिस्थितीला बरोबर लागू होण्यासारखे आहेत. आजही पक्षाभिमानापुढें आमचा देशभिमान लोप पावल्याचें दुर्दैवी दृश्य अनेक ठिकाणीं दिसत आहे. वास्तविक हा पक्षाभिमानही लेखाच्या आरंभीं वर्णन केलेल्या घांटणीच्या गोरक्षणाच्या अभिमानासारखा असतो. देशाभिमानाच्या नांवाखालीं वैयक्तिक अहंकार याचेंच सर्वत्र थैमान चालू आहे. सत्तारूढ पक्षांमध्यें या बंडखोर पक्षाच्या नायकांच्या अहंकाराची जर योग्य पूजा झाली असती, तर कदाचित् हे विरोधी पक्ष अस्तित्वांत आलेही नसते, किंवा सत्तारूढ पक्षामध्यें असे कित्येक लोक असतील कीं, त्यांना सध्याचें महत्त्व नसतें

तर ते विरोधी पक्षांत सामील झाले असते किंवा त्यांनीं नवे पक्ष उभारले असते. या वैयक्तिक पुढारीपणाच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेमुळें केवढा प्रचंड अनर्थ होऊं शकतो, हें मि. महमदअल्ली जिन्हा यांच्या उदाहरणावरून कळून येतें. त्यांना हवें असलेलें महत्त्व जर त्यांना कॉंग्रेसमध्येंच राहून मिळालें असतें, तर त्यांनीं कदाचित् पाकिस्तानचा राक्षस जन्माला घातलाही नसता.

## हें चित्र पाहा

हिंदुस्थानला हा जो दुहीचा रोग जडला आहे, त्याचें खापर धर्म व जाती यांच्या डोक्यावर निष्कारण फोडलें जातें. वास्तविक या दुहीचें मूळ कारण वैयक्तिक बडेजाव असून धर्म व जाति यांचा केवळ साधन म्हणून उपयोग केला जातो. धार्मिक भिन्नता असूनही जर राष्ट्राभिमान प्रखर असेल, तर धर्माभिमान कांहीं नुकसान करूं शकत नाहीं. इंग्लंडमध्यें प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक या धर्मपंथांचा विरोध इतक्या विकोपाला गेला होता कीं, एकमेकांना जाळून टाकण्यापर्यंत त्यांची मजल गेलीं होती; परंतु ज्या वेळीं स्पेनचें अजिंक्य आरमार इंग्लंडवर चाल करून आलें, त्या वेळीं कॅथलिक स्पेनला मदत करून इंग्लंडांतील कॅथॉलिकांनीं स्वराष्ट्रद्रोह केला नाहीं, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. याचें आणखीही एक उदाहरण सांगतां येण्यासारखें आहे. हिंदुस्थानांत आल्बुकेर्कबरोबर फ्रान्सिस्कन मिशनरी आले व गोव्याचा पहिला बिशप दों. जुवांव आल्बुकेर्क नांवाचा एक फ्रान्सिस्कन पाद्री होता. याची सत्ता केवळ गोव्यापुरती मर्यादित नसून सर्व पूर्वेकडील भागांवर होती. १५४२ सालीं ज्या वेळीं सेंट फ्रान्सिस झेवियर हिंदुस्थानांत आला, त्या वेळीं पोपचा पूर्वेकडील प्रतिनिधि म्हणून आला व पोर्तुगालच्या राजेसाहेबांनींही त्याला अधिकारपत्र दिलें होतें. तेव्हां फ्रासिस्कन व जेसुइट या पंथीयांमध्यें हा कलहाचा प्रसंग होता; परंतु हिंदुस्थानांत उतरल्याबरोबर झेवियरनें पहिली गोष्ट केली ती ही कीं, तो फ्रान्सिस्कन बिशपकडे गेला व त्याला पोप व पोर्तुगालचे राजे यांचीं पत्रें दाखवून आपला वैयक्तिक अधिकार केवढाही मोठा असला, तरी आपल्या हक्काचा उपयोग आपण बिशपला मान्य असतील अशाच गोष्टींत करीन, असें सांगून त्यानें धर्मकलहाचें बीजच उपटून टाकलें. याच्या उलट एकाद्या ख्रिश्चनची शुद्धि केल्यावर तिचें श्रेय कोणाला याबद्दल भांडत बसणाऱ्या आपल्या हिंदूंची वृत्ति पाहिली, म्हणजे वर सांगितलेल्या अशिक्षित घांटणीपेक्षां हे लोक उच्च दर्जाचे आहेत असें वाटत नाहीं. जातिभेदाविरुद्ध ओरड करण्याचीही अलीकडे फॅशन निघाली आहे. जुन्या काळीं जातिभेद होता; परंतु जातिमत्सर तितकासा नव्हता. भिन्न जातींचे लोक एका पंक्तीला जेवावयाला न बसले तरी आज एकाच पंक्तीला बसणाऱ्या लोकांपेक्षां त्यांच्यामध्यें जातिमत्सर कमी असे, असें बारकाईनें

पाहिलें असतां कळून येतें. आजही वैयक्तिक बडेजावाला सोकावलेले दोन एकाच जातीचे पुढारी एकमेकांचा जितका द्वेष करतात, तितका भिन्न जातींचे करीत नाहींत, असें दाखवून देतां येण्यासारखें आहे. यावरून आपल्यामध्यें अहंकार हाच प्रबळ भाव असून धर्माभिमान, स्वराज्याभिमान, देशाभिमान या भावना, केवळ त्याच्या आश्रित म्हणून राहूं शकतात, असें दिसून येतें. याच्याविरुद्ध पाश्चात्यांमध्यें राष्ट्राभिमान हीच प्रबलतम भावना आहे. त्यांचा अहंकार राष्ट्रभिमानाच्या आड कधींही येऊं शकत नाहीं. ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम वगैरे संतांच्या निवृत्तिपर शिकवणीमुळें अहंकाराची नांगी महाराष्ट्रांत कांहीं काळ ठेंचिली गेली व त्यामुळें शिवाजीमहाराजांना स्वराज्य स्थापन करणें शक्य झालें. पुढें सरंजामपद्धतीमुळें स्वराज्याभिमानाकडे आपलें दुर्लक्ष होऊन जो तो आपापल्या स्वार्थाकडे पाहूं लागला आणि त्याचें पर्यवसान अखेर मराठी स्वराज्याच्या नाशांत झालें.

**मराठे आणि इंग्रज**

कै. वासुदेवशास्त्री खरे यांनीं ‘ मराठे व इंग्रज ’ या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत याचें चांगलें वर्णन केलेलें आहे. ते लिहितात, “ पेशवाईच्या काळांत राज्याभिमान अस्तित्वांत होता म्हणावें, तर त्या राज्याचे शत्रु निजामअल्ली व हैदरअल्ली यांच्या पदरीं हजारों मराठी शिलेदार व सरदार होते; आणि ते पेशव्याशीं लढतांना त्यांचें नुकसान करण्यास बिलकूल कसूर करीत नव्हते ! पेशवाईबद्दल ब्राह्मणांना तरी अभिमान होता म्हणावें तर तेही पेशव्याशीं वैरभाव धरणाऱ्या जाट, रोहिले, रजपुत, इंग्रज, फ्रेंच इत्यादि लोकांच्या पदरीं राहून पेशवाईचें अकल्याण करण्यास प्रवृत्त होतच होते ! ईस्ट इंडिया कंपनीच्या मुंबई खात्याच्या पायदळ पलटणी पेशवाईची रयत असलेल्या मराठ्यांच्याच होत्या व यांपैकीं हजारों लोक इंग्रजांच्या वतीनें समरांगणांत पेशवाई फौजांशीं लढतांना मृत्यु पावले आहेत ! याच्या उलट इंग्रजांचा देशाभिमान कसा प्रखर व जागृत होता हें सुप्रसिद्धच आहे. एका इंग्रज डॉक्टरानें बादशहाच्या मुलीला औषध देऊन बरें केलें तेव्हां बादशहा खुषीनें त्या डॉक्टराला लाख पन्नास रुपये देता; परंतु डॉक्टरानें दुसरें कांहीं बक्षिस न घेतां बादशाहास अर्ज केला कीं, माझ्या देशाच्या लोकांस तुमच्या राज्यांत व्यापाराची सवलत द्या म्हणजे बक्षीस पोंचलें ! मीर जाफरच्या मृत्यूमुळें क्लाइव्हला मिळालेल्या पैक्याचा विनियोग त्यानें आपल्या देशाच्या लष्करी अंमलदारांच्या उपयोगार्थ केला आणि खर्ड्यांच्या लढाईनंतरचा तह ठरवितेवेळीं निजामअल्लीनें नाना फडणवीस यास तीस हजार रुपये उत्पन्नाचें गांव दिलें, तें यानें स्वतःकरितां खुशाल ठेवून घेतलें ! ”

**इतिहासडिंडिमाचा घोष !**

खरेशास्त्र्यांची ही स्पष्टोक्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या उपरिनिर्दिष्ट प्रस्तावनेच्या शेवटीं ते लिहितात,

“ देशाभिमानशून्यता, समूहरूपानें कार्य करण्याची नालायखी, स्वार्थसाधनाची बेसुमार हांव, आळस, हेळसांड, दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची संवय, इत्यादि दुर्गुण आमच्या समाजाच्या अंगीं खिळले आहेत, तेच आमच्या राज्यनाशाला कारण झाले आहेत...**पूर्वीं स्वराज्य होतें तें याच दुर्गुणांमुळें गेलें, हें समजून जर आम्हीं सावध झालों नाहीं, तर नवीन स्वराज्य मिळवूनसुद्धां व्यर्थच आहे, हाच इतिहासडिंडिमाचा घोष, प्रत्येकाच्या कानीं घुमत राहिला पाहिजे !** ”

विविधवृत्त, १५ ऑगस्ट १९४८

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ७६५९३ वि: ग्रंथालय
क्रमांक ९८९६ नों: दि: २८/३/६०

## १२

# " माझें मोठें पहा ! "

सुप्रसिद्ध मराठी व्याकरणकार रा. ब. दादोबा पांडुरंग यांचें म्हणून वरील वाक्य नेहमीं चेष्टेनें उच्चारलें जातें. आरंभीं कांहीं ग्राम्यताही त्यांत ध्वनित होती; परंतु हें वाक्य इतक्या थोरांमोठ्यांच्या मुखांतून घोळून निघालें आहे कीं, त्याला आज अभिजात ( classic ) म्हणीचें स्वरूप प्राप्त झालें आहे व त्यांतील ग्राम्यता जाऊन गम्मतच तेवढी शिल्लक राहिली आहे. एकादा ओबडधोबड दगड नदीच्या प्रवाहांत सांपडावा व कांहीं काळानें तो गुळगुळीत बनून त्याची शालिग्राम म्हणून पूजा व्हावी, असेंच कांहींसें या लोकोचाराच्या प्रवाहांत सांपडलेल्या वाक्याचें झालें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. 'रा. ब. दादोबा पांडुरंग' या माझ्या ग्रंथाला आपले पंतप्रधान श्रीयुत बाळासाहेब खेर यांनीं पुरस्कार लिहून पाठवून दिला, त्यांत वरील वाक्याचा उपयोग त्यांनीं केला होता तो असा, " लघुव्याकरणाच्या टीपांमध्यें दादोबा पांडुरंगांनीं लिहिलेल्या मोठ्या व्याकरणाचा जेथें जेथें संदर्भ असे, तेथें तेथें 'माझें मोठें पहा' अशी टीप असे. मग विद्वत्तेचा डौल आणून आम्हीं तें मोठें व्याकरण काढून वाचीत असूं. "

" माझें मोठें पहा, " असें लोक वात्रटपणानें बोलतात; पण यांपैकीं शेंकडा एकानेंही हें 'दादोबांचें मोठें' पाहिलेलें नसतें, असें मींच स्वतः माझ्या ग्रंथाच्या हस्तलिखितांत एक वाक्य प्रथम लिहिलें होतें. अर्थात् मींही हें वाक्य केवळ 'श्रुती' च्या परंपरागत आधारावरच नमूद केलें, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. माझें स्वतःचें मराठी शिक्षण दादोबांच्या लघुव्याकरणाच्याच साहाय्यानें झालेलें; पण त्याची मला आतां आठवण कोठली ? तेव्हां दादोबांनीं स्वतः काय लिहून ठेवलें आहे तें प्रत्यक्ष पहावें म्हणून मीं लघुव्याकरणाची माझ्या संग्रहीं असलेली जुन्यांतली जुनी १८९० सालची सोळावी आवृत्ती उघडून पाहिली; परंतु त्यांत मला कोठेंही असें वाक्य आढळलें नाहीं. उलट ठिकठिकाणीं त्यांनीं " माझें मोठें " असें मोघम न म्हणतां " माझें मोठें व्याकरण, " असा प्रत्येक ठिकाणीं स्पष्ट निर्देश केलेला मला आढळला. पहा—

( १ ) " याचा बारीक भेद **मोठ्या व्याकरणावरून** समजून घ्यावा. " ( पृ. ४ )

( २ ) " स्वरसंधीचे आणखी नियम, आणि व्यंजनसंधीचे सारे नियम जाणायाचे असल्यास **माझ्या मोठ्या व्याकरणांतलें** संधिप्रकरण पाहावें. " ( पृ. ५ )

( ३ ) " या वचनप्रकरणीं आणखी बारीक नियम पुष्कळ आहेत. ते पहायाचे असल्यास **माझें मोठें व्याकरण** पाहावें. " ( पृ. १२ )

( ४ ) " हीं सकर्मक आणि अकर्मक क्रियापदें ओळखायाच्या आणखीही रीति आहेत, त्या सविस्तर पाहणें असल्यास ' **माझें मोठें व्याकरण** ' पाहावें. " ( पृ. ३६ )

( ५ ) " याविषयींची सविस्तर समजूत **माझ्या मोठ्या व्याकरणांत** पहावी. "

( ६ ) " या कर्मकर्तरि प्रयोगाचा प्रचार इतर भाषांत फार आढळतो. या विषयाचा विस्तार **माझ्या मोठ्या व्याकरणांत** व त्याच्या पुरणिकेंत पहावा. " ( पृ. ४५ )

( ७ ) " या वाक्यरचनेचे पुष्कळ अगत्याचे नियम आहेत; ते **माझ्या मोठ्या व्याकरणांत** पहावे. " ( पृ. ६० )

यावरून दादोबांच्या लघु व्याकरणांत असें एकही स्थळ नाहीं कीं जेथें " माझें मोठें " असें मोघम म्हटलें आहे, ही गोष्ट स्पष्ट होईल. कदाचित् पूर्वींच्या आवृत्तींमध्यें तसें दादोबांनीं मोघम लिहिलें असेल व पुढें जेव्हां लोक चेष्टाच करूं लागले तेव्हां त्यांनीं दुरुस्ती केली असावी, अशीही मला एक शंका आली. तिचें निराकरण करण्याकरितां १८६५ सालची पाहिली प्रत आमचे मित्र रा. शंकरराव दाते यांच्या संग्रहीं होती ती पाहिली; पण माझी शंका शेवटीं खोटीच ठरली. श्रुतिस्मृतिपुराणोक्त गोष्टींवर आंधळेपणें विश्वास ठेवल्यानें कशी फसगत होते, हें पाहून मला खूपच हसूं लोटलें आणि प्रथम लिहिलेलें उपरि-निर्दिष्ट वाक्य मीं खोडून टाकलें.

पुढें वर सांगितल्याप्रमाणें बाळासाहेब खेरांच्या पुरस्कारांत ज्या वेळीं या वाक्याची पुनः भेट झाली, तेव्हां आतां काय करावें हा मला मोठाच प्रश्न पडला. अशा प्रकारचें चुकीचें विधान बाळासाहेबांच्या लिखाणांत जाणूनबुजून तसेंच राहूं देणें मला प्रशस्त वाटेना. पुस्तकप्रकाशनाचा दिवस ता. ९ मे १९४७ हा ( दादोबांचा जन्मदिवस ) मुक्रर केला होता, त्याला अवघे थोडेच दिवस शिल्लक राहिले होते व बाळासाहेब स्वतः दिल्लींत घटनासमितीच्या कार्यांत अडकले होते. त्यांच्या नजरेला ही गोष्ट आणून या बदलाला त्यांची संमती घेण्यास मला पुरेसा

अवधि नव्हता. पाठचिकित्साशास्त्राप्रमाणें मूळ लेखकाच्या लिखाणांत ढवळाढवळ करणें अनुचित आहे, हें मला ठाऊक होतें. ख्रिस्तवासी रे० टिळक यांनीं तर " माझीं कवनें कुणीं स्पर्शणें । सहन न होणें मुळिं मजला । याहून प्राण बरा गेला " ! असेंच कांहींसें लिहून ठेवलें आहे. मूळ ग्रंथकाराची चूकही असली तर ती तशीच राहिली पाहिजे, हें तत्त्व दिवंगत ग्रंथकारांच्या बाबतींत ठीक आहे; परंतु विद्यमान् ग्रंथकारांच्या बाबतींत या तत्त्वाची कडकपणें अंमलबजावणी करणें बरोबर नाहीं. या पेंचांतून मीं एक मधला मार्ग शोधून काढला. तो हा कीं, या पुरस्काराच्या पांचदहाच प्रती दुरुस्ती करून तूर्त प्रकाशनसमारंभापुरत्या छापून घ्याव्या व कंपोझ तसाच ठेवून बाळासाहेबांच्या संमतीनेंच पुढें काय करावयाचें तें ठरवावें.

प्रकाशनसमारंभ डॉ. बाबासाहेब जयकर यांच्या अध्यक्षतेखालीं व्हावयाचा होता. घटनासमितीचें काम चालू असल्यामुळें श्री. बाळासाहेब या प्रसंगीं हजर रहातील असें वाटलें नव्हतें; पण घटनासमितीचें काम अपेक्षेपेक्षां लवकर संपल्यामुळें ते या समारंभाला उपस्थित राहूं शकले. " रा. ब. दादोबा पांडुरंग " हा ग्रंथ टेबलावर पडला होता. डॉ. बाबासाहेब जयकर येण्यास दोनचार मिनिटें उशीर होता. तितक्या वेळांत बाळासाहेबांनीं आपला पुरस्कार वाचून काढला व मीं केलेला हस्तक्षेप त्यांच्या लक्षांत आल्याखेरीज राहिला नाहीं. त्यांच्या शेजारींच उच्चासनावर महामहोपाध्याय काणे बसले होते. त्यांच्याशीं आपसांत त्यांचें कांहीं वेळ हंसतच भाषण झालें. पुढें ज्या वेळीं बाळासाहेब बोलण्यास उभे राहिले, त्या वेळीं आपल्या भाषणांत, आपण ' माझें मोठें पहा अशी टीप असे ' असें पुरस्कारांत लिहिलें होतें, त्या जागीं प्रियोळकरांनीं " माझ्या मोठ्या व्याकरणांत पहा, अशा आशयाची टीप असे " असा फरक केला आहे, असे हंसतच त्यांनीं उद्गार काढले. हें वाक्य अशिष्ट वाटून मीं त्यांत फरक केला, अशी बाळासाहेबांची कल्पना असावी. खरें म्हटलें तर अशिष्टपणापेक्षां असत्याला टाळण्याचा माझा जास्त प्रयत्न होता. दुसऱ्या दिवशीं या ग्रंथाची पुरस्कारासह छापील प्रत बाळासाहेबांना देण्याकरितां त्यांच्या मलबारहिलवरील निवासस्थानीं मीं गेलों असतां त्यांना जुनीं लघुव्याकरणें दाखवून त्यांची समजूत कशी खोटी आहे, हें मीं त्यांच्या नजरेस आणलें.

" पण माझी एकट्याचीच अशी समजूत आहे असें नाहीं; महामहोपाध्याय काण्यांचेंही असेंच Impression आहे, " बाळासाहेब म्हणाले.

" बाबासाहेब जयकरही असेंच म्हणतात. मा. मो. पा. ( माझें मोठें पाहा ) अशी टीप लघुव्याकरणांत असे, असें ते मला कांहीं दिवसापूर्वीं म्हणाले, " मीं बोललों.

" मग आम्हां इतक्या लोकांचीं Impressions खोटीं कशीं असूं शकतील ? " मला त्यांनीं प्रश्न केला.

" पण अशा प्रकरणांत मेंदूवरील इंप्रेशनापेक्षां कागदावरील इंप्रेशनालाच जास्त महत्त्व दिलें पाहिजे, " मी हंसतच म्हणालों. माझी कोटी ऐकून तेही खूप हंसले !

दुसऱ्याच दिवशीं सकाळच्या सहलीहून परत येतांना महापहोपाध्याय काणे मला रस्त्यांत भेटले. " आमची आणि बाळासाहेबांची तुम्ही चांगलीच लावून दिलीत ! " मी म्हणालों.

" काय झालें ? " त्यांनीं विस्मयपूर्वक प्रश्न केला.

" माझें मोठें पहा, " अशी टीप लघुव्याकरणांत होती, या बाळासाहेबांच्या समजुतीला जर तुम्ही दुजोरा दिला नसता तर मीं त्यांच्या पुरस्कारांत केलेल्या हस्तक्षेपाचा त्यांनीं जाहीरपणें उल्लेख केला नसता. " मीं म्हणालों.

महामहोपाध्याय काणे यांची तर अशी टीप लघुव्याकरणांत होती याबद्दल निश्चित भावना अद्यापि आहे. इतकेंच नव्हे, त्यांच्याबरोबर असलेले एक बॅरिस्टर मित्र यांनींही त्याबद्दल छातिठोक ग्वाही दिली. आपल्या विद्यार्थीदशेंत वाचलेली १८८६ सालच्या सुमाराची आवृत्ती पहा म्हणजे तुम्हांला अशी टीप खात्रीनें सांपडेल, असें प्रा. काणे म्हणाले. अनेक लोकांकडे यासंबंधीं चौकशी केली व प्रत्येक त्याबद्दल खात्रीच देत होता. एल्फिन्स्टन कॉलेजचे माजी प्रिन्सिपल रँग्लर काशिनाथपंत गुंजीकर हे तर अशी टीप होती, हें आपण शपथेवर सांगूं शकेन असें म्हणाले. दादोबांच्या लघुव्याकरणांत अशी टीप कधींही नव्हती व त्या काळच्या शाळकरू पोरांनीं वात्रटपणानें उठविलेली ती निव्वळ गप्प आहे, असें ठासून सांगणारे मला एकच गृहस्थ भेटले व ते म्हणजे मंडलिकांच्या चरित्राचे कर्ते रा. ग. रा. हवालदार. लघुव्याकरणाची पहिली ( १८६५ ), दुसरी ( १८६६ ) ( ? ), सातवी ( १८७१ ), आठवी ( १८७३ ), नववी (१८७४), बारावी ( १८८२ ), पंधरावी ( १८८७ ), सोळावी ( १८९० ), अठरावी ( १८९४ ), चोविसावी ( १९१९ ) व पंचविसावी ( १९२७ ) अशा निरनिराळ्या आवृत्त्या मीं पाहिल्या. त्यांत अशा शब्दांची टीप नाहीं. यावरून अनेक लोकांच्या समजूती ( Impressions ) कशा चुकीच्या असूं शकतात हें कळून येतें, व " गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः " या उक्तीची सत्यताही पटूं लागते.

\+ \+ \+

ही जी मीं वर आठवण दिली त्यांत माझा एक हेतु आहे. आपल्या ग्रंथालयांमध्यें नेहमीं एका महत्त्वाच्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें जातें. एकाद्या

पुस्तकाची नवी आवृत्ति आली म्हणजे जुन्या आवृत्तीची लोकांना गरज वाटत नाहीं. ती पुष्कळदां रद्दीमध्यें फेंकूनही दिली जाते; परंतु ग्रंथसंग्रहशास्त्रदृष्ट्या ग्रंथाची प्रत्येक आवृत्ति ग्रंथालयामध्यें अवश्य असली पाहिजे. वरच्यासारख्या ज्यावेळीं शंका उत्पन्न होतात, त्यावेळीं त्यांचें निराकरण करण्याकरितां या निरनिराळ्या आवृत्त्यांचा उपयोग होतो. ग्रंथकाराच्या ज्ञानाची किंवा ग्रंथविषयाची कसकशी उत्क्रान्ति होत गेली याचा अभ्यास ज्यांना करावयाचा असेल त्यांनाही अशा वेगवेगळ्या आवृत्तींचा उपयोग फार आहे. पुष्कळदां एकाच ग्रंथाची पहिली प्रत व त्याच्या नंतरच्या आवृत्त्या यांच्यामध्यें इतकी तफावत असतें कीं, हीं अगदीं भिन्न पुस्तकें वाटूं लागतात. दादोबांचें मोठें व्याकरण याचें उदाहरण म्हणून सांगतां येईल. अगदीं शेवटची आवृत्ती ही जास्त उपयुक्त असतेच असें नाहीं. आरंभींच्या आवृत्तीच्या मोडतोड केलेल्याही पुढील आवृत्त्या निघतात. ज्यांना केवळ परीक्षेंत पास होण्यापुरते मार्क मिळविण्याचे असतील किंवा वेळ घालविण्याकरितां केवळ वाचावयाचें असेल त्यांचें काम कदाचित् शेवटची किंवा कुठचीही आवृत्ती करूं शकेल; परंतु ज्यांना पायाशुद्ध शास्त्रीय पद्धतीनें अभ्यास करावयाचा असेल, त्यांच्यापुढें पुस्तकाच्या सर्व आवृत्त्या असल्याखेरीज त्यांच्या कार्याची सिद्धता झाली, असें मी तरी म्हणणार नाहीं. एकाद्या भाषेचें ग्रंथसंग्रहालय म्हटलें म्हणजे त्या भाषेंतील प्रत्येक ग्रंथ, मग तो लहान किंवा मोठा, बरा किंवा वाईट, त्या ठिकाणीं संग्रहीत झाला पाहिजे व प्रत्येक ग्रंथाची प्रत्येक आवृत्ति त्या ठिकाणीं पहावयास मिळाली पाहिजे, अशी ध्येयदृष्टि ठेवून बनलेलें आपल्याकडील एकही ग्रंथसंग्रहालय माझ्या पहाण्यांत किंवा ऐकिवांत नाहीं. प्रत्येक ग्रंथसंग्रहालयाला अशी दृष्टि ठेवणें आर्थिकदृष्ट्या शक्य नाहीं, हें मी जाणतों; पण प्रत्येक देशी भाषेचें असें एक तरी परिपूर्ण ग्रंथसंग्रहालय असावें. रॉयल एशियाटिक सोसायटी किंवा भांडारकर प्राच्यविद्या संशोधकमंडळ म्हटलें म्हणजे तिकडे संस्कृत किंवा इतर प्राच्य विद्येवरील जगांत कोणत्याही भाषेंत प्रसिद्ध झालेला प्रत्येक ग्रंथ पहावयास मिळाला पाहिजे. अशा संग्रहालयांना सरकारनें उदारपणें मदत केली पाहिजे. मराठीपुरतें मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला असें स्वरूप देतां येण्यासारखें आहे. पुण्याचें मुक्तद्वार महाराष्ट्र ग्रंथालयही अशी आदर्श संस्था होऊं शकेल. नागपूर वऱ्हाडकडेही विदर्भसाहित्यसंघासारखी अशी एकादी संस्था असावी. म्हणजे कुठें ना कुठें प्रत्येक मराठी ग्रंथाची प्रत संग्रहीत झालेली आपणांस पाहावयास सांपडेल. आपल्या वाङ्मयधनाच्या संरक्षणाकडे The Royal Asiatic Society of Great Britain and Ireland या संस्थेनें प्रथम आपलें लक्ष वेधलें. या संस्थेच्या अधिकाऱ्यांनीं The Secretary of State for India यांना पत्र लिहून हिंदुस्थानांत संस्कृत किंवा इतर देशी

भाषांमध्यें जे ग्रंथ प्रसिद्ध होतात त्यांची युरोपीयन अभ्यासकांना माहिती नसते, तरी याकरितां आतांपर्यंत हिंदुस्थानांत जें प्रकाशन झालें असेल, त्यांचा शक्य तितका पूर्ण कॅटलॉग तयार करावा व यापुढें प्रसिद्ध होणाऱ्या प्रकाशनाच्या त्रैमासिक याद्या सादर कराव्या, अशा प्रकारची विनंती केली. या पत्रांत ते लिहितात,

"Five of our great libraries are entitled to a copy of every work published in the British Empire. The law conferring on them this privilege was intended to preclude the ultimate loss of any such book. Hitherto, however, these libraries have been practically deprived of the fruits of this privilege so far as India is concerned, chiefly, as we suppose, because the Hindus are unaware of the obligation imposed on them by law to furnish copies of their publications to the libraries in question."

या पत्रामुळें ग्रँट व पील यांचे कॅटलॉग प्रसिद्ध झाले व १८६७ सालचा २५ वा ॲक्ट पास होऊन हिंदुस्थानांतील प्रकाशनाच्या त्रैमासिक याद्या प्रसिद्ध होऊं लागल्या. या कायद्याप्रमाणें मुद्रकाला प्रत्येक प्रकाशनाच्या तीन प्रती सरकाकडे पाठवाव्या लागत; परंतु प्रत्येक पुस्तकाची प्रत कुठल्या न कुठल्या ग्रंथालयांत सुरक्षित राहावी, हा जो या कायद्याचा मुख्य हेतु तो साफ कसा फसला आहे, याची सविस्तर हकीकत मीं " मराठी **दोलामुद्रितें** " या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयातर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत कथन केली आहे. अलीकडे सरकारकडे पाठविणाऱ्या पुस्तकाच्या प्रतींची संख्या तीनाऐवजीं पांच करण्यांत आली आहे; पण वर सांगितलेल्या मूळ हेतूकडे जर लक्ष दिलें नाहीं, तर ' आंधळा दळतो आणि कुत्रें पीठ खातें, ' अशी या प्रतींची यापुढेंही स्थिती होईल, अशी मला भीति वाटते.

श्रीसरस्वती-साहित्य-संमेलन विशेषांक १९५१ मे

◎ ◎ ◎

# १३

## संशोधनाचें संशोधन

' दुरून डोंगर साजरे, ' अशी एक म्हण आहे. डोंगरच काय, माणसेंदेखील दुरून रम्य असतात. मी घरीं नेहमींच बोलतों. अभ्यासाचीं पुस्तकें टाकून गोष्टी व कादंबऱ्यांचीं पुस्तकें वाचतात म्हणून मुलांना बोलतों; पण माझ्या या जवळच्या बोलण्यासंबंधीं त्यांनीं कधींच आस्था दाखविलेली मला ठाऊक नाहीं! परंतु मीं दुरून–ऑल इंडिया रेडिओवरून-बोलणार म्हणून तें ऐकायला मात्र घरचीं माणसें रेडिओच्या यंत्राजवळ गोळा झालीं. मोठ्या माणसांची उत्सुकता पाहून छोटींही, शेजारची अंजली, गीता व मिलिंद हींही तेथें येऊन बसलीं. मुलें रेडिओ नेहमींच ऐकतात; पण दुरून कोठेंतरी, कोणीतरी बोलतो व तें आपल्याला ऐकूं येतें, अशी त्यांची कल्पना नसते. घंटा वाजते, शिटी वाजते, हार्मोनियम वाजतो, किंवा फोनोग्राफ वाजतो, तसाच ( त्याच्याप्रमाणें माणूस नसतां ) रेडिओ वाजतो, अशी मुलांची कल्पना! " हे पाहा आतां तात्या बोलणार, " असें कोणीतरी त्यांना सांगितलें, तरी त्यांना त्याचा अर्थ कळला नाहीं. तात्या जवळ किंवा घरांतही नाहींत, मग बोलणार कसे? मुलांनीं ओळखीचा आवाज रेडिओवर पूर्वीं कधीं ऐकिला नव्हता. माझें बोलणें सुरू झालें—

" खरंच बोलतात ते तात्याच? रेडिओच्या पेटींत ते केव्हां ग गेले? " माझा आवाज ओळखून गीता म्हणाली.

" अग, पण ते कसे गेले? " इतकें म्हणून मिलिंद थांबला नाहीं, तर एकदम उठून यंत्रामध्यें आंत जावयाला यंत्राला एकादें दार आहे कीं काय, हें निरखून पाहूं लागला! शेवटीं त्याला एक भोंक दिसलें, त्यांतूनच गेले असले पाहिजेत, याबद्दल त्याची खात्री झाली व तात्या दिसतात कीं काय, हें तो त्या भोंकांतून पाहूं लागला! मोठीं माणसें मीं काय बोलतों हें ऐकण्यांत गर्क होतीं, तर हीं छोटीं माणसें यंत्रांत मी केव्हां गेलों, कसा गेलों हें जाणून घेण्यास धडपडत होतीं. शेवटीं जेव्हां माझें भाषण संपलें, तेव्हां मुलांची मौज आठवून घरांत एकच हंशा पिकला. मीं घरीं आल्यावर मला ज्या वेळीं मुलांची गंमत सांगण्यांत आली, त्या वेळीं मुलांचा ' अज्ञानरस ' पाहून मींही पुष्कळ हंसलों.

लहान मुलें जेव्हां अज्ञानानें एकादी गोष्ट बोलतात, त्या वेळीं हंसूं येतें; पण ज्या वेळीं मोठीं माणसें असा प्रकार करतात, त्या वेळीं हंसावें कीं रडावें, हेंच समजत नाहीं !

मुंबई मराठा ग्रंथसंग्रहालयाला जोडून मराठी संशोधनमंडळ स्थापन होऊन नुकतेच चवदा महिने झाले होते. एका गृहस्थानें या मंडळाच्या कार्यासंबंधीं मला माहिती विचारली व ती मीं त्याला थोडक्यांत सांगितली. “ तर मग या चवदा महिन्यांत एकंदर किती पीएच्. डी. बाहेर पडले ? ” त्यानें मला सवाल टाकला. पावसाच्या आरंभीं भोंपळ्यांचा वेल लावला व त्याला किती भोंपळे धरले, किंवा घरांत उंदरांचा सांपळा मांडावा व त्यांत किती उंदीर सांपडले, हें विचारण्यासारखा त्याचा हा प्रश्न होता ! हा गृहस्थ सरळ बुद्धीचा नव्हता. कांहींतरी उणेपणा दाखविण्याचा त्याचा हेतु दिसला. मला रा. बा. दादोबा पांडुरंग यांनीं आत्मचरित्रांत सांगितलेल्या बडोद्याच्या एका आठवणीची आठवण झाली. दादोबा लिहितात, “ एका टवाळ मनुष्यानें मला पुसलें, का हो, आम्हीं ऐकतों, कीं यांहीं सर्व पृथ्वींतील देशांचा नकाशा केला आहे, तर ही गोष्ट खरी आहे काय ?...तिसरा म्हणाला, ‘ बरें, दादासाहेब, जर आपणांस इतक्या सर्व देशांची माहिती आहे, तर आमच्या या बडोद्यांत किती बोळ व गल्ल्या आहेत तें सांगा ना ! ’ मीं मनांत केलें, कीं टवाळ मंडळीनें रावसाहेबांसमक्ष आमचा पाणउतारा करावा असें मनांत आणलें आहे...( मीं ) त्यांस उलट प्रश्न केला, ‘ तुम्हीं आपला हात मिशांवर दिवसांतून पन्नासदां फिरवितां, तेव्हां तुम्हीं तर सहज सांगावें कीं तुमच्या मिशांत किती केस असावे तें ! ’ तेव्हां रावसाहेब चकित झाले, आणि म्हणाले ‘ भलें समयोचित उत्तर केलें ! ’ ” याच पद्धतीवर उत्तर दिल्याखेरीज या गृहस्थास नीट कळणार नाहीं, असें जाणून मीं म्हटलें, “ काय, आपली मुलगी जांवई ठीक आहेत ना ? एकादें नातवंड झालं कीं नाहीं ? ” माझा प्रश्न ऐकून तो म्हणाला, “ काय वेड्यासारखे बोलतां हें ? लग्न होऊन अद्याप पुरे सात महिने झाले नाहींत. नऊ महिने तरी होऊं द्या. मग विचारा ! ” मीं म्हणालों, “ रावसाहेब, मूल होण्यास ज्याप्रमाणें नऊ महिन्यांची मर्यादा ब्रह्मदेवानें घातलेली आहे, त्याप्रमाणें पीएच्. डी. व्हावयाला दोन वर्षांची मुदत आपल्या युनिव्हर्सिटीनें घातलेली आहे. चार टर्मस् भरल्याखेरीज विद्यार्थ्यांना आपला निबंध सादरही करतां येत नाहीं. शिवाय अपत्यलाभ होणें जितकें सोपें, त्या मानानें हा पीएच्. डी. चा उपाधिलाभ होणें सोपें नाहीं. चारपांच वर्षें कष्ट करून एकाद्यास यश मिळालें, तर मिळेल. ( अलीकडेच युनिव्हर्सिटीनें चार वर्षांत निबंध पुरा केला पाहिजे, अशी अट घातली आहे. ) उदरनिर्वाहाचा कांहीं तरी व्यवसाय करीत त्याबरोबर पीएच्. डी. ची तयारी आपले विद्यार्थी

करीत असतात; त्यामुळें या दोनही गोष्टी साधणें त्यांना फार कठीण जातें." या उत्तरानें गृहस्थांचें समाधान झालें कीं काय, सांगवत नाहीं. ते पुढें आणखी विशेष कांहीं बोलले नाहींत.

संशोधनासंबंधानें आपल्याकडे उतावीळपणाच्या फार विपरीत कल्पना आहेत. याचें कारण संशोधन हें आपल्याला नवीन आहे. इंग्रजींतील Research या शब्दाचा मराठी प्रतिशब्द म्हणून आपण हा शब्द योजतों. संशोधन या संस्कृत शब्दाचा मूळ अर्थ शुद्धीकरण ( Purification ) असा आहे; पण त्या अर्थी आपण तो आज वापरीत नाहीं. Research या अर्थी संशोधन हा शब्द प्रथम कोणी उपयोगांत आणला हें पाहणें मनोरंजक ठरेल. बहुतेक विसाव्या शतकांतच तो अस्तित्वांत आला असावा. बंगाली, गुजराती वगैरे भाषामध्यें Research या अर्थी संशोधन शब्द वापरीत नाहींत, असें कळतें. तो अस्सल मराठी टांकसाळीं-तील शब्द दिसतो. आगरकरांनीं हा शब्द 'महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र' या सुधारकांतील लेखांत वापरलेला आहे : ते लिहितात, "बांधव हो, विचार-कलहाला तुम्हीं इतके कशासाठीं भितां ? दुष्ट आचारांचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, **सत्यसंशोधन** व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्याच्या सुखाच्या वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत." यांतील 'सत्यसंशोधन' हा शब्द वापरतांना आगरकरांच्या मनांत Research हा शब्द होता कीं काय, हें नक्की सांगणें कठीण आहे. Research हा शब्दद्खील इंग्रजी भाषेमध्यें सतराव्या शतकांतच चालू अर्थानें रूढ झाला, असें ऑक्सफर्ड कोशावरून दिसतें.

"Studious inquiry; usually critical and exhaustive investigation or experimentation having for its aim the revision of accepted conclusions in the light of newly discovered facts" अशी 'रिसर्च' या शब्दाची व्याख्या किंवा वर्णन Webster नें आपल्या कोशामध्यें दिलेलें आहे. रिसर्चचें पर्यवसान जरी Purification हें असलें, तरी Research आणि Purification हे शब्द समानार्थक नाहींत. त्यांच्या अर्थच्छटा भिन्न आहेत. आपस्यांच्या इंग्रजी-संस्कृत कोशांत Research या शब्दाला "अन्वेषणं, निरूपणं, अनुसंधानं, जिज्ञासा, मार्गणं, विचारणा," असे संस्कृत प्रतिशब्द दिलेले आढळतील. कँडीच्या इंग्रजी—मराठी कोशाच्या दोनही आवृत्त्या ( १८४७, १८७३ ) पाहिल्या, तर त्यांत 'रिसर्च' या शब्दाचे मराठी प्रतिशब्द, "अनुधावन, गवेशण, अन्वेषण, मार्गण, मीमांसा, परीष्टि," असे दिलेले पाहावयास सांपडतात. यावरून त्यांच्या काळीं 'संशोधन' हा शब्द 'रिसर्च' या अर्थी रूढ झाला नव्हता, असें म्हणतां येतें. मोल्स्वर्थ यानें आपल्या १८५७ सालच्या मराठी—इंग्रजी कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्यें 'संशोधन'

याचा अर्थ "Purifying or cleansing" असा दिलेला आहे. पंडितमंडळाचा म्हणून प्रसिद्ध असलेल्या १८२९ सालच्या कोशांत संशोधन हा शब्द आढळत नाहीं. दात्यांच्या शब्दकोशामध्यें (१९३८) संशोधन या शब्दाचे 'रिसर्च' या अर्थीं "नवीन शोध लावण्याची क्रिया, तपासणी, चौकशी," असे प्रतिशब्द दिले आहेत.

संशोधन हा शब्द अलीकडचा बहुधा विसाव्या शतकांतील असला, तरी संशोधन अलीकडचें नाहीं. आपल्या इकडील संशोधनाला सुरुवात पाश्चात्यांनींच एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं केली. आरंभीं जे मुत्सद्दी किंवा राज्यकर्ते महाराष्ट्रांत आले ते म्हणजे एल्फिन्स्टन, माल्कम वगैरे लोक स्वतः वृत्तीचे उत्कृष्ट संशोधक होते. राज्यकर्त्यांनंतर महाराष्ट्रांत डॉ. विल्सन प्रभृति ख्रिस्ती मिशनरी आले, त्यांनींही संशोधनाचें काम जोरानें चालविलें. या राज्यकर्त्यांची व विशेषतः मिशनऱ्यांची दृष्टि पुष्कळदां पूर्वग्रहदूषित असे. त्यामुळें असो किंवा अज्ञानामुळें असो, भलतेच अपसिद्धांत ते पुढें मांडूं लागले. खरा प्रकार पुढें आणून त्यांच्या अपसिद्धांतांना आळा घालण्याकरितां आपल्या इतिहासाचें, धर्माचें व वाङ्मयाचें संशोधन आपणच केलें पाहिजे, अशी आपल्याकडील सुशिक्षितांमध्यें भावना निर्माण झाली. ग्रँट डफनें लिहिलेला मराठ्यांचा इतिहास पूर्वग्रहदूषित असल्याचें आढळल्यामुळें नीलकंठ जनार्दन कीर्तने यांनीं ग्रँट डफच्या बखरीवर १८६८ सालीं टीका लिहिली. मराठ्यांचा 'खरा इतिहास' लिहिला जावा, म्हणून रा. भि. गुंजीकर यांनीं 'विविधज्ञानविस्तारा' मध्यें इतिहासाचीं साधनें गोळा करण्याची योजना जाहीर केली. अशा प्रकारें इतिहाससंशोधनाच्या कामाला सुरुवात झाली. ख्रिस्ती मिशनऱ्यांबरोबर दोन हात करतांना विष्णुबावा ब्रह्मचारी, मोरभट दांडेकर वगैरेंना आपल्या धर्माचें संशोधन करावेंच लागलें. या धार्मिक संशोधनाच्या आंदोलनांत परमहंससभा, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरे चळवळी अस्तित्वांत आल्या. पाश्चात्यांपैकीं कांहीं लोकांची दृष्टि जरी राजकीय किंवा धार्मिक दृष्ट्या कलुषित झाली होती, तरी सर्वच पाश्चात्य लोक असे होते, असें म्हणणें मात्र कृतघ्नपणाचें ठरेल. यांपैकीं पुष्कळ लोक केवळ सत्यशोधनाच्या बुद्धीनेंच संशोधन करीत होते. त्यांच्यापासून स्फूर्ति घेऊन भांडारकर, तेलंग, टिळक, वैद्य, गुणे, सुखटणकर, काणे, गोडे, वेलणकर, कात्रे अशांसारखे संशोधक पुढें आले. याशिवाय देशाभिमानी म्हणून एक शुद्ध स्वदेशी वृत्तीचा संशोधकवर्गही अस्तित्वांत आला. या वर्गाचे प्रतिनिधि म्हणून वि. का. राजवाडे यांचें नांव सांगतां येईल. देव, चांदोरकर, पोतदार, खरे हे या वर्गांतील होत.

केवळ मराठी भाषेसंबंधीं पाहिलें, तर कोशविषयक कार्यांत कँडी, मोल्स्वर्थ यांनीं, भाषाशास्त्रविषयांत स्टेन कुन्हो, जुल्स् ब्लोक यांनीं आणि जुन्या

वाङ्मयाच्या संशोधनांत ॲक्वर्थ, सेज्विक यांनीं केलेलें कार्य अत्यंत महत्त्वाचें आहे.

संशोधन म्हणजे काय याची सर्वसाधारण व्याख्या वर दिलेलीच आहे. संशोधनाचे चार प्रकार पाडले जातात. ( १ ) **विद्वत्संशोधन** ( academic research )—भाषा, वाङ्मय किंवा इतिहास यांचें संशोधन या पहिल्या प्रकारांत येतें. याचें क्षेत्र मुख्यतः ग्रंथालय असतें. ( २ ) **शास्त्रीय संशोधन** ( scientific research )—याचें क्षेत्र रासायनिक प्रयोगशाळा. ( ३ ) **सामाजिक संशोधन** ( social research )—लोक, जातिसंस्था यांचा अभ्यास. ( ४ ) **कलाविज्ञानसंशोधन** ( technological research )—व्यापारउद्योगांकरितां या संशोधनाचा उपयोग करावयाचा असतो. उदाहरणार्थ, साखर, साबण, तेलें वगैरे.

यांपैकीं पहिल्या तीन संशोधनाच्या प्रकारांना शुद्ध ( pure ) किंवा औपपत्तिक ( theoretical ) संशोधन असें नांव देतात. याच्या उलट चौथ्या संशोधनाच्या प्रकाराला प्रायोगिक ( applied ) किंवा व्यावहारिक ( practical ) संशोधन असें म्हणण्याचा प्रघात आहे. आपण जो आज येथें विचार करतों, तो यांपैकीं पहिल्या प्रकारच्या संशोधनाचा होय.

आपल्याकडे साधारणपणें कवीप्रमाणें संशोधक जन्मसिद्ध ( born ) असावा लागतो, अशी सार्वत्रिक समजूत आहे. एकाद्या माणसामध्यें संशोधक-वृत्ति जन्मजात असली, तर उत्तमच आहे; परंतु ती अभ्यासानें वाढवितां येते, हेंही विसरतां येत नाहीं. उत्कृष्ट हिऱ्याचा खडा असूनही त्याला पैलू नसले, तर तो जसा मंदप्रभ होतो, तसें जन्मसिद्ध संशोधक योग्य पूर्वतयारीच्या अभावीं अयशस्वी ठरण्याचा किंवा वायां जाण्याचा संभव आहे. अलीकडे संशोधक-वृत्तीला मारक अशा प्रकारची शैक्षणिक परिस्थिति आहे. जुन्या काळचा मॅट्रिक किंवा बी. ए. हा अलीकडच्या मॅट्रिक किंवा बी. ए. च्या मानानें जास्त तयार असे, असें पुष्कळदां म्हटलें जातें तें खरें आहे. याचें कारण तो स्वावलंबी असे. त्याला शब्द अडला म्हणजे तो कोश उघडी व योग्य शब्द स्वतः शोधून काढी. एकाद्या माहितीची जरुरी लागली, म्हणजे निरनिराळे संदर्भग्रंथ पाही. संशोधन-वृत्तीची वाढ त्याच्यामध्यें अशा प्रकारें नकळतच होत असे. अलीकडील विद्यार्थ्यांना कोश किंवा संदर्भग्रंथ कधीं उघडण्याचा प्रसंगच येत नाहीं ! कारण ‘ गाइड ’ चीं पुस्तकें व खासगी शिक्षक यांजकडून त्यांना सर्व कांहीं आयतें तयार मिळतें ! पिंजऱ्यांतील पोपटानें जसे शिकविलेले शब्द बोलावे व घातलेले दाणे खावे, तशी त्यांची स्थिति असते. बौद्धिक व्यायाम त्यांना मिळतच नाहीं. ज्ञान मिळविण्याची गोडी व संवय लागणें हेंच खरें शिक्षण होय. पुष्कळशी

माहिती मेंदूंत कशी तरी अस्ताव्यस्त कोंबणें म्हणजे ज्ञानार्जन होय, ही आपली चुकीची कल्पना जितकी लवकर नष्ट होईल तितकें नव्या पिढीचें कल्याण होणार आहे. Karl Pearson यानें याविषयीं काढलेले उद्गार अत्यंत लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. तो लिहितो,

"The true aim of the teacher must be to impart an appreciation of method and not a knowledge of facts. This is far more readily achieved by concentrating the student's attention on a small range of phenomena, than by leading him in rapid and superficial survey over wide fields of knowledge. Personally I have no recollection of at least 90 per cent of the facts that were taught to me at school, but the notions of method which I derived from my instructor in Greek Grammar ( the contents of which I have long since forgotten ) remain in my mind as the really valuable part of my school equipment for life."

ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा; निरनिराळ्या प्रकारच्या वर्गीकरणाच्या पद्धतींचा परिचय करून घेऊन आपणांस हवें असलेलें पुस्तक कॅटलागांतून नेमकें कसें शोधावें; शब्दकोश, ज्ञानकोश, चरित्रकोश अशांसारख्या संदर्भग्रंथांचें निरीक्षण कसें करावें; एकादें आपणांस पाहिजे असलेलें पुस्तक खासगी ग्रंथसंग्रह अथवा कॉलेजची किंवा सार्वजनिक लायब्ररी यांच्यांतून कसें मिळवावें; तसेंच ग्रंथामध्यें माहिती मिळाली नाहीं, म्हणजे तिच्याकरितां मासिकें किंवा वृत्तपत्रें यांच्या जुन्या फाइली किंवा अहवाल कसे पाहावे, यांचें ज्ञान परिश्रमानें व दीर्घ अनुभवानें प्राप्त होत असतें. ही ग्रंथान्वेषण दृष्टि ( Library sense ) नसल्यास आपल्याच शेल्फवर असलेल्या पुस्तकांतील माहितीचा आपणांस उपयोग करून घेतां येणार नाहीं. दुर्दैवाची गोष्ट ही कीं, आपल्याकडील पुष्कळशा बी. ए., एम्. ए. झालेल्या विद्वानांमध्यें या दृष्टीचा अभाव दिसतो. गाइड व प्रोफेसरांनीं शिफारस केलेलीं पुस्तकें यांखेरीज स्वत: शोध करून पुस्तकें त्यांनीं वाचलेलीं नसतात. पीएच्. डी. च्या वर्गामध्यें नांव नोंदण्याकरितां ज्या वेळीं विद्यार्थी येतात, त्या वेळीं दोन चार प्रश्न विचारतांच त्यांपैकीं पुष्कळांची ही न्यूनता उघडी पडते. डॉक्टर होण्याची त्यांना उत्कट इच्छा असते; पण त्याला लागणारी पूर्वतयारी नसते. 'उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।' या विद्यार्थ्यांना असें वाटतें कीं, 'मार्गदर्शक' आपणांस विषय सांगेल; कोणतीं पुस्तकें वाचावीं त्यांची यादी करून देईल आणि तीं मिळवूनही देईल. आपण फक्त तीं पुस्तकें कशींतरी वाचून निबंध लिहावा व मार्गदर्शकाच्या हवालीं करावा, म्हणजे आपलें कर्तव्य संपलें.

त्यांत कांहीं न्यून राहिलें तर तें दुरुस्त करण्याची जबाबदारी मार्गदर्शकाची. अशा प्रकारें जर निबंध लिहिला गेला, तर ती परीक्षा विद्यार्थ्यांची न ठरतां मार्गदर्शकाची ठरेल, यांत शंका नाहीं. आपल्या विद्यापीठांमध्यें सध्यां पदव्युत्तर ( पोस्ट–ग्रॅज्युएट ) संशोधनाची सोय आहे. उपरिनिर्दिष्ट अनुचित परिस्थितीला आळा पाडावयाचा असेल, तर पदवीपूर्व ( अंडर-ग्रॅज्युएट ) संशोधनशिक्षणाचा आपल्या विश्वविद्यालयामध्यें उपक्रम सुरू झाला पाहिजे. ज्युनियर बी. ए. ला परीक्षा नसते. या वर्षी असा निबंध विद्यार्थ्यांकडून तयार करून घ्यावा व तो समाधानकारकपणें लिहिल्याखेरीज विद्यार्थ्याला पदवी मिळूं नये. एम्. ए. परीक्षेलाही असा संशोधनात्मक निबंध आवश्यक ठेवावा. अमेरिकेंतील विश्वविद्यालयामध्यें अंडरग्रॅज्युएट रिसर्चचा निबंध असतो. त्याला " Undergraduate research article " किंवा " term paper " असें नांव आहे. आपल्याकडील पुणें विद्यापीठांत असा अंडरग्रॅज्युएट-रिसर्चचा उपक्रम करावा, अशी डॉ. बाबासाहेब जयकर यांना माझी आग्रहाची सूचना आहे. असें केल्यास विद्यार्थ्यांमध्यें जिज्ञासावृत्ति आणि शास्त्रीय संशोधनपद्धति निर्माण होईल. मात्र स्वतः प्रोफेसरांमध्येंच प्रथम ती असावी लागेल. एकनाथांनीं भागवतांत ( अध्याय ३ ) म्हटल्याप्रमाणें,

जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी ।
तो दुजयातें गोडी केवीं लावी ।
यालागीं जो पूर्णानुभवी ।
तो तारी सद्भावें सच्छिष्यासी ॥८५॥

संशोधन हे भाषा किंवा इतिहास यांचीच मिरास आहे असें नव्हे; नित्याच्या प्रत्येक व्यवहारामध्यें संशोधक वृत्तीची आवश्यकता असते. सरकारी किंवा खाजगी ऑफिसांत काम करणारा अधिकारी किंवा कारकून असो, त्याला या गुणाची गरज आहे. एकाद्या प्रश्नासंबंधीं मागें काय झालें याची माहिती काढून निर्णय देणें या संशोधक वृत्तीखेरीज शक्य नाहीं. ही माहिती मिळण्याची शक्ति नसेल, तर हा अधिकारी गोंधळून भलतेंच धोरण आंखील व आपलें स्वतःचें व लोकांचें नुकसान करील. वृत्तपत्राच्या संपादकामध्यें जर जुनीनवी माहिती मिळविण्याची शक्ति नसेल, तर तो आपलें वृत्तपत्र लोकप्रिय व लोकोपयोगी कधींही करूं शकणार नाहीं. अमेरिकेमध्यें अंडरग्रॅज्युएट रिसर्चला इतकें महत्त्व कां देण्यांत येतें याचें मर्म यावरून कळून येईल.

आतांपर्यंत जें संशोधन झालें, तें जुन्या ' साहेब ' लोकांकडून किंवा त्यांच्या प्रोत्साहनानें झालें. सध्यां आम्हींच आमचे ' साहेब ' आहोंत. त्यामुळें आम्हींच संशोधनकार्य केलें पाहिजे व आम्हींच त्याला प्रोत्साहनही दिलें पाहिजे. इंग्रजी

राजवटींत युरोपांतून बहुश्रुत आणि व्यासंगी असे अधिकारी इकडे येत. त्यांच्या हातांत अधिकारसूत्रें असल्यामुळें संशोधनाचें महत्त्व राहिलें. अलीकडे केवळ मताधिक्यामुळें किंवा अन्य कारणामुळें निवडून आलेल्या लोकांच्या हातांत राज्यसूत्रें जाण्याचा संभव असल्यावरून संशोधनाची आबाळ होण्याची फार भीति आहे.

संशोधनामध्यें नेहमीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, आपण अपूर्व शोध म्हणून जी माहिती पुढें आणली तिच्या खरेपणाबद्दल आपला फार आग्रह असतां कामा नये. संशोधनामध्यें अखेरचें असें कांहीं नसतें. आज एकादी गोष्ट जी शंभर टक्के सिद्ध झाली असें आपण मानतों, ती नवा पुरावा पुढें येऊन पुढेंमागें शंभर टक्के खोटीही ठरण्याचा संभव असतो. आपल्या शोधाचा विश्वसनीय पुरावा म्हणून जो कागद, शिलालेख किंवा ताम्रपट आपण पुढें करतों, तोच चुकीच्या माहितीवर आधारलेला किंवा बनावट नसेल कशावरून ? लघुलिपीसारख्या यथार्थलेखनाच्या अनेक युक्त्या रूढ असलेल्या या विसाव्या शतकांत एकाद्या घटनेच्या निरनिराळ्या प्रकारच्या बातम्या दररोज वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतात. त्यांच्याविषयीं मतप्रदर्शनामध्यें तर उत्तरदक्षिण ध्रुवासारखें अंतर असतें. विद्याभूषण तांबेशास्त्री यांनीं, “ माझे आयुष्याचा जमाखर्च ” या नांवाखालीं १९३२ सालीं आत्मचरित्र लिहिलें होतें. त्यामध्यें एके ठिकाणीं ( पृ. ८ ) त्यांनीं दिलेली माहिती फार उद्बोधक व मौजेची आहे. तांबेशास्त्री लिहितात, “ आत्मचरित्रें लिहिण्याचा प्रघात नसल्यामुळें राजे, मुत्सद्दी व कवि यांचीं चरित्रें आज वादाचे विषय होऊन बसलीं आहेत. जन्मतिथीबद्दल वाद, मृत्युदिनाबद्दल वाद, कृतीबद्दल वाद, मतांबद्दल वाद, मिळून सर्वत्र वाद आणि गोंधळ माजला आहे. शिवाजीमहाराजांच्या जन्मतिथीबद्दलचा वाद हा वरील गोष्टींचा उत्तम पुरावा आहे. वस्तुतः या वादांनीं अल्पस्वल्प ऐतिहासिक सत्य कळतें, नाहीं असें नाहीं. अल्पस्वल्प सत्य कळतें. असें म्हणण्याचें कारण संशोधकास मिळालेला पुरावा हा सत्यच आहे असें कशावरून ? याविषयीं मी माझें घरचेंच गंमतीचें उदाहरण देतों. माझी पत्नी माहेरीं प्रसूत होऊन मुलगा झाला. मेहुण्यानें माघ वद्य तृतीयेस मुलगा झाला असें कळविलें व सासऱ्यानें माघ शुद्ध तृतीयेस मुलगा झाला असें कळविलें ! पुढें चार महिन्यांनीं बायको घरीं आलीं तेव्हां तूं दोनदां बाळंत झालीस, तर दुसरा मुलगा कोठें आहे म्हणून तिला प्रश्न केला ! दोनदां बाळंत झाल्याबद्दल पत्रें दाखवून खात्री केली. ती म्हणाली, “ दोन्हीं पत्रें, खोटीं, मी चतुर्थीस बाळंत झाल्यें, तृतीयेस नाहीं ! त्या दिवशीं अमुक वार होता. ” मग मीं पंचांग पाहिलें तेव्हां उलगडा झाला. वद्याचें ठिकाणीं शुद्ध पडलें हा हस्तदोष होता व तृतीयायुक्त चतुर्थीस ती बाळंत

झाली हें वारावरून कळलें. आमचे मुलाचें मीं स्वतः केलेलें टिपण, त्याचे आज्यानें केलेलें टिपण व त्याचे मामानें केलेलें टिपण अशीं परस्परविरुद्ध टिपणें भावी इतिहाससंशोधकांचे हातीं लागतील तर मोठी मौज होईल, नाहीं बरें ?"

कारवारच्या साहित्यसंमेलनाला जाऊन आल्यापासून तर संशोधनावरील माझ्या विश्वासाला धक्काच बसला आहे ! माझ्या डोळ्यांदेखत घडलेल्या गोष्टींचे निरनिराळे भिन्न रिपोर्ट पाहून खेद व मौजही वाटली. माझ्या तोंडीं भाषणांत भलतेच शब्द घातलेले पाहिले, तर माझ्या लेखी भाषणांत बदल करून भाषाशास्त्राचे मला पाठ दिलेले वाचले. मुळांत कांहींच आधार नसतां शून्यांतून सृष्टि कशी निर्माण होते याचा अनुभव डॉ. कैकिणी यांच्यावर झालेला शाब्दिक अन्याय्य हल्ला पाहून आला. खेरनिषेधविषयक ठरावावर बोलतांना आचार्य अत्रे म्हणाले, " ह्या ठरावाला विरोध करण्यासाठीं जे पुढें आले, त्यांना बघून मीं तर थक्कच झालों आहे. मनुष्यस्वभावाचे इतके विचित्र मासले मीं माझ्या आयुष्यांत कधीं पाहिले नसतील. ( हंशा ) " येथें लोकसत्ताकार महाजनी किंवा रा. रघुनाथराव खाडिलकर यांच्यावर केलेल्या हल्ल्यासंबधीं मीं कांहीं लिहीत नाहीं. कारण ते दोघेही उत्तर देण्यास खंबीर होते; परंतु तिसरा हल्ला जो डॉ. कैकिणी यांच्यावर झाला, त्यांत श्री. अत्रे म्हणाले, " कारवारकरांचा ह्या ठरावास विरोध आहे असें सांगण्यांत आलें; पण ही गोष्ट खोटी आहे. खेरांनीं हे उद्गार जेव्हां कायदेमंडळांत काढले, तेव्हां **त्याचा निषेध 'विविधवृत्तां'त अत्यंत प्रखर शब्दांत डॉ. कैकिणी ह्यांनीं केला** आणि ह्याच डॉ. कैकिणींनीं आज सकाळीं विषयनियामक समितींत या ठरावाला विरोध कीं हो केला ! ( प्रचंड हंशा. क्षणभर लोकांचीं हंसतां हंसतां पोटें दुखूं लागलीं. ) " आचार्यांच्या भाषणांतील हे जे उतारे दिले' त त्यांनींच स्वतः लिहिलेल्या लेखांतील आहेत. ( नवयुग, ३ जून १९५१, पान पांच ). साहित्यसंमेलनाच्या कक्षेंत हा ठराव येतो कीं काय, हाच प्रस्तुत प्रश्न होता. विविधवृत्तांत 'अत्यंत प्रखर शब्दांत' लेख लिहूनही विषयनियामक समितींत या ठरावाला डॉ. कैकिणींनीं विरोध करणें विसंगतपणाचें झालें नसतें; पण अशा प्रकारचा 'अत्यंत प्रखर शब्दांत' किंवा अत्यंत गुळमुळीत शब्दांतदेखील डॉ. कैकिणी यांनीं रा. खेरांचा निषेध विविधवृत्तांत किंवा अन्य पत्रांत कधीं केलाच नव्हता; आणि कसलाच आधार नसतां अत्र्यांनीं डॉक्टरसाहेबांचा त्यांनींच वर्णिल्याप्रमाणें निष्ठुर उपहास केला ! ! ! या प्रसंगाचा रिपोर्ट देतांना त्या वेळीं हजर असलेले प्रो. श्रीपाद महादेव माटे यांनीं तर कमालच केली ! ते लिहितात, " अत्रे म्हणाले, ज्या डॉ. कैकिणी यांनीं आज ठरावाच्या विरुद्ध धोरण धरलें आहे, **त्याच कैकिणींनीं पत्रावर पत्रें लिहून बाळासाहेबांचा निषेध झालाच पाहिजे असा आपल्याशीं आग्रह धरला होता**, अशीही माहिती त्यांनीं

सांगितली. ती ऐकल्यावर ' मनुष्यस्वभावाचे नमुने ' कसे असतात, हें श्रोत्यांच्या ध्यानांत आलें. " (प्रभात, पुणें १५ मे १९५१) आचार्य किंवा प्राध्यापक असलेल्या साहित्यसंमेलनाच्या दोघां भूतपूर्व अध्यक्षांच्या लिखाणांवरून जर आणखी शंभर वर्षांनीं डॉ. कैकिर्णींचें स्वभावचित्र एकादा भावी संशोधक रेखाटावयाला लागला, तर केवढा घोर अन्याय होईल बरें ? श्री. अत्रे किंवा प्रा. माटे यांच्या मनांत डॉ. कैकिर्णींबद्दल अत्यंत आदरबुद्धि असून त्यांच्यासंबंधीं जाणूनबुजून गैरसमज पसरविण्याचा त्या दोघांचा मुळींच हेतु नव्हता, हेंही येथें सांगितलें पाहिजे. प्रा. माटे यांनीं आचार्य अत्र्यांच्या बाबतींत अन्याय केला आहे, असें दिसून येईल. अत्रे-माट्यांसारख्या विद्वानांच्या लिखाणांत जर अशा गफलती, तर जुन्या काळच्या अडाणी लोकांच्या लिखाणांत त्या असल्यास नवल काय ? आणि त्यावरून आपण काढलेले निष्कर्ष कितपत विश्वासार्ह मानावे ?

असें जरी असलें, तरी सत्याच्या शोधाचा किंवा संशोधनाचा नाद मनुष्य-प्राण्यांमध्यें अखंड चालूच राहील. ईश्वराचा शोध अद्याप कोणालाही लागला नाहीं, म्हणून धर्माचा नाद जगानें सोडून दिला आहे काय ? संशोधनप्रवृत्ति ही एक धर्मप्रवृत्तीच आहे. तिचा लोप कधींही होणार नाहीं. ही प्रवृत्ति शुद्ध राखण्याचा मात्र आपला प्रयत्न पाहिजे. संशोधनांत एकादा सिद्धांत स्थापन करण्यांत चूक होणें किंवा त्यांत अपयश येणें हें कमीपणाचें नसून अप्रामाणिकपणें एकादा सिद्धांत स्थापन करूं पाहणें, हेंच लाजिरवाणें आहे.

विविधवृत्त-दिवाळी अंक १९५२

◎ ◎ ◎

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६९५९६ दि:
क्रमांक ९८९६ नोंद दि: २/३/६०

# १४

## कानडा विठ्ठल

पंढरपूरचा श्रीविठ्ठल ही महाराष्ट्रीयांची राष्ट्रीय देवता आहे. ज्ञानदेव, नामदेव, चोखा मेळा, एकनाथ, तुकाराम अशा निरनिराळ्या जातींच्या संत-कवींना स्फूर्ति पंढरीच्या विठ्ठलापासूनच मिळालेली आहे. पुंडलिकाच्या भेटीला आलेलें हें ' परब्रह्म ' युगें अठ्ठावीस विटेवरी उभें आहे, असा घोष आपण नेहमीं ऐकतों. महाराष्ट्रीयांप्रमाणें पुष्कळ कानडी कवीही विठ्ठलाचे भक्त होऊन गेले. चौंडरस, पुरंदरदास, कनकदास यांचा विठ्ठलभक्तांत प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. अद्यापीही कर्नाटकांत विठ्ठलभक्ति मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे, हें पंढर-पुरास दरसाल विठ्ठलाच्या भेटीला येणाऱ्या कन्नड भक्तगणांच्या संख्येवरून कळून येतें. श्रीविठ्ठल ही मूळ कानडी देवता होती, अशीही एक कल्पना आहे. ' कानडा विठ्ठल ' असा जो उल्लेख कांहीं संतांच्या काव्यांत सांपडतो, त्यानें या कल्पनेला पुष्टि मिळालेली आहे. श्रीज्ञानदेवाच्या नांवावर असलेल्या अभंगांतही आपणांस असे उल्लेख आढळतात.—

क्षीरसागरींचें निज रूपडें । पाहतां पारखिया त्रिभुवनीं न संपडे । तें उभें आहे वाडेकोडें । पुंडलिकाचे आवडी । मेघश्याम घेऊनिया बुंथी । जयातें श्रुती पैं वानिती । कीं तें पुराणासी वाड । तें पंढरिये उभें असे । कानडें गे माये॥... वगैरे.

नामदेवाच्या नांवावर असलेल्या अभंगांतही आपणांस असे उल्लेख आढळतात.—

कानडा विठ्ठल वो । उभा भिवरे तीरीं ।।
भक्ताचें आर्त वो । जीवा लागलें भारी ।।
नाम बरवें रूप बरवें । दर्शन बरवें कानडिया ।।१।।
वेदांसी कानडे श्रुतीसी कानडे । परब्रह्म उघडें पंढरिये ।।२।।
विठ्ठल कानडें बोलूं जाणें । त्याची भाषा पुंडलिक नेणें ।।
युगें अठ्ठावीस झाली ।। दोघांनाही बोलाबोली ।।

एकनाथाचा पणजा भानुदास याच्या नांवावर असलेल्या अभंगांतही आपणांस असा उल्लेख आढळतो:—

**चंद्रभागे तीरीं उभा विटेवरी ।**
**विठ्ठल राज्य करी पंढरीये ॥१॥**
**ऋद्धिसिद्धि धृति वोळंगती परिवार ।**
**न साहती अवसर ब्रह्मादिकां ॥ २ ॥**
**सांडोनी तितुलें यथा बीजें केलें ।**
**कवणें चाळविलें कानडीयासी ॥**...वगैरे

भानुदासाच्याच शब्दांत बोलावयाचें झालें तर,—

**परदेशीची वस्तु पंढरीस आली ।**
**ते दैवें फावली पुंडलिका ॥**

हा परदेश कोणता? वैकुंठ असेल! पुष्कळांच्या मतें ‘ कानडा ’ या शब्दाचा अर्थ ‘ अगम्य ’ किंवा दुर्बोध असा आहे. त्याचा कर्नाटक असा अर्थ घेण्याचें मुळींच कारण नाहीं. तात्पर्य, श्रीविठ्ठलाची मूर्ति मूळ कर्नाटकांतील व मागाहून महाराष्ट्रांत आली, या मताला विशेष पुरावा मिळत नाहीं. मात्र या मताच्याविरुद्ध पंढरपूरची विठ्ठलमूर्ति विजयनगरच्या राजानें अंदागोदीस म्हणजे विजयनगरास नेलेली व पुढें एकनाथाचे पणजे भानुदास यांनीं ती तिकडून आणून पुनः पंढरपुरास तिची स्थापना केली, अशी मात्र दंतकथा प्रचलित आहे. महीपतीनें आपल्या भक्तलीलामृत या ग्रंथामध्यें ही कथा विस्तारानें वर्णिलेली आहे (अ.१८). एकनाथ एकदां पंढरीला गेले व तेथें कीर्तनांत भानुदासांचें त्यांनीं चरित्र गाइलें, अशा स्वरूपांत ही कथा त्यानें दिली आहे; परंतु हीच कथा अभंगरूपांत, तुकारामाच्या नांवावर असलेली, धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवता-मंदिरांतील निरनिराळ्या तीन बाडांत मला सांपडली. तुकारामाच्या अभंगांच्या गाथा ज्या प्रसिद्ध आहेत, त्यांपैकीं माझ्या संग्रहांतील वेगवेगळ्या पांचसात मीं पाहिल्या. त्यांमध्यें हें भानुदासचरित्र मला आढळलें नाहीं. ही जी भानुदासाची कथा, महीपतीनें किंवा तुकारामानें कथन केलेली आहे, तिला पुष्टि देण्यास श्रीविठ्ठलमंदिराची टोलेजंग इमारत विजयनगरामध्यें आजही उभी आहे. तेथें विशाल मंदिर आहे. कल्याणमंडप आहे. विठ्ठलाचा मोठा दगडी रथही आहे; परंतु आत्म्याशिवाय कुडीप्रमाणें त्यांत विठ्ठल नाहीं. हंपीच्या या पडक्या इमारती-संबंधीं लिहितांना मि. लोंघर्स्ट (Mr. A. H. Longhurst) ‘ Hampi Ruins ’ या पुस्तकांत म्हणतो:—

“ We now pass on to the Vitthala temple, the most splendid building in the city. It was dedicated to Vishnu in the form of Vitthala or Vithoba. Vithoba is a god of the Maratha country and is rarely met with outside it. He is

regarded as a form of Krishna. In and about the temple are no less than 23 inscriptions of dates ranging from A. D. 1513 to 1564. Several of these are damaged, but those which are still legible show that Krishna Deva Raya, to whom the city owes so much, began the temple in the 1513 and endowed it with villages; that his two queens built the gateways and presented golden vessels to the shrine; and that his two successors Achyuta and Sadasiva, and many private individuals, made gifts of various kinds to the building. The temple was never finished nor consecrated. In all probability, the work was stopped by the destruction of the city in 1565, *but tradition gives another reason and says that tt was built specially for the famous image of Vithoba at Pandhnrpur in the Sholapur District of Bombay, but that the God, having come to look at it, refused to move, saying that it was too grand for him and that he preferred his own humbler home.*"

वरील इंग्रजी उताऱ्याचें समग्र मराठी भाषांतर येथें देण्याचें विशेष कारण दिसत नाहीं. विजयानगरच्या राजाच्या वैकुंठासारख्या प्रचंड प्रासादापेक्षां विठोबारायाला पुंडरिकाची साधी वीटच पसंत पडली, एवढें आपणांस त्यावरून दिसून यतें. ' विठोबा ' या शब्दाची उत्पत्ति विष्णूपासून झाल्याचें सांगतात. ' विटे- ' वर उभा राहिलेला देव तो ' विठोबा, ' असें तर नसेल ? कसेंही असो. विठोबा कर्नाटकांत कां गेला व तेथील राजवैभवावर लाभ मारून गरीब पंढरपुरास परत कसा आला याची माहिती तुकारामाच्या नांवावर असलेल्या उपरिनिर्दिष्ट अभंगांत कशी दिली आहे ती पहाः—

अनागोंदीमध्यें असे नृपनाथ। नामें तो विख्यात रामराजा ॥ वैष्णवांची पूजा करी हरिभक्त। असे शरणागत हरिच्या दासां ॥ ब्रह्मांडनायका भक्ति आरंभिली। दर्शन तयाला दिधलें देवें ॥ रामराजा म्हणे, "पंढरीच्या देवा। येई माझ्या गांवा आनागोंदीं"। देव म्हणे, "एका दिसिं मज न्यावें। वचन सांभाळावें प्रत्यक्ष त्वां" ॥ "माझ्या हरिभक्तां छळी जरी कोण्ही। तत्काळ तेथोनी येईन मी ॥ कबूल होऊनी पंढरीसी आला। शरसेतु बांधिला राजयानें ॥ देव रुक्मिणीसी म्हणे, "येथ असा। कानड्यानें फांसा केला मज"। रुक्मिणीचा पति भावें उचलिला। आनागोंदा नेला भक्तीबळें ॥ आषाढीचा पोहा पंढरीस आला। म्हणती, "देव नेला राजयानें" ॥ पताकांचे भार वैष्णव नाचती। लोटांगणें घेती महाद्वारीं ॥ राउळाचा रंग सर्व शोभा गेली। विठाई माउली नाहीं आंत ॥ म्हणती वारकरी, "मोकलिलें हरीं। कोणासी मुरारी भेटूं

आतां ? " ॥ " भेटूं आतां कोणा " म्हणती वारकरी । " धांव माझ्या हरि, " म्हणताती ॥ विठोबाचे दास प्रेमें गहिंवरती । " रुक्मिणीचा पति दावा " म्हणुनी ॥ क्षेत्र प्रतिष्ठानीं होता भानुदास । आला आषाढीस पंढरीस ॥ तया पोहियासी भानुदास म्हणे । " देव पंढरीस आणितों मी ॥ तुम्हीं चिंतातूर होऊं नका पोटीं । करवितों भेटी देवा तुम्हां " ॥ विठोबाची आण वाहोनि निघाला । भानुदास आला आनागोंदीं ॥ सप्त दारवंठे असती राउळा । कुलुपें अर्गळा किल्या कोंड्या ॥ तेव्हां झाली रात्र पडला अंधार । जोडुनियां कर विनवीत ॥ भानुदास म्हणे, " पंढरीच्या राया । लेकुराची माया सांडियेली ॥ भला रे विठोबा पळुनी आलासी । पोटींच्या पोरांसी कोण पोसी ? ॥ आपुल्या पोटाची धरिली तुवां सोय । आमुची गति काय मायबापा ॥ काय देवा तुला दुष्काळ पडला । न मिळे खायाला पंढरपूरीं ॥ कडीं कुडक्या तोडे मोहनमाळ कंठी । देखोनिया पोटीं भूललासी ॥ हत्ती घोडे धनमाल हे संपत्ती । देखतांचि चित्तीं तोषलासी " ॥ भानुदास म्हणे, " येथोनी चला स्वामी । नाहींतर आम्हीं भले नोव्हे " ॥ इतुकें बोलतां कुलुपें गळालीं । घनःश्याम देखिली मूर्ति डोळां ॥ देखोनि भानुदास गळां तो झोंबला । गहिंवर दाटला पांडुरंगा ॥ म्हणे, " भानुदासा माझिया पाडसा । कानाड्यानें फांसा केला मज ॥ राजयाच्या बंदी जाण मी पडिलों । भीमा अंतरलों चंद्रभागा ॥ सत्यभामा राही रुक्मिणी राहिली । जनी अंतरली पुंडलीक ॥ नाहीं गरुडपार नाम्याची पायरी । हनुमंत समोर नाहीं माझ्या ॥ भोवतालें पाहें नाहीं माझें कोण्ही । न देखे नयनीं हरीभक्त ॥ करी तो माझी पूजा मज वाटे वीख । तुज देखोनि सुख जालें पोटीं ॥ कानाड्या राजानें वचनीं गोविलें । चाळवुनी आणिलें करुं काय ? " ॥ भानुदास म्हणे, " अज्ञान होतासी ? । देखोनि भातुक्यासी भूललासी ॥ उठा पुरे जालें चलावें पंढरीसी । तुम्हांसाठीं सारी यात्रा आली " ॥ देव ह्मणे, " बेडी भक्तिची पडिली । पाहिजे संभाळिली दिधली भाक ॥ नगराबाहेरी धरीं मौन्यमुद्रा । मारितां शरीरा बोलूं नको " ॥ मोतियांचा हार कंठींचा काढिला । भानुदासा दिल्हा देवरायें ॥ निघतां भानुदास दारवठा लागला । सूर्योदय जाला तयेवेळीं ॥ प्रातः-काळीं स्नान भानुदास करी । आठवी श्रीहरि हृदयामाजी ॥ घालुनि आसन बैसला ध्यानस्थ । लावियलें चित्त पांडुरंगा ॥ सर्वांचि कानडा आला रामराजा । करावया पूजा भगवंताची ॥ कवाडें उघडोनि पाहे जों लवलाहीं । तंव हार नाहीं देवाकंठीं ॥ म्हणे, " विठोबाचा हार कोण्ही नेला ? । धरुनि आणा त्याला माझेपासीं " ॥ ' कोणी नेला हार ? ' जाहला बोभाट । ताडी उत्कृष्ट पुजाऱ्यासी ॥ चोर पाहावया सेवक धांवती । हार कंठीं पाहाती भानुदासा ॥ देखोनि तयासी ताडिती उत्कृष्ट । म्हणती, " चोरटा ह्याची मैंद " ॥ " ब्राह्मणाच्या गळां

देखियेला हार " । सांगताती हेर रायापासी ।। तेव्हां नृपनाथ सेवकांसि बोले । "बांधोनिया टोले देत आणा " ।। ऐकोनि भानुदास धरोनि बांधिलें । राया-जवळीं आणिलें राजधारीं ।। काय रामराजा बोले तयेवेळीं । " मैंदासी या सुळीं सत्वर द्यावें " ।। तेव्हां खांदीं सूळ देउनि चालविला । " चिंतीं त्या विठ्ठला " म्हणती दूत ।। " शरीराचा लोभ न धरावा मनीं । तुम्ही शूर जनीं हरिभक्त "।। भानुदास म्हणे, " देह हें देवाचें । ठेवणें जयाचें तया पावे ।। प्राक्तनाचा भोग सुखें कां होईना । परि त्या नारायणा सांडीच ना " ।। आनंदाचें कुंकू लेवविलें भाळीं । भक्तीची गळसरी बळकट ।। भानुदास म्हणे, " ऐका हें वचन । भेट मी घेईन विठ्ठलाची " ।। आणिला भानुदास, देवा नमन केलें । म्हणे, " शिक्षे देखिलें आम्हालागीं ।। आतां देवा तुम्ही लोभ असों द्यावा । आठव धरावा हृदयामाजी ।। केली तुम्ही मुक्ति कळों आली आम्हां । शतसहस्र जन्मा न सोडी " ।। दूतीं भानुदास सूळीं घालियेला । सुळाचा जाहला वृक्ष तेव्हां ।। पुष्पें पानें शाखा वृक्षाला दिसती । नवल करिती राजदूत ।। कळिकाळाचें भय नाहीं हरिदासां । तेथें भानुदासा भय काई ? ।। सूळावरी निद्रा भानुदासा आली । उन्मनि लागली तये वेळीं ।। सूळाचा तरुवर आश्चर्य पाहून । सांगती येऊन दूत राया ।। चिंतातूर राजा म्हणे, " त्यासि आणा । कैसें हें प्राक्तना वोढवलें " ।। सोडुनी भानुदासा लागती चरणीं । आणिलें ते क्षणीं राजद्वारीं ।। निराभिमानानें राजा बोलत सभेस । " संत भानुदास महाराज " ।। रामराजा म्हणे, " त्राहीं त्राहीं त्राहीं " । लोटांगण पायीं घालितसे ।। हातीं धरुनियां आणिला राउळीं । तेव्हां वनमाळी काय बोले ।। " न सरे हा क्रोध भक्ताचा कोवसा । चल भानुदासा जाऊं आतां " ।। तेव्हां नृपनाथें धरिले चरण । म्हणे, " नारायेणा न राहसी ? " ।। " ऐकें गा राया तुझी माझी भाक । येथुनीया देख उगवली ।। माझीया दासाला सूळावरी घालावें । पाषाण पूजावें, धर्म कोण ? ।। भक्त भानुदास माझेंचि शरीर । दासाचा मी भार वाहातसें ।। भगवद्भक्ताचें तो ऐसें नव्हे चिन्ह । भूतीं नारायण जाणावा तो ।। मोतियाचा हार तुज पैं सांपडला । तरी त्वां घातला सूळावरी "।। बोलत सक्रोध भक्ताचा कैवारी । " चलावें झडकरी भानुदासा " ।। रामराजा म्हणे, " मज उपेक्षुनी । जासी चक्रपाणी येथुनिया ।। आपुलें वचन सत्य केलें तुह्मीं । आतां लोभ स्वामी असों द्यावा । घेउनि भानुदास बाहेरि निघाला । बोलत, " विठ्ठला मायबापा " ।। " बैसा खांद्यावरी " म्हणे भानुदास । नारायण हंसे, " नेसी कैसा " ।। येरु ह्मणे, " वाटे नवल जीवासी । कौतुक दाविसी कृपासिंधु ।। ब्रह्मांडनायका संपुष्टि राहावें । खांदी न बैसावें चोज कैसें ? " ।। तेव्हां भानुदासा आलिंगुनी पोटीं । म्हणे, " मी संपुष्टिं राहातों तुझ्या" ।। विश्वाचा चालक संपुष्टिं घातला । भानुदास आला पंढरिये ।। धन्य भानुदास धन्य त्याची भक्ति ।

उभय लोकीं कीर्ती भरली ज्याची ।। आणितां भानुदासें रुक्मिणीचा वर । जाला जयजयकार चंद्रभागे ।। विठोबा रे माझा आंतर नेणसी काय । कैसा तैसा होय भक्तिबळें ।। काय येक केलें नवल बा विठ्ठलें । चिंतावीं पाऊलें तुका म्हणे ।।

वरील अभंगांत किंवा महीपतीनेंही भक्तिलीलामृतांत विठ्ठलाला नेणारा राजा रामराजा असें म्हटलें आहे; पण त्या वेळीं कृष्णराजा नामक राजा विजयनगराला होता, असें दिसतें. अशा प्रकारच्या कथेंत तपशिलाच्या बाबतींत खोल जाऊं नये हेंच बरें. विजयनगरामध्यें आजही विठ्ठलाचें मंदिर असून त्यांत विठ्ठल नाहीं आणि तो पंढरपूरला आहे. त्यामुळें या कथेला इतिहासाचा कांहींतरी आधार आहे, असें उघड दिसतें. मुसलमानांच्या आक्रमणाला भिऊन विठ्ठलमूर्ति विजयनगराला नेली व ती भीति कमी झाल्यावर तेथून परत आणण्यांत आली, असाही एक तर्क आहे. वरील तुकारामाचे म्हणून जे अभंग आहेत, ते नामदेवाच्या नांवावरही घातलेले पाहिले. भानुदासाचा काल इ. स. १४४८ ते १५१३ अशी समजूत आहे, आणि नामदेवाचा जन्म तर शके ११९२ (इ. स. १२८०) मानला जातो. तेव्हां ज्ञानदेवकालीन नामदेव भानुदासावर अभंग लिहिल हें अशक्य आहे. तेव्हां या अभंगाचा कर्ता असलाच तर तुकारामच असणें जास्त संभवनीय आहे, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. याविषयीं जास्त उहापोह करण्याचें हें स्थळ नव्हे. कवन कुणाचेंही असलें तरी जुनी कथा कळण्यास तें पुरेसें आहे. महाराष्ट्र–जनमनावर विठ्ठलभक्तीची जी विलक्षण पकड दिसते ती किती स्वाभाविक आहे, हें वरील आख्यायिकेवरून उघड दिसून येईल.

दिपावलि-दिवाळी अंक १९५०

० ० ०

## १५

# विलक्षण आत्मयज्ञ : सती

सुमारें वीस वर्षे झालीं असतील या गोष्टीला. औंधयेथील राजवाड्यांत मी पाहुण्याच्या खोलींत एके रात्रीं ९॥–१० च्या सुमारास अंथरुणावर वाचीत पडलों होतों. कोणीतरी बाहेरून जोरानें दार ठोठावलें. एकादा आचरट हुजऱ्या असेल असें वाटून, ' कोण ? ' असें मी ओरडलों.

' मी ! ' मला उत्तर मिळालें. आवाज राजेसाहेबांचा वाटला. दार उघडून पहातों तो स्वतः बाळासाहेब ! मला घाईघाईनेंच ते म्हणाले,

" चला लवकर झोंपी जा. वाचीत बसूं नका. उद्यां तुम्हांला लवकर उठावें लागेल. आजच्या व्याख्यात्यांनीं खटावयेथील युद्धानंतर एक बाई सती गेल्याचें जें वर्णन केलें, तें ठिकाण व तिच्या कांहीं खाणाखुणा असल्यास शोधून काढायच्या आहेत. तुम्ही, रावसाहेब देशपांडे ( व्याख्याते ) व नारायणराव गोलिवडेकर उद्यां सकळीं मोटारीनें खटावला जा. बरोबर फोटोग्राफरही येईल," असें म्हणून ते गडबडीनें वर माडीवर निघून गेले. नेहमीं ते लवकर झोंपीं जात व ४॥ च्या सुमारास उठून नमस्कार घालीत. आज सतीच्या शोधाची ही व्यवस्था करायाची असल्यामुळें त्यांना निजावयाला उशीर झाला असावा.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आंघोळ, चहा व फराळ करून आम्ही मोटारीनें खटावला गेलों. तिकडच्या देसायाचा माणूस आम्हीं वाटाड्या म्हणून बरोबर घेतला होता. त्यामुळें ज्या ठिकाणीं युद्ध झालें तें मैदान सांपडण्यास आम्हांला अडचण पडली नाहीं.

युद्ध ज्या ठिकाणीं झालें त्या ठिकाणीं एक रणस्तंभ होता; स्तंभ कसला, भला मोठा दगड जमिनींत उभा पुरलेला होता. याशिवाय आजूबाजूला कांहीं नव्हतें.

" या ठिकाणीं जवळपास आणखी एकादें लहान देऊळ किंवा वृंदावन अशासारखें कांहीं आहे काय ? " रा. सा. देशपांडे यांनीं वाटाड्याला विचारलें.

" कांहीं नाहीं, " त्यानें उत्तर दिलें.

" बरं, लोकवस्ती इकडून कितीशी दूर आहे ? " मीं प्रश्न केला.

" अर्ध्या मैलावर एक महारवाडा आहे. "

" तर मग आपण तिकडेच जाऊं. " मीं म्हटलें, व आम्हीं सगळे मोटारीनें त्या महारवाड्यांत गेलों. तिकडे दोनतीन झोंपड्या होत्या. मोटारीचें शिंग वाजलेलें ऐकून मुलें व बायका बाहेर आल्या.

" इकडे जवळपास एकादें लहानसें देऊळ वगैरे कांहीं आहे काय ? " आम्हीं प्रश्न केला.

## सतीचा दगड

" देऊळ नाहीं; पण मारुती आहे. तिकडे दर वर्षी यात्रा भरती. लोकबी जमत्यात. " एक बाई म्हणाली. आम्हांला मारुती नको होता. सतीचें स्मारक हवें होतें.

" आंत कोणी पुरुष माणूस नाहीं काय ? " मीं त्या बाईला विचारलें.

" आजोबा आहेत. आंत झोपल्यात. सीक आहेत." ती म्हणाली.

आम्हीं झोंपडींत गेलों आणि अंथरुणावर कण्हत पडलेल्या म्हाताऱ्याकडे, आसपास एकादें सतीचें स्मारक आहे कीं काय, याबद्दल चौकशी केली. म्हातारा सुमारें पाउणशें-ऐशीं वर्षें वयाचा होता. ' तिकडे चिंचेच्या झाडाखालीं एक सतीचा दगड आहे; शेजारच्या मैदानांत युद्ध झालें, त्यांत खटावचा देसाई मरण पावला, आणि त्याची विधवा सती गेली. तिचा तो दगड आहे, असें आम्हीं ऐकत आलों, ' असें तो म्हातारा म्हणाला. चिंचेच्या झाडाखालीं जाऊन गवत व पाचोळा याच्याखालीं दडलेला तो दगड आम्ही बाहेर काढला. ती बाई मारुती म्हणाली तो हाच ! या दगडावर बाईचा बांगड्या भरलेला एक हात, मध्यें स्त्री व पुरुष आणि वर चंद्र व सूर्य अशीं चित्रें कोरलेलीं होतीं. त्याचा अर्थ, तें जोडपें चंद्र व सूर्य असतील तोंपर्यंत एकत्र राहील, असा असल्याचें गोलिवडेकर म्हणाले. अशा दगडाला ' मस्तिकल ' असें म्हणतात. ' मस्ती ' म्हणजे महासती व ' कल ' म्हणजे कानडींत दगड.

या दिवसापासून सती या विषयाकडे माझें लक्ष वेधून राहिलें. कायद्यानें सतीला बंदी झाली असली तरी मधूनमधून सहगमनाच्या बातम्या वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतच असतात. त्या मीं लक्षपूर्वक वाचूं लागलों. वेद, रामायण, महाभारत, स्मृतिग्रंथ वगैरे वाङ्मयांत आढळणारे सतीचे निर्देश मीं पाहिले. मुसलमान, पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज वगैरे प्रवाशांनीं व अधिकाऱ्यांनीं सतीचे विधी प्रत्यक्ष पाहून ज्या सत्यकथा लिहून ठेवल्या त्या अवलोकन केल्या. सहगमनाच्या धार्मिक विधीसंबंधीं हस्तलिखित स्वरूपांत असलेले ग्रंथ मीं शोधले. पुढें एकदोन

वर्षांनीं औंधला माझें या विषयावर व्याख्यानही झालें. ‘ तुम्हीं या विषयावर एक स्वतंत्र मोठा ग्रंथच लिहा ना, आम्हीं तो प्रसिद्ध करूं, ’ राजेसाहेब म्हणाले; परंतु इतर कामाच्या गर्दीमुळें असा ग्रंथ माझ्या हातून लिहून झाला नाहीं आणि यापुढेंही लिहिला जाण्याचा संभव नाहीं.

गेल्या वर्षीं ‘ रत्नदीपा ’च्या दिवाळी अंकांत ख्रिस्ती लोकांच्या इंक्विझिशन या धार्मिक अधर्मांची वाचकांना ओळख करून देण्यांत आली. या वर्षीं हिंदूंच्या सती या धार्मिक अधर्मांचा थोडक्यांत परिचय करून देतों. धर्माच्या कल्पना कशा बदलतात पहा. एके काळीं पवित्र धर्म मानलेल्या चाली आज अधर्मच नव्हे तर गुन्हा ठरलेल्या आहेत !

## सहगमनविधीचा पूर्वेतिहास

ऋग्वेदामध्यें ( मंडळ १०, सू. १८,८ ) पुढील अर्थाची ऋचा आहे : “ हे स्त्रिये, ह्या तूं मेलेल्या पतीच्या समीप शयन केलें आहेस; तर हा जिवंत लोकांचा समुदाय पाहून प्रेताजवळून उठ आणि इकडे ये, व पुनर्विवाह करूं इच्छिणाऱ्या—पाणिग्रहण करणाऱ्या—या पतीच्या भार्यत्वाप्रत मुख्यत्वेंकरून तयार हो. ”

यावरून वेदपूर्वकालीं सहगमनाची इंडोजर्मन लोकांत चाल रूढ होती, पण वेदकालांत तिचा केवळ अवशेषच राहिला; म्हणजे विधवेला चितेवर चढवून नंतर दीर किंवा जवळचा एकादा नातलग तिला वरील ऋचा म्हणून परत नेई, असें कांहीं पंडितांचें म्हणणें आहे.

वाल्मीकीच्या रामायणावरून त्या काळीं सहगमनाची चाल होती, असें वाटत नाहीं. दशरथाच्या मृत्यूनंतर त्याची एकही राणी सती गेली नाहीं. रावणाच्या वधानंतर त्याची राणी मंदोदरी किंवा अन्य स्त्रिया सती गेल्या नाहींत; बिभीषणानें त्यांचें समाधान करून परत नगरास जाण्यास सांगितलें, असा निर्देश आढळतो.

महाभारतामध्यें आदिपर्वांत पंडुराजाबरोबर त्याची कनिष्ठ पत्नी माद्री सती गेल्याचें विस्तृत वर्णन आहे. याशिवाय आश्रमवासिक पर्वांत सांघिक किंवा सामुदायिक सहगमनाची किंवा अनुमरणाची माहिती दिली आहे. नवऱ्याच्या प्रेताबरोबर जाळून घेणें याला सहगमन आणि पतीच्या अभावीं त्याच्या स्मृतिचिन्हाबरोबर मागून सती जाणें याला अनुमरण म्हणतात. व्यासमुनींनीं भारतीय युद्धानंतर राहिलेल्या धृतराष्ट्रादि विरहदुःखित लोकांना गंगेवर नेलें व भागीरथीमध्यें स्नान करून या मृत वीरांच्या नांवें हवन केलें. त्याबरोबर युद्धांत मरण पावलेले भीष्मद्रोणादि सारे वीर आपआपल्या सैन्यासह त्या पाण्यांतून वर आले व आपल्या स्त्रियांस व इतर आप्तसुहृदांस भेटले. एक रात्र अशा स्थितींत घालविल्यावर पुनः त्या वीरांनीं भागीरथींत प्रवेश केला. असें झाल्यावर व्यासमुनि या गतभर्तृकांस

म्हणाले, " ज्या थोर स्त्रियांस पतींचा लोक प्राप्त व्हावा, अशी इच्छा असेल त्यांनीं वेळ न गमावतां ताबडतोब भागीरथींत स्नान करावें. " त्यांचें तें भाषण ऐकून त्या श्रद्धाळु वरांगनांनीं एकदम जान्हवीच्या जलांत उड्या घेतल्या. तेव्हां त्या सर्वही साध्वी स्त्रिया तात्काळ देहापासून विमुक्त होऊन दिव्य देहानें पतींशीं संगत झाल्या.

मौसलपर्वांत, वसुदेवाच्या देवकी, भद्रा, रोहिणी व मदिरा या बायकांनीं सहगमन केलें व कृष्णाच्या मरणानंतर रुक्मिणी, गांधारी, शैब्या, हेमवती, जांबवती वगैरेनीं अग्निप्रवेश करून सत्यभामादि कांहीं वनांत जाऊन तापसव्रत स्वीकारतात, असा उल्लेख आढळतो. शांतिपर्वांत एका कपोतीनें पतिनिधनानंतर अग्निप्रवेश केल्याचा उल्लेख आहे.

युमेनिसच्या सैन्यांतील हिंदी तुकडीचा सेनापति Ketens ( कृष्ण ! ) मरण पावतो व त्याच्या दोन बायकांमध्यें सहगमन कोणी करावें, याबद्दल अहमहमिका सुरू होते. त्यावेळीं मुलगा असलेल्या बायकोला बंदी केली जाते व अपत्यहीन बायकोला सती जाऊं देतात. यासंबंधीं डिवोडोरस सिसिकस ( क्रिस्तपूर्व ३१७ ) लिहितो, " शेवटीं घरच्या मंडळीचा निरोप घेतल्यावर तिला तिच्या बंधूनें चितेवर चढविली व जमलेले लोक आश्चर्यचकित होऊन गेले. ती आपल्या नवऱ्याच्या शेजारीं पहुडली व अग्निज्वाळा अंगाला भिडत असतांही बिलकूल ' हाय ' म्हटलें नाहीं. प्रेक्षकांचीं अंतःकरणें दयेनें भरून आलीं व ते सतीच्या पतिनिष्ठेबद्दल प्रशंसा करूं लागले. जवळ असलेल्या कांहीं ग्रीक लोकांनीं मात्र हा विधि रानटी व क्रूर आहे, असें म्हणून नापसंती दर्शविली. "

कर्नाटकामध्यें केवळ मृताच्या स्त्रियाच सती जात असत असें नाहीं, तर ' एपिग्राफिका कर्नाटिका ' पाहिल्यास कांहीं राजांबरोबर त्यांच्या राण्याच नव्हे तर प्रधान, सरदार व इतर नोकर सहगमन करीत, असें दिसून येतें ! कृष्णराज पेठांतील तालुक्यांत बल्लाळदेवाबरोबर त्याच्या पांच नोकरांनीं सहगमन केलें व लख्खय्या नायक व त्याची पत्नी गंगादेवी यांनीं बल्लाळाचा पुत्र नरसिंह याच्याबरोबर देह जाळून घेतला ( खंड ४, ९-१० ). १२२० मधील एका शिलालेखांत राजा बल्लाळाबरोबर त्याची राणी सुग्गलादेवी व प्रधान कुंवरलक्ष्म सहगमन करते झाले, असा निर्देश आहे ( खंड ५, ११२). होनइ तालुक्यांतील एका कोरीव लेखांत कदंबराजा तैल याच्याबरोबर त्याचा प्रधान बोपण्णा यानें अग्निप्रवेश केला ( खंड ७ ), असा उल्लेख आहे. यादवांच्या काळांत सहगमनाची पद्धति प्रचलित होती, असें ' ज्ञानेश्वरी 'वरून कळून येतें. पहा:—

वोखटें मरणा ऐसें । तेंही आलें अग्निप्रवेशें । परि प्राणेश्वरा दोसें । न गणी सती ॥ ( अ० १६ ) कां महासतिये भोग । देखे किर आघवें जग । परि आगि

ना अंग। ना लोकु देखे ॥ ( अ० १८ ). महानुभाव लोक या चालीच्या विरुद्ध होते, असें ‘ स्मृतिस्थळा ’वरून दिसतें ( १४९ ). पहाः—“ या उपरि मागौतें कामाइसिं म्हणितलें : ‘ भटो रावो मरैल : आणि मातें आगिआंतु घालितील. ’ भटोबांसीं म्हणितलें । ‘ तरि तुम्हीं आपुला आदिभाव चुकवा : मग ते बळाधिकारें घालितील, तरि तुम्हां आत्महत्तेचें पातक नाहीं ’ : इतुकेनि ते उगिचि राहिली... मग कितिकां दिसां रावो निवर्तला : मग तेहीं तैसेंचि केलें : तेउतापरी आपुला आदिभाव चुकविला : परि येरीं बळाधिकारेंसी केला । ”

## निर्भय सहगमन

**इबन बातुता** ऊर्फ शेख अबु अबदुल्ला हा आपल्या प्रवासवर्णनांत १३४३ च्या सुमाराच्या हकिगतींत लिहितो, “ पतीच्या निधनानंतर त्याच्या विधवेनें जाळून घेणें हें हिंदुलोक प्रशंसनीय कृत्य मानतात; परंतु असें करणें सक्तीचें नाहीं. ज्यावेळीं एकादी स्त्री सहगमन करते, त्यावेळीं तिच्या घराण्याची कीर्ति पसरते व इमानीपणाबद्दल लौकिक वाढतो एवढेंच. जी स्त्री सती जात नाहीं ती जाडेभरडे कपडे वापरते व आपल्या आप्तांजवळ कष्टांत दिवस कंठिते आणि पतिनिष्ठेच्या अभावाबद्दल तिचा तिरस्कार होतो; परंतु तिच्यावर जाळून घेण्याची सक्ति केली जात नाहीं. एकदा धारजवळील आमझरी शहरांत ज्यांचे नवरे लढाईत कामास आले होते व ज्या सहगमनाला सिद्ध झाल्या होत्या, अशा तीन स्त्रिया मीं पाहिल्या. प्रत्येकजणीनें मौल्यवान पोषाक करून सुवासिक तेलें अंगास लाविलीं होतीं व त्या घोड्यावर स्वार झाल्या होत्या. उजव्या हातांत नारळ घेऊन ते त्या झेलित होत्या, आणि उजव्या हातांत आरसे घेऊन त्यांत आपलें रूप पहात होत्या. त्यांच्या भोंवतीं ब्राह्मण व आप्त यांची गर्दी जमली होती व पुढें ढोल, सनई व शिंगें वाजत होतीं. जो तो त्यांना आपल्या स्वर्गस्थ बापाला, आईला, बंधूला किंवा मित्राला नमस्कार सांगा, अशी विनंती करी आणि त्याही, “ हं सांगेन बरं का, ” असें या लोकांना उत्तर देत. मी घोड्यावर स्वार होऊन हा दहनविधि पाहाण्याकरितां निघालों. तीन मैल चालल्यानंतर, जेथें पुष्कळ पाणी व घनदाट झाडी होती, अशा काळोख्या ठिकाणीं आम्हीं येऊन पोहोंचलों. तेथें आंत दगडी मूर्ति असलेले चार मंडप होते. त्यांच्या मधोमध पाण्याचें एक तळें होतें. त्यावर इतकी गर्द झाडी होती कीं, सूर्यकिरणास प्रवेश करण्यास तिकडे वाव नव्हता. या मंडपाजवळ येतांच त्या बायांनीं तळ्यांत उतरून पाण्यांत बुडी मारली आणि आपले कपडे व दागिने उतरून त्यांचें दान केलें. त्या प्रत्येकीला एक एक जाडेंभरडें न शिवलेलें वस्त्र देण्यांत आलें. तें त्यांनीं आपल्या कमरेभोंवतीं गुंडाळून बाहू व डोकें यांवरून पदर घेतला. या तळ्याजवळच एका सखल जागीं

अग्नि पेटविण्यांत येऊन त्यांत तेल ओतण्यांत आलें. त्यामुळें ज्वाला जास्तच भडकल्या. तिकडे सुमारें दहा माणसें लहान लहान लांकडें घेऊन उभीं होतीं, व सुमारें तितकींच मोठीं लांकडें घेऊन उभीं होतीं. तसेंच ढोल व सनई घेऊन कांहीं माणसें त्या स्त्रियांच्या आगमनाची वाट पाहात होतीं. त्या बायांच्या नजरेला तो अग्नि पडून त्यांनीं घाबरून जाऊं नये, म्हणून कांहीं लोकांनीं त्या विस्तवाच्या समोर पडद्यादाखल एक घोंगडी धरली होती. त्यांपैकीं एका बाईनें त्या पडद्याकडे येऊन ती घोंगडी हिसकावून घेतली व म्हणाली, "या विस्तवाचें मला भय दाखवतां होय ? तो अग्नि आहे हें मला ठाऊक आहे. पडद्याची गरज नाहीं." इतकें झाल्यावर तिनें डोक्यावर हात उचलून अग्निनारायणाला नमस्कार केला व आंत उडी घेतली. यावेळीं ढोल, सनई, व शिंगें वाजूं लागलीं व लोकांनीं सरपण व मोठीं लांकडें तिच्यावर टाकिलीं. तीं अशीं कीं, तिला हलतां येऊं नये. लोकांनीं मोठा जयघोष केला व अशा प्रकारें त्या ठिकाणीं एकच गलबला झाला. तें दृश्य पाहून मीं भोंवळ येऊन घोड्यावरून खालीं जमिनीवर आदळणारच होतों; परंतु आमच्या सोबत्यानें झटकन् पाणी आणून तें माझ्यावर तोंडावर शिंपडलें व त्यामुळें हा प्रसंग टळला. इतकें झाल्यावर आम्ही तिकडून परतलों."

**निकोलो कोंती** हा इटालियन प्रवासी दुसऱ्या देवरायाच्या कारकीर्दींत १४२० च्या सुमारास विजयानगरला आला होता. तो लिहितो, "येथील रहिवाशी वाटेल तितक्या बायकांशीं विवाह करतात, व त्या त्यांच्या मृत नवऱ्याबरोबर जाळल्या जातात. येथील राजा हिंदुस्थानांतील इतर राजांपेक्षां बलिष्ठ आहे. त्याच्याकडे बारा हजार बायका आहेत. त्यांपैकीं चार हजार तो जिकडे जाईल तिकडे त्याच्याबरोबर पायीं चालतात. यांची स्वयंपाकाकरितां नेमणूक असते. इतकीच बायकामंडळी विशेष सुंदर साज केलेली घोड्यावर स्वार होतात व बाकीच्या पालख्यांमध्यें बसून जातात. यांपैकीं दोन ते तीन हजार स्त्रियांकडे राजाच्या निधनोत्तर त्यांनीं सहगमन करावें या अटीवर तो विवाहबद्ध झालेला असतो."

## जमिनींत पुरण्याचा सहगमनविधि

**फेर्नाव नूनिस** हा १५३६ च्या सुमारास लिहितो, "त्याला (अच्युतरायाला) पांचशें बायका आहेत. त्या सगळ्या त्याच्या निधनोत्तर सहगमन करतील." पुढें सहगमनविधीची विस्तृत माहिती देऊन तो म्हणतो, "जेव्हां एकादा सरदार मरतो तेव्हां त्याच्या कितीही बायका असोत, त्या स्वतःस जाळून घेतात व जेव्हां एकादा राजा निधन पावतो तेव्हां त्याच्या राण्याही हेंच करतात. सर्व देशांत हिंदु लोकांमध्यें हीच चाल आहे. फक्त तेलंगी लोकांमध्यें जेव्हां नवरा

मरतो तेव्हां त्याची बायको त्याच्यासह जिवंत पुरली जाते. त्या आनंदानें एका तयार केलेल्या खड्ड्याकडे जातात. या खड्ड्यांत दोन मातीचीं आसनें तयार केलेलीं असतात. एक नवऱ्याकरितां व दुसरें त्याच्या विधवेकरितां. या दोघांना आपापल्या आसनावर बसवून हळुहळू तीं पुरलीं जाईपर्यंत त्यांवर माती घालतात. अशा प्रकारें नवऱ्याबरोबर त्याची पत्नी मरते. " हा मातींत गाडण्याचा सतीचा प्रकार थेवेनो, देलों, बेर्नियें वगैरे अनेक युरोपियन प्रवाशांनीं वर्णिला आहे; परंतु तो कोणीही प्रत्यक्ष पाहिल्याचें नमूद केलें नसल्यामुळें त्याची माहिती मी देणार नाहीं.

## ताव्हेर्नियेनें पाहिलेले विलक्षण प्रकार

**ज्यां बाप्तिस्त ताव्हेर्नियें** नांवाच्या एका फ्रेंच माणसानें आपल्या प्रवासवर्णनांत सतीसंबंधीं बरीच माहिती दिली आहे. त्यांपैकीं त्यानें स्वतः पाहिलेले कांहीं वृत्तांत खालीं देतोः—

१६४८ तील वेंगुर्ल्याच्या एका सतीसंबंधी तो लिहितो, " ...गोव्याला जाण्यास निघण्यापूर्वी जे नऊ दिवस मीं वेंगुर्ल्याला घालविले, त्यावेळीं तेथें घडलेल्या एका प्रसंगाची या ठिकाणीं आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. एका हिंदु मेला व त्याला जाळण्याकरितां त्या लोकांच्या रिवाजाप्रमाणें खड्ड्यांत अग्नि पेटविण्यांत आला. त्याच्या बायकोला मूलबाळ नसल्यामुळें तिनें सुभेदाराकडून सहगमनाचा परवाना मिळविला होता. त्याप्रमाणें ती अग्निप्रवेश करण्याकरितां ब्राह्मण व नातलग यांच्यासह त्या ठिकाणीं आली. सहगमनविधीप्रमाणें अग्नींत उडी टाकण्यांपूर्वीं चितेभोंवतीं तीन प्रदक्षणा घालाव्या लागतात. तसें करतांना जोराचा पाऊस आला. त्यावेळीं ब्राह्मण लोकांनीं तिला त्या खड्ड्यामध्यें लोटून दिली व ते चालते झाले. पाऊस इतका मुसळधार होता कीं, ती चिता त्यामुळें क्षणांत साफ विझून गेली, व बाई जळालीच नाहीं. मध्यरात्रीच्या सुमारास उठून ती आपल्या एका नातलगाच्या घरीं गेली व तिनें दार ठोठावलें...अंग भाजल्यामुळें तिची स्थिति भयंकर होऊन ती अगदीं विद्रूप दिसत होती. फिरून दोन दिवसांनीं, एकदां वेदना सहन केल्या असतांही, ती अग्निप्रवेश केल्याशिवाय राहिली नाहीं. "

वंगालमधील सहगमनासंबंधीं तो लिहितो, " या देशामध्यें एकाद्या स्त्रीनें जर पतिनिधनानंतर गंगेच्या तीरावर जाऊन सहगमनापूर्वीं नवऱ्याच्या प्रेताला व स्वतःला गंगेच्या जलानें स्नान घातलें नाहीं तर ती अगदींच गरीब समजावी. वीस दिवसांपेक्षांही लांबचा प्रवास पत्करून सहगमनाकरितां गंगातीरावर येतांना अशा विधवांना मीं पाहिलें आहे. इतक्या काळांत तीं प्रेतें कुजून जातात व त्यांना असह्य घाण सुटते. अशाचपैकीं एक विधवा उत्तरेकडून भूतानच्या सरहद्दीवरून

गंगेच्या कांठीं आली; नवऱ्याचें प्रेत खटाऱ्यामध्यें घालून ती स्वतः मागें चालत होती. या प्रवासांत पंधरा दिवसपर्यंत तिनें बिलकूल कांहीं खाल्लें नाहीं. भयंकर दुर्गंध सुटलेल्या आपल्या नवऱ्याच्या प्रेताला तिनें गंगोदकाचें स्नान घातलें व आपणही आंघोळ करून अग्निप्रवेश केला. तिचा हा दृढनिश्चय पाहिलेल्या सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटलें. मी याप्रसंगीं स्वतः हजर होतों."

आणखी एक स्त्रियांचा विलक्षण पतिनिष्ठेची ताव्हर्नियें कथा सांगतो, "वेलोरच्या राजावर विजापूरच्या बादशहाच्या सेनापतीनें स्वारी करून त्याचें राज्य जिंकलें. या युद्धांत राजा पतन पावला. त्यामुळें नगरांत एकच हाहाकार उडाला. त्याच्या महालांतील अकरा राण्यांनीं राजाबरोबर सती जाण्याचा निश्चय केला. विजापूरच्या सेनापतीनें त्यांना चांगल्या प्रकारें वागविण्याचें आश्वासन दिलें व या भयंकर विचारापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सहगमनाचा हेका त्या सोडीनात असें दिसून आल्यावर, त्यांना एका खोलींत कोंडून ठेवण्याचा सेनापतीनें हुकूम सोडला. या आज्ञेची अंमलबजावणी करण्याकरितां जो मनुष्य त्यांच्याकडे आला, त्याला या बेफाम विधवांनीं सांगितलें कीं, हा सारा खटाटोप व्यर्थ आहे. त्यांना कैद केल्यानें कांहीं वळणार नाहीं. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना वागूं न दिल्यास तीन तासांनीं त्यांच्यापैकीं एकही बाई जिवंत राहाणार नाहीं. त्यांचें हें बोलणें त्याला पोकळ धमकी वाटली व तें कृतींत येणार नाहीं, अशा कल्पनेनें तें थट्टेवारी नेण्यांत आलें. तीन तासानंतर खोलीचें दार उघडून पाहतां त्या अकराही बाया गतप्राण होऊन जमिनीवर पडलेल्या त्याला आढळल्या! आपला अंत त्यांनीं कशाप्रकारें करून घेतला याचें निदर्शक कसलेंही हत्यार, दोरी किंवा विष याचें चिन्ह जवळ नव्हतें. इतकेंच नव्हे तर त्यांनीं प्राणत्याग कसा केला हें कोणालाही सांगतां येईना. निश्चयपूर्वक हा सारा सैतानाचाच खेळ असला पाहिजे!"

## भयंकर अग्निदिव्य

आणखी एक विस्मयकारक हकीकत तो लिहितो, "बंगालमधील पाटणा शहरांत माझ्यासमक्ष घडलेला आणखी एक प्रसंग मला आठवतो. मीं त्या शहराच्या सुभेदाराच्या वाड्यांत कांहीं डच लोकांसह उतरलों होतों. हा गृहस्थ जवळजवळ साठ वर्षांचा होता. आम्हीं त्याच्या दिवाणखान्यांत बसलों असतां सुमारें बावीस वर्षें वयाची एक बाई आंत आली. नुकत्याच मरण पावलेल्या आपल्या नवऱ्याबरोबर सती जाण्याकरितां सुभेदाराची परवानगी घेण्याकरितां ती आली होती. तिचें वय व सौंदर्य पाहून त्या सुभेदाराचें अंतःकरण कळवळलें, व कृतनिश्चयापासून तिला परावृत्त करण्याचा त्यानें प्रयत्न करून पाहिला; परंतु ती जास्तच हट्टी बनली.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
............ दि: ............
अनुक्रम............ नोंद दि: ............

" मी अग्नीला घाबरतें, असें तुम्हांला वाटतें काय ? " अशा कणखर आवाजांत तिनें सुभेदाराला प्रश्न केला. तेव्हां " विस्तवामध्यें हात भाजून त्याची झळ तुला कधीं कळली आहे कीं नाहीं ? ", असा उलट त्यानें तिला सवाल केला. तेव्हां ती बाई पूर्वींपेक्षांही उसळून म्हणाली, " नाहीं, नाहीं. मी अग्नीला कोणत्याही प्रकारें बिलकूल घाबरत नाहीं. याचें प्रत्यंतरच पाहावयाचें असल्यास चांगली एक पेटती मशाल इकडे आणण्याची व्यवस्था करा. " तिचें तें भाषण ऐकून सुभेदार आश्चर्यचकित झाला. " जा जा, सैतानाकडे जा ! " असें रागानें म्हणून त्यानें तिला तिकडून जावयास सांगितलें. तेव्हां जवळ बसलेले कांहीं तरुण सरदार म्हणाले, " चला, या बाईची परीक्षा तर पाहूं. मशाल आणवा. हिला हात जाळून घेण्याचें धैर्य होणार नाहीं. " सुभेदार प्रथम या गोष्टीला परवानगी देईना; परंतु त्यांनीं फारच आग्रह केल्यामुळें त्याला संमति देणें प्राप्त झालें. पुढें आज्ञे-प्रमाणें मशाल आणण्यांत आली. त्या बाईनें चांगली पेटणारी ती मशाल पाहिल्या-बरोबर ती धांवत पुढें आली व आपला हात तिनें ज्वालेवर धरून कोणत्याही प्रकारच्या वेदना होत असल्याचा भाव मुद्रेवर न दाखवितां कोपरापर्यंत आपला हात त्या मशालीवर पुढें-मागें करूं लागली. त्याबरोबर तो तात्काळ भाजून निघाला. हें दृश्य पाहाणाऱ्यांच्या अंगावर भयानें शहारे आले. सुभेदारानें त्या बाईला आपल्या समोरून दूर नेण्याची आज्ञा केली. "

## वात्सल्याचा विजय

**फ्रांसो बेर्नियें** हा फ्रेंच डॉक्टर १६५९ सालीं दाराचा वैद्यकीय सल्लागार होता. हिंदुस्थानांत त्याचा मुक्काम सुमारें दहा वर्षें होता. तो सतीच्या चालीसंबंधीं आपल्या प्रवासवर्णनांत लिहितो, " पूर्वींपेक्षां आतां सती जाणाऱ्या विधवांची संख्या कमी आहे; कारण ज्यांच्या सत्तेखालीं हा प्रदेश आहे ते मुसलमान लोक या रानटी चालीला आळा घालण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतात ही चाल बंद पाडण्याचा त्यांनीं प्रत्यक्ष असा फायदा केलेला नाहीं हें खरें; कारण आपल्या-पेक्षां बहुसंख्य असलेल्या हिंदुलोकांच्या धर्मस्वातंत्र्याच्या आत न घेण्याचें त्यांचें धोरण आहे; परंतु या चालीला अप्रत्यक्ष रीतीनें पायबंद घालण्यांत येतो. ज्या भागांत ही बाई वास्तव्य करीत असेल, तेथील सुभेदाराच्या परवानगीखेरीज तिला सहगमन करतां येत नाहीं. तिठा या कार्यापासून परावृत्त करतां येत नाहीं याची पुरी खात्री झाल्याखेरीज अशी परवानगी देण्यांत येत नाहीं. आपला हा हेतु साध्य करण्याकरितां सुभेदार त्या विधवेशीं अनेक युक्तिवाद करतो, व तिला अनेक आकर्षक आश्वासनें देतो. इतक्याचाही कांहीं उपयोग होत नाहीं, असें पाहिल्यावर तो त्यांना आपल्या बायकांकडे पाठवितो. हेतु हा कीं, त्याच्या कान-उघाडणीचा तरी कांहीं परिणाम त्यांच्यावर होत असल्यास पाहावा. इतके सर्व

अडथळे उत्पन्न करूनही या सतींची संख्या ज्या प्रदेशांमध्यें मुसलमान सुभेदार नसतात, अशा हिंदु राजांच्या अंमलाखालीं फार मोठी असते. चितेवर चढून आत्मनाश केलेल्या व मीं पाहिलेल्या प्रत्येक विधवेचा इतिहास देऊन तुम्हांला कंटाळा न आणतां जेथें मी स्वतः हजर होतों, अशा दोनतीन देखाव्यांकडेच वळतों. प्रथम या भयंकर निश्चयापासून परावृत्त करण्याकरितां ज्या एका विधवेकडे मला पाठविण्यांत आलें होतें, तिची थोडी माहिती ही अशीः—वेणीदास नांवाचा माझा एक मित्र वारला. दानेचमेंडखान याकडे तो मुख्य कारकून होता. त्याला जीर्णज्वर येत होता, व मींच दोन वर्षें त्याला औषधोपचार करीत होतों. त्याच्या बायकोनें सहगमन करण्याचें ठरविलें. तिचे कांहीं नातलग माझ्या धन्याकडे नोकरीस होते. या भयंकर कृत्यापासून तिला निवृत्त करण्याची त्यानें मला आज्ञा केली. तिच्या नातलगांचें म्हणणें असें होतें कीं, तिचा हा निश्चय अत्यंत उदात्त व प्रशंसार्ह असला व तेणेंकरून आपल्या कुळाच्या लौकिकामध्यें जरी भर पडणार असली, तरीपण अल्पवयी अशा आपल्या मुलांकडे तिनें दुर्लक्ष करणें योग्य नसून अशा प्रकारें त्यांना टाकून जाणें निष्ठुरपणाचें आहे. तरी आपल्या स्वर्गस्थ पतीच्या स्मृतीपेक्षां आपल्या मुलांच्या कल्याणाकडेच तिनें जास्त लक्ष द्यावें; परंतु त्या बेफाम झालेल्या बाईनें त्यांचें हें म्हणणें बिलकूल ऐकून घेतलें नाहीं, व त्या कुटुंबाचा एक जुना दोस्त म्हणून त्या विधवेला भेटून तिचें मन वळविण्याची कामगिरी माझ्या धन्याच्या इच्छेवरून मला पत्करावी लागली. मी तिच्या घरीं गेलों. ती विधवा आपल्या मृत नवऱ्याच्या पायांजवळ बसली होती. तिचे केस अस्ताव्यस्त पसरले होते. तिचा चेहरा पांढरा फटफटीत दिसत होता. डोळे अश्रुहीन पण सतेज दिसत होते. इतरांबरोबर तीही मोठ्यानें किंकाळ्या फोडीत होती. त्यांचा तो गोंधळ जरा ओसरल्यावर मीं त्या भयंकर मंडळीजवळ गेलों आणि शांतपणें मीं त्या विधवेला म्हटलें, "मी दानेचमेंडच्या इच्छेवरून इकडे आलों आहें. तुझ्या मुलांच्या संभाळ करण्याकरितां व त्यांच्या शिक्षणाकरितां तुला जिवंत रहाणें अवश्य आहे. तूं जर सहगमन केलें नाहींस, तर तो तुझ्या प्रत्येक मुलाला दरमहा दोन मोहरांची नेमणूक करून द्यावयास राजी आहे. तुला चितेवर चढण्यास आडकाठी करणें किंवा हें अविचारी कृत्य करण्यास तुला प्रोत्साहन देणाऱ्यांना शिक्षा देणें आमच्या हातीं आहे. तुझ्या मुलांकरितां तूं जिवंत रहावें, अशी तुझ्या साऱ्या आप्तांची इच्छा आहे. ज्याप्रमाणें मूलबाळ नसलेल्या विधवा सती न गेल्यास त्यांचा बदलौकिक होतो, तसा प्रकार तुझ्या बाबतींत नाहीं." मीं तिला हाच बोध अनेक प्रकारें केला; परंतु ती बिलकूल कांहीं बोलली नाहीं. शेवटीं माझ्याकडे निश्चयात्मक दृष्टि रोखून ती म्हणाली, "ठीक आहे. जर तुम्हीं सहगमन

करण्याचा मला प्रतिबंध केला तर मी भिंतीवर डोकें आपटून प्राण देईन. " या बाईला पिशाच्चानें तर पछाडलें नाहीं ना, असेंही मला वाटलें. मी रागानें बोललों, " बरं तर बाई, तसं कर; पण हे दुष्ट व निष्ठुर माते, प्रथम आपल्या मुलांचे गळे कापून तुझ्या चितेवर त्यांनाही जाळून टाक. उपासमारीनें मरावयाला त्यांना मागें ठेवूं नकोस. हा पहा मी दानेचमेंडखानाकडे जाऊन त्यांची नेमणूक रद्द करवितों ! " हे शब्द मी इतक्या आवेशानें व मोठ्यानें बोलून गेलों कीं, त्यांचा इष्ट परिणाम तिच्या मनावर झाल्याखेरीज राहिला नाहीं. ती एक अवाक्षरदेखील बोलली नाहीं. तिनें आपलें डोकें एकदम आपल्या गुडघ्यांवर टेंकलें. तिकडील बहुतेक ब्राह्मण व इतर स्त्रियाही गुपचूप बाहेर गेल्या. इतकें झाल्यावर त्या बाईला त्यांच्या स्वाधीन करून मी घोड्यावर बसून तसाच परत फिरलों. संध्याकाळीं मीं काय केलें तें दानेचमेंडखानाच्या कानावर घालण्याकरितां मी त्याच्या घरीं जावयास निघालों असतां, तिच्या आप्तांपैकीं एक गृहस्थ मला रस्त्यांत भेटला. त्यानें माझे आभार मानले. त्या विधवेनें सती जाण्याचा हेका सोडला असून तिच्याशिवायच त्या मृताला अग्निसंस्कार देण्यांत आल्याचें मला त्यानें सांगितलें."

डॉ. बर्नियें पुढें लिहितो, " स्त्रियांनीं स्वतःस जाळून घेण्याच्या या भयंकर विधीला मी इतक्या कांहीं वेळां हजर राहिलों आहें कीं, तो प्रसंग पुनः पाहाण्याचा मला धीर होत नाहीं. इतकेंच नव्हे, तर या गोष्टीचा विचार करतांनादेखील माझ्या अंगावर भीतीनें शहारे उभे राहातात ! तरीपण माझ्या दृष्टीखालून गेलेल्या एका प्रसंगाचें वर्णन करण्याचा प्रयत्न करतों. या भयजनक विधीच्या वेळीं या बेफाम बाया जें विलक्षण धारिष्ट प्रकट करतात त्याची यथातथ्य कल्पना करून देणें अशक्यप्राय आहे. हा प्रकार स्वतः पाहिल्याखेरीज त्याच्यावर विश्वास बसणार नाहीं.

### राणीबरोबर दासींचें सहगमन

" एकदां हिंदुराजांच्या अंमलाखालील मुलुखांतून मी अहमदाबादेहून आग्र्याला चाललों होतों. संध्याकाळ होऊन उन्हाचा ताप जरा कमी होईपर्यंत वाटेंत एका वडाच्या झाडाखालीं आम्हीं तळ दिला. इतक्यांत एक विधवा आपल्या मृत नवऱ्याबरोबर सहगमन करण्याच्या बेतांत असल्याची बातमी आली. ती ऐकल्याबरोबर मी तसाच पळत त्या ठिकाणीं गेलों. तेथें एका जवळजवळ निर्जल अशा तळ्याच्या कांठीं जाऊन पाहातों, तों त्याच्या मध्यभागीं एक खड्डा खणून त्याच्यामध्यें लांकडें रचण्यांत आलीं असल्याचें मीं पाहिलें. त्या चितेवर मृताचा देह ठेवण्यांत आला होता. ती बाईही शेजारीं बसली होती. चारपांच ब्राह्मण त्या चितेला सर्व बाजूंनीं अग्नि पेटवीत होते. चारपांच मध्यम वयाच्या व

साधारण चांगला पोशाक केलेल्या बाया एकमेकींचे हात हातांत धरून त्या खड्ड्याच्या भोंवतीं गात नाचत होत्या. सभोंवार बरीच स्त्रीपुरुष प्रेक्षकमंडळी जमली होती. इतक्यांत जिच्यांत पुष्कळ तेल व तूप ओतलें आहे अशा त्या चितेचा अग्नि एकदम भडकला, आणि सुगंधी तेलानें भिजवलेल्या त्या विधवेच्या लुगड्यानेंही पेट घेतला; परंतु तिच्या चेहऱ्यावर वेदनेची किंवा दुःखाची अल्प छटाही मला दिसली नाहीं. असें सांगतात कीं, त्या बाईनें ' पांच ', ' दोन ', असे शब्द जोरानें उच्चारले. त्याचा अर्थ असा कीं, ती बाई त्याच नवऱ्याबरोबर पूर्वीं पांचदां सती गेली होती आणि अशा प्रकारच्या आणखी दोन अग्निदिव्यांतून गेल्यावर तिला कायम मोक्ष प्राप्त होणार आहे. जशी काय प्राण सोडतां-सोडतां पूर्वस्मृतीची व भविष्यज्ञानाची तिला अंतःप्रेरणाच झाली; परंतु या शोकपर्यवसायी नाटकाची ही केवळ नांदीच होती. त्या उपरिनिर्दिष्ट पांच स्त्रियांचें गाणें व नाचणें हा या विधीचा एक निरर्थक भाग अशी माझी प्रथम कल्पना होती; परंतु अत्यंत आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्या बायांपैकीं एकीच्या साडीला ज्वाला लागून तिच्या लुगड्यानें पेट घेतला व तिनें डोकें पुढें करून एकदम त्या खड्ड्यांत उडी घेतली. अशाच प्रकारें दुसऱ्या बाईच्या लुगड्याला ज्वाला स्पर्शतांच तिनेंही तिच्या पहिल्या मैत्रिणीचें अनुकरण केलें. राहिलेल्या तीन बाया तशाच नाचत होत्या. थोड्याच वेळानें एका मागून एक अशा पटापट त्यांनींही अग्नीमध्यें उड्या टाकल्या. या बहुविध बलिदानाचा अर्थ मला मागाहून कळला. ह्या पांच बाया त्या विधवेच्या दासी होत्या. आपल्या धनिणीचें नवऱ्याच्या दुखण्यांत व्यक्त झालेलें दुःख पाहून त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, त्यांनींही आपल्या मालकीणीबरोबर त्याच चितेंत स्वतःस जाळून घेण्याची प्रतिज्ञा केली. "

## बनावट बाजारगप्प

आणखी एक विलक्षण सतीची गोष्ट डॉक्टर बेर्नियेनें कथन केली आहे. मात्र ती स्वतः त्यानें पाहिलेली नाहीं. ती अशक्य आहे असें नाहीं; परंतु आर्य-स्त्रियांच्या पतिनिष्ठेची थट्टा करण्याकरितां कोणा तरी परकीयानें ती गमतीदाखल उठविलेली गप्प असणेंच जास्त संभवनीय आहे. बेर्नियें लिहितो,

" आणखी एका भयंकर प्रसंगाकडे मी वळतों. वास्तविक यावेळीं मी स्वतः हजर नव्हतों; परंतु या विलक्षण हकीकतीच्या अपूर्वत्वामुळें मीं प्रत्यक्ष पाहिलेल्या इतर प्रसंगांपेक्षां, कथनाकरितां मीं तिची निवड केली आहेः मीं इतक्या कांहीं गोष्टी पाहिल्या आहेत कीं, मला स्वतःलाच कोणी असल्या

गोष्टी सांगितल्या असत्या तर त्यांच्यावर माझा विश्वास बसला नसता. त्यावरून प्रस्तुत हकिकत विचित्र आहे एवढ्याचकरितां तिच्या खरेपणाविषयीं संशय घेण्याचें कारण नाहीं. हिंदुस्थानामध्यें ही गोष्ट सर्वतोमुखी झाली आहे, आणि सगळे लोक ती खरी मानतात. कदाचित् युरोपामध्येंही ती इतक्यांत जाऊन थडकली असेल.

"एका बाईचें तिच्या शेजारीं राहणाऱ्या मुसलमान तरुणाशीं संधान होतें. हा इसम धंद्यानें शिंपी असून सनईही वाजवीत असे. हा तरुण आपल्याशीं विवाह करील या आशेनें तिनें आपल्या नवऱ्याला विष चारलें. इतकें झाल्यावर ती तशीच धांवत आपल्या प्रियकराकडे गेली व त्याला आपल्या या कृत्याची वर्दी दिली. आतां आधीं ठरल्याप्रमाणें या ठिकाणाहून पळून जाऊं, नाहींतर जर थोडादेखील विलंब झाला तर आपणांस कुळाचाराप्रमाणें सहगमन करावें लागेल, असें तिनें त्याला सांगितलें. या बाईच्या या कारस्थानांत अडकल्यास पुढें येणाऱ्या अडचणींचा व संकटांचा विचार करून त्यानें ताबडतोब तिला झिडकारून लाविलें. त्याबरोबर त्या बाईनें आपला चित्तक्षोभ बिलकूल प्रकट केला नाहीं. तशीच ती धांवत आपल्या नातलगांकडे गेली व एकाएकीं आपल्या नवऱ्याचें प्राणोत्क्रमण झाल्याचें तिनें त्यांना कळविलें. तसेंच सहगमन करण्याचा आपला हेतूही त्यांना सांगितला. तिच्या हा आत्मत्यागानें आपल्या कुटुंबाचें यश उज्ज्वल होईल या कल्पनेनें त्यांना संतोष झाला. त्यांनीं खड्डा खणून चिता रचिली व त्यावर प्रेत ठेवून अग्नि पेटविला. इतकी सर्व व्यवस्था झाल्यावर ती बाई चितेभोंवतीं प्रदक्षिणा घालूं लागली व असें करतांना आपल्या नातलगांना मिठी मारून त्यांचा शेवटचा निरोप घेऊं लागली. या ठिकाणीं तिचा तो मुसलमान प्रियकर निमंत्रणावरून सनई वाजविण्यास आला होता. त्याला मुजरा करण्याच्या मिषानें ती त्याच्याकडे गेली व त्याच्या मानेला धरून त्या बेफाम बाईनें अनिवार जोरानें त्याला खड्ड्याच्या कांठाशीं ओढला व आपल्या क्रोधास पात्र झालेल्या त्या माणसासह तिनें धडाधड पेटणाऱ्या चितेमध्यें एकदम उडी घेतली."

## "आयुष्यांतील आनंदाचा प्रसंग"

**थोमस बावरे** नांवाचा एक इंग्रज अधिकारी समक्ष पाहिलेल्या सतीच्या विधीचें वर्णन पुढीलप्रमाणें करतो, "१६७२ सालीं प्रवासांत असतांना फोर्ट सेंट जॉर्जहून मच्छालिपटनला मी जात होतों. वाटेंत कारिरो या शहरांत मला मुक्काम करावा लागला. मी जेवण आटोपून पुढील प्रवासाकरितां सामानाची बांधाबांध करीत होतों. इतक्यांत नरसा नांवाचा माझा दुभाषा मजजवळ येऊन म्हणाला, 'एक सुंदर तरुणी आज सहगमन करणार आहे. तरी हा विधि

पाहाण्यास तोंपर्यंत आपण थांबावें. ' मी कित्येक दिवस ऐकत असलेल्या गोष्टीचें प्रत्यंतर पाहण्याची मला जिज्ञासा उत्पन्न झाली, व ताबडतोब निघण्याचा बेत मीं रद्द केला. दुपारीं तीन वाजतां पुष्कळ पुरुष, स्त्रिया व मुलें गांवाबाहेर जात असतांना मला दिसलीं. हा रानटी समारंभ नीट पहावयास मिळावा म्हणून मी घोड्यावर बसून त्या ठिकाणीं गेलों. गांवापासून अर्ध्या मैलाच्या अंतरावर एका हिरव्यागार मैदानांत अग्नि प्रज्वलित करण्यांत आला होता. तो जोरानें पेटत होता. भोंवतीं सारे लोक गोळा झाले होते. मीही त्याच्या अगदीं जवळ गेलों. तिकडून मला त्या माणसाचें प्रेत जळत असलेलें दिसत होतें. जवळच आणखी एक पोकळ असा जळाऊ वस्तूंचा ढीग ( चिता ) रचून ठेवला होता. त्यालाही अग्नि लावण्यांत आला. जमलेली मंडळी दोनतीन यार्ड अंतरावर जाऊन भोंवतीं उभी राहिली. मीं त्या तरुण बाईच्या अगदीं जवळ घोड्यावरूनच गेलों. ती बाई अगदीं आनंदांत होती. ' या ब्राह्मणांच्या नादाला लागून कां फसतेस ? ' अशा आशयाचा तिला मीं प्रश्न केला. माझें हें बोलणें त्या ब्राह्मणांच्या कानांवर जाऊन ते रागानें संतप्त झालेले दिसले; परंतु त्यांना बोलण्यास अवसर मिळण्याच्या आधींच ती बाई हंसली आणि म्हणाली, ' माझ्या आयुष्यांतील हा अत्यंत आनंदाचा प्रसंग आहे. ' हे शब्द ती इतक्या जलद बोलून गेली कीं, तिच्यामध्यें मला एका प्रकारचा विलक्षण बेफामपणा दिसून आला. कोणी कांहींही म्हणो; ते छद्मी ब्राह्मण तिला आधीं कांहींतरी मादक पेय प्रथम देत असावेत. त्यामुळें त्या इतक्या धैर्यानें व उत्कंठेनें आत्मयज्ञ करूं शकतात. त्या मूर्ख बाईनें अत्यंत आनंदी मुद्रेनें व हंसत आपले हात वर केले आणि त्या देशाच्या पद्धतीप्रमाणें आपल्या सर्व आप्त-सुहृदांना व विशेषतः ब्राह्मणांना नमस्कार केला, आणि माझ्याकडे आस्थापूर्वक पाहात, हिंदु पद्धतीला अनुसरून अत्यंत सुंदर रीतीनें शृंगारलेल्या आपल्या वेणींतून कांहीं पांढरीं व पिवळीं फुलें काढून तिनें मला दिलीं आणि विलक्षण चलाखीनें त्या अग्नीमध्यें उडी घेतली. ''

**डॉ. देलों** या गेल्या ' रत्नदीपा ' च्या दिवाळी अंकांत इंक्विझिशनचा कैदी म्हणून ज्याचें वर्णन केलें आहे, त्यानेंही आपल्या प्रवासवर्णनांत सतीसंबंधीं बरेंच लिहून ठेवलें आहे. तो स्वतः पाहिलेल्या सतीचें वर्णन करतोः—'' ज्यावेळीं पहिल्यांदाच मी या भयंकर उत्सवाला हजर राहिलों, त्यावेळीं मीं या विधीची दरएक गोष्ट लक्षपूर्वक अवलोकन केली. ही सती जाणारी बाई वीस वर्षांपेक्षां जास्त वयाची दिसत नव्हती. ती त्या चितेकडे शांत मुद्रेनें पाहात होती, व आपल्यावर लवकरच गुदरणाऱ्या प्रसंगाबद्दल दुःखाची छाया तिच्या चेहऱ्यावर बिलकूल दिसत नव्हती. मीं चितेच्या अगदीं जवळच होतों. त्यामुळें मला तिची प्रत्येक हालचाल दिसली. तिनें आपल्या मृत पतीचें डोकें वर करून त्याच्या

गालावर आपला गाल ठेवला. इतकें केल्यावर तिनें आपल्या तोंडावर पदर ओढून दुःखाचें चिन्ह न दाखवितां ती त्या चितेंत मरण पावली. कांहीं दिवसांनंतर मला आणखी असा एक विधि पाहावयास सांपडला. ही विधवा पहिल्या बाईसारखी वयानें लहान नव्हती; परंतु मोठ्या निश्चयानें ती प्रसंगाला तोंड देत होती; पण ऐन वेळीं तिचा धीर खचला. चितेवर चढतांच ती तेथून बाहेर येण्याचा प्रयत्न करूं लागली. इतक्यांत ब्राह्मणानें घाई करुन चितेला अग्नि पेटविला व अशा प्रकारें तिचा अंत झाला."

आणखीही तो शेवटीं लिहितो, "मदुरेच्या राजाला तीनचारशें बायका आहेत. तो निधन पावल्यावर त्याच्या राण्यांना सती जाणें भाग पडेल. शिवाजीच्या जातीच्या राजेलोकांमध्यें याहीपेक्षां भयंकर अशी एक रानटी चाल आहे; कारण त्यांच्या प्रेतांबरोबर सर्व सरदारांनीं ( ही संख्या बरीच मोठी असते. ) स्वतःला जाळून घ्यावें लागतें. हीच चाल हिंदुस्थानांतील इतर कांहीं छोट्या राज्यांमध्येंही प्रचलित असलेली दिसून येते."

## विस्मयकारक सहगमनाचा निर्धार

**लेफ्टनंट कर्नल स्लीमन** यानें नर्मदेच्या कांठावर समक्ष पाहिलेला एक विस्मयजनक सहगमनाचा प्रकार लिहून ठेवला आहे तो असा :—" १८२९ सालच्या नवंबर महिन्याच्या २९ व्या तारखेला चार दिवसांपूर्वीच मृत झालेल्या आपल्या पतीच्या चितेवर एक पासष्ट वर्षांची बाई सती गेली. १८२८ सालच्या मार्च महिन्यांत मी जबलपूर जिल्ह्याचा सिव्हिल चार्ज घेतला व लगेच सती जाण्याविरुद्ध एक जाहिरनामा काढला. सतीच्या समारंभाला जो कोणत्याही प्रकारें मदत करील व त्याकरितां एक औंस वजनाचींही जरी लांकडें आणील तर त्याला शिक्षा केली जाईल, असें त्यांत म्हटलें होतें; कारण आधीं नवऱ्याचें प्रेत जाळल्यावर विधवेला जाळण्याकरितां नवीन लांकडें आणावीं लागतात. त्या जिल्ह्यांतील अत्यंत सन्मान्य अशा ब्राह्मण लोकांकडून ता. २४ नवंबर १८२९ मंगळवार रोजीं माझ्याकडे एक अर्ज आला. उमेदसिंग उपाध्याय नांवाचा एक ब्राह्मण त्याच दिवशीं सकाळीं वारला व त्याच्याबरोबर सती जाण्याची त्याच्या विधवेला परवानगी मिळावी, असा त्यांतील आशय होता. मीं माझा जाहिरनामा सक्तपणें अंमलांत आणण्याची त्यांना धमकी दिली व या कामीं तिला कोणी मदत करूं नये म्हणून तेथें पोलिसांचा कडक पहारा ठेवला. ती बाई नदीच्या कांठावर कांहीं न खातां किंवा न पितां तशीच बसून राहिली. दुसऱ्या दिवशीं तिच्या नवऱ्याचें प्रेत सुमारें चार चौरस व तीनचार फूट खोल अशा खड्डयामध्यें जाळण्यांत आलें. यावेळीं कित्येक हजार प्रेक्षक जमा झाले होते. त्या बाईनें सहगमन केल्याशिवाय

किंवा परत त्यांच्याबरोबर जाण्याची इच्छा दर्शविल्याशिवाय तिच्या घरच्या मंडळीला अन्नाला स्पर्शही करणें शक्य नव्हतें. त्यांच्या मनधरणीला मी दाद देत नाहीं, असें पाहिल्यावर परके लोक आपआपल्या घरीं चालते झाले. तिचे मुलगे, नातू व इतर नात्यांतील मंडळी मात्र तिच्या जवळ बसून राहिली. कांहीं मंडळी माझ्या बंगल्याभोंवतीं जमून तिला परवानगी देण्याबद्दल गयावया करीत होती, तर कांहीं तिला या अग्निदिव्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करीत होती; परंतु ती बाई नदीमधल्या एका खडकावर बसून राहिली. तिनें कांहींच खाल्लें नाहीं. दिवसा रखरखीत ऊन व रात्रौ भयंकर थंडी यांचा तिच्यावर मारा होत होता. तिच्या खांद्याभोंवतीं असलेल्या पातळ लुगड्यापलीकडे थंडी निवारण्याकरितां अन्य साधन तिच्याकडे नव्हतें. आपल्या निर्धारापासून परावृत्त होण्याची लोकांची आशा नष्ट करण्याकरितां तिनें गुरुवारीं एक तांबडें फडकें डोक्याला गुंडाळलें व बांगड्या फोडून टाकल्या. धर्मशास्त्राप्रमाणें आपण मृत व जातिबाह्य झालों याचें हें निदर्शक होतें. असें केल्यावर तिनें जगण्याचें मनांत आणलें तरी तिला कुटुंबांत प्रवेश मिळणें शक्य नव्हतें. तिचीं मुलें व नातवंडें तिच्याजवळ तशींच बसून होतीं; परंतु त्यांच्या विनवण्यांचा तिच्यावर कांहींच परिणाम झाला नाहीं. माझी खात्री झाली कीं जर या बाईला मीं सती जाऊं दिलें नाहीं, तर ही भुकेनें प्राण सोडील. शिवाय तिच्या घरांतील माणसांचे निष्कारण हाल होऊन त्यांची दुष्कीर्ति होईल. मीं जो सतीविरुद्ध जाहिरनामा पुकारला होता त्यालाही वरिष्ठ सरकारकडून अद्याप मान्यता मिळालेली नव्हती. तेव्हां मीं अधिकाराचा भलताच दुरुपयोग केला, असाही माझ्यावर ठपका येण्याचा संभव होता.

"ता. २८ रोजीं म्हणजे शनिवारीं सकाळीं मी घोड्यावर स्वार होऊन दहा मैल दूर असलेल्या त्या ठिकाणीं गेलों. ती बिचारी विधवा डोक्याला एक तांबडा फडका गुंडाळून व आपल्यापुढें तांदूळ व फुलें भरलेलें एक पितळेचें ताट ठेवून बसली होती. तिच्या हातांत नारळ होता. अत्यंत शांतपणानें ती मला म्हणाली, 'सहगमन करण्याचा माझा पक्का निर्धार आहे. मीं जरी कांहीं खाल्लें किंवा प्यालें नाहीं तरी आपली परवानगी मिळेपर्यंत मी जिवंत राहीन.' इतकें म्हटल्यावर नर्मदेच्या सुंदर पात्रावर तळपणाऱ्या सूर्यनारायणाकडे पहात ती शांतपणें मला म्हणाली, "सूर्यासंनिध असलेल्या माझ्या पतिराजाशेजारीं माझा आत्मा आज पांच दिवस आहे. येथें असलेली मी म्हणजे केवळ मृत्पिंड होय. तुम्हीं मला त्या पलीकडच्या चितेवर सहगमन करूं द्याल याची मला खात्री आहे; कारण एका गरीब वृद्ध विधवेचे हाल निष्कारण आणखी वाढविण्याचा आपला स्वभाव नाहीं." मी म्हणालों, "खराच नाहीं. तुझा जीव वांचविणें हें मी माझें कर्तव्य समजतों, आणि म्हणून तुला या दुष्कृत्यापासून परावृत्त करण्याकरितां मी

या ठिकाणीं आलों आहें. माझी तुला अत्याग्रहाची विनंती आहे कीं, जिवंत राहून, तुझे मारेकरी म्हणून जो तुझ्या घराण्याचा दुर्लौकिक होईल त्याच्यापासून त्यांचा बचाव कर." ती म्हणाली, 'कोणी कांहीं म्हटलें तरी त्याची मला पर्वा नाहीं. त्यांनीं सर्वांनीं मीं परत त्यांच्यामध्यें येऊन राहावें म्हणून माझें मन वळविण्याचे त्यांच्या हातून होतील तितके सर्व प्रयत्न केले. त्यांच्या विनंतीस जर मीं मान दिला असतां तर मला प्रेमानें व सन्मानानें त्यांनीं वागविलें असतें, याबद्दल मला बिलकूल शंका नाहीं; परंतु त्यांच्याविषयींचें माझें कर्तव्य संपलें. त्यांचा संभाळ करण्याचें काम मी आपल्यावर संपवितें आणि माझा मृत भ्रतार जो उमेदसिंग उपाध्याय त्याच्या सेवेला मी सादर होतें. त्याच्याबरोबर मीं यापूर्वीं तीनदां सहगमन केलें आहे.'

"आपल्या संबंध आयुष्यांत तिनें आपल्या नवऱ्याचें नांव हें पाहिल्यांदाच उच्चारलें होतें; कारण हिंदुस्थानामध्यें उच्च किंवा खालच्या जातीची स्त्री आपल्या नवऱ्याचा नामोच्चार कधींही करीत नाहीं.

"मीं तिच्या स्वाभिमानाला व भीतीलाही चालना देण्याचा प्रयत्न केला. 'तूं जर सती गेलीस तर तुला या कार्यापासून परावृत्त न केल्याबद्दल तुझ्या घराण्याला सुटलेल्या जमिनी सरकार परत घेईल व तुझ्या पूर्वजांच्या येथें असलेल्या समाधीही मोडून सरकार जमीनदोस्त करील,' अशी तिला भीति घातली; पण ती हंसली व आपला हात पुढें करून म्हणाली, "माझी नाडी चालण्याची बंद पडली. थोड्याशा मातीशिवाय येथें माझें आतां कांहीं शिल्लक राहिलें नाहीं. मीं त्याची राख माझ्या नवऱ्याच्या देहाच्या राखेमध्यें मिसळूं इच्छितें. मला जाळलें तर मला त्याचा बिलकूल त्रास होणार नाहीं. तुम्हांला याचें प्रत्यंतर पाहावयाचेंच असेल तर थोडा विस्तव आणायला लावा. मी माझा हात जाळून टाकतें. मला त्यापासून बिलकूल वेदना होणार नाहींत." या बाईची नाडी मीं स्वतः पाहिली नाहीं; पण माझ्या लोकांपैकीं कांहींजणांनीं पाहिली. खरोखरच तिचें अस्तित्व जाणवत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. तिचा जीव वांचवण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, अशी माझी खात्री झाल्यावर मीं दुपारीं तिच्या सहगमनाला परवानगी दिली. तिला अतिशय आनंद झाला व तिनें माझे आभार मानिले. तिच्या नवऱ्याच्या चित्तेच्या खड्डयांत लांकडें व इतर ज्वालाग्राही पदार्थ रचण्यांत आले. आणि तिनें तीन वाजण्याच्या आंत स्नानविधि आटोपला. स्नान झाल्यावर तिनें तांबूलभक्षण केलें व एक हात आपल्या वडील मुलाच्या व दुसरा आपल्या पुतण्याच्या खांद्यावर ठेवून ती चितेच्या जागीं प्राप्त झाली. मीं खड्डयाजवळ पहारेकरी ठेवले होते व चितेच्या आसपास इतरांना फिरकण्याची बंदी केली होती. तिथें आल्याबरोबर प्रशांत व आनंदी मुद्रा करून व वर पाहून ती म्हणाली, 'या लोकांनीं मला माझ्या पतिराजापासून

पांच दिवस दूर कां बरें ठेविलें ? ' चितेला अग्नि लावण्यांत आला व क्षणार्धांत त्यानें पेट घेतला. त्या अग्नीमध्यें कांहीं प्रार्थना म्हणून तिनें फुलें टाकलीं. ती सावकाश त्या खड्डयाच्या कांठापर्यंत हळुहळू चालत गेली व त्या ज्वालांच्या मधोमध जाऊन मंचकावर बसल्यासारखी बसली. तिनें किंकाळी ठोकली नाहीं किंवा तिला वेदना झाल्याचें अन्य कोणतेंही चिन्ह दिसलें नाहीं. यावेळीं वाद्यांचा गजर करण्यांत आला; कारण सतीच्या वेदनेची किंकाळी कानीं पडणें अशुभ-कारक समजतात. स्वतःस जाळून घेतल्यानें परलोकांत आपल्या पतीशीं समागम होईल या एकाच दुर्निवार इच्छेमुळें तिनें या प्रकाराला तोंड दिलें. तिचा नवरा मंगळवारीं मरण पावला. बुधवार संध्याकाळपर्यंत तिनें तांबूलाशिवाय कांहीं भक्षण केलें नाहीं. पुढें तर तांबूल खाणेंही तिनें सोडून दिलें. मंगळवारपासून पाणी तर ती प्यालीच नाहीं. नेसलेलें लुगडें भिजवून तिनें ओल्या वस्त्रानिशीं अग्निप्रवेश केला. त्या विधवेला आपल्या निश्चयापासून परावृत्त करण्याची तिच्या घरच्या माणसांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, हें येथें मला प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. ती जर जिवंत राहाती तर तिच्या घरच्या माणसांनीं तिला आपल्या घराण्याचें भूषण म्हणून अत्यंत प्रेमानें व सन्मानानें वागविलें असतें; कारण वडील माणसांना अत्यंत प्रेमानें व सन्मानानें वागविणारे व त्यांच्या आज्ञा पाळणारे हिंदु लोकांसारखे लोक जगाच्या पाठीवर अन्यत्र सांपडणार नाहींत. आईपेक्षांही आजीला जास्त मान दिला जातो. सिंहासनाधिष्ठित अशा एकाद्या महाराणीपुढें तिचे प्रजाजन ज्या आदरानें जाणार नाहींत त्या आदरानें नदीच्या पात्रामध्यें एका खडकावर डोक्याला एक तांबडा फडका व अंगावर साधें वस्त्र लपेटून बसलेल्या या विधवा बाईकडे तिची घरची मंडळी जात होती. " ( There is no people in the world among whom parents are more loved, honoured and obeyed than among the Hindoos; and the grand-mother is always more honoured than the mother. No queen upon her throne could ever have been approached with more reverence by her subjects than was this old lady by all the members of her family as she sat upon a naked rock in the bed of the river, with only a rag upon her head and a single white sheet over her shoulders ).

## बायको सती गेली, पण नवरा जिवंत !

कर्नल स्लीमन यानें ऐकलेली आणखी एका सतीची गोष्ट मोठ्या मौजेची आहे. जबलपूरचा एक कोळी बनारसला दोन महिन्याकरितां म्हणून कांहीं कामानिमित्त गेला. पुढें सहा महिने झाले तरी त्याचा पत्ताच नाहीं असें पाहून

घरची मंडळी काळजींत पडली. शेवटीं एके रात्रीं त्याच्या बायकोला तो कोळी वाटेवर वारला असें स्वप्न पडलें. झालें. ती बाई सती जावयाला सिद्ध झाली. या निर्धारापासून तिला परावृत्त करण्याचा लोकांनीं पुष्कळ प्रयत्न केला; परंतु ती आपला हेका सोडीना. शेवटीं नवऱ्याच्या ऐवजीं त्याचें पागोटें उराशीं धरून ती बाई सती गेली आणि बरोबर दहा दिवसांनीं तिचा नवरा परत आला ! प्रत्यक्ष हा प्रकार डोळ्यांनीं पाहिलेल्या माणसाकडून स्लीमनला कळलेली ही गोष्ट आहे !

## पूर्व जन्मांतील पतीबरोबर सहगमन !

याच्याहीपेक्षां विलक्षण अशी सतीची आणखी एक गोष्ट सांगतों. कर्नल स्लीमनला ती मृताच्या धाकट्या भावानेंच कथन केली होती. ती अशी:—
" सेहोरा येथील धूली सुकल नांवाचा एक ब्राह्मण मरण पावला. त्याबरोबर तिकडून दोन मैलांच्या अंतरावर असलेल्या खिटोळी नांवाच्या गांवांतील लोधी ब्राह्मणेतर जातीची एका शेतकऱ्याची बायको त्याच्या घरीं आली व आपण त्या ब्राह्मणाबरोबर सहगमन करणार म्हणून हट्ट धरून बसली. तिचें म्हणणें असें होतें कीं, सदर ब्राह्मण त्या बाईचा मागील तीन जन्मांत नवरा होता व त्याच्याबरोबर तिनें तीन वेळां सहगमनही केलें होतें, आणि आतां चवथ्यांदां तिला सहगमन करावयाचें आहे. तिचें वय साठ वर्षांचें होतें व तिचा स्वतःचा नवराही पण जीवंत होता. त्यावेळीं लोकांनीं तिला सांगितलें कीं, यांत तिची कांहींतरी चूक होत आहे; कारण मृत हा ब्राह्मण आहे तर ती लोधी आहे. तेव्हां ब्राह्मणांचा ब्राह्मणेतर बाईशीं विवाह कसा होऊं शकेल ? त्याबरोबर ती बाई म्हणाली, " यांत चूकबिक कांहीं नाहीं. गेल्या जन्मांत मी माझ्या बंधुबरोबर पवित्र काशीक्षेत्रांत वास करीत होतें. तेव्हां एका अतिथीच्या अन्नांत मीं चुकीनें साखरेच्या जागीं मीठ घातलें. तेव्हां तो ब्राह्मण रागावला व " पुढच्या जन्मीं तूं आपल्या सध्यांच्या नवऱ्याला दुरावशील व खालच्या जातींत जन्म घेशील, असा मला शाप दिला; परंतु त्या जन्मांत जर तूं सदाचरणानें वागशील तर त्या पुढच्या जन्मीं तूं पूर्वपतीला जाऊन मिळशील, असेंही त्यानें सांगितलें." त्या लोधी बायकोचें हें बोलणें ऐकून लोक हंसलें व " बाई, तुला स्वप्न पडलें नाहीं ना ? " असें म्हणाले. त्या मृताला एक विधवा होती. तिला सहगमन करण्यापासून परावृत्त करण्यांत आलें होतें. ती म्हणाली, ' मला जर तुम्हीं सती जाऊं दिलें नाहीं तरी आणखी कोणीही माझ्या पतीबरोबर सहगमन करतां कामा नये. ' पुढें त्या ब्राह्मणाच्या प्रेताला अग्निसंस्कार करण्यांत आला. तेव्हां ती बाई चोरून हळूच येऊन त्या चितेंतील मूठभर राख घेऊन पळून आपल्या गांवीं गेली. तेथें आपला चालू नवरा व दीर यांना आपल्या पूर्वजन्मांतील नवऱ्याकडे जाण्याचा तिनें निर्धार सांगितला व

त्यांची अनुमतिही मिळविली. इंग्रजांचें राज्य त्यावेळीं प्रस्थापित झालें नव्हतें व तो भाग देशी राजाच्या ताब्यांत होता. त्या राजानें गांवांतील कोणीही माणसांनीं या बाईला सती जायला मदत करूं नये, असा हुकूम सोडला. त्याबरोबर ती बाई, तिचा नवरा व दीर या तिघांनींच मिळून लांकडें नदीच्या किनाऱ्यावर नेलीं व त्या लांकडांच्या ढिगाऱ्यावर ती बसली व त्याला तिच्या इहजन्मींच्या नवऱ्यानें व दिरानें अग्नि लावला. अशा प्रकारें ती बाई पूर्वजन्मांतील ब्राह्मणपतीच्या मूठभर राखेबरोबर सती गेली ! ”

## नागिणींचें मृत माणसाबरोबर सहगमन !

कर्नल स्लीमननें ही या लोधी बाईची गोष्ट जबलपूरच्या इंग्रजी कॉलेजचे आंग्लविद्याविभूषित प्रिन्सिपाल गुरुचरण बाबू यांना सांगितली व यासंबंधीं त्यांचें मत विचारलें. तेव्हां ती लोधी बाई त्या ब्राह्मणाची पूर्वजन्मांतील पत्नी असावी ही गोष्ट पुष्कळशी शक्य आहे, असें ते म्हणाले व त्यांनीं या मताच्या पुरस्कारार्थ जी आपल्या घराण्यांतील गोष्ट सांगितली, ती याहीपेक्षां अद्‌भुत आहे. ते म्हणाले,

“ माझ्या पणज्याला तीन बायका होत्या. तो ज्यावेळीं मरण पावला, त्यावेळीं त्या तिघीही त्याच्या शवाबरोबर सती गेल्या. त्यांची ही चिता जळत असतां एक नागीण येऊन त्या चितेवर चढली व त्या अग्नीबरोबर जळून गेली. दुसरी नागीण आली तीही तशीच जळून गेली. हजारों लोकांनीं हें दृश्य पाहिलें. या नागिणी त्या मृताच्या पूर्वजन्मांतील बायका होत्या. श्राद्धाच्या वेळीं तो मृत व त्याच्या तीन बायका यांबरोबर त्या नागिणींनाही पूर्वज म्हणून पिंड देण्यांत येऊं लागले. ”

## सक्तीचे प्रकार

स्वतःला जिवंतपणीं जाळून घेणें ही गोष्ट सोपी नाहीं. प्रत्येक विधवेला असें धैर्य असे, असें म्हणणें कठीण आहे. जुन्या काळीं कांहीं विधवांना इच्छेविरुद्ध व बळजबरीनेंही हिंदु राज्यांत सहगमन करावें लागलें असणें पुष्कळच शक्य आहे. डॉ फ्रांसो बेर्नियें–ज्याचा निर्देश मागें आला आहे—तो लिहितो, “ लाहोरला एका अत्यंत सुस्वरूप विधवेला बळी देतांना मीं पाहिली. तिचें वय बारा वर्षांपेक्षां जास्त होतें असें मला वाटत नाहीं. जेव्हां ती त्या भयंकर खड्ड्याजवळ आली, त्यावेळीं ती गरीब बिचारी पोर मेल्यासारखीच दिसत होती. तिच्या त्यावेळच्या मनोवेदनांचें वर्णन करणें अशक्य आहे. ती थरथरां कांपत होती व ओक्साबोक्सीं रडत होती; परंतु तीनचार ब्राह्मणांनीं तिला एका वृद्धेचा मदतीनें त्या ठिकाणीं

आणून बळजबरीनें चितेवर बसविली व पळतां येऊं नये म्हणून तिचे हातपाय बांधून टाकले. अशा प्रकारें त्या निष्पाप बालिकेला त्यांनीं जाळून टाकलें. ” उपरिनिर्दिष्ट थोमस बावरे यांनेंही असे तीन प्रसंग वर्णन केले आहेत. त्यांपैकीं एक असा :–“ हुगळीपासून सहा मैलांच्या अंतरावर आणखी एक सती मीं पाहिली. हा प्रसंग मात्र आतांपर्यंत पाहिलेल्या प्रसंगांपेक्षां मला आनंददायक वाटला. या बाईनें सती जाण्यास बिलकूल हरकत घेतली नाहीं; कारण अशा प्रतिकाराचा कांहीं उपयोग होणार नाहीं, हें तिला माहीत होतें. स्वतःची मुळींच इच्छा नसतांही, प्राप्त प्रसंगाला तोंड देण्याकरितां ती; मोठ्या धैर्यानें व शांतपणें त्या पेटलेल्या चितेजवळ उभी होती. ब्राह्मणांच्या आज्ञेनुसार तो अग्नि विशेष जोमानें पेटविण्यांत आला. तरीही ती बाई शांत व अविचल होती, हें पाहून त्या ब्राह्मणांना फार आनंद झाला; परंतु त्यांच्या अपेक्षेप्रमाणें ज्यावेळीं तिनें विस्तवामध्यें उडी घालावयाची त्यावेळीं तिनें सहगमन करण्याचें साफ नाकारलें. त्याबरोबर त्या ब्राह्मणांना भयंकर राग येऊन तिला ते पकडूं लागले. इतक्यांत ज्या ब्राह्मणानें तिच्या अंगावर प्रथम हात घातला त्याला घट्ट धरून त्याच्या समवेत तिनें अग्नीमध्यें उडी घेतली. अशा प्रकारें दुसऱ्याकरितां खणलेल्या खड्डयांत या राक्षसी ब्राह्मणां-पैकीं एक स्वतःच नाश पावला. ”

या गोष्टी हिंदू राज्यांत घडल्या असल्या पाहिजेत. मुसलमान व इंग्लिश यांच्या अंमलाखालीं असलेल्या प्रदेशांत सती जाण्याच्या मार्गांत किती प्रचंड अडथळे निर्माण केले जात, याचें अनेक युरोपियन लोकांनीं केलेलें तपशीलवार वर्णन वर आलेंच आहे. असें असतांही परकीय अमलाखालीं ज्या बाया सती जात त्या स्वेच्छेनेंच जात असत, हें उघड आहे. १८१५ ते १८२८ या चवदा वर्षांच्या काळांत किती स्त्रिया सती गेल्या, याचे आंकडे इंग्रज सरकारनें गोळा केले होते ते पुढीलप्रमाणें :—कलकत्ता विभाग ( ५०९९ ), डाक्काविभाग ( ६१० ), मुर्शिदाबाद ( २६० ), पाटणा ( ७०९ ), बरेली ( १९३ ), बनारस ( ११६५ ). बंगालमधील सहगमनाचे चवदा वर्षांचे आंकडे :—१८१५ ( ३७८ ), १८१६ ( ४४२ ), १८१७ ( ७०७ ), १८१८ ( ८३९ ), १८१९ ( ६५० ), १८२० ( ५९८ ), १८२१ ( ६५४ ), १८२२ ( ५८३ ), १८२३ ( ५७५ ), १८२४ ( ५७२ ), १८२५ ( ६३९ ), १८२६ ( ५१८ ), १८२७ ( ५१७ ), व १८२८ ( ४६३ ). या आत्मसमर्पणाला काय म्हणावें ? धार्मिक अधर्म कीं त्यागाचा कळस ?

रत्नदीप--दिवाळी अंक १९५९

○ ○ ○

१६

## महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र

एका गुर्जर कवीनें 'ज्यां ज्यां वसे एक गुजराती त्यां त्यां सदाकाळ गुजरात,' असे आपल्या काव्यांत उद्गार काढले आहेत. श्रीयुत मुनशींप्रमाणेंच मलाही ते 'वास्तविक अने व्यावहारिक सत्य छे,' असे वाटतात; परंतु त्याचबरोबर जेथें जेथें एक बंगाली वास्तव्य करतो, तोही सदाकाळ बंगाल, हें तितकेंच वास्तविक आणि व्यावहारिक सत्य आहे, असें मीं समजतों. मात्र याचा अर्थ असा नव्हे कीं उद्यां एकाद्या बंगाली बाबूला, ९९ गुर्जर लोकवस्ती असलेल्या एकाद्या गांवांत जाऊन तो सगळाच गांव बंगाल आहे, असा हक्क सांगतां येईल! एक टक्का बंगाल तर ९९ टक्के तो भाग गुजरात ठरेल, आणि बहुसंख्य लोकांचा त्या भागावर स्वाभाविकच जास्त हक्क राहील. माझें तें माझें आणि तुझें तेंही माझें, ही वृत्ति अन्यायाची होईल. जुन्या काळीं कोणत्याही प्रदेशांच्या सीमा, संज्ञा व स्वरूप हें तेथील राजकीय सत्तेवर अवलंबून असे; परंतु भारत हा सांप्रत एकाच राजकीय शासनाखालीं असल्यामुळें आज कर्नाटक, गुजरात किंवा महाराष्ट्र हे प्रांतिक भेद राजकीय दृष्ट्या करतां येणें अशक्य आहे. बडोद्यांत एकेकाळीं महाराष्ट्रीयांचें राज्य होतें, म्हणून तो महाराष्ट्र, किंवा इंदूर-ग्वाल्हेरांत मागें मराठे राज्य करीत होते म्हणून तो महाराष्ट्र, असा हक्क सांगणें आज फुकट आहे. भाषावार प्रांतरचना करावयाची म्हटलें म्हणजे बहुसख्यांक भाषिकांच्या नांवावर तो तो प्रदेश मोडेल व अल्पसंख्यांक भाषिकांना आपली भाषा किंवा संस्कृति सुरक्षित राखण्याचें तेथें स्वातंत्र्य असेल. कोणताही भूप्रदेश घेतला, तरी शंभर टक्के एकच भाषा बोलणारे लोक तेथें असतील, असें होणें अशक्यच आहे. त्या प्रदेशाच्या राजकीय, शैक्षणिक औद्योगिक किंवा व्यापारविषयक महत्त्वाप्रमाणेंच त्या भागांत अन्यभाषिकांची कमीजास्त प्रमाणावर गर्दी ही होणारच.

वरील सर्व गोष्टी लक्षांत घेतल्या म्हणजे आजच्या महाराष्ट्र देशाची व्याप्ति किंवा व्याख्या बहुसंख्य मराठी बोलणाऱ्या लोकांचा सलग प्रांत, अशी करतां येण्यासारखी आहे; परंतु निरनिराळ्या कारणांमुळें ह्या प्रांताबाहेर जेथें मराठी भाषिक असतील, तोही प्रांत या लेखाच्या आरंभींच म्हटल्याप्रमाणें त्या त्या प्रमाणानें महाराष्ट्रच आहे. या महाराष्ट्राला '**महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र**' असें

वर दिसण्यांत खोटें, पण वस्तुतः खरें असें Paradoxical नांव द्यावयास हरकत नाहीं. एकाद्या समाजांतील लोक स्वतःची जन्मभूमि सोडून अन्य मुलुखामध्यें जाण्याच्या मुळाशीं अनेक कारणें असूं शकतात. विद्यार्जन, राजकीय मुलुखगिरी, व्यापारउद्योग, दुष्काळ किंवा धार्मिक छळ, अशीं कांहीं कारणें सांगतां येतील.

यांपैकीं व्यापार–उद्योगाच्या निमित्तानें किती महाराष्ट्रीय बाहेर गेले, हें सांगण्यासारखा निश्चित पुरावा मजपुढें नाहीं; तरी इतर जीं कांहीं कारणें वर नमूद केलीं आहेत, त्यांमुळें पुष्कळ महाराष्ट्रीय मूळ महाराष्ट्राबाहेर गेले असें म्हणतां येण्यासारखें आहे. वाणीज्य हे महाराष्ट्रीयांचें वैशिष्ट्य नाहीं. विद्या व पराक्रम हेच त्यांचे विशेष होत. आज ज्याप्रमाणें मुंबई, दिल्ली, पुणें, कलकत्ता, मद्रास अशांसारख्या शहरीं पुष्कळ बुद्धिमान लोक विद्यासंपादनाकरितां किंवा आपल्या पांडित्याला योग्य अवसर मिळावा म्हणून गोळा होतात, त्याप्रमाणें प्राचीनकाळीं बुद्धिमान लोक काशी, उज्जयिनी, कांची, रामेश्वर अशा स्थानीं वास्तव्य करून राहत.

हिंदुस्थानांतील शिक्षणासंबधीं ले. टी. बी. जर्विस यांनीं ता. ८ सप्टेंबर १८२४ तारखेचा एक वृत्तांत मुंबई सरकारला सादर केला होता. त्यांत दक्षिण कोंकणासंबधीं तो लिहितो,

"This country has been always famed for the eminent statesmen, expounders of law, religion and science which it has furnished to all India. It is probable that at least a tenth part of the Brahmins, who attain to manhood, visit Benares; and it is there, that the most learned Shastree acquires the rudiments of the Sungskrit. .... There are about 250 houses of Concan Brahmins at Benares and there are various Schools in that City for the instruction of Hindoo in Sunsgkrit which are under Teachers of this country".

दक्षिण कोंकण म्हणजे केवळ सध्याचा कुलाबा जिल्हा किंवा फार तर रत्नागिरी–राजापूर हा भाग, ले. जर्विसच्या दृष्टीपुढें असावा. त्याच्याही खालच्या कोंकणांतील लोक काशीमध्यें त्या काळीं प्रसिद्ध होते, हे अमरकोशाचे प्रसिद्ध टीकाकार महेश्वरशास्त्री सुखटणकर यांच्यासारख्या गोमंतकांतील पंडितांच्या उदाहरणावरून दिसून येतें. याशिवाय पैठण वगैरे देशावरील कितीतरी महाराष्ट्रीय ब्राह्मण घराणीं काशी किंवा दक्षिणेकडील धर्मस्थानांत त्या काळीं वास्तव्य करून राहिलीं असावीं. 'महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र' या ठिकाणीं फार मोठा असावा. या निरनिराळ्या धर्मस्थानांतील जुन्या घराण्यांची महाराष्ट्रीय परंपरेची नोंद अवश्य करून ठेवण्या सारखी आहे.

विद्येप्रमाणें पराक्रम हें महाराष्ट्राचें एक वैशिष्ट्य होय, असें वर सांगितलें; त्यामुळें महाराष्ट्रीयांच्या राजकीय सत्तेच्या विस्ताराबरोबर महाराष्ट्रीय लोक महाराष्ट्राबाहेर पसरले आणि उत्तरेकडे आणि दक्षिणेकडे ठिकठिकाणीं 'महाराष्ट्र बाहेरचा महाराष्ट्र' निर्माण झाला. उत्तरेकडे ग्वाल्हेर, इंदूर, बडोदें वगैरे ठिकाणीं आज महाराष्ट्रीय घराणीं महाराष्ट्रीय राजसत्तेबरोबर किंवा नंतर तिकडे गेलेलीं स्थायिक होऊन राहिलीं आहेत. उत्तरेकडील ही मराठी राजकीय सत्ता उशिरां गेलेली व तिचा लोपही आपल्या डोळ्यांदेखतंच झालेला असल्यामुळें या उत्तरेकडील महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रसंबंधीं या ठिकाणीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं; परंतु दक्षिणेकडे मराठी सत्ता फार जुन्या काळीं गेली आणि ती नष्ट होऊनही फार काल लोटला असल्यामुळें या दक्षिणेकडील "महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रा" संबंधीं आपणांस असावी तितकी (किंवा मुळींच) माहिती नाहीं, असें म्हटल्यास चालेल.

दक्षिणेचा आणि महाराष्ट्रीयांचा राजकीय संबंध फार जुन्या काळचा म्हणजे विजयानगरच्या हिंदु साम्राज्यापर्यंतचा तरी आहे. १५४४ च्या एका सदाशिवरायाच्या ताम्रपटामध्यें 'सिंहासनसमुद्रासिमे' येथील व्हायसराय श्रीमान महामंडलेश्वर श्री. मराठेय विठ्ठलेश्वर–देव–महा–आरसु हा होता, त्याची सत्ता बंगलोरपर्यंत पसरली होती आणि त्या ठिकाणीं त्याचा 'कार्यकर्ता' नांवाचा प्रतिनिधि राहत असे, असें नमूद आहे. पुढें १५६५ मध्यें विजयानगर साम्राज्य नष्ट झाल्यावर मुसलमानाच्या सत्तेखालीं शाहजी, मादाजी, वेदोजी, अनंतोजी, आणि बाळाजी हैबतराव अशा मराठे सरदारांचीं नांवें चमकतांना दिसतात. बंगलोरमध्यें मराठ्यांच्या सत्तेची मुहुर्तमेढ शाहाजी भोंसले यांनीं रोवली, हें तर स्पष्टच आहे. १६७५ मध्यें तंजावर नायक घराण्यापासून जिंकीपर्यंत बंगलोर हें येकोजीचें वास्तव्यस्थान होतें. पुढें तंजावर ही आपली राजधानी करून तिकडूनच तो बंगलोरच्या जहागिरीची व्यवस्था पाहू लागला. बंगलूर, तंजावर याप्रमाणेंच जिंजी, वेलोर हें मराठ्यांचे बालेकिल्ले बनले होते. मराठी सत्ता या भागांत असतांना पंडित, कीर्तनकार, गवई, लढवय्ये अशा अनेक महाराष्ट्रीयांना तिकडे आश्रय होता. रघुनाथपंडित, आनंदतनय, माधव, गोसावीनंदन, भगवद्गीतेवर मराठी टीका लिहिणारा हुसेनांबरखान असे कितीतरी मराठी कवि या दक्षिणेकडील 'महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रांत' होऊन गेले. स्वतः तंजावरच्या राजाचेही कांहीं ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांपैकीं शाहजी व प्रतापसिंह हे नाटककार होते. राजा प्रतापसिंहांनीं प्रबोधचंद्रोदय, पार्वतीकल्याण, मित्रविंदापरिणय वगैरे नाटकें लिहिलीं. राजा सरफोजी याच्या त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या व देवेंद्र कोवंजी असे तंजावरच्या रस्वतीमहाल ग्रंथालयामधील कांहीं निवडक ग्रंथ मद्रास सरकारनें अलिकडे छापून

प्रसिद्ध केले आहेत. सरकारनें प्रसिद्ध केलेल्या बृहदीश्वर देवालयाजवळ असलेल्या मराठी शिलालेखाचींच डेमी आकाराचीं पृष्ठें एकशें दहा भरतात ! असो.

मराठ्यांची दक्षिणेकडील राजकीय सत्ता शिवाजीच्या निधनानंतर कमी होत चालली. चिक्कदेवराज वोडेयार हा प्रबल होत चालला आणि बंगलोरच्या जहागिरीचा कारभार तंजावरहून चालविणें कठीण होऊं लागल्यामुळें १६८७ मध्यें येकोजीनें ती त्याला तीन लाख रुपयांना विकून टाकली. म्हैसूर राज्यांच्या पदरींही कांहीं महाराष्ट्रीय वेळोवेळीं मोठ्या अधिकारावर होते. हैदर व टिपू यांना यशस्वी विरोध करण्यांत म्हैसूर राज्यांना मदत करणारा दुसऱ्या कृष्णराजाचा विश्वासु सेनापति खंडेराव, तिसऱ्या कृष्णराजाचा सेनापति विष्ठोपंत बदामी, अशीं कांहीं नांवें सांगतां येतील. १८१८ सालीं पेशव्यांची सत्ता नष्ट झाल्यावर त्यांच्यावर अवलंबून असलेलीं बरींच महाराष्ट्रीय घराणीं म्हैसूरच्या आश्रयाला गेलीं व त्यांच्या बुद्धिमत्तेचा तेथील राजकर्त्यांनीं चांगला उपयोग करून घेतला. यासंबंधीं बंगळूर येथील रावसाहेब सी. हयवदन राव लिहितात,

" The continued effect of the influence wielded by these Mahratta families in the state has been the spread of Marathi language as the language of the administration at one time and the spread of Mahratta culture which made active service for the good of the state its primary duty; whether in the higher administrative or military walks of life, the Mahrattas have always distinguished themselves by their zeal, hard work and infinite capacity for taking pains in the interests of common good. Politically they have been in the forefront, their sagacity, alertness and adaptability being well known".

१९३७ सालीं प्रसिद्ध झालेल्या या लेखांत त्यांनीं आणखी माहिती दिली आहे ती अशी : सध्यां म्हैसूर संस्थानांत ५३,००० मराठ्यांची वसती आहे. याशिवाय महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत ते निराळे. संस्थानांतील आठही जिल्ह्यांत मराठे पसरले आहेत; पण शिमोगा, कोलार आणि बंगलोर या जिल्ह्यांमध्येंच त्यांचें विशेष वास्तव्य आहे. यांपैकी ५०,००० लोक मराठी भाषा बोलतात. कांहीं घराण्यांनीं भोंवतालच्या स्थानिक दडपणामुळें कानडी भाषा स्वीकारलेली आहे. भारतीय लष्कराचा एक भाग असलेल्या म्हैसुरच्या सैन्यांत या मराठ्यांची पुष्कळ भरती होते. लष्करी वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्येंही जुन्या काळीं म्हैसूरांत पराक्रम गाजविणाऱ्या मराठ्यांचे वंशज असे पुष्कळ महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. हें म्हैसूर संस्थानांतील महाराष्ट्रसंबंधीं झालें. तंजावरमध्यें गेल्या शतकाच्या

मध्यापर्यंत महाराष्ट्रीय सत्ता होती. सरफोजीचा पुत्र शिवाजी १८५५ सालीं पुरुषसंतान मागें न ठेवितां निधन पावल्यामुळें हें संस्थान खालसा होऊन इंग्रजी राज्यांत समाविष्ट करण्यांत आलें.

एकाद्या भागांतील राजकीय सत्ता नष्ट झाली, तरी तेथील जुनी राजभाषा नष्ट होत नाहीं, ही गोष्ट हिंदुस्थानांतील इंग्रजी भाषेवरूनही आज आपणांस दिसून येते. राजाश्रय नसल्यामुळें पोरकी झालेल्या मराठी भाषेचें दक्षिणेंतील महाराष्ट्रीयांनीं प्रेमळ माउलीप्रमाणें प्रेमानें संरक्षण केलें व सध्यांही ते करीत आहेत. १९०९ सालीं झालेल्या बडोदें येथील साहित्यसंमेलनांत दिवाण बहादूर व्ही. पी. माधवराव म्हणाले,

"It it not Maharashtra proper alone which is interested in the cultivation of the Mahratta language. Mahratti was the court language in the small Kingdom of Tanjore up to the middle of the last century. His Highness the penultimate Maharaja of Mysore, who died in 1868 was an accomplished Mahratti scholar and many of his Nirups are in Mahratti. In some of the British districts in the Madras Presidency and even in the Board of Revenue, if I am not mistaken, there was a Mahratti Dufter up to the middle of the last century. In Travancore also, the southernmost state in India, the Mahratti Language was introduced in the court of one of the Maharajas and the late and penultimate Maharajas were good Mahratta scholars. *A knowledge of Mahratti upto a very recent date was a mark of culture and refinement.*"

राज्याची भाषा परभाषिक असलेल्या महाराष्ट्रीयांनीं शिकावी, हे स्वाभाविक आहे; परंतु स्वतः राज्यकर्त्यांना व तिकडील परभाषिक लोकांना मराठी भाषेचें ज्ञान हें सुसंस्कृतपणाचेंच एक लक्षण आहे, असें वाटण्यास लावावें, यावरून 'महाराष्ट्राबाहेरच्या या महाराष्ट्रा'ची प्रखर तेजस्विता आपणांस कळून येते. तरीपण इतर महाराष्ट्रीयांपासून अलग झालेल्या आणि परभाषिकांमध्यें सांपडलेल्या कांहीं एकलकोंड्या महाराष्ट्रीय घराण्यांनीं स्वतःच्या मराठीचा त्याग करून स्थानिक भाषेचा स्वीकार करणें, हेंही तितकेंच स्वाभाविक आहे. अशा कांहीं घराण्यांचा उल्लेख रावसाहेब हयवदनराव यांच्या वर उद्धृत केलेल्या उताऱ्यांत आलाच आहे. त्या काळीं अशीं पुष्कळ कानडी घराणीं महाराष्ट्रांत येऊन महाराष्ट्रीय बनल्याचेंही दाखवितात.

अशाच प्रकारें कांहीं महाराष्ट्रीय सुरतेंत जाऊन गुजराती झाल्याचें दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या आत्मचरित्रांत लिहून ठेविलें आहे. ते लिहितातः " येथें इंग्रजी झाली तेव्हांपासून या शहरांत मुंबईचे कांहीं प्रभु वस्ती करून राहिले आहेत. पूर्वीं ते त्या वेळेच्या इंग्रजी अमलांत बरेच अधिकारी होते व त्यांनीं बराच पैका गोळा केला होता. त्यांचीं मी गेलों तेव्हां सुरतेंत दहाबारा घरें होतीं व त्यांची येथें जन्मभाषा बदलून गुजराती भाषा झाली आहे. घरीं बायकापोरांसुद्धां गुजरातींत बोलतात. कित्येकांस तर मराठी येतच नाहीं. कित्येकांनीं तर महाराजाची कंठीसुद्धां बांधली आहे...यांचा मुंबईच्या परभांशीं संबंधव्यवहार असतो. "

याच्या उलट कांहीं गुजराती कुटुंबें महाराष्ट्रांत येऊन पूर्णपणें महाराष्ट्रीयांत मिसळून गेलेलीं कुलाबा जिल्हा व इतर ठिकाणीं आहेत, असें दाखविण्यांत येतें.

मराठ्यांची राजसत्ता नष्ट होऊन त्यांचा आश्रय नाहींसा झाल्यामुळें तंजावर, बंगलोर वगैरे भागांतील पुष्कळ महाराष्ट्रीय कुटुंबें उदरनिर्वाहाच्या निमित्तानें ठिकठिकाणीं गेलीं. अशा महाराष्ट्रीयांची बरीच मोठी वस्ती मद्रास शहरांत आहे. आपली महाराष्ट्रीय संस्कृति व मराठी भाषा यांचें संरक्षण करण्यासंबंधीं त्यांनीं केलेले प्रयत्न पाहून या महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रीयासंबंधीं अत्यंत आदर वाटूं लागतो, आणि त्याचबरोबर आपणांस या आपल्या महाराष्ट्रीयांची मुळींच माहिती नसावी, याबद्दल लज्जा व खेद यांनीं अन्तःकरण भरून येतें.

अशा कांहीं प्रयत्नांची उपलब्ध असलेली कांहीं माहिती खालीं देतोंः— १८८३ सालीं मद्रासमध्यें महाराष्ट्र भाषा व संस्कृति यांच्या रक्षणाकरितां ' दि मद्रास मराठा असोसिएशन ' नांवाची एक संस्था स्थापन झाली. तिचें कार्य १८८८ पासून विशेष जोरानें सुरू झालें. या संस्थेचे आश्रयदाते अरणीचे जहागीरदार ए. ए. श्रीनिवासरावसाहेब, राजा सर टी. माधवराव, आणि अध्यक्ष दिवाणबहाद्दर आर्. रघुनाथ राव हे होते.

त्यांनीं खालील उपायांनीं मराठी भाषेला उत्तेजन देण्याचें ठरविलें:

( १ ) मराठी भाषेच्या विकासाकरितां वादविवादसभा घडवून आणणें.

( २ ) ग्रंथसंग्रहालय व वाचनालय उघडणें.

( ३ ) व्याख्यानें देणें.

( ४ ) मराठी मातृभाषा घेऊन युनिव्हर्सिटीच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां शाळा उघडणें.

या संस्थेची एक महत्त्वाची कामगिरी म्हणजे मद्रास युनिव्हर्सिटीच्या शिक्षणक्रमांत मॅट्रिकपासून एम्. ए. पर्यंत झालेला मराठी भाषेचा अन्तर्भाव होय. याविषयीं श्री. इ. विनायकराव हे लिहितात,

" They were able to persuade the University of Madras to include Marathi as a subject for examination from the Matriculation to the M. A. Degree Examination. *Be it noted that at that time such a recognition had not been accorded to Marathi even by the Bombay University.* "

या संस्थेमार्फत त्रिप्लिकेन येथें एक मिडल स्कूल स्थापन करण्यांत आलें. या शाळेंत सर्व शिक्षण मराठी भाषेंतूनच देण्यांत येत असे. येथेंच एक ग्रंथालयही उघडलें होतें व व्याख्यानें किंवा वादविवादसभाही याच जागीं भरत.

ता. २६ फेब्रुवारी १८८८ रोजीं या संस्थेच्या सभासदांनीं त्रावणकोरच्या महाराजांना मानपत्र अर्पण केलें, त्या वेळीं उत्तरादाखल केलेल्या भाषणांत महाराज म्हणाले :

" As I said at Tanjore, the southern home of the Mahrarttas, the state of Travancore is much indebted to you- intellectual race for some of the best Dewans * who have administered its affairs and to none more than to the distinguished politician, Sir Madhao Rao, who came into Travancore a scholar and left it a statesman of renown, to carry into the service of two Sovereigns successively to his own race, the benefit of the knowledge and experience he had acquired in the land of the Perumals. . A nation with a history like yours, which can in the present day, produce such remarkable men as Rajah Sir T. Madhao Rao, Dewan

* दक्षिणेंत जे महाराष्ट्रीय दिवाण झाले, त्यांचीं उपलब्ध झालेलीं नांवें, ते कोठें दिवाण झाले एतद्विषयक माहितीसह पुढें देतों :—

१ राय राया वेंकट राव ( त्रावणकोर ), २ दिवाण टी. रामा राव ( त्रावणकोर ), ३ दिवाण रेड्डी राव ( त्रावणकोर ), ४ दिवाण सुब्बाराव ( त्रावणकोर ), ५ राजा सर टी. माधव राव ( त्रावणकोर, इंदूर, बडोदें ), ६ दिवाणबहाद्दर आर. रघुनाथ राव ( इंदूर ), ७ दिवाण व्ही. पी. माधव राव ( त्रावणकोर, म्हैसूर, बडोदें ), ८ प्रधानशिरोमणि टी. आनंदराव ( म्हैसूर ), ९ दिवाणबहाद्दर के. कृष्णस्वामी राव ( त्रावणकोर ). न्यायाधीश, प्रोफेसर्स, वकील, इंजिनियर, संशोधक, पोलिस अधिकारी, अशा इतर विविध क्षेत्रांतही दक्षिणेकडील महाराष्ट्रीयांनीं मानाच्या जागा मिळविलेल्या दिसतात.

Bahadur Ragunatha Rao and others, whom I have lately met in Tanjore and Poona need have no fear of being beaten in the race for a position, in the front ranks of civilisation, which is vigorously being run all over India".

'आरंभशूरा : खलु दाक्षिणात्या :' या नियमास अनुसरून ही संस्था मागें पडली व 'दि सौथ इंडियन मराठा ब्राह्मणसभा, मद्रास' ही नवी संस्था अस्तित्वांत आली. "The development and preservation of the Marathi language and culture and its usages and tradition" हें या संस्थेचें उद्दिष्ट होतें. आणखीही एक संस्था 'महाराष्ट्रसभा' या नांवानें त्रिप्लिकेनच्या आसपास राहणाऱ्या महाराष्ट्रीयांनीं ता. १८–१०–१९०४ रोजीं दसऱ्याच्या सुमुहूर्तावर स्थापन केली. या सभेचें उद्दिष्ट "bringing together the scattered members of the Marathi speaking community and to encourage the study of Marathi language and literature," असें होतें. संस्थेचें एक मराठी ग्रंथालय होतें. 'केसरी' पत्र तिकडे येत असे. मधूनमधून या संस्थेंत मराठी कथा–कीर्तनें होत. शिवाजी-उत्सवही दरवर्षीं साजरा करण्यांत येत असे. १९०८ सालीं भारतीय सभा मद्रासमध्यें भरली, त्या वेळीं दिवाणबहादूर के. कृष्णस्वामी राव हे त्रावणकोरचे महाराष्ट्रीय दिवाण स्वागताध्यक्ष होते. या वेळीं नामदार गोपाळ कृष्ण गोखले तेथें राष्ट्रीय सभेकरितां गेले असतां या संस्थेनें त्यांना निमंत्रण करून त्यांचा सत्कार केला होता. ही संस्था पांच वर्षें चालली.

१९०७ सालीं कुंभकोणमला 'मराठी मंडळी' नांवाची एक संस्था स्थापन झाली. "To encourage the study of Marathi and to arrange for meetings and debates for the benefit of the young men of the community," हें या संस्थेचें ध्येय होतें. दिवाण-बहादूर रघुनाथ राव या संस्थेचे अध्यक्ष होते. हीही संस्था अल्पायुषी ठरून १९०९ सालीं बंद पडली.

या ज्या संस्था अल्पायुषी ठरल्या याचें कारण सर्वसाधारण लोकांची आर्थिक अस्वस्थता हेंच दिसून येईल. पेशव्यांचें राज्य बुडाल्यावर विद्याव्यासंगी लोकांची जी स्थिति मूळ महाराष्ट्रांत झाली, तीच स्थिति दक्षिणेकडील "महाराष्ट्रा-बाहेरच्या महाराष्ट्रांतील" मराठ्यांची सत्ता संपुष्टांत आल्यावर झाली. दक्षिणे-कडील या महाराष्ट्रीयांसंबंधीं लिहितांना सर ए. शेषय्या शास्त्री म्हणतात: "they are not rich, they cannot beg, they cannot starve, they must live." आजच्या जीवनार्थ धडपडींमध्यें टिकाव धरावयाचा

असेल, तर द्रव्यार्जनाचें एक साधन जें विद्यार्जन त्याचे मार्ग या समाजांतील तरुणांना मोकळे झाले पाहिजेत, ही गोष्ट श्रीयुत इ. विनायक रावांनीं अचूक ओळखली आणि त्याप्रमाणें ( १ ) समाजामध्यें शिक्षणप्रसार करणें, ( २ ) स्त्रीपुरुषांमध्यें नव्या सहकारी तत्त्वांचा व काटकसरीच्या कल्पनांचा फैलाव करणें, ( ३ ) समाजामधील निरनिराळे लोक एकत्र येऊन त्यामध्यें दळणवळण वाढण्याकरितां मराठी मध्यें कीर्तनें व भजनें घडवून आणणें आणि ( ४ ) वाचनालयें व ग्रंथालयें उघडणें आणि सरकारमान्य शाळेमध्यें मराठी शिक्षणाची सोय करणें, या गोष्टींकरितां एक स्वतंत्र नवी संस्था स्थापन करावी, असें ठरलें. त्याप्रमाणें ता. १५ सप्टेंबर १९१२ रोजीं मद्रासमधील प्रमुख महाराष्ट्रीयांची सभा भरून 'मराठा एज्युकेशन फंड' नांवाची नवी संस्था स्थापन करण्यांत आली. या संस्थेचे पहिले अध्यक्ष, त्रावणकोरचे दिवाण, दिवाणबहादूर के. कृष्णस्वामी राव हे होते. या संस्थेचें उद्दिष्ट पुढीलप्रमाणें आहे :

" The object of the Fund shall be to afford facilities for the education of Maharatta youths in the Madras Presidency and the province of Mysore by meeting their college and school fees and if funds permit by arranging for their boarding and lodging. "

१९१२ सालीं स्थापन झालेल्या या संस्थेनें १९३७ सालीं आपला रौप्यमहोत्सव मोठ्या थाटानें साजरा केला. अद्यापिही ही संस्था उत्तम प्रकारें चालली असून Mowbray's, Teynampet ( Madras ) या ठिकाणीं महाराष्ट्रनिवास या नांवाची इमारतदेखील चालकांनीं उभारली आहे. संस्थेच्या या यशाचे पुष्कळसें श्रेय सतत २५ वर्षें ज्यांनीं ऑनररी सेक्रेटरी म्हणून कार्य केलें त्या ई. विनायक राव यांना द्यावें लागेल. या संस्थेच्या उद्दिष्टांत मराठी भाषेला जितकें महत्त्व द्यावयाला पाहिजे तितकें न दिलें गेल्यामुळें कांहीं सभासदांनीं असंतुष्ट होऊन आरंभीं कशी चळवळ केली, त्यासंबंधीं उपरिनिर्दिष्ट विनायक राव लिहितात,

"Those who wished to give primary importance to the development of Marathi among the objects of the Fund began to press forward their proposal insistenty. I suggested that a separate association may, if necessary be formed with the sole object of encouraging the study of Marathi... My suggestion was accepted and a separate institute was started under the name " Marathi Sangh " at Triplicane... During its short existence of about a couple of years, it did useful

work in arranging for periodical meetings and debates where the proceedings were mostly in Marathi. After the Marathi Sangh ceased to function, with the idea of doing something exclusively for the promotion of Marathi, an association called the "Marathi Library Association" was formed. Those connected with it thought of running a free Marathi Girls School at Triplicane, teaching only English and Marathi. The name of the association was therefore changed to "The Marathi Girls' Schools Association',. After some months even that name was dropped and the name "Maharashtra Association, Triplicane," was adopted."

अशा प्रकारें थोडक्यांत हा दक्षिणेकडील महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रांतील, महाराष्ट्र भाषा व संस्कृति यांचें रक्षण करण्याच्या धडपडीचा इतिहास आहे. महाराष्ट्रनिधि लिमिटेड, नांवाची बँकही तेथें उभारण्यांत आली होती; पण ती पुढें बंद पडली. मराठा एज्युकेशन फंड हीच एक संस्था सध्यां जोरांत चालली आहे. तिचा मुख्य उद्देश मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मद्रास व म्हैसूर विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षण घेण्यास स्कॉलर्शिपा देणें आणि औद्योगिक व व्यापारी शिक्षण घेणाऱ्या व परदेशांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणें हा आहे. मराठी शिक्षणाला मदत करणें, मराठी वाचनालयें स्थापणें, मराठी भाषा घेऊन परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणें आणि मराठी भाषिकांना एकत्र आणण्याकरितां व्याख्यानें, हरिकथा, भजन, कीर्तनें वगैरे प्रसंग घडवून आणणें, हाही एक या संस्थेचा दुसरा महत्त्वाचा उद्देश आहे. ( The next important object of the Fund to promote the study of Marathi and preserve the language in South India ). या संस्थेचे अलीकडील कांहीं अहवाल मीं मुद्दाम तिकडून मागवून आणले, व वाचून पाहिले; परंतु या दुसऱ्या महत्त्वाच्या उद्देशाकडे चालकांचें अलीकडे पूर्वींच्या लोकांसारखें लक्ष आहे, असें मला वाटलें नाहीं. मराठी भाषेचा तिकडील जुना अभिमान मंदावत चालला आहे, अशी मला शंका येते. तो पुनः वाढण्यास महाराष्ट्रांतील महाराष्ट्राशीं त्यांचा जास्त संबंध व दळणवळण राहणें अवश्य आहे.

मद्रास प्रांतामध्यें महाराष्ट्रासंबंधीं अभिमान बाळगणारा एवढा मोठा समाज आहे, याची आपल्यापैकीं कितीजणांना माहिती आहे ? निदान मला तरी नव्हती. एका वर्षापूर्वी, माझ्या एका डॉक्टरमित्रांना पर्शियन भाषेचें दुर्मिळ झालेलें एक पुस्तक हवें होतें, म्हणून एका सेकंडहँड पुस्तकांच्या दुकानांत मी सहज गेलों

असतां तेथें 'मराठा एज्युकेशन फंड' चा १९३७ सालीं प्रसिद्ध झालेला Silver Jubilee Souvenir दिसला व तो मीं विकत घेतला. घरीं आल्यावर त्यांतील या महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रांतील मराठी भाषेच्या धडपडीचा वृत्तांत वाचून मी आश्चर्यचकित झालों. या लोकांच्या आम्हीं आतांपर्यंत केलेल्या उपेक्षेबद्दल मला लाज वाटली. मला या गोष्टीची मुळींच जाणीव नव्हती, असें मात्र नाहीं. महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्रीयांशीं संपर्क घडवून आणण्याची आवश्यकता कारवारच्या साहित्यसंमेलनांतील अध्यक्षीय भाषणांत मीं जोरानें प्रतिपादन केलेली पुष्कळांनीं वाचली असेल. "मुंबई–पुण्यासारख्या मोठ्या शहरांत संमेलनें भरविणें सोपें असलें, तरी अशा ठिकाणीं तीं पुनः पुनः न भरवितां ज्या ठिकाणीं संमेलनानें मुळींच पाऊल टाकलेलें नाहीं, अशा जागीं हा साहित्यसोहळा साजरा होईल, अशाप्रकारची व्यवस्था करणें यापुढें युक्त होईल. दिल्लीमध्यें महाराष्ट्रीयांची बरीच वसती आहे. अशा ठिकाणीं एकादें वर्षीं आपलें संमेलन कां भरू नये?...अशाच प्रकारें धारवाड, मंगळूर अशा कर्नाटकांतील भागांत महाराष्ट्र साहित्यसंमेलन भरविल्यास तिकडील महाराष्ट्रीयांमध्यें मराठीसंबंधीं आत्मीयता जागृत करण्यास त्यांची फार मदत होईल," असे मीं उद्गार काढले होते. त्याप्रमाणें अहमदाबाद व दिल्ली येथें अनुक्रमें गेल्या वर्षीं व यंदा मराठी साहित्य संमेलनें भरलीं हें पाहून मला संतोष झाला; परंतु याहीपेक्षां तंजावर, बंगलूर, मद्रास या भागांत तीं भरण्याची जास्त निकड आहे यांत शंका नाहीं.

आपली स्वतःची भूमि सोडण्यास ज्या कांहीं गोष्टी कारणीभूत होतात, असें वर सांगितलें, त्यांपैकीं दुष्काळ किंवा धर्मच्छळ यांचा विचार करण्याचा राहिला. रा. ब. आर्. कृष्णराव भोंसले हे दक्षिणेंतील महाराष्ट्रीयांच्या वसतीसंबंधीं लिहितात, "South Canara and Malabar, Cochin and Travancore were probably colonised from the coast and these settlements had little or no connection with the political domination established in the middle of the seventeenth century by Shahaji and his sons".

या वसतीच्या मुळाशीं दुष्काळ व धर्मच्छळ हीं कारणें असावींत, असें मला वाटतें. दुष्काळासंबंधीं निश्चित सांगतां येत नाहीं; परंतु मंगळूर, कोचीन वगैरे भागांत गोमंतकांतील पुष्कळ कुटुंबें पोर्तुगीज धर्मछळाच्या वेळीं गेलीं, हें प्रसिद्धच आहे. तीं केवळ हिंदूच नव्हे, तर नुकतीच बाटविलेलीं खिस्ती कुटुंबेंही त्यांत पुष्कळ आहेत; कारण इंक्विझिशनचा धाक हिंदूंपेक्षाही खिस्ती लोकांनाच जास्त होता.

खिस्ती धर्मान्तराच्या कार्यांत अडथळा आणल्याच्या आरोपाखालीं हिंदु लोकांना इंक्विझिशनला साधी शिक्षा देतां येई; परंतु त्यांना जीवंत जाळण्याचा

इंक्विझिशनला अधिकार नसे. एकाद्या ख्रिस्ती माणसाला जुन्या धर्माच्या चाली-रीती पाळल्याबद्दल शिक्षा झाल्यावर त्याला जीवंतही जाळण्यांत येई व त्याची अर्धी मालमत्ता इंक्विझिशनला व अर्धी फिर्यादीला मिळे; त्यामुळें प्रत्येक ख्रिस्ती माणसाचें जीवित पोर्तुगीजांच्या मुलखांत नेहमींच धोक्यांत असे. केव्हां कोणता माणूस खासगी द्वेषानें किंवा अर्धी संपत्ति मिळविण्याच्या लोभानें इंक्विझिशनकडे आपली कागाळी करील, हें सांगणें कठीण होतें. खुद्द आपल्या नवऱ्यानें, प्रॉटेस्टंट पंथाचे ग्रंथ जवळ बाळगल्याची इंक्विझिशनकडे कागाळी करून एका बाईनें त्याची अर्धी संपत्ति मिळविल्याची हकीकत, फ्रांसो पिरार्ड यानें आपल्या प्रवासवर्णनांत दिली आहे. हिंदु लोकांना तर गोवें सोडून जाण्याबद्दल वेळोवेळीं फर्मानें निघालीं होतीं. अशा गोव्यांतून नेलेल्या देवांच्या कितीतरी मूर्ती कोचीनला असल्याचें कळतें. कोंकणी बोलणारे तिकडील सगळे ख्रिस्ती व हिंदु लोक मूळ गोमंतकांतील आहेत. ख्रिस्ती लोकांना त्यांचीं हिंदु आडनांवें आजही माहीत आहेत; परंतु गोव्यांतील ख्रिस्ती लोक तीं विसरलेले दिसतात. कांहीं महिन्यांपूर्वीं श्री. एच्. एल्. कामत नांवाचे गांगोळी ( South Kanara ) येथील एक वृद्ध गृहस्थ मला भेटावयाला आले. त्यांचें मराठीचें ज्ञान चांगलेंच दिसलें. मूळ महाराष्ट्रापासून इतके लांब असतांना आपण इतकें मराठीचें ज्ञान कोठून मिळविलें असा मीं त्यांना प्रश्न केला असतां, आपण ' केसरी ' मागवीत होतों व तिकडील लोक मराठीच धर्मग्रंथ वाचीत असतात, असें त्यांनीं मला सांगितलें. दक्षिण कॅनरामध्यें कांहीं चित्पावन ब्राह्मणांचीं घराणींही असल्याचें कळतें. तीं मात्र दुष्काळासारख्या कारणानें तिकडे गेलीं असावींत; कारण खुद्द गोव्यांत त्या काळीं चित्पावन लोकांची वस्ती होती, असें वाटत नाहीं.

अशा या सर्व महाराष्ट्राबाहेरील महाराष्ट्रीयांशीं पुनः संबंध जोडण्याकरितां वक्ते, कीर्तनकार आणि एक मराठी नाटकमंडळी बरोबर घेऊन त्या भागांत जाणें अवश्य आहे. निदान त्यापूर्वीं कांहीं मंडळींनीं तिकडे जाऊन या महाराष्ट्रीयांची पाहणी करावी, अशी माझी सूचना आहे. एकादें मराठी साहित्य-संमेलन त्या भागांत भरविण्याची व्यवस्था झाल्यास पुष्कळ कार्यभाग आपोआपच साधेल. श्री. काकासाहेब गाडगीळांनीं दिल्ली येथील मराठी संमेलनाकरितां रेल्वेची सवलत जी यंदा मिळविली आहे, ती प्रथा अशीच चालू राहिल्यास या दूरच्या भागाचें आर्थिक अंतर अर्धें झालें, असें म्हणावयास हरकत नाहीं. तिकडे संमेलन भरविल्यास आंतल्या महाराष्ट्रांतील पुष्कळ लोक मोठ्या आनंदानें या महाराष्ट्राबाहेरच्या महाराष्ट्राला भेट देतील.

—विविधवृत्त, दिवाळी अंक १९५४

१४४०३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७१४९८ वि: निबंध
क्रमांक १८९६ नों. दि: २।६।१२।६०

REFBK-0014403



प्रा. अ. का. प्रियोळकर ह्यांचें नांव महाराष्ट्रांतील आजकालच्या ज्येष्ठ संशोधकांमध्यें अग्रभागीं घेतलें जातें. रा. ब. दादोबा पांडुरंगांचें त्यांनीं लिहिलेलें चरित्र व त्यांच्या आत्मचरित्राचें केलेलें संपादन, रघुनाथपंडिताचें नलदमयंतीस्वयंवराख्यान, मुक्तेश्वराचें महाभारत–आदिपर्व इत्यादि ग्रंथांचें त्यांचें संपादनकार्य अशाप्रकारच्या संशोधनांतील नमुनेदार व उच्च प्रतीचें समजलें जातें. त्यांच्या मार्गदर्शनाखालीं मराठींत Ph. D. झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आज मुंबईत सर्वांत मोठी आहे. 'The Printing Press in India' व 'The Goa Inquisition' हीं त्यांनीं इंग्रजींत लिहिलेलीं पुस्तकें जगन्मान्य झालीं आहेत.

प्रियोळकरांनीं प्रसंगोपात केलेलें कांहीं संशोधनपर स्फुट लेखनकार्यहि तितकेंच महत्त्वाचें असून चिकित्सा, चिकाटी व विचारमंथन या तिहींचा त्यांत मोठा आकर्षक समन्वय आढळतो. त्यांतल्या अत्यंत परिश्रमपूर्वक मांडलेल्या विचारांमुळें वेळोवेळीं ते विद्वानांच्या व सामान्य वाचकांच्या चर्चेचा विषय ठरले आहेत. संशोधक प्रियोळकर किती खुसखुशीत, प्रसंगीं उपहासपर व लालित्यपूर्ण लिहूं शकतात, त्याचें प्रत्यंतर या लेखांतून येईल.

त्यांच्या लेखांच्या या निवडक संग्रहामुळें हा ग्रंथ नव्या–जुन्या पिढीला एक मोठा ठेवा वाटेल. अर्थातच ही माहिती वाचकांना त्याच्या नांवाप्रमाणेंच कांहीं ठिकाणीं वाटेल–प्रिय आणि अप्रिय.

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

१३२० शुक्रवार : पुणें २